पुणें शहर म्युनिसिपालिटीचा

# वार्षिक अहवाल.

## सन १९३२—३३

पुणें.

१९३४.

जनरल रिपोर्टासोबतच्या तक्त्यांतील पानें २१ ते २४ व आरोग्यखात्याचा अहवाल पानें १ ते १६ श्री. अनंत विनायक पटवर्धन यांनीं आर्यभूषण प्रेस, भांबुर्डा घ. नं. ९३६।२ येथें छापलीं व बाकीच्या रिपोर्टाचीं सर्व पानें पुणें पेठ शुक्रवार घर नंबर ८७० येथें म्युनिसिपालिटीच्या छापखान्यांत छापून विश्रामबाग वाड्यांत सदाशिव पेठ घर नंबर ७९६ येथें रा. शं. रा. भागवत, एल्. सी. ई., चीफ ऑफिसर, यांनीं प्रसिद्ध केलीं.

# पुणें शहर म्युनिसिपालिटीच्या सन १९३२-३३ च्या वार्षिक अहवालाची अनुक्रमणिका.


| अनुक्रम नंबर. | विषय. | पानें. |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण रिपोर्ट ... ... ... ... ... | १ ते ४७ |
| २ | परिशिष्ट तक्ता नं. १-सन १९३२।३३ मधील म्युनिसिपालिटीची घटना ... | १ |
| ३ | " " नं. २-जमा ... ... ... ... | २ ते ४ |
| ४ | " " नं ३- खर्च ... ... ... ... | ५ ते ७ |
| ५ | " " नं. ४-जकातीचें उत्पन्न ... ... ... | ८ ते १० |
| ६ | " १-अ-जनरल कमिटीच्या सभा ... ... ... | ११ ते १२ |
| ७ | " १-ब-जनरल व स्टँडिंग कमिटीच्या सभा... ... ... | १३ |
| ८ | " १-क-जनरल कमिटीच्या सभांस जे सभासद हजर होते त्यांची हजिरी दाखविणारा तक्ता ... ... ... | १४ ते १५ |
| ९ | " १-ड-स्टँडिंग कमिटी,-स्कूल कमिटी व स्कूल बोर्ड यांच्या सभांस जे सभासद हजर होते त्यांची हजिरी दाखविणारा तक्ता आणि सब् कमिटीच्या सभासदांचा तक्ता ... ... | १६ ते २० |
| १० | परिशिष्ट २-अ-मालाची एकूण व नक्की झालेली आयात व त्यावर वसूल केलेली जकात ... ... ... ... | २१ ते २३ |
| ११ | परिशिष्ट ३--ब-कर्जें... ... ... ... ... | २४ ते २७ |
| १२ | परिशिष्ट ७-ब -जमिनींची खरेदी व अदलाबदल केलेल्या जमिनी ... | २८ ते ३२ |
| १३ | परिशिष्ट ७-क-विकलेल्या जमिनी ... ... ... ... | ३३ |
| १४ | परिशिष्ट ९-करांची जमा व बाकी ... ... ... ... | ३४ ते ३५ |
| १५ | परिशिष्ट १०-स्कॉलरशिपांच्या देणग्यांच्या गुंतविलेल्या रकमा ... ... | ३६ |
| १६ | परिशिष्ट १०-ब-कर्जरोख्यांत गुंतविलेल्या रकमांचें टिपण ... ... | ३७ ते ४३ |
| १७ | सन १९३२-३३ सरकारला देणें असलेल्या रकमा व मध्यें दिलेल्या रकमा यांचा तक्ता ... ... ... ... | ४४ ते ४५ |
| १८ | परिशिष्ट १३-म्युनिसिपल करांच्या बाक्या ज्या सभासदांकडून येणें राहिल्या त्यांचा तक्ता ... ... ... ... | ४६ |
| १९ | परिशिष्ट-डी-सन१९३२-३३ मध्यें झालेल्या निवडणुकीची माहिती ... | ४७ |
| २० | परिशिष्ट-ई-म्युनिसिपालिटीचे दवाखाने इस्पितळें यांबाबत झालेल्या खर्चाचें एकूण खर्चावर शेंकडा प्रमाण दाखविणारा तक्ता ... | ४८ |
| २१ | परिशिष्ट-एफ्- चाकपट्टी व टोलपट्टी यांचें उत्पन्न व नवीन रस्ते करणें ( रस्तारुंदी व सेट बॅक धरून ) व दुरुस्त करणें यांवर झालेला खर्च दाखविणारा तक्ता. ... ... ... ... | ४९ |
| २२ | परिशिष्ट-जी- सन १९३२-३३ मधील म्युनिसिपालिटीची सांपत्तिक स्थिति. ... | ५० |

| अनुक्रम नंबर. | विषय. | पानें. |
|---|---|---|
| २३ | परिशिष्ट–एच्–सन १९३२–३३ मधील म्युनिसिपालिटीच्या करांच्या बाकीचा तक्ता | ५१ |
| २४ | सन १९३१-३२ सालचे पुणें शहर म्युनिसिपालिटीचे हिशेबावरील तपासणीचें टिपण व त्यांचीं उत्तरें ... ... ... | १ ते ५७ |
| २५ | आरोग्य खात्याचा अहवाल ... ... ... ... | १ ते १६ |
| २६ | स्कूलबोर्डाचा अहवाल ... ... ... ... | |
| | ( अ ) चेअरमन स्कूलबोर्ड यांचा रिपोर्ट ... ... | १ ते २ |
| | ( ब ) अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांचा रिपोर्ट ... ... | ३ ते ११ |
| | ( क ) प्राथमिक सक्तीचे शिक्षणाबाबत वृत्तांत ... ... | १२ ते १३ |
| | ( ड ) मुसलमान समाजांतील शिक्षणाची प्रगति ... ... | १४ ते १५ |
| २७ | सक्तीच्या शिक्षणासंबंधीं माहितीचे तक्ते १ ते ५ ... ... | १६ ते १९ |
| २८ | परिशिष्ट १–विद्यार्थ्यांची जातवारी ... ... ... ... | २० |
| २९ | „ १ ( अ व ब )—वयवारी व सामाजिक परिस्थिति ... ... | २१ |
| ३० | „ १ ( क ) पालकांचे धंदे ... ... ... ... | २२ |
| ३१ | „ १ ( ड )—प्राथमिक शाळांतील पटावरील सरासरी संख्या व सरासरी हजेरी ... ... ... ... | २३ |
| ३२ | „ २ —शिक्षकांची वर्गवारी ... ... ... ... | २४ |
| ३३ | „ २ ( अ ) —ट्रेंड शिक्षक ... ... ... ... | २४ ते २६ |
| ३४ | „ ३—जमेचा तक्ता ... ... ... ... | २७ |
| ३५ | „ ४—खर्चाचा तक्ता ... ... ... ... | २८ ते २९ |
| ३६ | „ २ ( ब ) वार्षिक परिक्षांचे निकाल ... ... ... | ३० ते ३३ |
| ३७ | „ ६—( अ व ब ) दिवसाच्या प्राथमिक शाळांतील पटावरील मुलांची संख्या, हजेरी वगैरे ... ... ... ... | ३४ ते ३७ |
| ३८ | „ ७ ' अ " वर्ग शाळा–खासगी मदतीच्या दिवसांच्या व रात्रींच्या शाळांची पटावरील संख्या वगैरे ... ... ... | ३८ ते ४० |
| ३९ | „ ७ अ "ब" वर्ग शाळा–दिवसाच्या व रात्रीच्या शाळांतील पटावरील मुलें, हजेरी वगैरे ... ... ... ... | ४१ |
| ४० | स्कूल्स कमिटीचा रिपोर्ट ... ... ... ... | १ ते ५ |
| ४१ | मोफत वाचनालयास ग्रँट दिली त्याचा तक्ता ... ... ... | ६ |
| ४२ | परिशिष्ट १–जमेचा तक्ता ... ... ... ... | ७ |
| ४३ | „ २—खर्चाचा तक्ता ... ... ... ... | ८ |


पुणें शहर म्युनिसिपल ऑफिस
तारीख १० मार्च १९३४

**शं. रा. भागवत,**
चीफ ऑफिसर,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

# पुणें शहर म्युनिसिपालिटीचा
# वार्षिक अहवाल.

---

## सन १९३२-३३.

---

नंबर ४२४३, सन १९३३-३४ चा.
पुणें शहर म्युनिसिपल ऑफिस.
ता. २० जुलै १९३३.

मे० डी. मॅक्लॅकन,
आय्. सी. एस्.
कलेक्टर, पुणें;
यांजकडेः—

रा० ब० हणमंतराम रामनाथ,
अध्यक्ष, पुणें शहर म्युनिसिपालिटी,
पुणें;
यांजकडूनः—

विषयः—पुणें शहर म्युनिसिपालिटीचा वार्षिक अहवाल.

पुणें शहर म्युनिसिपालिटीचा सन १९३२-३३ चा वार्षिक अहवाल आपल्या माहितीकरितां पाठवीत आहे. तो नेहमींप्रमाणें सरकारकडे पाठविण्यांत यावा.

## १ लोकसंख्या व हद्दी यांमधील फेरफार.

१ (अ) सन १९३१ सालच्या खानेसुमारीप्रमाणें लोकसंख्या १,६२,९०१ आहे; त्यांत आक्टोबर सन १९३१ पासून पर्वती गांव पुणें शहरच्या हद्दींत आल्याकारणानें तेथील लोकसंख्या ३६६ इचा समावेश करण्यांत आला आहे, म्हणून पुणें शहराची एकंदर लोकसंख्या १,६३,२६७ आहे, व या रिपोर्टाच्या कामीं दर्दे प्रकारच्या माहिती करितां हीच लोकसंख्या आधारभूत धरली आहे.

(ब) अहवालाचें सालीं पुणें शहराचें पश्चिम हद्दींमध्यें फरक झाला आहे. लकडीपूलाचे नैऋत्येकडील बाजूचे सुमारें पांच फर्लांग लांबचें नदीचे पात्र याचा या शहराचें हद्दींत सरकारी ठराव, जनरल डिपार्टमेंट, नं. ५९१४ ता. २२-३-१९३३ नें समावेश करण्यांत आला. या भागाचा सन १९३१ मध्यें मंजूर झालेल्या नगररचनेच्या योजनेंतच समावेश करण्यांत आला होता व म्हणून नदीचा हा भाग शहराच्या हद्दींत समाविष्ट करण्यांत आला आहे.

## २ तक्ता नं १ संबंधीं माहिती.

२. या सालीं जनरल कमिटीच्या सभा ६४ भरल्या. गतवर्षी ९१ भरल्या होत्या. यासालीं ५४४ विषयांचा निकाल झाला. सन १९३१–३२ सालांत ही संख्या ९०४ होती. या एकंदर ६४ सभांपैकीं कायद्यांत सांगितल्याप्रमाणें चार सभा त्रैमासिक साधारण सभा होत्या. त्या एप्रिल, जुलै, आक्टोबर १९३२ व जानेवारी १९३३ मध्यें भरल्या. खास सभा १५ व ४५ सभा तहकूब सभा होत्या. तसेंच अहवालाच्या सालीं स्टँडिंग कमिटीच्या ६४ सभा बोलावण्यांत आल्या. त्यांपैकीं चार सभा कोरमच्या अभावीं तहकूब करण्यांत आल्या. या सभांमध्यें हजर असलेल्या सभासदांची माहिती परिशिष्ट १ (ब), १ (क) व १ (ड) मध्यें दिली आहे.

## ३ म्युनिसिपल सभासदांमध्यें फेरफार.

ह्या म्युनिसिपालिटीची त्रैवार्षिक निवडणूक ता. २७ फेब्रुवारी १९३२ रोजीं झाली. पूर्वीच्या लोकनियुक्त ४५ सभासदांपैकीं २७ पुन्हां निवडून आले, ९ निवडणूकींत अयशस्वी झाले व ९ निवडणुकीस उभे राहिले नाहींत. नवीन निवडून आलेल्या १७ सभासदांपैकीं ४ सभासद सन १९२८ पूर्वी लोकनियुक्त सभासद होते. सरकार नियुक्त ५ सभासदांपैकीं ३ पुन्हां नेमले गेले. एक सभासद निवडणुकींत अयशस्वी झाल्यानंतर त्याना सरकारतर्फे नेमण्यांत आलें व एक नवीनच सरकारकडून नेमून आले.

नवीन निवडून आलेल्या सभासदांचे व्यवसाय खालील प्रमाणें आहेत:—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| व्यापारी | ... | ... | ... | ... | २२ |
| कॉंट्रॅक्टर्स | ... | ... | ... | ... | ७ |
| वकील | ... | ... | ... | ... | ७ |
| डॉक्टर | ... | ... | ... | ... | ३ |
| संपादक | ... | ... | ... | ... | २ |
| शेतकरी | ... | ... | ... | ... | २ |
| प्रोफेसर | ... | ... | ... | ... | १ |
| इनामदार | ... | ... | ... | ... | १ |
| किरकोळ | ... | ... | ... | ... | ४ |
| पेन्शनर | ... | ... | ... | ... | १ |

नवीन निवडून आलेल्या सभासदांची मुदत ता. ८ एप्रिल १९३२ पासून सुरु झाली व त्या तारखेस पहिली सभा भरविण्यांत आली.

श्री. वा. भा. फुले हे ता. ५ डिसेंबर १९३२ रोजीं वारल्यामुळें सदाशिव पेठेची पोट निवडणूक ता. ११ फेब्रुवारी १९३३ रोजीं झाली. त्यावेळीं त्यांचे जागीं श्री. ना. कृ. झांजले निवडून आले.

अहवालाच्या सालीं सर्व वर्षांत डॉ. रा. कृ. नायडू अध्यक्ष, श्री. के. अ. भगत उपाध्यक्ष, व डॉ. डी. के. गोरे, हे स्टँडिंग कमिटीचे चेअरमन होते.

४. कार्यकारी व सल्लागार कमिट्यांमधील सभासदांची नांवें व सभांस हजर राहिल्यांची माहिती परिशिष्ट १ ड मध्यें दिली आहे.

## ३. कर वसुलीच्या पद्धतींत फेरफार.

५. सन १९३२–३३ सालांत कर वसुलीच्या पद्धतींत फेरफार झाला नाहीं.

## ४. नमुना नंबर २ मधील तक्त्यासंबंधीं माहिती.

१. अह्वालाच्या सालीं वर्षारंभीं स्कूल बोर्डाची शिल्लक धरून एकंदर शिल्लक रु. १,२५,०१५ होती. जमा रु. २५,९५,१९१ झाली. दोन्ही मिळून रक्कम रु. २७,२०,२०६ झाली. या व पुढील प्याऱ्यामध्यें जी जमा दाखविली आहे ती सरकारी ग्रँट व कर्ज धरून नक्की जमा आहे. जकातीची वसूल केलेली व मागाहून परत दिलेली रक्कम या जमेमध्यें धरली नाहीं. ( सरकारी ठराव, जनरल डिपार्टमेंट, नं. ११७४ ता. १९-२-१९०७ पहावा ) या सालाची जमा पुढील रकमा मिळून झाली आहे.

| | | १९३१–३२ | १९३२–३३ |
|---|---|---|---|
| (अ) | म्युनिसिपल कर ... | ११,०८,६१८ | ११,८५,४७५ |
| (ब) | स्पेशल कायद्याखालीं उत्पन्न ... | ६,०५३ | ५,८२६ |
| (क) | मालमत्ता व अधिकार यांपासून उत्पन्न. | १,५५,२०३ | १,५१,११४ |
| (ड) | ग्रँट ( मदत )... ... | २,५५,३१४ | २,३७,८६६ |
| (इ) | किरकोळ ... ... | १,३५,९३३ | १,३३,१९० |
| | | १६,६१,१२१ | १७,१३,४७१ |
| (एफ्) | विशेष उत्पन्न व कर्जे ... | १०,६९,६५३ | ६,७५,८८७ |
| | अमानत ... ... | ३,७०,३९१ | २,०८,५३३ |
| | | ३०,९७,१६५ | २५,९५,१९१ |

" विशेष उत्पन्न व कर्जे " हीं वगळून या सालचें उत्पन्न गेल्या सालाहून रु. ५२,३५० नें वाढलें आहे. याचें कारण ( अ ) म्युनिसिपल करांच्या उत्पन्नांत वाढ झाली आहे.

(अ) जकातः—जकातीची माहिती एका स्वतंत्र भागांत दिली असल्यानें त्या खात्याच्या कारभाराची जास्त माहिती तेंथेंच देण्यांत येईल.

(ब) घरपट्टीः—रु. २,०२,४०७ ( १९३१–३२ ) रु. २,२२,६५९ ( १९३२–३३ ) जास्ती रु. २०,२५२.

(१) कांहीं पेठांची रिव्हिजन ( फेर-आकारणी ) झाल्यामुळें, (२) रक्कम वसूल करण्याकरितां जास्त कडक उपाय योजल्यामुळें व (३) सरकारी इमारतीवरील घरपट्टीची रक्कम वसूल केल्यामुळें ही वाढ झाली आहे.

सॅनिटरी सेसः—

| | १९३१–३२ | १९३२–३३ | |
|---|---|---|---|
| भंगीपट्टी व विन पायखानापट्टी... | ३३,२६० | २८,२२७ | कमी ५,०३३ |
| ड्रेनेज व सेसपूल पट्टी ... | १,३४,६२० | १,५३,३४१ | जास्ती १८,७२१ |

भंगीपट्टीच्या एकंदर रुपये २८,२२७ च्या जमेपैकीं खाजगी पायखान्यांच्या भंगीपट्टीचे रुपये १६,५५२ व विन पायखाना पट्टीचे रु. ११,६७५ आहेत. या विन पायखानापट्टीचा विनियोग सार्वजनिक पायखाने साफ करण्याकडे होतो. पाटीच्या पायखान्यांच्या जागीं फ्लशिंग पायखाने झाल्यामुळें भंगीपट्टी रु. ५,०३३ नें कमी आली आहे. कारण फ्लशिंग पायखान्यांना भंगीपट्टी माफ आहे.

सर्व पेठांत ड्रेनेजचें काम चालू असल्यामुळें ड्रेनेज कुंड्या पुष्कळ जास्त झाल्या व त्यामुळें ड्रेनेज टॅक्समध्यें रु. १८,७२१ वाढ झाली आहे.

| | | १९३१–३२ | १९३२–३३ | |
|---|---|---|---|---|
| गाडीपट्टीः— | ... | २३,९७३ | ३४,४५९ | वाढ १०,४८६ |

सार्वजनिक वाहनांवरील कर पोलीस खात्याकडून वसूल होत असल्याकारणानें व या साली तो जास्त वसूल झाल्याकारणानें उत्पन्न जास्त झालें. मोटार गाड्या धरून खाजगी वाहनांचें उत्पन्न १९३१–३२ मध्यें रु. ८,७८३ होतें तें १९३२–३३ मध्यें रु. ८,४५७ पर्यंत खालीं उतरलें.

( क ) धंदे व व्यापार यांवरील करः—रु. १४,४४३ ( ३१–३२ ). रु. १४,६९७ ( ३२–३३ ). वाढ रु. २५४. वाजंत्री पासाचें उत्पन्न २,९३७ रु. झालें. मागल्या वर्षी रु. २९८८ झालें होतें. करमणुकीवरील करांचें उत्पन्न ६,१८६ रु. झालें. मागल्या वर्षी रु. ६२२१ झालें होतें. हॉटेलवरील फीचें उत्पन्न रु. ५,२३५ पासून ५,५७३ रु. पर्यंत वाढलें.

( ड ) पाणीपट्टीः—

| १९३१–३२ | १९३२–३३ |
|---|---|
| रु. १,५३,६५५ | १,६१,०७३ जास्ती रु. ७,४१८ |

फ्लशिंग पायखान्यांस नवीन नळ द्यावे लागल्यामुळें नळांची संख्या वाढली. त्यामुळे पाणीपट्टी जास्त आली.

करांची मागील बाकी किती वसूल झाली याचा तपशील या अहवालाच्या परिशिष्ट ९ मध्यें दिला आहे. वाद्यांवरील कर हा लायन्सेसवजा असल्यामुळें त्याचा सदर परिशिष्टांत समावेश केला नाहीं.

( ई ) विशेष कायद्याअन्वयें उत्पन्नः—रु. ६,०५३ ( ३१–३२ ); रु. ५,८२६ ( ३२–३३ ) कोंडवाड्याचें उत्पन्न कमी झाल्यामुळें रु. २२७ कमी आले.

( एफ् ) जमिनी व घरें यांच भाडेंः—रु. ३२,६२० ( ३१–३२ ); रु. २९,३८९ ( ३२–३३ ); ३,२३१ रु. कमी. ही तूट मुख्यत्वें शाळा इमारतीचें भाडें कमी आल्यामुळें झाली आहे; कारण बजेटांत सदर बाबीच्या रकमेंत मोठी कपात करण्यांत आली.

( जी ) जमिन विक्री व जमिनीच्या उत्पन्नाची विक्री यांचें उत्पन्नः—रु. ८३७ ( १९३१–३२ ); रु. ८३० ( १९३२–३३ ). ७ रु. कमी.

( एच् ) खताचें उत्पन्नः—रु. ८,२७३ (१९३१–३२), रु. ८,३०० (१९३२–३३) रु. २७ वाढ.

( आय् ) शाळांची फी व इतर शिक्षण संस्था यांचें उत्पन्नः—रु.५,२२३ (३१–३२); रु. ४,८०६ ( ३२–३३ ). डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाकडून लोकलफंड सेसची रकम कमी आल्यामुळें रु. ४१७ नें उत्पन्न कमी झालें. रु. ९९५ ( १९३२–३३ ) व रु. २०१२ सन १९३१–३२ मध्यें.

( जे ) मार्केट व कसाईखाने यांची फी व इतर उत्पन्नः—रु. ७४,५२६ (३१–३२); रु. ७४,७८० ( १९३२–३३ ). रु. २५४ ची वाढ 'रे मार्केट' च्या उत्पन्नांतील वाढीमुळें झाली आहे.

( के ) म्युनिसिपल ॲक्टाप्रमाणें वसूल केलेली फीः—

( १ ) नक्कल व रुजवात फीः—रु. ४४६ ( ३१–३२ ); रु. ४७३ ( ३२–३३ ). रु. २७ जास्त. नेहमीं कमी जास्त होणारी ही बाब आहे.

( २ ) म्युनीसिपल जागा तात्पुरती अडविण्याबद्दल फी:—रु. ३,६७४ ( १९३१-३२ ). रु. ४,५८९ ( १९३२-३३. ) जास्त रु. ९१५.

( एल् ) म्युनिसिपल व पोलीस कायद्याखालीं दंड:—रु. ८,४०८ ( १९३१-३२ ), रु. ६,४१३ ( १९३२-३३ ) कमी रु. १,९९५ म्युनिसिपल व पोलीस कायद्याखालीं खटले कमी करण्यांत आल्यामुळें उत्पन्न कमी आलें.

( एम् ) ठेवी व कर्जरोखे यांवरील व्याज:—रु. ११,४४२ ( १९३१-३२ ); रु. १२,७७४ ( १९३२-३३ ). जास्ती रु. १३३२ नेहमीं कमी जास्त होणारा बाब आहे.

( एन् ) सरकारी व इतर मदत:—रु. २,५५,५१४ (१९३१-३२); रु. २,३७,८६६ ( १९३२-३३ ) कमी रु. १७,६४८. या सालीं नवीन ड्रेनेज योजनेकरितां रु. ९६,०१० ची मदत मिळाली. सन १९३१-३२ मध्यें हीच मदत ७१,७०० रु. ची मिळाली होती. शिक्षणाची ग्रँट चालू सालीं रु. १,२५,२५८ मिळाली. गेल्या सालीं रु. १,४४,३२९ मिळाली होती. डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाकडून १९३२-३३ सालांत प्राथमिक शिक्षणाकरितां ग्रँट मिळाली नाहीं.

( ओ ) खाजगी लोकांकरितां केलेल्या कामाची जमा:—रु. १८,३२४ (१९३१-३२) रु. १६,५६० ( १९३२-३३ ), या सालीं खाजगी ड्रेनेज कुंड्यांचें काम कमी झालें म्हणून रु. १,७६४ कमी आले.

( पी ) इतर बाबी:—रु. ४,५७४ ( ३१-३२ ), रु. २,९७१ ( १९३२-३३ ). रु. १,६०३ कमी; कारण लोकांस देणें असलेल्या लहान लहान रकमा त्यांनीं नेल्या नाहींत. म्हणून म्युनिसिपल खजिन्यांत जमा होतात, अशा रकमा या सालीं कमी जमा करण्यांत आल्या.

( पी १ ) म्युनिसिपल कारखाना, छापखाना, स्टोअर व मोटार खातें यांचें उत्पन्न:— रु. १,१३,०३५ ( १९३१-३२ ), रु. १,१३,६५९ ( १९३२-३३ ) स्टोअर खात्यांकडून जास्त उत्पन्न आल्यामुळें रु. ६२४ ची वाढ झाली आहे.

( क्यू ) या सालचें असाधारण उत्पन्न:—जमीन विक्री रु. ७८,७३२ ( १९३१-३२) मध्यें झाली होती. ती या सालीं रु. ८६,४७५ झाली. ( जमीन विक्रीचा तपशील परिशिष्ट ७ ब मध्यें दिला आहे. ) चालू सालीं सरकारी मंजुरीनें ड्रेनेजचे कामाकरतां रु. ९०,००० चें कर्ज नागरिकांकडून काढण्यांत आलें. रु. ७७,६८८ ची रकम टाउन -प्लॅनिंग स्कीममधील जमिनीचे सुधारणेबद्दल ( बेटरमेंटबद्दल ) वगैरे वसूल झाली. सरकारी कर्जरोखे विकून व बँकेतून ठेवी काढल्यामुळें रु. ४,५३,५४२ जमा झाले.

( आर ) इतर तसलमाती:—रु. १,२९,६५० ( १९३१-३२ ); रु. ४७,३२९ ( १९३२-३३ ).

( एस् ) अमानती:—रु. २,४०,७४१ ( १९३१-३२ ); रु. १,५८,५०४ ( १९३२-३३ ). कमी रु. ८२,२३७ ही घट देवघेवीमधील नेहमीं होणाऱ्या फरकामुळें झाली आहे.

## ५ जकातीचा कारभार.

या म्युनिसिपालिटीच्या अंमलाखालीं असलेल्या जकात टापूमध्यें शहर म्युनिसिपालिटी, सबर्बन म्युनिसिपालिटी, पुणें लष्कर व खडकी लष्कर यांच्या हद्दींचा समावेश होतो. खडकी लष्कराची हद्द या टापूमध्यें ता. १-१०-१९११ पासून प्रयोगादाखल घेण्यांत आली. ही व्यवस्था सरकारी ठराव नं. ८८२८

[ आर. डी. ] तारीख २८–४–३३ नें ता. ३० जून १९३३ पर्यंत चालू ठेवण्यांत आली. या हद्दीचा वेगळा हिशेब ठेवण्यांत येतो. व खडकी हद्दींत आयात झालेल्या सर्व मालावरील जकात, खर्च वजा जातां, तेथील अधिकाऱ्यांकडे दरमहा पाठविण्यांत येते. बाकीच्या भागासंबंधीं मंजूर दरवारीप्रमाणें जकात टापूमध्यें आयात होणाऱ्या मालावर ही म्युनिसिपालिटी जकात वसूल करते. नंतर एकंदर उत्पन्नांतून आयात झालेल्या मालापैकीं निर्गत झालेल्या मालाच्या रिफंडची रक्कम आणि त्याचप्रमाणें नोकरवर्गांचा व इतर खर्च वजा करून राहिलेलें नक्की उत्पन्न सरकारी ठराव नं. ४६५३ ता. ९–११–१८९५ नें मंजूर झाल्याप्रमाणें तीन म्युनिसिपालिट्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत वाटलें जातें. म्हणून याखालीं दिलेले आंकडे सर्व जकातीच्या टापूसंबंधींचें आहेत व तक्ता नं. ४ आणि परिशिष्ट २ अ मध्यें दिलेले आंकडे फक्त पुणें शहर-संबंधीं आहेत असें समजावें.

खडकी बोर्डाला दरसाल ११,००० रु. ची ठराविक रक्कम देण्याच्या अटीवर खडकी लष्कराची हद्द या जकात टापूमध्यें कायमची अंतर्भूत करण्यांत यावी अशी योजना मे. कलेक्टरसाहेब, पुणें, यांचेकडे ता. ६।१।३२ रोजीं पाठविली होती. परंतु खडकी रेल्वे स्टेशनचा समावेश खडकी लष्कराचें हद्दींत होण्यावर ही गोष्ट अवलंबून आहे. व हा फेरबदल करण्याचें कामीं हिंदुस्थान सरकारची मंजुरी अद्याप यावयाची आहे.

जकात दरवारीमध्यें सुधारणा करण्याचें बाबतींत या म्युनिसिपालिटींत गेलीं सात वर्षें विचार होत आहे. नवीन दरवारीचें मुख्य स्वरूप पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

( १ ) शक्य तो जकातीची आकारणी मालाच्या वजनावर करण्यांत यावी. (२) साखर व ' मार्गस्थ निर्गतीचा माल ' या खेरीज इतर निर्यात होणाऱ्या मालावर जकात रिफंड देण्याची पद्धत मोडण्यांत यावी. सुधारलेल्या दरवारीला सरकारची मंजुरी मिळविण्यासाठीं ता. ६।१०।१९३२ रोजीं सदर दरवारी मे. कलेक्टरसाहेब, पुणें, यांचेकडे पाठविण्यांत आली. परंतु सुधारलेल्या दरवारीबरोबर विचारासाठीं पाठविलेल्या नियमांवर लोकांचे आक्षेप मागविण्यासाठीं वरील सर्व कागद नुकतेच परत आले आहेत.

सन १९३२–३३ सालीं झालेलें जकातीचें एकूण उत्पन्न व शेकडा १० प्रमाणें जकात रिफंडवरील रिबेट धरून रु ८,३४,०२७ चें झालें. ( यांत रु. ११,९४९ खडकी कँटोनमेंट कमिटीस दिलें ते सामील आहेत. ) गतवर्षीं रु. ८,०६,७७३ इतकें उत्पन्न झालें होतें. रु. २७,२५४ नें उत्पन्न जास्त झालें याचें कारण कापड माल, धातू व किरकोळ जिन्नस वगैरे मालाची आयात जास्त झाली.

रु. ८,३४,०२७ इतक्या जमेपैकीं रु. ७१,६३७ निर्यात मालावर रिफंड देण्यांत आले. रु. ७२,९७२ जकातीच्या नोकर लोकांसाठीं खर्च केले. रु. ७,९६४ नाके दुरुस्ती व कचेरी खर्च यावर खर्च पडले. रु. ३१९ पोषाखाकरितां आणि रु. ३,९०९ ग्रॅच्युइटी व प्रॉव्हिडंट फंड देण्याकरितां खर्च करण्यांत आले. रु. ३,५१९ खडकी कँटोनमेंट कमिटीस देण्यांत आले. गतवर्षीं रु. १४,१४२ दिले होते.

त्याप्रमाणें एकूण खर्च रु. १,५८,८१७ झाला. गतवर्षी रु. १,७६,५३९ झाला होता. जकातीच्या एकंदर जमेंतून हा खर्च वजा जातां बाकी राहिलेली रक्कम रु. ६,७५,२१० तीन म्युनिसिपालिट्यांमध्यें विभागण्यांत आली. पुणें शहर म्युनिसिपालिटीच्या हिश्यास रु. ५,१०९६० आले. पुणें कँन्टोनमेंट बोर्डाचा हिस्सा रु. १,१२,०६१ व पुणें सबर्बन म्युनिसिपालिटीचा रु. ५२,१८९ चा होता.

वर उल्लेख केल्याप्रमाणें रक्कम रु. ७१,६३७ सन १९३२–३३ मध्यें निर्यात झालेल्या मालावर रिफंड म्हणून देण्यांत आली, रु. ७७,५०३ गेतवर्षी रिफंड देण्यांत आले होते. रु. ५,८६६ कमी रिफंड झाले. यांच कारण फक्त नोव्हेंबर १९३२ अखेर पर्यंतचाच रिफंड मार्च १९३३ अखेर पर्यंत खर्च पडला आहे.

जकात खात्याच्या एकंदर कामाचे आंकडे वर दिले आहेत. ते जकातीचें एकूण येणारें उत्पन्न व एकंदर जकात खात्याकरितां होणारा खर्च दाखवितात. परंतु तक्ता नं. २ व ३ यांत एकूण उत्पन्न व खर्च यामध्यें फक्त शहर म्युनिसिपालिटीचा जकातीचा किती भाग आहे तें दाखविलें आहे. जकातीच्या नोकर

लोकांकरितां या वर्षी एकंदर उत्पन्नांपैकीं शेकडा ८.७ रक्कम खर्ची पडली. सन १९३१–३२ मध्यें शेकडा ८·९ खर्च आला होता व १९३०–३१ मध्यें शेकडा ८·६ होता.

पुणें शहरांत या सालीं वेगवेगळ्या जिनसांचा दरमाणशीं सरासरी किती खप झाला हें दाखविणारें कोष्टक खालीं दिलें आहेः—

| अ. नंबर | जिनसांचा वर्ग | सरकारनें ठरविलेलें खपाचें प्रमाण | १९३२-३३ मध्यें माणशीं किती खप झाला तें. | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मण | शेर | तोळे |
| १ | (अ) धान्य .... | १० मण | ७ | ११ | ७१ |
| | (ब) साखर ... | ७ शेर | ० | २६ | १२ |
| | (क) गूळ ... | २० शेर | १ | ३ | ३६ |
| २ | तूप ... | ९ शेर | ० | ३ | ३२ |
| ३ | तेल व गळिताचीं धान्यें ... | ७½ शेर | ० | १४ | ४७ |
| ४ | औषधी जिनस व मसाल्याचें सामान. | रु. २८८ | रु. १०८५८० | | |
| | | | मण | शेर | तोळे |
| ५ | तंबाखू .... | ६ शेर | ० | ६ | २३ |
| ६ | कापड ... | रु. १२ | रु. २२८१३८ | | |
| ७ | धातू | रु. २८८ | रु. १९८१८० | | |

वरील कोष्टकावरून सरासरी खप हा सरकारनें सर्व जिनसांचे बाबतींत ठरविलेल्या खपाच्या प्रमाणांपेक्षां साखर, तेल, तंबाखूशिवाय कमी आहे असें दिसून येईल. ज्या जिनसांचें प्रमाण वजनावर ठरविलें आहे त्या जिनसांचे बाबतींत सरासरी खपाचें प्रमाण सरकारी आंकड्याहून कमी पडतें. व जेथें किंमतीवर प्रमाण ठरविलें आहे, तेथें खपाचें प्रमाण जास्त पडतें. जिनसांच्या सर्वसाधारण किंमतींत वाढ झाल्यामुळें किंमतीवर ठरविलेल्या जिनसांच्या बाबतींत सरासरी खपाचें प्रमाण वाढलें आहे. वर्ग नं. ४ इमारतींचें सामान व नं. ९ किरकोळ याबद्दल सरकारकडून प्रमाण ठरविण्यांत आलें नसलेंमुळें वरील कोष्टकांत ते वर्ग दाखविलें नाहींत.

परिशिष्ट २ अ मध्यें गेल्या तीन वर्षांत ९ वर्गांमधील प्रत्येक वर्गापासून म्युनिसिपालिटीस जकातीचें उत्पन्न काय झालें हें दिलें आहे.

## ६ फॉर्म नं. ३ तक्त्यासंबंधीं खुलासा.

फार्म नं. ३ वरून दिसून येईल कीं, या सालीं एकंदर खर्च रु. २४,६४,१३८ झाला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणें आहे.

| | | | सन १९३१–३२ | सन १९३२–३३ |
|---|---|---|---|---|
| (अ) | मुख्य कारभार व वसुली | ... | १,३३,११३ | १,३७,१५० |
| (ब) | लोकसंरक्षण ... | ... | ५८,७९२ | ५७,७२९ |
| (क) | आरोग्य व सुखसोई | ... | १६,१५,२७९ | ११,९६,०८९ |
| (ड) | शिक्षण–खातें ... | ... | ३,७१,००० | ३,०९,५६८ |
| (इ) | देणग्या ... | ... | ... | ... |
| (फ) | किरकोळ ... | ... | २,६१,८२४ | २,७१,५८ |
| | | | २४,४०,००८ | २१,७१,५९४ |
| (ज) | विशेष बाबी व कर्जे ... | ... | ५,५७,४८२ | २,९२,५४४ |
| | | | २९,९७,४९० | २४,६४,१३८ |

मागील वर्षाच्या खर्चाशीं तुलना करितां सन १९३२–३३ सालीं रु. ५,३३,३५२ कमी खर्च झाला आहे. कमी जास्ती खर्चाचीं कारणें प्रत्येक बाबीसंबंधीं खुलासेवार खालीलप्रमाणें आहेत:–

(अ) मुख्य कारभार खातें:—रु. ४६,४५० (३१–३२). रु. ४७,३३८ (१९३२–३३). रु. ८८८ वाढ, वाढ होण्याचें कारण सिटी सर्व्हे शीट्स लहान स्केलमध्यें छापण्याकरितां झालेला जादा खर्च हें होय.

(ब) करवसुली:—रु. ७०,३२१ (३१–३२); रु. ७१,८७४ (३२–३३) घरपट्टीची मागील बाकी वसूल करण्याकरितां चार अधिक वारंट कारकून नेमल्यामुळें व शहरांतील १४ पेठांच्या घरपट्टीच्या फेरआकारणीच्या ( रिव्हिजन ) कामामुळें खर्चांत १,५५३ रु. वाढ झाली आहे.

(क) रिफंड:—रु. २२४ (३१ –३२); रु. ७९९ (३२–३३), वाढ रुपये ५७५. ही बाब अनिश्चित आहे.

(ड) प्रॉव्हिडंट फंड व ग्रॅच्युइटी:—रु. १६,११८ (३१–३२); रु. १७,१३९ (३२–३३) वाढ रु. १,०२१ ही बाब अनिश्चित आहे.

(इ) लोकसंरक्षण:—आगीचा बंदोबस्त रु. ११,७२५ (३१–३२); रु. ९४२४ (३२–३३) कमी रु. २,३०१. या सालीं सामानाकरितां कमी रकम खर्च करण्यांत आली व पगारांत बचत केली. या सालीं १२ ठिकाणीं आगी लागल्या. १९३१–३२ सालीं २० ठिकाणीं लागल्या होत्या. या सालीं आगीपासून झालेल्या नुकसानीचा अंदाज रु. ७५० होता. तर १९३१–३२ सालीं रु. ३,४८० होता.

( फ ) दिवाबत्ती:—रु. ४७,०६७ ( ३१–३२ ); रु. ४८,३०५ ( ३२–३३ ). वाढ रु. १,२३८. वाढीचें कारण विजेच्या दिव्यांची संख्या वाढली आहे. सन १९३१–३२ सालीं रॉकेलचे दिवे १,२०१ होते, व या वर्षी १,११३ आहेत. ३१ मार्च १९३३ पर्यंत विजेच्या दिव्यांची संख्या ८६५ झाली. गतवर्षी ६८० होती.

( ज ) पोलीस:—या बाबीकरितां म्यु. नें वेगळा खर्च केलेला नाहीं. जे ७ शिपाई पोलीस खात्यांकडून मागून घेतले होते त्यांचा खर्च जकात, वसुली व मार्केट या खात्यांवर घालण्यांत आला आहे.

( एच् ) पाणी पुरवठा ( नवीन कामाचा खर्च ):—रु. २,४०,३०१ ( ३१–३२ ) रु. १,८०,०१७ ( ३२–३३ ). रु. ६०,२८४ कमी होण्याचें कारण या सालीं पाण्याचे नवे नळ घालण्याकरितां कमी रक्कम खर्च केली गेली. सन १९३१–३२ व १९३२–३३ सालांत शहरांतील पाणीपुरवठ्यामध्यें सुधारणा करणेंकरितां पाण्याचे मोठे नळ मोठ्या प्रमाणांत घालण्यांत आले. व तें काम जास्त लोक नेमून व कंत्राटानें करण्यांत आलें.

( आय् ) पाणीपुरवठा [ चालू खर्च व रिपेरी ]:—रु. १,४७,१२८ ( ३१–३२ ), रु. १,५२,५७५ ( ३२–३३ ). वाढ रुपये ५,४४७. इरिगेशन खात्यांस या सालीं रु. १,१६,१२४ व गेले सालीं रु १,१०,९६० आदा करण्यांत आले. वाढ रु. ५,१६४. गेले सालीं पाणी शुद्ध करणेसाठीं रु. १६,३३२ खर्ची पडले असून या सालीं रु. १७,१६४ खर्च पडले आहेत वाढ रु. ८३२ ही रोज जास्त पाणी शुद्ध करावें लागत असल्यामुळें झाली. कालव्याच्या पाण्याचा दर रु. २ होता तो रु.२८८ ता. ११ सप्टेंबर १९२९ पासून झालेला आहे. आणि कालव्याच्या पाण्यावर लोकल-फंड कर ता. १–१०–१९२९ पासून नवीन बसविला आहे. साध्या पायखान्याचे फ्लशिंग पायखाने करण्याचें काम जोरानें सुरू असलेमुळें रोजचा पाण्याचा खर्च वाढत आहे. त्यामुळें कालव्याचें पाण्याचा खप जास्त होत आहे. म्हणून खर्च वाढणें साहजिक आहे. म्युनिसिपालिटीनें दिलेल्या लोकल फंडाचे रकमेचा "कायदेशीर रीतीनें द्यावयाचा ⅓ हिस्सा" परत देण्याचें डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानें नाकारल्यामुळें पाणीपुरवठ्यावरील खर्च झपाट्यानें वाढत आहे.

शहरांत पाण्याची निष्कारण नासधूस होत असल्यामुळें विवक्षित मर्यादेबाहेर खप होणाऱ्या पाण्यावर रु. ५ व रु. १० याप्रमाणें पाण्याचे दर वाढविणार असल्याचें सरकारनें म्युनिसिपालिटीस कळविलें. म्युनिसिपल सभासदांचें एक शिष्टमंडळ ता. ३०–१–१९३३ रोजीं लोकल सेल्फ गव्हर्मेंटचे दिवाणसाहेब यांचेकडे गेले होतें. परंतु ता. ९–४–३३ पासून सरकारनीं, ६० लाखांपेक्षां जास्त व ९० लाखांपर्यंत खपणाऱ्या पाण्यावर प्रत्येक १०,००० घन फूट पाण्यास चार रुपयेप्रमाणें व प्रत्येक दिवशीं ९० लाखांहून जास्त खप होणाऱ्या पाण्यावर आठ रुपयेप्रमाणें दर आकारला जाईल असा हुकूम काढला.

( जे ) ड्रेनेज [ नवीन कामाचा खर्च ]:—रु. २,४८,०४८ ( १९३१–३२ ); रु. १,८५,५८५ ( ३२–३३ ). कमी रु. ६२,४६३ म्युनिसिपालिटीकडून व सरकारकडून या वर्षी कमी कामें करण्यांत आल्यामुळें खर्च कमी झाला आहे. मे. एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, पूना ड्रेनेज कन्स्ट्रक्शन, यांनीं केलेल्या कामाचा खर्च १९३२–३३ मध्यें रु. ९३,७९० झाला. तो १९३१–३२ मध्यें रु. १,२८,८७९ होता. सन १९३२–३३ मध्यें म्युनिसिपालिटीकडून रु. ७७,२०८ चीं कामें झालीं असून सन १९३१–३२ मध्यें तीं रु. ८८,०४४ चीं झालीं होतीं. नागझरी नाला सुधारणेंकरितां चालू सालीं रु. १०,७७४ खर्च झाला. मागील सालीं रु. ९,९६३ खर्च झाला होता.

( के ) ड्रेनेजकडील नोकर वर्ग व रिपेरी:—रु. ४१,६४७ ( ३१–३२ ); रु. ३१,७७३ ( ३२–३३ ). कमी रु. ९,८७४ चालू सालीं लो लेव्हल पंपिंग स्टेशन चालू होतें त्यावर रु. ६,६४० खर्च झाला. तो गेल्या वर्षी रु. १६,६१९ झाला होता. सार्वजनिक आरोग्य खात्याला पंपिंगकरितां गेल्या वर्षी दिलेल्या रकमेंतील कांहीं शिल्लक राहिलेली रक्कम चालू सालीं खर्च करण्यांत आली.

[ एल् ] शहर सफाई:—शहरसफाईसाठीं एकंदर खर्च खालीलप्रमाणें झाला.

| बाब | सन १९३१–३२ रुपये | सन १९३२–३३ रुपये |
|---|---|---|
| अ–सर्वसाधारण देखरेखीच्या नोकरवर्गाचा खर्च. | १९,७१० | २०,३६९ |
| ब–रस्ते झाडणें ... | ९३,२३६ | १०८,२६० |
| क–भंगी लोकांचा पगार वगैरे ... | ५९,६१४ | ३८,४९० |
| ड–मैला आणि कचरा डेपो ... | ४०८५ | ८,००० |
| ई–पायखाने व मुताऱ्या ... | ६,२०२ | ३,६०३ |
| फ–रस्त्यावर पाणी शिंपडणें ... | ७,२४९ | ११,८६० |
| ज–किरकोळ ... | ५,२०० | ४,१३६ |
| एकूण ... | १,९५,३७६ | १,९४,७१८ |

खर्चांत बचत होण्याचीं कारणें खालीलप्रमाणें आहेत:—

(१) सर्वसाधारण देखरेख करणारा नोकरवर्ग:—वाढ रु. ६५९. पर्वतीचा समावेश म्युनिसिपल हद्दींत झाल्यामुळें तेथें भंगी व मुकादम यांची नेमणूक करण्यांत आल्यापासून खर्चांत वाढ झाली आहे.

(२ व ३) रस्ते झाडणें आणि भंग्यांचे पगार:— या दोन बाबींवर १९३२–३३ मध्यें रु. १,४६,७५० खर्च झाला असून सन १९३१–३२ मध्यें रु. १,५२,९३० खर्ची पडले होते. कमी रु. ६,१८०. भंग्यांच्या पगाराचा खर्च या सालीं रु. ३८,४९० झाला. तर तो गेल्या सालीं रु. ५९,६१४ झाला होता. अशा रीतीनें रु. २१,१२४ कमी खर्च झाले. कारण फ्लशिंगचे संडास झाल्यामुळें चालू सालीं बरेच भंगी कमी करण्यांत आले. या सालीं रस्ते झाडण्याचा खर्च रु. ३४,६०६ लागला; तर १९३१–३२ मध्यें तो रु. २९,४७१ झाला होता. वाढ रु. ५,१३५. मैला व मैलापाणी यांच्या वाहतुकीचा खर्च चालू सालीं रु. ४६,४९० झाला असून गेल्या वर्षीं रु. ६३,७६५ झाला होता. कमी रु. १७,२७५ झाला. कारण पाटीचे पायखाने झपाट्यानें नाहींसे होत आहेत.

(४) मैला आणि कचरा डेपो:— सन १९३२–३३ मध्यें कचरा डिसइनफेक्ट करण्याकरितां रॅकिल व क्रूड ऑइल बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वापरण्यांत आल्यामुळें रु. ३,९१५ नें खर्च जास्त आला. (१९३१–३२ मध्यें रु. ५७९ व १९३२–३३ मध्यें रु. २,५५८). मजूर लोकांच्या पगाराचा खर्च देखील १९३१–३२ सालांत रु. ३,१४३ होता, तो १९३२–३३ सालांत रु. ४,२४० पर्यंत वाढला आहे. कारण मोटार गाड्यांपासून कचऱ्याच्या ढिगापर्यंत कचरा हात–मेहनतीनें वाहून न्यावा लागला.

(५) पायखाने व मुताऱ्या:— कमी रु. २,५९९ आहे. कारण १९३२–३३ मध्यें फक्त ४५९ रुपये नवीन मुताऱ्या बांधणेंचे कामीं खर्च झाले आहेत. तर १९३१–३२ मध्यें २,६९३ रु. खर्च झाला होता.

( ६ ) रस्त्यावर पाणी शिंपणें:— १९३२-३३ मध्यें पुष्कळ रस्त्यावर पाणी शिंपडल्यामुळें खर्चांत रु. ४,६११ ची वाढ झाली आहे.

( ७ ) किरकोळ:— कमी रु. १,०६४. या वर्षांत नोकर लोकांना पोषाख देण्यांत आले नसल्यानें कमी.

( एम् ) हेल्थ ऑफिसर आणि सॅनिटरी इन्स्पेक्टर यांचेकरितां खर्च:— रु. २०,१८८ ( ३१-३२ ); रु. २०,४९१ ( ३२-३३ ). नोकरवर्गाला वार्षिक बढती दिल्यामुळें खर्चांत ३०३ रु. वाढ झाली.

( एन् ) इस्पितळें व दवाखानेः— रु. ४७,०८६ ( ३१-३२ ); रु. ४७,५९० (३१-३२) रु. ५०४ ची वाढ नोकरवर्गाच्या पगारांच्या खर्चांत वाढ झाल्यामुळें आहे. सन १९३२-३३ सालांत भांबुर्डा येथें एक नवीन दवाखाना उघडण्यांत आला.

सदर बाबींच्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

( १ ) नोकरवर्गाचा खर्च वार्षिक पगारवाढीमुळें रु. १७,०६६ वरून रु. १७,४६६ इतका वाढला.

( २ ) कचेरी खर्च रुपये २,५११ वरून रु. २,९४९ इतका वाढला.

( ३ ) औषधांचा खर्च:— रु. ४,६४९ वरून रु. ३,८६६ पर्यंत कमी झाला.

( ४ ) रु. ५,३६५ चीं वेड्यांच्या खर्चाचीं बिलें या सालीं दिलीं. तींच गेल्या सालीं ४,२३५ रु. चीं दिलीं होतीं. जास्त रु. १,१३० वेड्यांची संख्या सालोसाल झपाट्यानें वाढत आहे.

( ५ ) पिसाळलेलीं कुत्रीं चावलेल्या लोकांस उपचार केल्याबद्दल ससून हॉस्पिटला या सालीं कांहीं देण्यांत आलें नाहीं. १९३१-३२ मध्यें हा खर्च रु. २,८२४ चा होता. चालू सालीं सदर बाबतींतील बिलांची चिकित्सा चालू असल्यामुळें सालअखेरपर्यंत रकम देणें शक्य झालें नाहीं.

( ६ ) चालू सालीं खालील संस्थांना मदत देण्यांत आली:—

| | | रुपये. |
|---|---|---|
| १. | ससून हॉस्पिटल नर्सिंग फंड | ६०० |
| २. | आयुर्वेदिक हॉस्पिटल | ५,००० |
| ३. | किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल | ५,००० |
| ४. | लेपर असायलम | ६०० |
| ५. | मोटार ॲम्बुलन्स | ६०० |
| ६. | लेडी डफरिन फंड | २,००० |
| ७. | वाडिया हॉस्पिटल | १,००० |
| ८. | सेंट मार्गारेट हॉस्पिटल | १,००० |
| ९. | सेंट जॉन्स हॉस्पिटल | ५०० |
| १०. | इन्फंट वेलफेअर सोसायटी | २०० |

( ओ ) प्लेग व इतर सांसर्गिक रोग:— रु. २७,४८८ ( ३१-३२ ); रु. ३१,३८९ ( ३२-३३ ). जास्त रु. ३,९०१. सांसर्गिक रोगांच्या प्रतिबंधक उपायांकरितां

सन १९३१–३२ मध्यें रु. ७,०२२ खर्च झाले होते. ते १९३२–३३ मध्यें रु. १८,१६३ खर्च झाले. प्लेगच्या उद्भवामुळें उंदीर पकडून नाश करणें, इनॉक्युलेशन करणें व इतर उपाय याकरितां फार मोठी रकम खर्च करण्यांत आली. सांसर्गिक रोगांच्या इस्पितळास यंदा मदतीदाखल रु. १३,२२६ देण्यांत आले, ते १९३१–३२ सालीं रु. २०,४६६ दिले होते. कमी रु. ७,२४०. ट्रेझरी ऑफिसरच्या मागणीप्रमाणें या रकमा देण्यांत येतात. सांसर्गिक रोगांच्या इस्पितळास मदत दिलेली रकम आणि प्लेग, देवी व कॉलरा यांचे प्रतिबंधक उपायांकरितां लागलेली रकम या रकमा या खात्यास खर्च घालण्यांत येतात. प्लेगची परगांवाहून लागून आलेली पहिली केस ता. १८ जानेवारी १९३३ रोजीं झाली व मार्च अखेरपर्यंत लागण व मृत्यु यांची एकूण संख्या अनुक्रमें ४० व २६ होती.

(पी) व्हॅक्सिनेशन [देवी काढणें]:–रु. २,५१९ (३१–३२); रु. २,६०६ (३२–३३). कचेरी खर्चांत वाढ झाली म्हणून जास्त रु. ८७.

(क्यू) आरोग्यरक्षणाच्या इतर बाबींचा खर्च:—रु. १०,७३८ (३१–३२), रुपये २,२९६ (३२–३३). कमी रु. ८,४४२,. रु. ४६७ :निवडुंग काढणेसाठीं खर्च झाला असून हा खर्च गेले सालीं रु. १९७ झाला होता. भांबुर्डा येथें मांग लोकांसाठीं स्वच्छ घरें बांधणें आणि तेथें इतर स्वच्छतेच्या सोयी करणें यासाठीं रु. ४२ खर्च झाले. गेलें सालीं रु. १०,०२७ खर्च झाले होते. पर्वती तळें स्वच्छ करणेंकरितां चालू सालीं रु. १,४६७ खर्च झाले, १९३१–३२ मध्यें रु. ५१४ खर्च झाले होते. ३२० रुपये खर्च करून विश्रामबागेजवळ एक टांग्यांकरितां स्टँड तयार करण्यांत आला.

(आर) मार्केटें व कसाईखानेः—रु. २६,६३६ (३१–३२), रु. २२,८४३ (३२–३३). रे मार्केटांतील रस्त्यांच्या रिपेरीसाठीं या सालीं कमी खर्च करण्यांत आला म्हणून रुपये ३,७९३ कमी खर्च झाले.

(एस्) कोंडवाडेः–रु. ३,३४० (३१–३२), रु. ३,०८१ (३२–३३) नोकरांच्या पगाराकरितां कमी खर्च झाला म्हणून रु. २५९ कमी.

(एस्-अ) प्रेतें पुरण्याच्या व दहन करण्याच्या जागाः–रु. ८,३६९ (३१–३२), रुपये ८,६५२ (३२–३३) २८३ रु. ची वाढ. लकडीपूल स्मशान भूमीवर पडव्या उभ्या केल्या म्हणून सदर खर्च वाढला आहे.

(टी) सार्वजनिक बागाः–रु. ९६५ (३१–३२), रु. १,००८ (३२–३३) जास्त रु. ४३.

(यू) गुरांच्या दवाखान्याचा खर्च:—रु. ११,४२० (३१–३२); रु. ९८२८ (३२–३३); कमी रु. १५९२, औषधाकरितां कमी खर्च झाला. रु. [रु. ३५८ (१०३२–३३) व रु. १३५२ (१९३१–३२)].

(व्ही) जन्म मृत्यू नोंदः—रु. १,८५३ (३१–३२), रु. २१४८ (३२–३३), जास्त रु. २९५, जन्म मृत्यूंचे तपशलिवार आंकडे मे. हेल्थ ऑफिसर यांचा निराळा रिपोर्ट जोडला आहे त्यांत दिले आहेत.

| सन | जन्म | मृत्यू |
|---|---|---|
| १९३२–३३ | ५,३२७ | ५,४१९ |
| १९३१–३२ | ५,०७२ | ५,७१२ |

सन १९३२–३३ सालीं मृत्यूंचें प्रमाण ३३.१९ आहे. व सन १९३१–३२ सालीं ३५.०५ होतें. जननांचें प्रमाण चालू सालीं ३२.६७ आहे. तें गतवर्षी ३१.१३ होतें. हे आंकडे १९३१ च्या खानेसुमारीतील लोकसंख्येवर आकारण्यांत आले आहेत.

(डब्ल्यू) इंजिनियर खातें, नोकर पगारः— रु. १७,५३४ (३१–३२); रु. २३,२६९ (३२–३३), वाढ रु. ५,७३५. कारण नोकरवर्गांत वाढ झाली आहे.

(एक्स) इमारतीः— रु. ५,३४९ (३१–३२); रु. ५,७६५ (३२–३३), वाढ रु. ४१६. ही वाढ नेहमीं कमी जास्त होणारी आहे.

(वाय) रस्तेः— रु. २,२५,५८९ (३१–३२); रु. १,९०,१९७ (३२–३३), कमी रु. ३५,३९२.

या कामांतील खर्चाच्या मुख्य बाबी खालीलप्रमाणें आहेतः—

| | | सन | सन |
|---|---|---|---|
| १. | रस्त्यांची दुरुस्ती | | |
| | खडी घालून अगर अन्य तऱ्हेनें दुरुस्त | १९३१–३२ मैल | १९३२–३३ मैल |
| | केलेली रस्ता लांबी ... ... | ९ – १½ फ. | ७.७७ रस्ते<br>५.१३ बोळ |
| | खर्च, दुरुस्तीखर्चासुद्धां ... ... | रु. ५६,६६३ | रु. ९९,९५४ |
| २. | रस्तारुंदीचा खर्च ... ... | रु. २७,७५३ | रु. ११,७८० |

घेतलेल्या जागाबद्दलचा तपशील परिशिष्ट ७ मध्यें दिला आहे.

| | | रुपये | रुपये |
|---|---|---|---|
| ३. | नवीन रस्ते तयार करणें | | |
| | ईस्ट–वेस्ट ( लक्ष्मीरोड ) रोड ... | ९५,६४४ | ४७,२८० |
| | टिळकरोड ... ... ... | १६,८३३ | १,८६२ |
| | फडके गेट ते अंबरखाना बाग रस्ता ... | ३५ | २८,६४० |

रस्तेदुरुस्तीच्या खर्चाच्या मुख्य बाबी खालीलप्रमाणें आहेत. ( १ ) खडी घालून दुरुस्ती रु. ५४,४६५; ( २ ) खांच खळगे भरणें रु. २०,६९०; ( ३ ) बोळ दुरुस्ती रु. २२,०५१.

या म्युनिसिपालिटीनें वसूल केलेली चाकपट्टी कोणत्याहि सालीं रु. ३०,००० हून जास्त असत नाहीं. पण रस्त्यांचा दरसालचा चालू खर्च ६०,००० रुपयांचेवर होतो. रस्त्यांवरील टोल म्युनिसिपालिटी वसूल करीत नाहीं. चाकपट्टी व टोल यांच्या उत्पन्नांतून चालू खर्च वजा जाऊन राहिलेल्या शिल्लकी रकमेचा एक वेगळा फंड जमवून नंतर तो रस्ते करण्याकरतां खर्च करणें हें येथें संभवत नाहीं.

(झेड्) स्टोअर्सः— रु. २९३ ( ३१–३२ ); रु. ३६८ ( ३२–३३ ). रु. ७५ वाढ. स्टोअरसाठीं जास्त माल खरेदी केल्यामुळें झाली आहे.

(अ अ) शिक्षण खातें—शाळाः—प्राथमिक शाळा व टेकनिकल स्कूल यांचे वार्षिक अहवाल निराळे दिले आहेत. त्यांत प्राथमिक शाळांसंबंधीं व धंदेशिक्षणाच्या शाळेसंबंधीं सर्व माहिती तपशीलवार दिलेली आहे. ह्या वर्षी एकंदर खर्च रु. २,९८,७८५ झाला असून गेले सालीं रु. ३,५७,७०४ झाला होता. शाळा खात्यासंबंधीं स्कूल-बोर्डाचा रिपोर्ट सोबत आहे. त्यांत सर्व तपशील दिलेला आहे. १९३१–३२ सालीं शाळेच्या इमारतीवर रु. ३५,६९८ खर्च झाला व १९३२–३३ सालीं रु. २,७४१ झाला ह्यामुळें व सर्व खर्चाच्या बाबींत सर्वसाधारण कपात केल्यामुळें एकंदर खर्चाचा आंकडा कमी झाला आहे.

( अ–ब ) संस्थांस मदत:––या खात्यांत चालू वर्षांत रु. २,६५० खर्च झाले असून गेले सालीं रु. २,९०० खर्च झाले होते. कमी रु. २५०.

( अ–क ) लायब्रऱ्या व म्यूझियम:––शहरांतील अनेक वाचनालयांना मिळून रुपये ८,१३३ देणगीदाखल देण्यांत आलि. गेले वर्षी, रु. १०,३९८ देण्यांत आले होते. कमी रु २,२६५. कारण सार्वजनिक लायब्रऱ्यांची देणगीची रक्कम ५०० वरून १०० पर्यंत कमी करण्यांत आली.

( अ–ड ) कर्जावरील व्याज:––रु. १,१६,८०२ ( ३१–३२ ); रु. १,१९,७०० ( ३२–३३ ). जास्त रु २,८९८. जास्त माहितीकरितां परिशिष्ट ३–ब पहावा.

( अ–ई ) खाजगी कामगिरी:—रु २०,७२९ ( ३१–३२ ); रु. १८,६४८ (३२–३३). कमी २,०८१. या सालीं कमी कामें केलीं म्हणून कमी खर्च लागला.

( अ–एफ् ) निवडणुकी:––रु. ६,२१४ ( १९३१–३२ ); रु. ३८९ [ ३२–३३ ]. रु. ५,८२८. कमी खर्च होण्याचे कारण सन १९३२–३३ सालीं फक्त एक पोट निवडणूक झाली. व सर्व बोर्डाची मुख्य निवडणूक सन १९३१–३२ सालांत झाली होती.

[ अ–जी ] मर्दानी खेळांस मदत:–––नाहीं.

[ अ–एच् ] लोकल सेल्फ गव्हर्मेन्ट-इन्स्टिटयूटला मदत:—रु. २५०

( अ–आय् ) छापखाना व वर्कशाप:––छापखान्यावर खर्च रु. १७,९२० ( ३१–३२); रु. १७,९७४ ( ३२–३३ ). जास्ती रु. ५४. सन १९३२–३३ सालीं वर्षभर गॅझेट छापलें गेलें. वर्क–शॉप व स्टोअर खात्यांचा खर्च रु. ४६,९९४ झाला असून गेले सालीं रु. ४४,३५० झाला होता. जास्ती रु. २,६४४ होण्याचें कारण कामें जास्त केलीं गेलीं. रस्त्यावर पाणी शिंपडणें व कचरा वाहतूक यांसाठीं मोटार लॉरींचें एक स्वतंत्र खातें उघडण्यांत आलें आहे. इन्शुअरन्स ( रु. १,९३६ ) धरून १३ लॉऱ्या चालविण्याचा एकंदर खर्च रु. ३९,३४७ झाला आहे. गतवर्षी रु. ३८,३५७ झाला होता.

( अ–जे ) कर्जाची परत फेड:––रु. ३८,२९७ ( ३१–३२ ); रु. ५३,८५१ ( ३२–३३ ). वाढ रु. १७,५५४. सरकारी कर्ज सारख्या रकमेचे हप्ते देऊन फेडण्यांत येतें. जसजशी अधिक वर्षे होतील तसतशी व्याजाची रक्कम कमी होते. व त्यामुळें कर्जाच्या मुद्दलाची अधिक रक्कम जमा केली जाते. ह्या सालीं हप्ते मुदतीच्या आंत भरले म्हणून मुद्दलाची बरीच मोठी रक्कम जमा केली गेली. सिंकिंग व इतर फंडासाठीं चालू सालीं रु. ६१,२८७ खर्च झाला; तो १९३१–३२ सालीं २८,४७३ झाला होता. सन १९३१ ३२ सालांत नागरिकांकडून ६,३५,९०० रु. चीं तीन कर्जें काढण्यांत आलीं. व १९३२–३३ पासून त्यांच्या खात्यावर सिंकिंग फंडाची रक्कम खर्चे घालावी लागली.

( अ–के ) कर्जरोख्यांत गुंतविलेल्या रकमा:—कर्जरोख्यांमध्यें रक्कम रु. ९,७०६ गुंतविण्यांत आली.

( अ–एल् ) डिपॉझिट:—रु. ३,२९,२३६ ( ३१–३२ ); रु. १,५५,३८६ ( ३२–३३ ). कमी रु. ९३,८५०. ही जमाखर्ची रक्कम असल्यामुळें खुलाशाची जरुरी नाहीं.

( अ-एम ) अमानतः—रु. ९,३१८ ( ३१-३२ ); रु. १२,३१४ ( ३२-३३ ). जास्त रु. २,९९६. ही जमाखर्ची रकम आहे.

( अ-एन् ) शिल्लकः—रु. १,२५,०१५ ( १९३१-३२ ); रु. २,५६,०६८ ( ३२-३३ ). जास्त रु. १,३१,०५३. स्कूलबोर्डाकडील रु. २४,९९३ धरून एकंदर रकम २,५६,०६८ ही निरानिराळ्या बँकांतून चालूं खात्यांत ठेवली असून ऑफिसमधील रोख शिल्लकही त्यांतच धरली आहे.

## जागा घेणें.

( १४ ) ह्या सालीं ५० जागा निरानिराळ्या कामासाठीं रु. १,३२,३१७ ला खरेदी करण्यांत आल्या. सन १९३१-३२ सालीं ७६ जागा रु. १,७६,१५६ ला खरेदी केल्या होत्या.

## हिशेब तपासणी.

( १५ ) ह्या म्युनिसिपालिटीचे १९३१-३२ चे हिशेब सरकारी हिशेब-तपासनिसांनीं २।९।१९३२ ते १४।१।१९३३ पर्यंत तपासले. ऑडिट नोट व ऑब्जेक्शनचा तक्ता अनुक्रमें ता. १।५।१९३३ व २०।३।१९३३ रोजीं मिळाले. त्यांचीं उत्तरें तयार होत आहेत. व योग्य वेळीं तीं मे. एक्झॅमिनर ऑफ लोकल फंड अकाउंट्स यांचेकडे पाठविण्यांत येतील.

## १९३२-३३ मधील मुसलमानांच्या शिक्षणाबद्दल टिपण.

एकंदर दिवसाच्या उर्दू शाळा १४ आहेत. पैकीं मुलांच्या ७ व मुलींच्या ७ आहेत. ३१ मार्च १९३३ रोजीं हजेरीपटावर म्यु. उर्दू शाळांमध्यें मुलांची संख्या ९८२ व मुलींची ६०७ होती. गेल्या सालीं हीच संख्या अनुक्रमें ९९४ व ५३२ अशी होती. हजेरीचें सरासरी प्रमाण चालूं सालीं ७०२ व ४०३ असें होतें. तें गतवर्षी ७५७ व ३६९ असें होतें. रात्रीचें शाळेमध्यें हजेरीपटावर ३२ संख्या असून सरासरी हजेरी १६ होती. स्कूलबोर्डानं मुलींच्या उर्दू शाळेंत पुरुष शिक्षक न ठेवतां स्त्री शिक्षकच नेमणेंचें धोरण चालूं ठेविलें आहे. व ट्रेंड स्त्री शिक्षकिणी मिळविण्याचा प्रयत्न शक्य तितका चालविला आहे. परंतु अद्याप परीक्षा पास झालेल्या व ट्रेंड स्त्री शिक्षकिणी पुरेशा मिळत नाहींत.

ह्या म्युनिसिपालिटीनें सेंट्रल उर्दू मुलींच्या शाळेंत जाणाऱ्या प्रौढ मुलींच्या उपयोगासाठीं एक मोटार लॉरी ठेविली आहे. या शाळेंत कपडे साफ करणें व स्वयंपाक करणें या विषयांचें शिक्षण देखील दिलें जातें.

उर्दू मुलांची शाळा नं. १० येथें अगोदर इंग्रजी वर्ग जोडण्यांत आले आहेत. हे वर्ग एक अंडर ग्रॅज्युएट शिक्षक शिकवीत असतो.

उर्दू शाळांची देखरेख गेले सालप्रमाणें सदर शाळांचे सुपरवायझर यांचेकडून केली जात होती. उर्दू शाळांवर चालूं सालीं सुमारें रुपये ३७,३३८ खर्च झाला असून गेले सालीं तो रुपये ३७,७४० झाला होता.

जी. आर., ई. डी., नं. एस्. ७८ [ ४८ ] ता. १८ मार्च १९३० अन्वयें जाहीर झालेल्या सक्तीच्या शिक्षणाच्या भागामध्यें उर्दू शाळांचे अटेंडन्स ऑफिसरचेंही काम उर्दू शाळांचे सुपरवायझर हे पाहतात.

## सर्वसामान्य माहिती.

१९३२-१९३३ सालीं म्युनिसिपालिटीनें जीं महत्वाचीं कामें केलीं व ज्या महत्वाच्या गोष्टी घडल्या त्या खालीं दिल्या आहेत.

## अ–रस्ते.

( १ ) लक्ष्मी रोडः—या रस्त्याच्या गणेश पेठ विभागांतील जागा लँड अॅक्विझिशन कायद्याखालीं व खाजगी तडजोडीनें संपादन करण्याचें काम १९३२–३३ सालांत चाललें होतें. सदर सालीं खाजगी करारानें १३ जागा ६५,३७७ रुपयांस खरेदी करण्याचें काम पुरें झालें. याशिवाय मालकांशीं तडजोड करून कित्येक जागा खरेदी करण्यांत येत आहेत. सिटी पोस्ट ऑफिस ते सराफ आळी चौकापर्यंतच्या लक्ष्मीरोडच्या भागावर ड्रेनेजचा दुसरा नळ घालण्यांत आला. या रस्त्याकरितां घेतलेल्या जागेबद्दल १९३२–३३ मध्यें ६०,००० रुपयांहून अधिक रक्कम खर्च झाली. सन १९२० पासून आतांपर्यंत या रस्त्याकरितां एकंदर जमा व खर्च अनुक्रमें रु. १०,१४,८११ व रु. ९,७९,५४४ झाला आहे.

( २ ) टिळक रोडः—लकडी पुलाजवळील लहानसा विभाग शेवटीं म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत आला. व रस्त्याच्या वायव्येकडील भागावर पूर्णपणें खडी घालून झाल्यावर जून १९३३ अखेर हा रस्ता रहदारीसाठीं खुला करण्यांत आला. सन १९२२ सालीं हा रस्ता तयार करण्यास आरंभ झाला. व पूर्णपणें तयार होण्यास सुमारें ११ वर्षे लागलीं. रस्त्याची सर्व लांबी १½ मैल असून आतांपर्यंत खर्च झालेली रक्कम २,५७,०८३ रु. हून जास्त आहे. प्लॉट विक्री करून जमा झालेली रक्कम रु. १,७९,७६३ आहे.

( ३ ) गोविंद हलवाई चौक ते सुभानशा दर्गा यांस जोडणाऱ्या रस्त्याची योजना आतां रेमार्केटपर्यंत वाढविण्यांत आली आहे. व या सर्व लांबीच्या रस्त्याकरितां जागा संपादन करणेंबद्दल मे. कलेक्टरसाहेब यांचेकडे १९३२–३३ मध्यें लिहिण्यांत आलें आहे.

( ४ ) गणेश रोड स्कीममध्यें चालू सालीं विशेष प्रगति झाली नाहीं. तडजोडीनें पांच जागा २७,९०५ रुपयांस संपादन केल्या. व बाकीच्या जागा लँड ॲक्विझिशन कायद्याखालीं संपादन करण्याचें काम चालू आहे.

( ५ ) रामोशी गेट ते शंकरशेट रोडपर्यंत उत्तर–दक्षिण रस्त्याची योजना १९३२–३३ मध्यें फिरून विचारांत घेण्यांत आली. व जागा संपादन करणेंबद्दलची योजना मे. कलेक्टरसाहेब यांचेकडे लौकरच पाठविण्यांत येणार आहे.

( ६ ) नगर–रचना–योजनेंतील भागांत खालील रस्ते सन १९३२–३३ सालीं तयार झाले. खडी घालण्याचें काम सन १९३३–३४ सालांत करावयाचें आहे.

| वर्णन | | | रुंदी फूट | लांबी फूट |
|---|---|---|---|---|
| ' आय् ' रोड | ... | ... | ४० | २,१०० |
| ' जी ' रोड | ... | ... | ४५ | २,५९० |
| ' जे ' व ' के ' रोड्स | ... | ... | ४५ | २,१५० |
| ' एल् ' रोड | ... | ... | ४५ | १,९७० |
| ' डब्ल्यू १ ' व ' डब्ल्यू ' २ रोड्स | | ... | ४५ | २,३०० |
| ' एक्स ' रोड | ... | ... | ४५ | १,८०० |
| ' एक्स १ ' रोड | ... | ... | ३० | १,६०० |
| ' वाय् ' रोड | ... | ... | ४० | ३,००० |
| ' पी १ ' व ' पी २ ' रस्ते | ... | ... | २५ | १,००० |

शिवाय दुसरे १३ लहान रस्ते तयार केले. १९३१–३२ मध्यें तयार झालेल्या सर्व रस्त्यांत खडी घालण्याचें काम सन १९३२–३३ सालांत केलें.

( ७ ) शहरच्या रस्त्यांची स्थितिः—शहरांतील रस्त्यांच्या चालू दुरुस्तीकरितां १९३२-३३ सालांत रुपये ९९,९५४ खर्च झाला. विशेषतः या सालीं अरुंद बोळ रिपेर करण्याकडे रु. १०,००० खर्च करण्यांत आले. ह्या बोळांकडे नेहमीं दुर्लक्ष होत असल्यामुळें आसपासच्या रहिवाश्यांना अतिशय त्रास सहन करावा लागतो. एकंदर २७,०९० फूट ( म्हणजे ५.१३ मैल ) लांबीचे ११० बोळ दुरुस्त केले. खांच खळगे भरून बोळ लेव्हल करणें आणि बोळाच्या कोणत्याही भागांत पाणी साचूं न देण्याची खबरदारी घेणें इत्यादि कामें केलीं.

मोटारींच्या रहदारीमुळें रस्त्यांची फार खराबी होत असल्यानें रस्ते दुरुस्तीवरील खर्च सालोसाल वाढत आहे. मोटारींच्या सहाय्यानें रस्त्यावर पाणी शिंपडण्याचें काम या सालीं चालू ठेवण्यांत आलें होतें. १९३२-३३ सालांत ११,३०२ रु. खर्च करून २६० वाटर हायड्रंट्स मुख्य मुख्य रस्त्यावर देण्यांत आल्यापासून त्यांच्या योगानें सदर रस्त्यांवर पाणी शिंपडण्याचें काम करण्यांत येतें. सन १९३३-३४ सालांत आणखी ९२ हायड्रंट्स बसवावयाचे आहेत.

( ८ ) रस्त्यांवरील दिवाबत्तीः—म्युनिसिपालिटीशीं केलेल्या सन १९२७ च्या कराराअन्वये पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी दरसाल दोन मैल इलेक्ट्रिक लायनींची भर घालीत आहे. ता. ३१।३।३३ रोजीं रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांची संख्या ८६५ होती. व ३१।३।३२ रोजीं ६८० होती. खोपोलीच्या कारखान्यांतून फार स्वस्त दरानें विजेचा पुरवठा मिळत असूनही कंपनी म्युनिसिपालिटीस मिळणाऱ्या विजेचे दर कमी करीत नाहीं. जर पुण्यांतील तीन स्थानिक संस्था मिळून प्रत्येक महिन्याला २०,००० युनिट वीज खर्च करण्याची हमी घेतली तर दर युनिटला ८३ आणे प्रमाणें वीज कंपनीनें पुरवावी अशा तऱ्हेची कंपनीशीं वाटाघाट सुरूं आहे. हल्लींचा दर सहा आणे युनिटप्रमाणें आहे. व तो जेथें खोपोलीपेक्षां वीज तयार होण्यास जास्त खर्च लागतो. अशा शहरांच्या दरांपेक्षां देखील महाग आहे. इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीनें वाजवी दर आकारण्याचें कबूल केल्याशिवाय शहरांतल्या रस्त्यांवरील दिवाबत्तीच्या पद्धतींत सुधारणा होणें शक्य दिसत नाहीं.

## [ ब ] मार्केटें.

( १ ) रे मार्केटः—दावे लावून गाळ्याच्या भाड्याची थकलेली बाकी बऱ्याचशा अंशीं वसूल केली आहे. भोंवतालचा 'वारी वाडा' नांवाचा भाग ता. १।३।३३ पासून दरमहा ९०० रु. भाड्यानें सिनेमा थिएटरकरितां दिला आहे. व त्यामुळें आसपास गर्दी वाढणार हें निश्चित. नाना पेठेंत भाजी मार्केट बांधण्याच्या योजनेला अद्याप मूर्तस्वरूप प्राप्त झालेलें नाहीं. कारण सदर योजनेसाठीं जागा संपादन करण्याचें काम अद्याप चालूं आहे.

( २ ) मासे मार्केटः—ताजे आणि सुकविलेले मासे विकण्यास एकादी आरोग्य-कारक (Sanitary) जागा असणें जरूर आहे असें फार दिवस वाटत होतें. त्यामुळें हें मार्केट रु. ५०६२७ खर्च करून १९३० मध्यें बांधण्यांत आलें. परंतु किरकोळ धंदेवाल्यांना आपलीं दुकानें शहरांतील ठिकठिकाणच्या पहिल्या जागींच चालविणें श्रेयस्कर वाटतें. अशा जागीं विकण्यांत येणाऱ्या माशांच्या चांगलेपणाची खात्री करून घेण्यास कांहींच साधन नसतें. धंदेवाल्यांनीं मासे मार्केटांतच मासे विकले पाहिजेत अशा तऱ्हेची सक्ती जरूर त्या नियमांना सरकारची मंजुरी मिळाल्याशिवाय करतां येत नाहीं. मध्यंतरीं शहरांतील मासेविक्यांचे एका मंडळानें शहरांतील सहा मासे मार्केटांमध्यें सहा ते दहापर्यंत मासे विकण्याकरितां स्वतंत्र गाळे जोडण्यांत यावेत म्हणजे गिऱ्हाइकांना आपल्या घरांपासून थोड्या अंतरावर मासे विकत मिळूं शकतील अशी योजना पुढें मांडली. सदर योजनेवर विचार चालूं आहे. मासे मार्केटांतील कांहीं गाळे अद्याप रिकामेच राहिले आहेत.

( ३ ) मांस मार्केटः—हें मार्केट १९३० सालीं बांधण्यांत आलें व मांस विकणारे याचा पूर्णपणें उपयोग करून घेत आहेत.

## ( क ) पाणी पुरवठा.

१९३२-३३ सालीं शहरांतील पाण्याचे मुख्य नळ मोठे करण्याचें काम चालू ठेवण्यांत आलें होतें. या कामीं सन १९३२–३३ सालांत रु. १,८०,०१७ खर्च झाले. योजिलेल्या कार्यक्रमांतील वरीचशीं कामें एकूण खर्च रु. ४,२५,००० करून करण्यांत आलीं आहेत. सॅनिटरी इंजिनीयर डिपार्टमेंटनें या कार्यक्रमाकरितां रु. ९,३७,००० चें बरेंच मोठें एस्टिमेट तयार केलें होतें. परंतु काम काटकसरीनें केल्यानें, कास्ट आयर्न नळाचे भाव कमी झाल्याकारणानें व Hume Pipes चा मुबलक उपयोग केल्याकारणानें कामें बऱ्याच कमी खर्चांत केलीं गेलीं. कालवाच्या नळाचें पाणी स्वारगेट सेटलिंग टँक्समध्यें घेण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. अशा रीतीनें आणलेलें पाणी कालव्याचें पाणी बंद असतांना व इतर वेळीं बरेचसे उपयोगाला येईल.

एक ओव्हरसियर, सहा सब–ओव्हरसियर्स व इतर नोकर यांची स्वतंत्र नेमणूक करून पाणी गळून जाणें व वाया जाणें यांची कारणें शोधून काढण्याकरितां सन १९३२–३३ सालांत घरोघर तपासणी करण्यांत आली. या नोकरवर्गांनीं चालविलेल्या तपासणीचा अद्याप निश्चित निकाल झालेला नाहीं. परंतु बरेचसे घरमालक त्यांच्याकडून येणाऱ्या पैशाच्या मानानें बऱ्याच जास्त प्रमाणांत पाणी विनाकारण खर्च करितात हें स्पष्ट आहे. व अशा ठिकाणीं पाण्याचें मिटर बसविणें आवश्यक आहे. घरांतील पाण्याच्या नळाचे सांधे सैल झाल्यामुळें बरेचसें पाणी गळून फुकट जातें असें आढळून आल्यावरून त्या त्या घरमालकांना गळणारे भाग दुरुस्त करण्याबद्दल नोटीसा करण्यांत आल्या आहेत.

ता. २६।१०।३२ रोजीं सरकारनीं ( मे. कमिशनरसाहेब यांच्या नं. आय. आर. आर. ०।१७ ता. २६।१०।३२ च्या पत्रानें ) म्युनिसिपालिटीस कळविलें कीं, "म्युनिसिपालिटी कालव्याचें पाणी विनाकारण जास्त प्रमाणांत खर्च करते म्हणून दररोज ६० लाख ग्यालनपर्यंत खर्च होणाऱ्या पाण्याला दर १०,००० घनफुटास रु. २८८ प्रमाणें, साठ लाखांपासून नव्वद लाखांपर्यंत पांच रु. प्रमाणें व ९० लाखांहून अधिक खर्च होणाऱ्या पाण्याला १० रु. प्रमाणें आकार द्यावा लागेल." वस्तुस्थिती अशी होती कीं ही म्युनिसिपालिटी दर माणशी फक्त ५२ ग्यालन पाणी खर्च करीत आहे. व शेजारची स्थानिक संस्था–म्हणजे–पूना कँटोन्मेंट, तेथें फ्लशिंग पायखाने नसतांना देखील माणशीं ५७ ग्यालन पाणी घेत आहे. शिवाय या शहरांत फ्लशिंग पायखान्याकरितां मोठ्या प्रमाणांत पाणी खर्च होतें. मोठ्या शहरांना मुताऱ्याकरितां, रस्त्यावर पाणी शिंपडण्याकरितां व इतर सुखसोयींसाठीं पाण्याचा बराचसा भाग खर्च करावा लागतो व त्या मानानें ५२ ग्यालन हें प्रमाण जास्त नाहीं. प्रेसिडेंट, कित्येक सभासद, चीफ ऑफिसर व इंजिनियर यांचें एक शिष्टमंडळ मे. लोकल सेल्फ गव्हर्मेंट दिवाणसाहेब, मुंबई यांचेकडे ता. ३०।१।१९३३ रोजीं गेलें होतें. परंतु या शिष्टमंडळाच्या संयुक्तिक मागणीचा फारसा उपयोग न होऊन फक्त दरामध्यें खालीलप्रमाणें सवलत देऊन वाढलेले दर कायम करण्यांत आले. रु. २८८, रु. ५ व १० रु. यांच्याऐवजीं रु. २८८, रु. ४ व रु. ८ याप्रमाणें दर ठरले. दिवसांतून कित्येक तास पाण्यावरील दाब कमी करून, व अन्य उपायांनीं पाणी काटकसरीनें खर्च होईल अशी व्यवस्था करण्याचे प्रयत्न चालू आहेत. सरकारनीं म्युनिसिपालिटीस या बाबतींत असमाधानकारक निकाल दिला असें म्हणावें लागतें. नवीन दर ता. १।४।१९३३ पासून अमलांत आले असून त्यामुळें म्युनिसिपालिटीस दर वर्षी तीस हजारपासून पन्नास हजारांपर्यंतचा अधिक खर्च सोसावा लागणार आहे.

कालव्याच्या पाण्याला सरकारला म्युनिसिपालिटीपासून सर्वांत कमी अशा मिळणाऱ्या दरापेक्षां ( म्हणजे १०,००० घन फुटांस रु. २८८ ) या दरापेक्षां देखील कमी दर शेतकरी लोकांपासून मिळतो. ही गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्यक आहे.

## ड–सार्वजनिक सुखसोयी.

( १ ) म्युनिसिपालिटीचे ६ धर्मार्थ दवाखाने असूनसुद्धां भांबुर्ड्यासारख्या झपाट्यानें वाढत असलेल्या ठिकाणीं तेथील रहिवाश्यांच्या विनंतीवरून ता. २५।१०।३२ रोजीं एक नवीन अलोपाथिक ऊर्फ इंग्रजी दवाखाना उघडण्यांत आला. तेथें औषध घेणाऱ्यांची संख्या बरीच मोठी झाली असून म्युनिसिपालिटीनें केलेल्या या सोयीची सार्थकता पटली आहे. खाजगी धर्मार्थ हॉस्पिटलांना देण्यांत येणाऱ्या देणग्या

दिल्या आहेत. सांसर्गिक रोगांच्या इस्पितळाच्या इमारतींच्या खर्चाचा हिस्सा देण्याच्या प्रश्नाचा अद्याप निकाल लागला नाहीं. ज्या स्थानिक संस्थांचा सदर इस्पितळाशीं संबंध येतो त्यांचे प्रतिनिधी व सरकारी ऑफिसर यांची परिषद मुंबईस ता. २९ जानेवारी १९३१ रोजीं भरली होती. त्यावेळीं या म्युनिसिपालिटी-तर्फे श्री. ल. र. गोखले, एम्. एल्. सी यांना पाठविण्यांत आलें होतें. या परिषदेचा निष्कर्ष या म्युनिसि-पालिटीपुढें मांडण्यांत आला. परंतु सरकाराची मागणी २½ लाख रुपयांहून अधिक असल्यामुळें सदर बाबतींत लवकर निकाल देणें शक्य झालें नाहीं. इस्पितळाची इमारत उभारण्यापूर्वी या म्युनिसिपालिटीची संमति घेण्यांत आली नव्हती. म्हणून ही मागणी मान्य करणें अशक्य आहे असें वाटतें. एकंदर खर्चाचा शेंकडा ३४ प्रमाणांत येणारा हिस्सा ( म्हणजे रु. ५,७९,३८१×३४।१००=रु. १,९६,९९० ) वार्षिक अशा पांच हप्त्यांनीं देण्यास ही म्युनिसिपालिटी तयार आहे. पण यावर कोणत्याही प्रकारचें व्याज ती देऊं शकणार नाहीं असें अलीकडे म्युनिसिपालिटीनें सरकारास कळविलें आहे.

( २ ) बालमृत्यूः—जननाची नोंद पूर्वीपेक्षां बरीच चांगल्या तऱ्हेनें होऊं लागली आहे. नोंद-लेल्या जननसंख्येशीं बालमृत्यूंचें प्रमाण १९३२–३३ सालीं दर हजारीं ३८८ पडलें होतें. तें गेले वर्षी ४१९ पडलें. उपजत मृत्यूंची संख्या ( ३४५ ) वरील आकड्यांत धरली नाहीं. सविस्तर माहिती खालीं दिली आहेः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जननसंख्या | ... | ... | ... | ५,३२७ |
| उपजत मृत्यू | ... | ... | ... | ३४५ |
| बाल मृत्यू | ... | ... | ... | २,०६६ |
| लहान मुलांचे मृत्यू ( एक वर्षावरील व तीन वर्षांपर्यंत ) | ... | ... | ... | ८२२ |

अशा रीतीनें बाल मृत्यू व ( एक ते ३ वयाच्या ) लहान मुलांचे मृत्यु यांची एकूण संख्या २,८८८ आहे व ही ५,३२७ जननसंख्येच्या दृष्टीनें फारच मोठी आहे. आईबापांची गरीबी व आरो-ग्याला बाधक अशी भोंवतालची परिस्थिती ह्या दोन गोष्टी बाल मृत्यूंना कारणीभूत होत आहेत. वरील संख्येंत उपजत मृत्यूंची संख्या मिळविली असतां होणारा आंकडा फारच मोठा व भीतिप्रद वाटतो. परंतु ही स्थिति फक्त पुणें शहराचीच नसून हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व शहरांची आहे असें आढळून येतें. बाल मृत्यूंच्या वाढत्या आंकड्याचें दुसरें कारण म्हणजे शहरांत गाईच्या दुधाची दुर्मिळता हें होय. गरीब लोकांना मुलांकरितां दूध विकत घेणें अशक्य असतें व ज्यांना विकत घेणें शक्य आहे अशांना गाईचें दूध योग्य किंमत देऊनसुद्धां मिळूं शकत नाहीं. जर सरकार गाईच्या दुधाचा पुरवठा करण्याच्या योजनेला पाठिंबा देण्याची पसंती दर्शवील तर म्युनिसिपालिटी देखील सदर योजना आमलांत आणण्यासाठीं आनंदानें शक्य तितकी खटपट करील.

( ३ ) सांथीः—प्लेगच्या सांथीला १८ जानेवारी १९३३ पासून सुरवात होऊन मार्च १९३३ अखेरपर्यंत ती सौम्य स्वरूपांत चालू होती. जून अखेरपर्यंत ती रेंगाळत चालली असून केव्हां थांबेल हें निश्चित सांगतां येत नाहीं. इनॉक्युलेशन, घरें डिसइन्फेक्ट करणें, रोगी स्टां. रो. हॉस्पिटलमध्यें पोंचविणें, उंदीर पकडून त्यांचा नाश करणें इत्यादि आवश्यक असे उपाय तत्परतेनें योजण्यांत आले. मार्च अखेरीस लागण व मृत्यु यांची संख्या अनुक्रमें ४० व २६ होती. इनॉक्युलेशन केलेल्यांची संख्या २१,६६८ होती. १९३२–३३ मध्यें उंदीर व घुशी नाश केल्या. त्यांची संख्या अनुक्रमें १,०२,४३२ व ४,७६३ होती. इनॉक्युलेशननें बऱ्याच अंशीं प्लेगचा प्रतिकार करण्याची शक्ति अंगीं येत असल्याचें आढळून आल्यामुळें दूषित घरें सोडून गावाबाहेर रहावयास जाण्याकडे फार थोड्या लोकांची प्रवृत्ति दिसून येते.

( ४ ) ड्रेनेजः—मे० एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर, पब्लिक हेल्थ, यांजकडून चालू सालीं रु. ९३,७९० चीं कामें करण्यांत आलीं. गेले सालीं हा खर्च रु. १,२८,१७९ होता. म्युनिसिपालिटीकडून रु. ७७,२०८ किंमतीचीं नवीन कामें करण्यांत आलीं. मागल्या वर्षी रु. ८८,०४४ किंमतीचीं केलीं होतीं.

(अ) देणें घेण्याच्या तक्त्यांतील देणें सदरांत नमूद केलेल्या रकमांखेरीज म्युनिसिपालिटीला सरकारांतून व बाजारांतून काढलेल्या कर्जाचें रु. २६,२५,७०५ इतकें देणें आहे तें वेगळेंच. या कर्जाचें परत फेडीचा वार्षिक खर्च रु. १,९५,८७६ इतका आहे. सन १९३१-३२ अखेर संपणाऱ्या तीन सालांतील जमा व खर्चाचे आंकडे पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

## उत्तर.

जावक नंबर ७७७८
तारीख ६ नवंबर १९३३

मे. अध्यक्ष, पुणें शहर म्युनिसिपालिटी,
यांजकडून:—

मे. एक्झामिनर लोकल फंड अकौंटस्; मुंबई
यांजकडे:—

विषयः—पुणें शहर म्युनिसिपालिटीच्या सन १९३१-३२ सालचे हिशेबाबाबत तपासणी पत्रक.

सन १९३१-३२ सालच्या, या म्युनिसिपालिटीच्या हिशेबाचे तपासणीपत्रकांतील प्यारिग्राफांस सोबतचीं उत्तरें दिलेलीं आहेत. उत्तरांच्या तीन प्रती पाठवीत आहोंत. मे. कळावें.

हणमंतराम रामनाथ,
अध्यक्ष, पुणें शहर म्यु.

| सन | जमा | खर्च |
|---|---|---|
| १९२९-३० | १४,२४,८३२ | १३,१०,६२१ |
| १९३०-३१ | १४,६९,७९४ | १३,२७,८८९ |
| १९३१-३२ | १५,७०,२३९ | १४,१६,२५८ |
| एकूण | ४४,६४,८६५ | ४०,५४,७६८ |
| सरासरी | १४,८८,२८८ | १३,५१,५८९ |

यावरून असें दिसून येईल कीं, सन १९३१-३२ अखेर संपणाऱ्या तीन वर्षांत मिळून म्युनिसिपालिटीचें उत्पन्न खर्चापेक्षां सरासरीनें १.३७ लक्ष रुपयांनीं जास्त होतें. यांतून. ८४ लक्ष रुपये वरील खर्चांत न दाखविलेली यावयाची रक्कम वार्षिक कर्जाचे हप्त्या-बद्दल वजा केली तरी म्युनिसिपालिटिजवळ. ५३ लक्ष रुपये सरासरी शिल्लक राहाते. यावरुन म्युनिसिपालिटीची सांपत्तिक स्थिती ठीक असून सांप्रतचे आर्थिक बोजे सोसण्याइतकी कार्यक्षम आहे असें दिसून येतें.

२ या पूर्वीची हिशेब तपासणीः—तपासणी पत्रक

३ (अ) पॅरा १२ वाः—सन १९२९-३० च्या हिशेब तपासणीचें पत्रकांत ११ वे प्यान्यांत निर्दिशित केल्याप्रमाणें म्युनिसिपालिटीच्या खुल्या जागेचा तात्पुरता उपयोग करण्याबद्दल मंजूर नियमांप्रमाणें फी आकारण्याऐवजीं निम्मी अगर अर्धवट फी आकारण्याचा अखत्यार म्युनिसिपालिटीस नाहीं. सन १९३०-३१ च्या हिशेब तपासणी पत्रकाचें परिशिष्ट ३ यांत नमूद केल्याप्रमाणें या बाबतींत वसूल व्हावयाची रक्कम संबंध असणारे इसमांचेकडून वसूल करून घ्यावी; व असें होत नसेल तर ज्या सभासदांनीं ठरा-वाला मंजुरी दिली त्यांचेकडून रकमेची भरपाई करून घ्यावी. या कामीं कालापव्यय झाल्यानें कदाचित म्युनिसिपालिटीस येणाऱ्या रकमा वसूल होण्यास त्रास पडेल. म्हणून या बाबतींत निकाल करावयाचा तो लवकर करणें जरुरीचें आहे.

(ब) पॅरा १३, १४, १७, १९, २३ व २४ मध्यें उल्लेख केलेल्या मुद्यांचे बाबतींत म्यु. नें केलेल्या तजविजी व त्यांचे अखेर निकाल कळवावे.

(क) पॅरा १६. घ. नं. ११६ शनिवार पेठ या घरांत बेकायदेशीर जोडलेल्या पाण्याचे तोटीबाबत प्रश्नाची चौकशी करण्या-करितां नेमलेल्या सब कमिटीनें अभिप्राय दिला आहे कीं, कायदेशीर रीतीनें घरमालकांकडून जितकी पाणीपट्टी वसूल करतां येईल तितकी करावी. पाण्याचा नळ कोणी, केव्हां व कसा दिला याची माहिती देण्यांत आलेली नाहीं. ही माहिती काढून त्या बाबत जबाबदार असणारे इसमांस काय शासन केलें अगर, शिस्तीकरितां काय तज-वीज केली हें कळवावें.

(ड) पॅरा २७:—म्युनिसिपल सभासद मे. वि. आ. गाडकरी यांचेकडून टेलीफोन दिल्याबद्दल भाड्याची रक्कम लवकर वसूल करावी.

(इ) पॅरा ३०:—जकात हद्दीमध्यें माल आल्यावर माल आणणारानें कंत्राटाचा हवाला देऊन जर डिक्लेरेशन केलें असेल तर रिफंड देणें जरुर आहे, असें मे. रिमेंब्रन्सर ऑफ लीगल अफेअर्स

जावक नंबर १००७७
तारीख २२–१२–१९३

पॅरा १२:—हा प्रश्न मे. जनरल कमिटीपुढें अजून विचा-साठीं आहे.

पॅरा १३:—मे. जनरल कमिटीनें हा प्रश्न मे. सब कमि-कडे सोंपविला होता. नियमांप्रमाणें भाडें मे. फुले यांचेकडून व करावें असा मे. सब कमिटीनें ठराव केला. प्रकरण नंबर ३०७ ही बाब मे. जनरल कमिटीपुढें विचारासाठीं ठेविली आहे.

पॅरा १४:—मे. जनरल कमिटीनें ठराव नंबर ४ तारीख १७–२–१९३३ चा करून पुढीलप्रमाणें ठराव केला अ

" जागेची परिस्थिती लक्षांत घेतां रस्त्याचे बाजूचे ज्या दरानें डॉ. तेंडुलकर यांस भाड्यानें दिली तो दर योग्य व र होता असें या म्यु. स वाटतें. "

पॅरा १६:—मे. लॉ. कमिटीपुढें हा प्रश्न विचारास आहे.

पॅरा १७:—मीटर भाडें व धंद्याचें कामावर उपयोग क यांचें पाण्याचा आकार याबद्दल प्रश्न मे. जनरल कमिटी विचारासाठीं आहे. याच वेळीं सरकारनें कालव्याचें पाण्या किंमत वाढविल्यामुळें या प्रश्नास विशेष महत्त्व आलेलें अ तथापि या कामीं नियम करण्यापूर्वी पाण्याच्या खपाबद्दल चौकशी करावी असाबद्दल म्यु. स जरूरी दिसून आल्यावरून कामासाठीं रु. ७००० मंजूर केले. जरूर तो नोकर वर्ग ने आतां चौकशी जवळजवळ पुरी झाली आहे. पी. डब्ल्यु. कडील रिटायर झालेल्या व सध्यां नोकरींत असलेल्या अंमलदारा एक ' तज्ज्ञ कमिटी, ' म्युनिसिपालिटीस नियम करण्याचें का जरूर तो सल्ला देण्यासाठीं नेमण्यांत आलेली आहे. काम च आहे. जरूर तेथें म्यु. टी कडून मीटर लावण्यांत येऊन मंजूर दराप्रम दर वसूल करण्यांत येत आहे.

पॅरा १९:—मीटर लावून पाणी घेतल्यास किमान दर कि घ्यावयाचा याबद्दल नियम तयार करून मे. जनरल कमिटी मंजुरीसाठीं ठेविला आहे.

पॅरा २३:—मे. रिव्हिजन कमिटीनें नं. ९८ तारी २५–४–३३ चा ठराव केला कीं नंबर ३४३ व १५८।२३ र वरील घरपट्टीची आकारणी घरमालकांनीं दिलेले ' डिक्लेरेशन फार्म व प्रत्यक्ष जागेवर तपास करून भाड्याच्या मिळकतीवर करण्य आली आहे. घर मालक स्वतः राहात असलेल्या जागांचे बाबतं पोटमाळे अगर अडगळ साठविण्याच्या जागा यांवरील आकार भाडें कमी धरून करण्यांत आलेली आहे. मे. जनरल कमिटीनें नं. ३३२ तारीख १९।१२।३३ चा करून मे. रिव्हिजन कमिटीच निकालास मान्यता दिली आहे.

पॅरा २४:—नोटीस फीबाबत पूर्वी केलेला नियम सरका मान्य केला नाहीं. याबाबत पुन्हां नवीन नियम करून तो. मे जन रल कमिटीपुढें विचारासाठीं ठेविला आहे.

पॅरा २७:—नवीन कनेक्शन घेतल्यानंतर तें पांच वर्षे पु झाल्यावांचून बंद करतां येत नाहीं, म्हणून म्युनिसिपल कनेक्शनपै पांच वर्षांपेक्षां जास्त दिवस असलेलें एक कनेक्शन बंद करून गडकरी यांचेकडील कनेक्शन तेथें आणण्यांत आलें. ता. २३।११।३ रोजीं म्यु. वर्कशॉपकडील कनेक्शन बंद करून मे. गडकरी यांचेकडी कनेक्शन वर्कशॉपकडे देण्यांत आलें. याला जवळजवळ एक महि लागला. वर्कशॉपकडील कनेक्शन ता. २२।११।३० ते २२।१२।३

( सरकारचे कायदे सल्लागार. ) यांचें मत आहे. अशा डिक्लेरेशन्स ( इकरारांखेरीज ) शिवाय देण्यांत आलेला रिफंड हिशेब तपासणीचे दृष्टीनें मान्य करतां येत नाहीं याकरितां रिफंडाबाबत देण्यांत आलेल्या रकमा वसूल करण्यांत याव्या.

( क ) पॅरा ३५:—म्युनिसिपालिटीला या कामीं आलेला तोटा संबंध असणारे इसमांकडून वसूल करण्याबाबत मे. स्टँडिंग कमिटीनें दिलेला निकाल कळविण्यांत यावा.

३ कर:—

रु. १९,३८८ इतकी रक्कम म्हणजे सालमजकुरीं वसूल व्हावयाच्या रकमेचा शेंकडा २.६ इतकी रक्कम माफींत टाकल्यामुळें सालअखेर वसूल व्हावयाची बाकी रुपये १,५८,८७७ इतकी म्हणजे वसूल व्हावयाच्या एकूण रकमेच्या जवळ जवळ शेंकडा २३ नें वाढली. वसूल व्हावयाच्या रकमेपैकीं मोठमोठ्या रकमा माफींत टाकूनही बाकी सालोसाल तुंबतच चालली आहे ही गोष्ट उद्विग्नकारक वाटते. तें पुढील आंकड्यावरून कळून येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९२८–२९ | सालअखेर बाकी. | | रुपये | ९५,६२५ |
| १९२९–३० | ,, | ,, | रुपये | १,३०,९४७ |
| १९३०–३१ | ,, | ,, | रुपये | १,४२,७५९ |
| १९३१–३२ | ,, | ,, | रुपये | १,५८,८७७ |

वसूल व्हावयाच्या रकमेच्या बाकींत सालोसाल होत असणारी वाढ आणि रकमा ( न वसूल होणाऱ्या ) माफींत टाकल्यामुळें म्युनिसिपालिटीचा होत असणारा तोटा यावरून म्युनिसिपालिटीच्या वसूली खात्याची कामगिरी अगर तीवर ठेवण्यांत येणारी देखरेख भूषणास्पद नाहीं. हरकती पत्रकामधील बाब नं. ५५ पाहिली तर कित्येक कर देणारे इसमांनीं सालोसाल करच दिले नाहींत असें दिसून येईल. बाकी तुंबल्यामुळें ती वसूल होणें अशक्य झाल्यामुळें म्यु. चें नुकसान होतें त्यास आळा घालण्यासाठीं कसोशीनें प्रयत्न होणें फार जरूरीचें आहे. करांची वसुली जारीनें करण्याकरितां जादा ४ कारकुनांची नेमणूक केली असल्याबद्दल गेल्या वर्षाचा तपासणी पत्रकास दिलेल्या उत्तरावरून बोध होतो. तथापि आतांपर्यंत करवसुलीच्या बाबतींत क्वचितच उपयोगांत आणलेले निर्वाणीचे उपाय सरसकट योजल्यावांचून करवसुलीच्या बाबतींत, विशेषतः कर न देणारांचे बाबतींत तरी, सुधारणा होईल असें वाटत नाहीं. चांगलें काम करण्याबद्दल कारकुनांना बक्षीस ( बोनस ) देण्याची पद्धतही पण म्युनिसिपालिटीनें सुरू करून पाहाण्यासारखी आहे. कारकुनाचे ताब्यांत असलेल्या हद्दींतील एकूण जमाबंदीच्या शेंकडा ९० नें कमी नाहीं, इतका वसूल केला तर कारकुनास बक्षीस ( बोनस ) देण्यांत यावे. याही रकमेपेक्षां त्यानें जास्त वसूल आणला तर त्यास देण्याच्या किमान बक्षीसाच्या रकमेंत वसूलाचे मानानें वाढ देण्यांत यावी.

५ ( अ ) माहे मार्च १९३२ मध्यें रु. १९३८८ इतकी करांची बाकी वसूल होण्यासारखी नाहीं म्हणून माफींत टाकली. माफीची कारणें पुढील प्रमाणें होती.

( १ ) घर मालकांची कंगाल परिस्थिती.
( २ ) घर मालक मयत.
( ३ ) घर पडीक स्थितींत अगर,
( ४ ) घर मालकांचा ठावठिकाण माहीत नाहीं.

पॅंयत पुरें एक महिना बंद होतें. म्युनिसिपल कारभाराच्या जरूरीसाठीं मे. गडकरी यांजकडे टेलीफोन कनेक्शन ठेवण्यांत आलेलें होतें. त्यामुळें मे. गडकरी यांजकडून एक महिन्याचें टेलीफोनबाबत भाडें घेतां येत नाहीं.

पॅरा ३०:—कंत्राटदारांनीं दिलेल्या खातीपत्रकांवरून सन १९३०–३१ मध्यें व १९३१–३२ मध्यें रिफंड देण्यांत आले. रिफंडासाठीं जरूर असणारी अट पुरी करण्यासाठीं जरूर ती माहिती आणि दाखले आतां आणविलेले आहेत. जरूर पडेल तर ही माहिती हिशेबनीसांना दाखविण्यांत येईल.

पॅरा ३५:—मे. स्टँडिंग कमिटीनें ठ. नं. ११३४ ता. २१।१०।३२ नें रु. ६२॥ व रु. २५।= या रकमा, प्रकर्णाचा विचार करून माफींत टाकल्या आहेत.

पॅरा नं. ४.

कर वसुलीसाठीं जारीचे उपाय योजून थकलेल्या बाकीचा आंकडा शक्य तेवढा कमी करण्याचें यत्न चालू आहेत. १९३२-३३ सालांत मार्च १९३२ अखेर येणें बाकी रुपये १,५८,८८३ होती. त्यापैकीं रुपये १६,०९६ वसूल केली गेली. परंतु १९३३ मार्च अखेर रुपये १,६५,९८३ इतकी बाकी एकूण थकलेली होती. ती पैकीं रुपये ३४,०५९ वसूल करण्यांत आले. या गोष्टीवरून थकलेल्या बाक्या वसूल करण्याचें कामांत सुधारणा आहे हें कळून येण्यासारखें आहे. वसूल करण्याबद्दल कारकुनांना जादा मुशाहिरा देण्याबद्दल हिशेबनिसांनीं सूचना केल्याप्रमाणें ता. १–९–१९३३ पासून मे. स्टँडिंग कमिटीचे मंजुरीनें प्रयोग करून पाहण्यांत येत आहे.

( ५ अ ) मे. सरकारी हिशेबतपासनिसांनीं आपले आक्षेपांत नमूद केलेल्या घरांचें बाबतींत नियमांत सांगितल्याप्रमाणें बिलें पाठविणें, नोटीसा करणें, वारंटें बजावणें याबाबतींत व्यवस्था करण्यांत आलेली होती. जेव्हां वारंट कारकून वारंटांतील रकमा वसूल करण्यासाठीं गेले तेव्हां त्यांना कांहीं घरें पडीक स्थितींत असल्याचें, कांहीं घर मालक मयत अगर बेपत्ता असल्याचें तर कांहीं घर मालकांच्या वारसांचा तपासही लागत नसल्याचें आढळून आलें. त्यामुळें वारंट

मार्फीत टाकलेल्या रकमेंत १९२८-२९ ते १९३०-३१ सालापर्यंतची बाकी होती. करांच्या रकमा मार्फीत टाकण्यापूर्वी त्या मार्फीत टाकण्यास सर्वथैव पात्र आहेत कां नाहीं अगर वारंट कारकुनानें केलेला, रकमा वसूल होण्यासारख्या नाहींत अशाबद्दलचा रिपोर्ट कोणी तरी जबाबदार अंमलदारानें प्रत्यक्ष जागेवर जाऊन समक्ष चौकशी करून भाडेकऱ्याचेकडे विचारपूस करून पडताळून पाहिल्याचें कागदोपत्रांवरील टिपणांवरून दिसून आलें नाहीं. रकमा मार्फात टाकण्यापूर्वी कर बाकी वसूल करण्याबाबत केलेले सर्व कसोशीचे प्रयत्न निष्फळ ठरले. असें सिद्ध करण्याजोगा सबळ पुरावाही पण पुढें आलेला नाहीं. कित्येक रकमांस माफी दिल्याबाबतची कारणें तर अगदींच तुटपुंजी होती. उदाहरण म्हणून बाजूस दिलेल्या घरांबाबतचे आंकडे देतां येतील. घर मालक मयत झाले अगर त्यांचा ठावठिकाणा लागला नाहीं म्हणून कर बाकी मार्फात काढण्यांत आली. घरपट्टी रजिस्टरांत घरांची माहिती पाहिली तो सदर घरें भाड्यानें देण्यांत आलेलीं असून त्यांवर १९३१-३२ करितां आकारणीही पण बसविण्यांत आलेली असल्याचें दिसून आलें, जरी घर मालक मयत होते तरी म्यु. कर हा त्या त्या मिळकतींवरील अग्रहक्क असल्यामुळें मयतांचे वारसाकडून अगर भाडेकऱ्याकडून तो वसूल करून घेतां आला असता. अगर म्यु. नें कलम ८५ जे प्रमाणें कर न देणाराचे स्थावर मिळकतीची जप्ती करून त्यांचा लिलांव करण्याबाबत नियम करीपर्यंत दिवाणी कोर्टांत दावे लावून घरभाड्यांवर टांच आणून वसूली करतां आली असती.

कारकुनांचें रिपोर्टप्रमाणें रकमा वसूल होण्यासारख्या नसल्यामुळें माफीत टाकाव्या लागल्या. म्यु. ॲक्टाचें कलम ८४ प्रमाणें दर चार वर्षांनीं घरपट्टीबाबत चौकशी होत असतें हें लक्षांत घेतलें पाहिजे. रविवार पेठेची रिव्हिजन तपासणी १९२८—२९ सालामध्यें झाली. जे भाडेकरी सदर सालांत तेथें रहात होते त्यांची नांवें रजिस्टरांत नोंदली गेलीं. म्यु. ॲक्टाचें कलम ८० व ८१ प्रमाणें रिव्हिजन नंतरच्या प्रत्येक वर्षी एक जाहीर नोटीस देण्यांत येऊन म्यु. नें पुढील वर्षांकरितां आकारलेल्या पट्टीबाबत कोणाच्या कांहीं तक्रारी वगैरे आहेत काय याबद्दल चौकशी करण्यांत येत असे.

नोटिसांप्रमाणें ज्या घर मालकांनीं अर्ज केले त्या घर मालकांचीं घरें रिव्हिजन ऑफिसर हे समक्ष जाऊन पाहून त्या बाबतची आकारणी दुरुस्त अगर कमी करीत असत. बाकीच्या घरांची आकारणी मात्र मागील सालाप्रमाणेंच पुढील सालींही करण्यात येत असे.

मे. हिशेब तपासनिसांनीं आक्षेपांत दाखविलेल्या घरांचे बाबतींत म्यु. नें दिलेल्या नोटीशीस अनुसरून घर मालकांकडून म्यु. कडे अर्ज आले नाहींत त्यामुळें सन १९३१—३२ मध्यें रिव्हिजन ऑफिसर यांनीं तीं घरें तपासलीं नाहींत. असें असतांना सदर सालांत त्या घरांतून भाडेकरी होते अशाबद्दलचें विधान मे. सरकारी हिशेब तपासनीस हें कसें करतात हें समजत नाहीं. सरतेशेवटी तपासणी होत असतांना या पूर्वीच्या तपासण्यांच्या प्रमाणें एकंदर वस्तुस्थितीबद्दलचा खुलासा करण्यास व वसुली सुपरिंटेंडेंट यांचा हिशेब तपासनिसांचें मनास वाटेल अशा रीतीनें कागदपत्रें दाखविण्यास जर जरूर ती सवड दिली असती तर या रकमांच्या वसुलीबाबत कचेरीकडून जी तजवीज करण्यांत आली ती बाबत खुलासेवार उलगडा करण्यात आला असता व हरकत काढण्यांत आली तिचेंही कारण उरलें नसतें.

( ब ) याखेरीज दुसरी गोष्ट ही कीं सरकारी ठराव जनरल डिपार्टमेंट नं. ३१३३ ता. २३ मार्च १९३१ मध्यें मंजूर झालेल्या नियमापैकीं नियम नं. १ प्रमाणें स्टँडिंग कमिटीस १९२९-३० व १९३०—३१ सालच्या १० रुपयांपेक्षां जास्त रकमेच्या बाक्या मार्च १९३२ मध्यें माफीत टाकल्या त्या नियमाप्रमाणें गेल्या तीन वर्षांपेक्षां जास्त काळ येण्याच्या शिल्लक नसल्यामुळें माफीत टाकतां येण्यासारख्या नव्हत्या. या रकमांना अकालीं माफी दिली ती नियमबाह्य असल्यामुळें हिशेब तपासणींत मंजूर करतां येत नाहीं. या सर्व रकमा पुन्हां ठरावबंदावर लिहाव्या व त्या शक्य तितक्या वसूल करण्याचा पुनः प्रयत्न करावा. " शक्य तेवढ्या काळजीनें व तत्परतेनें करांच्या बाक्या वसूल करून वसूल होण्याची रकम योग्य कालावधींमध्यें योग्य तो खर्च करण्यांत आला तरी कोणत्याही कायदेशीर मार्गानें वसूल होण्यासारखी नव्हती." अशा तऱ्हेची स्थिती रकमा मार्फीत घातल्या त्यांचे किती बाबतींत होती अगर वसुली करण्यास जबाबदार असणाऱ्या इसमांच्या निष्काळजीपणामुळें म्यु. च्या या होत असणाऱ्या तोट्यास मदत होत नव्हती, ह्याचा म्युनिसिपालिटीनें तपास करावयास हवा. वसुली करणारे कारकून अगर वारंट कारकुन यांच्या रिपोर्टावरून केवळ भिस्त न ठेवतां यापुढें मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांनीं परिस्थितीचें प्रत्यक्ष अवलोकन केल्यावर योग्य कालांत

( ५ ब ) मे. सरकारी हिशेब तपासणीस यांनीं सूचना केल्याप्रमाणें इतःपर मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांनीं रकमा वसूल होण्यासारख्या नसल्याबद्दलचा दाखला प्रत्येक बाबतींत दिल्याखेरीज रकमा माफीत टाकल्या नाहींत अशी तजवीज करण्यांत आली आहे. तसेंच तीन वर्षांपेक्षां कमी मुदतींत असणाऱ्या दहा रुपयांवरील रकमा पुन्हां ठराव बंदास लिहून त्या शक्य तितक्या वसूल करण्याबद्दल वसुली सुपरिंटेंडेंट यांना हुकूम दिलेला आहे.

व जरूर ते कायदेशीर इलाज योजूनही रकम वसूल होण्यासारखी नाहीं अशाबद्दल दाखला दिल्यावांचून रकमा इतःपर माफींत टाकण्यांत येऊं नयेत.

६ (अ) घर पट्टीचा नियम ४ व ९ अन्वयें सार्वजनिक धार्मिक अगर धर्मादाय कामासाठीं जर घरांचा उपयोग केलेला असेल तर त्यांवर घरपट्टी माफ करावी असें असले तरी त्यांवरील बिन पायखानापट्टी व सर्वसाधारण पाणीपट्टी ह्यांना चालू नियमाप्रमाणें माफी देतां येत नाहीं. असें असतांना हरकतीपत्रकांतील ७ व्या बाबतींत उल्लेख केलेल्या घरांवर घरपट्टी माफ असतांना वरील दोन्ही करांना माफी दिल्याचीं उदाहरणें नजरेस आलीं आहेत.

(ब) तसेंच घरपट्टीबाबत ६ व्या नियमाखालीं २० रुपायापेक्षां कमी भाडें येणाऱ्या घरांवर घरपट्टीची माफी देण्यांत येते. पण बिनपायखाना पट्टी व सर्वसाधारण पाणीपट्टी याबाबत वरीलप्रमाणें घरांस माफी लागू नाहीं. या करांचे नियम नंबर १ प्रमाणें म्युनिसिपल नंबर दिलेला असून जेथें वस्ती आहे, तेथें वरील कर घ्यावयास पाहिजेत, मग तेथें कितीही भाडें येवो. हरकतीपत्रकांतील बाब ६ येथें या तऱ्हेचे मासले नमूद केलेले आहेत. अशा तऱ्हेची पद्धत कोणत्या नियमास अनुसरून चालू आहे हें दाखवावें अगर ज्या घरावरील हे कर माफींत घातले त्यांवरून ते आकारण्यांत यावे.

(क) ठराव बंदाची तपासणी करीत असतांना कित्येक घरांना १९३१–३२ सालांत ड्रेनेजचा जोड दिल्यामुळें सदर घरावरील पायखाना अगर बिगर पायखानापट्टी वसूल करण्याचें बंद केलें तरीही साल मजकुरीं ड्रेनेजपट्टी न घेतल्याचें दिसून आलें यावद्दल हरकतीपत्रकांतील बाबी ३१ व ३२ मध्यें उल्लेख आहे.

ड्रेनेजचे घरजोड नक्की कोणत्या तारखेस दिले ह्याबद्दलची माहिती इंजिनियर खात्याकडून यावयाची असल्यामुळें ही आकारणी अद्याप करण्यांत न आल्याचें मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांनीं सांगितलें. हा खुलासा दोन्ही खात्यांच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनें भूषणावह नाहीं. या तोट्यास कारणीभूत असणारे इसमांस जबाबदार कां धरूं नये याबद्दल म्युनिसिपालिटीनें चौकशी करून त्याचा विचार करावा.

(२) म्युनिसिपालिटीमार्फत दिलेल्या ड्रेनेजच्या घरजोडांचे व्यतिरिक्त मे. एक्झिक्यूटीव्ह इंजिनियर यांनीं घरजोड बरेचसे दिले ते वेगळेच. यापैकीं कांहीं घरजोड तपासून पाहून त्यांवर ड्रेनेज कराची आकारणी करण्यांत आली नसावी हें हरकतीपत्रकाच्या १६७ व्या बाबींत उदाहरणें दर्शविलीं आहेत त्यावरून दिसून येईल. या संबंधांत पूरतपास होऊन ड्रेनेज कराची आकारणी करावी.

(ड) घ. नं. ३६७ ते ६१८ (यांतील घर नंबर ५९५ ५९६ व ५७५ अ खेरीज करून) यांवरून घरपट्टीची व बिन पायखानापट्टीची आकारणी करण्यांत आली असून सर्वसाधारण पाणीपट्टी आकारण्यांत आलेली नाहीं. घ. नं. ५९५, ५९६ व ५७५ यावरून ही पट्टी आकारली आहे. सर्वसाधारण पाणीपट्टीची आकारणी न केलेल्या घरांपैकीं कांहीं घरें पाण्याचे नळापासून (मेनपासून) १०० फुटांपेक्षां कमी अंतरावर असूनही नियम नं. १ प्रमाणें पाणीपट्टीबद्दल आकारणी केलेली नाहीं. सर्वसाधारण पाणीपट्टीच्या या माफीबद्दल काय कारणे आहेत याचा तपास करावा.

(पॅरा ६ अ व ब)

याबाबत हरकतीपत्रकांत (ऑब्जेक्शन स्टेटमेंट) खुलासेवार उत्तर दिलेलें पहावें.

गेल्या डिव्हिजन चौकशीमध्यें प्यारा ६ अ मध्यें नमूद केलेल्या घरांपैकीं कांहीं घरें भाड्यानें दिलीं असल्याचें आढळून आल्यामुळें घरपट्टी, बिन पायखानापट्टी व सर्वसाधारण पाणीपट्टी यांची आकारणी तारीख १–४–३३ पासून करण्यांत आलेली आहे. तसेंच प्यारा ६ व मध्यें नमूद केलेल्या घरांचे बाबतींत बिन पायखानापट्टी व सर्वसाधारण पाणीपट्टी यांचीही आकारणी ता. १–४–३३ पासून करण्यांत आलेली आहे.

पॅरा ६ (क) १.

सन १९३२–३३ मध्यें ज्यावेळीं ड्रेनेजचे घरजोड देण्यांत आले त्या वेळेपासून, ड्रेनेज खात्यानें माहिती कळविल्याप्रमाणें ड्रेनेज कराची आकारणी, हरकती पत्रकांतील ३१ व ३२ प्याऱ्यांत नमूद केल्याप्रमाणें सर्व घरावर करण्यांत आलेली असून ती वसूल करण्यांत येत आहे.

मे. एक्झिक्यूटीव्ह इंजिनियर यांजकडून कळविण्यांत आलेल्या ड्रेनेज घरजोडासह एकंदर घरजोड किती देण्यांत आले याचा तक्ता मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांजकडे वक्तशीर देण्याबद्दल मे. डेव्हलपमेंट इंजिनियर यांचेकडे कळविण्यांत आलें आहे. या बाबतींत जबाबदार कोणास धरावें याबद्दल पूरतपास चालू असून म्युनिसिपालिटीच्या नजरेस ही बाब आणण्यांत येणार आहे.

पॅरा ६ (क) २.

मे. एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर पुणें वाटर वर्क्स डिव्हिजन यांजकडून खुलासेवार तपशील मागितला आहे. अजून उत्तर आलेलें नाहीं.

पॅरा ६ (ड)

हरकतींत नमूद केलेलीं घरें पाण्याच्या नळापासून १०० फुटापेक्षां अंतरावर आहेत किंवा काय याबद्दल इंजिनियरिंग खात्याकडून माहिती आतां आलेली असून जीं घरें नळापासून १०० फुटांपेक्षां कमी अंतरावर असल्याचें दिसून आलें अशा घरांवर नळ घालण्यांत आलेल्या महिन्यापासून कराची आकारणी करण्यांत आलेली आहे. हरकतीपत्रकाच्या १० व प्याऱ्यांमधील हरकतीस दिलेलें उत्तर पहावें.

(ई) पुष्कळशीं देवळें, मशीदी, चर्च वगैरेंना खास नळ देऊन मोफत पाणी देण्यांत आलें आहे. याबाबतचा नियम ५ अ यामध्यें सदर इमारतीचा कोणताही भाग अगर त्यांतील कोणतीही मोकळी जागा भाड्यानें देण्यांत आलेली नसेल तरच मोफत नळ देण्यांत येईल असें सांगितलें आहे. या सवलतीचा दुरुपयोग करण्यांत न यावा म्हणून वरील देवळें चर्च वगैरेंच्या पंचाकडून अगर व्यवस्थापकांकडून जागा भाड्यानें न दिल्याबद्दल वारंवार लेख घेण्यांत येऊन ते म्युनिसिपल दप्तरांत ठेवावेत.

पॅरा ६ (ई)

चौकशी करतांना ज्या ठिकाणीं भाडेकरी ठेवल्याचें निदर्शनास आलें त्या ठिकाणांवर खास पाणीपट्टी बसवून ती वसूल करण्यांत येत आहे. हिशेब तपासनिसांनीं सुचविल्याप्रमाणें या जागांच्या व्यवस्थापकांकडून वेळोवेळीं दाखले मागण्याचीही तजवीज होत आहे.

(एफ्) हरकतीपत्रकांतील बाब नं. २२ व २४ पाहिल्या तर असें आढळून येईल कीं, पाणीपट्टीच्या नियमांतील नियम नंबर ५ अ हा सार्वजनिक उपासनेच्या ठिकाणीं मोफत पाणी देण्याबाबतचा असतांना तालीमखाना, धर्मशाळा वगैरे जागांसही अशाच प्रकारें मोफत नळ दिल्याच दृष्टोत्पत्तीस आलें. अशा तऱ्हेनें पाणी देणें हें नियमबाह्य असल्यामुळें यापुढें अशा जागांना पाणी देणें बंद करून सध्यां चालू असणाऱ्या नळांवरील पाणीपट्टी वसूल करावी.

पॅरा ६ (एफ्)

हरकतीचा उतारा मे. स्टँडिंग कमिटीपुढें विचारासाठीं ठेवण्यांत आला आहे.

(जी) कित्येक ठिकाणीं पाणीपुरवठ्यावर म्युनिसिपालिटीकडून मीटर लावून पाण्याच्या खपावर आकार बसविला जात असून पाणीपट्टीची वसुली होत असली तरी वेगळें मीटरचें भाडें येत आहे किंवा नाहीं हें पाहाण्यासाठीं वेगळें मागणी व वसुली रजिस्टर ठेवण्यांत आलें नाहीं.

या बाबतींत चौकशी करतां नळ सुपरिंटेंडेंट यांनीं सांगितलें कीं, पाण्याच्या खपाबद्दल त्याचप्रमाणें मीटर भाड्याबद्दल आकारांचे तक्ते वसुलीखात्याकडे रकमा वसूल करण्यासाठीं पाठविण्यांत येत असत. मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांनीं, म्युनिसिपल इंजिनियर यांचे आफिसकडे मीटर भाड्याच्या रकमा जमा झाल्या त्या पाठविल्याचें व मीटर भाडें कित्येकदां म्युनिसिपल इंजिनियर यांचेकडून वसूल केलें जातें तेव्हां मीटरभाड्याबद्दलची नोंद इंजिनियर ऑफीसनेंच ठेवणें इष्ट आहे असें प्रतिपादन केलें. यामुळें दरमहा भाडें वसुलीकडे दोन्ही ऑफिसांनीं लक्ष न दिल्यामुळें मीटरबाबत एकूण येणें, वसूल झालेलें असून ते म्यु. तखजिन्यास जमा झालेलें आहे किंवा नाहीं हें हिशेब तपासणींत समजलें नाहीं. मीटर भाड्याबद्दलची मागणी कोणच्या ऑफिसनें करावयाची हें ठरवून १९३१–३२ व १९३२–३३ सालची एकंदर मागणी, प्रत्यक्ष आलेला वसूल व वसूल व्हावयाची राहिलेली बाकी यांचा हिशेब करावा.

पॅरा ६ (जी)

मीटर रिडिंग्ज घेणें, व त्याबाबत जरूर तीं रजिस्टरें ठेवणें बिलें करणें व बिलांची वसुली वगैरे करणें हीं कामें मे. म्युनिसिपल इंजिनियर यांचेकडून होतात. आतां जास्ती नोकरवर्ग ठेवून मागणीकडे लक्ष देऊन वक्तशीरपणानें वसुली करण्यांत येते.

(ह) पूर्वीच्या तपासणी पत्रकांतून वारंवार कळविलेलें असूनही नोटीस व वारंट फी आकारल्याबाबतचें ठरावबंद जसजशी बाकी वाढेल तसतसें ठेवण्यांत आलें नाहींत. हरकती पत्रकांतील बाब नं. ५९ यांत उदाहरणें दिलीं आहेत. त्याबाबत ठराव बंद तर हिशेबतपासणी चालू होती तेव्हांच तयार केलेले आहेत. वर्ष संपून जाऊन दुसरें वर्ष गेल्यावर अशा तऱ्हेच्या ठरावबंदांनीं तें ज्याकरितां लिहावयाचें असतात ते हेतु साध्य होत नाहींत. लिहिण्यांत आलेल्या ठरावबंदांतून प्रत्यक्ष वसूल केलेल्या बाक्यांचेंच आंकडे लिहिण्यांत आल्याचें दिसून आलें. म्युनिसिपल नियमांप्रमाणें नोटीस अगर वारंट फी ही नोटीस अगर वारंट बजावल्यानंतर आकारावयाची असल्यामुळें ही फी तावडतोब ठरावबंदास लिहून इतर करबाकीप्रमाणें तिचा वसूल झाला पाहिजे.

पॅरा ६ एच.

हिशेब तपासनीसांच्या सुचनेस अनुसरून सन १९३२–३३ सालांकरितां रजिस्टरें तयार करण्यांत आलीं आहेत.

(६) म्युनिसिपालिकडून जागा घेऊन तीवर इमारती बांधल्या असतां घरपट्टी व इतर करांची आकारणी घरभाड्याच्या उत्पन्नांतून म्युनिसिपालिटीला दिलेलें भाडें वजा टाकून आलेल्या रकमेवर करण्यांत येते. त्याचप्रमाणें भाडेपट्ट्यानें लोकांकडून जमिनी घेऊन त्यांवर इमारती बांधल्या असल्या तर त्यावर करांची आकारणी वेगवेगळी करण्यांत येते, म्हणजे खुल्या जागेबद्दल आकारणी जमिनीचे मालकांवर व इमारतीबद्दल आकारणी इमारतीचे मालकांवर होते. हरकतीपत्रकांतील १०० वे बाबींत उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून कळून येईल कीं, अशा तऱ्हेची फाळणी केल्यामुळें इमारतींवरील भाड्याचा आकार कर घेण्याच्या मर्यादेपेक्षां कमी झाल्यानें इमारतींवर घरपट्टीचा आकार बसला नाहीं व कांहीं ठिकाणीं पट्टी दुबार बसली. जमीनी व खुल्या जागा यांवर कर बसविण्याचा विचार म्युनिसिपल नियमांतून केलेला नसल्यामुळें उघड्या जागेवरच फक्त कर बसविणें योग्य दिसत नाहीं. घरपट्टीबाबतचे नियमांतील नियम १ अ व ब प्रमाणें, घरें, वाडे, दुकानें, गाळे व कोठे अगर माल सांठविण्याच्या खुल्या जागा यांवर कर बसविणेबद्दल सांगितलें असून कर बसविण्याकरितां मूलभूत अशा भाड्याचे रकमेंत भाडेकऱ्यानें जागा आडवण्याबद्दल कर, विमा अगर भाड्याबाबत इतर अटींस अनुसरून मालकांस द्यावयाच्या रकमेचा समावेश व्हावयास पाहिजे. म्हणून जमीनभाड्याची रकम इमारतीचे भाड्याचें उत्पन्नांतून वजा टाकणें चुकीचें असून इमारतीचें भाड्याचें उत्पन्नांतच ती जमेस धरून तीवर कराची आकारणी होणेस हवी. मग बांधण्यांत आलेल्या इमारती खासगी जागेवर बांधलेल्या असोत अगर म्युनिसिपल जागेवर असोत.

पॅरा ६ (आय).

या बाबीबद्दलचा उत्तर मे. लॉ कमिटीपुढें ठेविला आहे.

७. म्युनिसिपालिटीच्या सर्वसाधारण पाणीपट्टी व खिनपायखानापट्टी बाबतच्या नियमास अनुसरून मार्केट इमारतींतील गाळ्यांवर सन१९३१-३२सालीं या पट्ट्या आकारण्यांत आलेल्या नाहींत. ही चूक १९२६-२७ व १९२७-२८ च्या हिशेब तपासणींत नजरेस आणली होती तरी वरील करांची आकारणी १९३२ च्या १ जुलै पासून करण्यांत आलेली आहे. १९२७-२८ मधील करांच्या भिन आकारणीबाबत हरकत निकालांत काढतांना मे. कलेक्टर यांनीं पत्र नं. १/४९ ता. ३१ जुलै १९३० मध्यें "म्युनिसिपालिटीचें उत्तर समाधानकारक नाहीं. सर्वसाधारण पाणीपट्टी व भिनपायखाना पट्टी हे सर्वसाधारण कर असल्यामुळें ते केवळ राहण्याच्याच घरांवरच बसवावयाचें नसून वापर होत असणाऱ्या इतर सर्व जागांवरही त्यांबद्दल खास भाडें देण्यांत येत नसेल तर आकारण्याचें आहेत. तेव्हां हे दोन कर आकारलेच पाहिजेत" असें लिहिलें आहे. १९२६-२७ व १९२७-२८ च्या हिशेब तपासणी पत्रकांतून दोष दाखवून म्युनिसिपालिटीचा होत असणारा तोटा दाखण्यांत आला असतांना १ जुलै १९३२ पासून कराची आकारणी होत आहे. म्युनिसिपालिटीचा या कराबाबतचा गेल्या सहा वर्षांतील एकूण तोटा जवळ जवळ रुपये ६१२० इतका झाला. मुंबईच्या बरो म्युनिसिपल ॲक्टाचें कलम १४ (जी) अन्वयें मे. चीफ ऑफिसर यांनीं हिशेब तपासणीमध्यें दाखविलेला दोष दूर करण्याबाबत तडफेनें व हुषारीनें काय तजवीज केली होती याबाबत म्युनिसिपालिटी खात्रीनें चौकशी करील अशी आशा आहे.

पॅरा ७

याबाबत प्रकरण मे. स्टँडिंग कमिटीमार्फत मे. जनरल कमिटीपुढें ठेविलें आहे.

८ (अ) गाडीपट्टीची मागणी, आरोग्यखात्याकडून वेळोवेळीं गणतीं होऊन येणाऱ्या तक्त्यांतील माहितीवरून करण्यांत येते. हरकतीपत्रकांतील बाबी ३६,३७ व ३८ पाहिल्या तर आरोग्य खात्यानें कळविलेली माहिती व प्रत्यक्ष कर बसविण्यांत आला त्या बाबतची माहिती यांत पुष्कळच फरक असल्याचें दिसून आलें. कराबाबत रजिस्टरांवर मागणी लिहिण्यांत येऊन करहीपण प्रत्यक्ष वसूल झाला अशा कित्येक गाड्या आरोग्य खात्याकडील तक्त्यांत नमूद केलेल्या नव्हत्या, तर आरोग्य खात्याकडील तक्त्यांतून गाड्या लिहिलेल्या असून त्या जाग्यावर नाहींत म्हणून त्यांवर पट्टी आकारण्यांत आलेली नव्हती. आरोग्य खात्याकडे चौकशी करुन दोन्ही तक्त्यांतील तफावतीबाबत मेळ घालण्याचें काम वसुली खात्याकडून झालें नाहीं. आरोग्यखात्याकडून तपासणी होत असलेली प्रतिवार्षिक गणती हीच हा कर घेण्याचें मूलभूत प्रमाण असल्यानें ही माहिती व ठरावबंदास नमूद असणाऱ्या नोंदी यांतील मोठा फरक पाहिला तर शहरांतील गाडीपट्टीस पात्र असणाऱ्या नक्की वाहनांची संख्या अगर कर घेतलेली वाहनांची संख्या या दोन्ही बरोबर असाव्या असें वाटत नाहीं. वाहनांच्या गणतीबाबत बेजबाबदार रीतीनें तक्ते करण्यांत आल्यामुळें माहितीमध्यें घोटाळा उपस्थित होऊन म्युनिसिपालिटीचें आर्थिक नुकसान होणें शक्य असून त्याबद्दल संबंध असणाऱ्या खात्यांस जबाबदार धरणें जरुर आहे.

पॅरा (८)

बरोबर माहिती देण्याबद्दल सक्त हुकूम संबंध असणारे लोकांना देण्यांत आले आहेत.

(९) ज्यांवर नोटीसा काढण्यांत आल्या अशा सर्व लोकांवर नोटीसफी बसविण्यांस पाहिजे असा नियम असतांना ज्या लोकांवर करवसुलीसाठीं प्रत्यक्ष नोटीसा बजावण्यांत आल्या अशा लोकांवरच फक्त नोटीस फीची आकारणी करण्यांत आली. चालू असणारे परिपाठास अनुसरुन नियम तयार करण्यांत येत आहेत असें सांगण्यांत आलें, तरी प्रत्यक्ष जोपर्यंत नियम तयार करुन त्यांस मंजुरी आणलेली नाहीं तोपर्यंत नियमबाह्य असलेला परिपाठ हिशेब तपासणींत ग्राह्य धरला जाणार नाहीं. एकूण वर्षामध्यें नोटीसफीची जेवढी आकारणी करण्यांत आली असेल तेवढी सर्व वसूल करण्यांत यावी.

पॅरा ९ वा.

मे. सरकारी ऑडिटर यांनीं सुचविल्याप्रमाणें सन १९३१–३२ व १९३२–३३ सालांकरितां नोटीस फीची रक्कम वसूल करण्याची तजवीज होत आहे सुचविलेल्या नियमांना सरकारची मंजुरी येईपर्यंत नोटीस फी माफ करण्याची १९३३–३४ पासून बंद करण्यांत आली आहे.

१०. या तपासणीपत्रकाचे पांचवे प्याऱ्यामध्यें लिहिल्यावरून दिसून येईल कीं (१) घरमालकांचा ठावठिकाण माहित नसल्यामुळें (२) घर मालक मयत झाल्यामुळें अगर (३) जागेवर जंगम माल न सांपडल्यामुळें वगैरे कारणांवरून म्युनिसिपल करांची वसुली न होऊन म्यु. चा बराच तोटा होत आहे. म्यु. ॲक्टाचें कलम १०५ (क) अन्वयें कर न देणाराची स्थावर मालमत्ता जप्त करून विक्रीस काढण्याचा आखत्यार म्यु. स आहे. तथापि मालमत्तेची जप्ती व विक्री याबाबत नियम केलेले नसल्यामुळें ह्या अधिकाराचा उपयोग करण्यांत येत नाहीं. कलम ५८ (जे) खालीं स्थावर मिळकतींची जप्ती व विक्री करण्याबद्दल नियम करून जरुरीप्रमाणें त्यांची अंमलबजावणी होईल तर म्युनिसिपालिटीचा होणारा बराचसा तोटा कमी होईल.

पॅरा १० वा.

म्युनिसिपल ॲक्टाचें कलम ५८ जे या खालीं स्थावर मिळकतींची जप्ती करून ती विक्रीस काढण्याबाबत नियमांचा मसुदा मे. जनरल कमिटीनें ठराव नं. ३७ ता. ६–५–३२ नें नागरिकांकडून त्याबाबत हरकती मागविल्यानंतर मंजूर केला. सरकारची मंजुरी मिळविण्यासाठीं हे नियम मे. कलेक्टरसाहेब पुर्णे यांचेकडे पत्र नं. ३८५३ तारीख २८–७–३२ नें पाठविण्यांत आलें. या नियमांत थोड्याफार दुरुस्त्या म्हणून कलेक्टरसाहेब यांचेकडून पत्र नं. ११०८ ता. २२–१०–३२ नें नियम पुनः परत आले. मे. कलेक्टरसाहेब यांनीं केलेल्या सुचनांचा विचार सध्यां चालू आहे.

### ४. रे मार्केट कडील हिशेब

११ (अ) ता. ३१ मार्च १९३२ रोजीं मार्केटांतील गाळेवाले व मार्केट मैदानांत भाड्यानें खुल्या जागा घेणारे लोकांकडून, साल मजकुरीं व्हावयाची एकूण रुपये ६८,१२२ रकमे-

पॅरा ११ (अ)

ता. ३१ मार्च १९३२ अखेर एकूण येणें बाकींमध्यें नमूद केल्याप्रमाणें रुपये १६,५३५ नसून रुपये १६५६५–१२–० होती.

पैकीं रु. १६,५३५ इतकी रक्कम बाकी म्हणून वसूल होण्याची शिल्लक राहिली होती. हरकतपित्रकाची बाब १०२ यांत उल्लेख केलेलीं कांहीं उदाहरणें पाहिलीं तर लागोपाठ दोन दोन तीन तीन वर्षे मासिक भाडेंच दिलेलें नाहीं अशी उदाहरणें दिसून आलीं अशा रीतीनें भाडें थकविणारामध्यें पुढें दिलेले इसम होते:—

| नांव | ३१ मार्च १९३२ रोजीं बाकी रुपये. |
|---|---|
| (१) मैनाबाई हाशमत. | १०४ |
| (२) अब्दुल रहीम मोमीनभाई. | ९६ |
| (३) लालभाई माणीकसाहेब. | १६४० |

वरीलपैकीं नं. १ ची इसम, म्युनिसिपल कौन्सिलर मि. महमूभाई यांची आई असून नंबर २ चे इसम त्यांचा मुलगा आहे. जरी १ ले नंबरचा गाळा मैनाबाई हाशमत या नांवावर आहे तरी बाई मजकूर ही बरेंच दिवसांपासून मयत असून गाळा प्रत्यक्ष म्यु. कौन्सिलर महमूभाई यांचे ताब्यांत आहे. ता. ३१ मार्च १९३२ रोजीं रु. १,६४० बाकी असणारे इसम मि. लालभाई माणिक साहेब हे म्युनिसिपल सभासद असल्याचें कळतें म्युनिसिपल सभासदांनीच बाकी भरण्याची थकवली तर इतरांनी भाडें वक्तशीरपणानें भरावें अशी आशा क्वचितच करावयास पाहिजे. हिशेब तपासणींत हरकत काढल्यावर डिसेंबर १९३२ मध्यें नं. ३ च्या गृहस्थांनीं सर्व बाकी व नं. १ व २ नीं कांहीं बाकी चुकती केली.

एकूण येणें असलेल्या बाकीमधून माहे मार्च १९३३ अखेर एकूण रक्कम रुपये ११,९८५–१४–० चालू सालामध्यें वसूल करण्यांत आलें. हरकतींमधील १, २ व ३ या बाबतींतील रकमा पूर्णपणें वसूल केलेल्या आहेत.

हरकतपित्रकांत १०२ वे बाबतींत उत्तर दिलेलें आहे. त्यांत सविस्तर खुलासा करण्यांत आलेला आहे.

(ब) भाड्याची बाकी वसूल होण्याची बरीच शिल्लक असतांना भाडें वसुलीबाबत कसोशीनें प्रयत्न केल्याचें दिसून येत नाहीं. भाडें येण्याबद्दल ठराव बंद करणें व भाडें वसुली करणें हीं दोन्हीं कामें रा. मार्केट इन्स्पेक्टर यांकडेच दिलेलीं असून त्यांचे कामावर योग्य देखरेख ठेविली गेलेली नव्हती. भाडें वसुलीचें काम कितपत जारीनें चाललें आहे हें पाहण्यासाठीं मासिक अगर तिमाही तक्ते मागविण्यांत येत नव्हते, इतकेंच काय पण साल अखेरीचे हिशेब, वसूल बाक्या वगैरेवरसुद्धा मे. चीफ ऑफिसर यांनीं अगर दुसऱ्या कोणाही अधिकृत अंमलदारानें ते पाहून त्यावर सही केलेली नाहीं. म्युनिसिपालिटीनें जागांचें स्वामित्व व भाड्याची सुरक्षितता संभाळण्याची केलेली तजवीज अपुरी असून निकामी आहे. जुन्या गाळेवाल्यांनीं तर मार्केट पोट नियमास अनुसरून भाडेचिठ्ठ्या लिहून देण्याचें साफ नाकारलेंच. पण म्युनिसिपालिटीचा त्यांना गाळ्यांवरून काढून लावण्याचा जो हक्क आहे, त्या हक्काबाबतही ते वाद घालतात. इतका प्रकार झाला तरी योग्य उपायांचा अवलंब करून यावर इलाज करण्यांत आलेला नाहीं. अगदीं अलीकडे १९३१–३२ मध्यें भाडेपट्ट्यानें जागा दिल्या त्यांच्या बाबतींतही योग्य तो भाडेपट्टा लिहून घेऊन भाडें वक्तशीर भरण्याबाबत भाडेकऱ्याकडून जामीन अगर आगाऊ भाडें देण्याबाबत हमी घेण्यांत आलेली नाहीं. मार्केट सभोंवतालच्या किंमतीच्या खुल्या जागा हल्लीं खासगी लोकांना इमारती बांधण्यासाठीं ज्या भाड्यानें देण्यांत आल्या आहेत त्या वस्तुतः योग्य भाडेपट्टा लिहून घेतल्याशिवाय भाडेकऱ्याकडे यावयास नको होत्या. थकलेलें भाडें वसूल करण्याचे बाबतींत म्युनिसिपालिटीला समरी पॉवरचा अधिकार नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. भाडें वसुलीसाठीं दिवाणी कोर्टाचा मार्ग पत्करणें त्रासदायक असून शिवाय वेळच पैसा तंटा.

पॅरा ११ (ब).

भाडें वसुलीच्या बाबतींत सध्यां अमलांत असलेल्या नियमांस अनुसरून शक्य तेवढ्या उपायांचा अवलंब करण्यांत येत आहे. गाळ्यांचे भाडेकऱ्यांचेकडून भाडेचिठ्ठ्या घेणें व भाडें वसुलीसाठीं पुरेशीं उपायांची योजना करणें याबाबत मे. स्टँडिंग कमिटीनें नेमलेल्या पोटकमिटीकडून सध्यां विचार चालू आहे. तसेंच मार्केटबाबत ही पोटनियमांचा विचार म्युनिसिपालिटी करीत आहे.

मार्केट खात्याचें काम मार्केट इन्स्पेक्टर यांचे देखरेखीखालीं चालत असल्यामुळें भाड्याची डिमांड रजिस्टरें वगैरेंवर तेच सह्या करतात. ही पद्धत बरेंच दिवसांपासून अमलांत असून तीस पूर्वी हरकत घेण्यांत आलेली नव्हती. मार्केटकडील रजिस्टरांवर मे. चीफ ऑफिसर यांनीं सह्या केलेल्या नव्हत्या, यावरून मार्केट इन्स्पेक्टरच्या कामावर मे. चीफ ऑफिसर यांची देखरेख नव्हती असें नाहीं. मार्केट बाबतींत देखरेख करण्यासाठीं यंदाचे सालीं एक पोटकमिटी नेमण्यांत आलेली आहे. मागणी रजिस्टरप्रमाणें येणें असलेल्या भाड्याबाबत तसेंच वसुलीबाबत प्रगति दर्शविणारे मासिक तक्ते मागविण्यांत येतात व त्यांची तपासणी करण्यांत येते. या पुढें वार्षिक हिशेबावरून मे. हिशेब तपासनीस यांनीं सुचविल्याप्रमाणें चीफ ऑफिसर यांच्या सह्या होत आहेत.

मध्ये निष्कारण खर्च कसा करावा लागतो हें वऱ्याचशा विन-बजावलेल्या दरखास्ती म्यु. जवळ आहेत त्यांवरुन कळून येईल. याचीं उदाहरणें हरकती पत्रकांतील बाब १ (अ) व १०७ यांत नमूद केलेलीं प्राहाण्यासारखीं आहेत. अशा परिस्थितींत म्युनिसिपालिटीच्या हितसंरक्षणार्थ योग्य ते इलाज उपयोगांत आणण्याची जरुरी जास्त विशद करुन सांगावयास पाहिजे असें नाहीं.

(क) दरमहा ७ तारखेच्या आंत जर भाडें भरलें नाहीं तर दोन रुपये भाड्यापर्यंत दोन आणे व दोन रुपयापेक्षां जास्त भाड्या बद्दल चार आणे याप्रमाणें नोटीस फी आकारण्यांत येते. ही फी म्युनिसिपालिटीनें केलेल्या व सरकारनें मंजूर केलेल्या नियमांप्रमाणें आकारली जात नाहीं म्हणून सध्यां चालू असलेल्या परिपाठाप्रमाणें नियम तयार करण्यांत यावेत.

पॅरा ११ क.

मार्केट कमिटीकडून या प्रश्नाचा विचार चालू आहे.

५ जकातीचें–उत्पन्न.

१२ (अ) सरकारी अंमलदाराबरोबर करण्यांत आलेल्या करारांस अनुसरून जर आयात झालेल्या मालाचे जकातीवर रिफंड द्यावयाचा असेल तर रिफंडाचें नियमांतील ११ व्या नियमाप्रमाणें पुढील अटी मालाची आयात करणारांस पाळाव्या लागतात.

(१) मालाची आयात करतांना द्यावयाच्या खात्रीपत्रकांत त्यानें कामाचें नांव आणि सरकारी अंमलदार यांचा नामनिर्देश करावयास पाहिजे.

(२) आयात होणाऱ्या मालाचा उपयोग सरकारी अंमलदाराकडे व्हावयाचा आहे अशाबद्दल त्या कामावरील अंमलदारानें दाखला दिलेला पाहिजे.

(३) नियम ११ मधील अट नंबर १ या बाबतींत अर्धवट रीतीनें अंमलबजावणी झाल्याचें दिसून आलें. जरी मालाची आयात करणारांनीं मालाचा उपयोग सरकारी अंमलदाराबरोबर झालेल्या करारांप्रमाणें करण्यांत यावयाचा असल्याबद्दल खात्रीपत्रक लिहून दिलेलें असलें, तरी नक्की अमुक एका कामावर माल जात आहे अगर अमुक एका अंमलदाराकरितां माल जात आहे याबद्दल खुलासा केलेला नाहीं. तथापि अशा मालावर जकात माफी (रिफंड) देण्यांत आली. मालाची आयात होतेवेळीं कंत्राटाचा तपशील व सरकारी अंमलदाराचें नांव यांचा उल्लेख रिफंड देण्यापूर्वीं करणें जरूर असतांना अशा तऱ्हेची माहिती दिल्यावांचून जो रु. ५,७१० चा रिफंड देण्यांत आला तो हिशेब तपासणींत मान्य करतां येत नाहीं. हरकतीपत्रकांतील बाब नं. १७२ मधील अगर त्याच प्रकारचे दुसरे कांहीं बाबतींत जर रिफंड देण्यांत आले असतील तर ते वसूल करावे.

पॅरा १२ (अ)

खात्रीपत्रकांतून कंत्राटाचा निर्देश करणें व मालाचा उपयोग सरकारी कामावर होणार असल्याबद्दल दाखले घेणें या बाबतींत हिशेब तपासनीस यांच्या सूचनांप्रमाणें तजवीज सध्यां होत आहे. पूर्वींचे पैसे देण्यांत आलेले आहेत. अशा बाबतींत जरूर ते दाखले कंत्राटदारांचेकडून मिळविण्यांत येत आहेत.

(ब) (१) म्युनिसिपालिटीच्या नियमांप्रमाणें सागवानी वाशांच्या आयातीवर प्रत्यक्ष वॅगनचें वजनाप्रमाणें जकात घ्यावयास पाहिजे असतांना तशी ती घेतली नसल्यानें म्युनिसिपालिटीचें फार नुकसान झालें आहे. रेल्वेच्या इन्व्हॉइसप्रमाणें अशा वॅगनचें वजन ३०० मण असतें व जकात सु. यांनीं नक्की केलेलें वजन २७७मण सरासरी असतें असें असतां जकाती आकारणीसाठीं ता. २७ एप्रील १९३२ पर्यंत एका वॅगनचें वजन सरसकट १६० मण कसें धरण्यांत आलें त्याचा खुलासा होत नाहीं.

पॅरा १२ (ब)

मे. स्टँडिंग कमिटीनें नेमलेल्या पोटकमिटीकडे हा प्रश्न सोंपविला होता. या बाबतींत पूर्ण पूसतपास करून व सिंगल व बोगी वॅगनच्या वजनांचा तुलनात्मक पडताळा घेऊन पोटकमिटीनें पुढील प्रमाणें आशय प्राह्य वरला:

" सिंगल वॅगनवर १६० मणाप्रमाणें वजन आकारून जकात वसूल करण्याची पद्धत गेल्या १४ वर्षांपासून चालू आहे. १९२८ सालापासून नवीन बांधलेल्या सिंगल वॅगनचें प्रमाण १२.१६ टना-

ता. २१ एप्रील १९३२ रोजीं मे. जकात सुपरिंटेंडेंट यांनीं नाकें नं. ५ येथील इन्स्पेक्टरांस आयात होणाऱ्या मालाच्या प्रत्यक्ष वजनावर जकात घेण्याबद्दल हुकूम दिला. परंतु रावसाहेब गायकवाड, करपे व किराड मे. चीफ ऑफिसर व जकात सुपरिंटेंडंट यांची बैठक होऊन मे. जकात सु. यांनीं दिलेला पूर्वीचा हुकूम रद्द करण्यांत येऊन दर वॅगनवर १७५ मणाप्रमाणें वजन धरून जकात आकारण्यांत यावी असा हुकूम नाकें इन्स्पेक्टरांस देण्यांत आला. ही बैठक कां भरली अगर या बैठकीनें १७५ मणावर जकात घ्यावी असा निष्कर्ष कशावरून काढला ही माहिती दप्तरावरून मिळाली नाहीं.

( २ ) अशा प्रकारचा प्रघात म्युनिसिपल नियमांशीं विसंगत असून म्युनिसिपालिटीच्या हितास हानिकारक असल्यामुळे या ऑफिसचें खास पत्र नंबर एल्. २।३ ४०६७ तारीख २९ नोव्हेंबर १९३२ चें पाठवून बेसनदशीर चालू असणारा हा प्रघात एकदम बंद करावा व हा प्रघात सुरू कसा झाला याविषयीं चौकशी करावी म्हणून मे. अध्यक्ष यांजकडे कळविलें. प्रत्यक्ष होणारे वजनाऐवजीं १६० अगर १७५ पौंड वजन गृहीत धरून जकात आकारण्याचें आतां बंद झालें आहे, असें समजतें, पण हा प्रघात कसा पडला याबद्दल नक्की अजून कांहींच कळलें नाहीं. यामुळें म्युनिसिपालिटीचा तारीख १ एप्रिल पासून आम्ही रिपोर्ट करीपर्यंत जवळ जवळ रुपये ७८१ चा तोटा झालेला आहे. याचा तपशील हरकतीपत्रकातील बाब नं.११३ यावर आहे. अशा तऱ्हेच्या बेसनदशीर पद्धतीमुळें म्युनिसिपालिटीच्या झालेल्या तोट्याबद्दल संबंध असणारे इसमांस जबाबदार धरतां येईल किंवा काय हें पाहण्यासाठीं चौकशी करण्यांत यावी, अशी सुचना आहे.

ऐवजीं १६.२२ टनावर वाढत चालल्याचें मे. जकात सुपरिंटेंडेंट यांच्या लक्षांत आलें. ही गोष्ट कळल्यावर मे. जकात सुपरिंटेंडेंट यांनीं १९३१ सालापासून आयात मालाचीं नक्की वजनें घेऊन त्याप्रमाणें जकात घेण्यास सुरवात केली. पण ही पद्धत शिस्तीनें व वक्तशीरपणानें अमलांत आली नाहीं. कारण असें करणें अती त्रासदायक व नियमाविरुद्ध काम होतें. नंतर प्रत्यक्ष वजनावर जकात आकारावी असा मे. चीफ ऑफिसर यांनीं ता. २३–४–१९३२ रोजीं हुकूम दिला. प्रत्यक्ष वजनावर जकात आकारण्याची पद्धत १९१० सालापर्यंत अमलांत असून कांहीं वर्षांनीं मे. स्टँडिंग कमिटीच्या हुकुमावरून ती बंद करण्यांत आली असें दिसतें. म्हणून प्रत्यक्ष वजनावर जकात घ्यावी अशाबद्दल मे. चीफ ऑफिसर यांनीं मे. स्टँडिंग कमिटीच्या नजरेस ही गोष्ट आणली. हा महत्त्वाचा प्रश्न असल्यानें मे. स्टँडिंग कमिटीच्या सभासदांनीं या बाबतींत तज्ञ व वजनदार व्यापाऱ्याबरोबर वाटाघाट केली. अशा तज्ञ व्यापाऱ्यांमध्यें मे. करपे व मे. किराड हे होते. या वाटाघाटींत असें ठरलें कीं, या प्रश्नाचा कायम निकाल लागेपर्यंत मे. जकात सुपरिंटेंडेंट यांनीं एका हंगामांत वजनांबाबत ट्रायल्स घ्याव्या. वॅगनचें वजन प्रत्यक्ष तर घ्यावेंच पण तूर्त १७५ मणाप्रमाणें धरून जकात आकारावी. यानंतर प्रत्यक्ष वजनावर जकात आकारावी म्हणून मे. चीफ ऑफिसर यांनीं ता. १४–१२–३२ रोजीं हुकूम दिला व तीच पद्धत सध्यां अमलांत आहे.

मे. स्टँडिंग कमिटीनें ता. ८–९–३२ रोजीं पोटकमिटी नेमली. या पोटकमिटीनें ठरविलें कीं, १९३२–३३ च्या हंगामांत प्रत्यक्ष वजन घेऊन सरासरी वजन काय निघतें तें पाहवें.

१९३२–३३ सालांत जें इमारती लाकूड आयात झालें त्यांतला २/३ हिस्सा बोगी वॅगन्समधून आयात झाला. बोगी वॅगनचें वजन ३५४ मण असल्याचें दिसून आलें. याच मानानें म्युनिसिपालिटीनें सिंगल वॅगनचें वजन १७५ मण म्हणजे बरोबर निम्म्यानें धरलें. हें वजन बरोबर असल्यानें म्युनिसिपालिटीचा तोटा झालेला नाहीं.

सिंगल वॅगन म्हणून समजल्या जाणाऱ्या वॅगन्सचें वजन रेल्वे रसीदींतून ३०० मण असतांना प्रत्यक्ष वजन २७५ मणाच भरल्याचें १९३२–३३ मध्यें दृष्टोत्पत्तीस आलें. विश्वसनीय माहिती मिळविली तेव्हां असें कळून आलें कीं, हें इमारती लाकूड छोटा उदेपूर गोध्रा वगैरे भागांतून बी. बी. सी. आय्. रेल्वेनें आणण्यांत आलें होतें व तें अगदीं ओलें मागणी जरूरीची होती म्हणून नुकतेंच तोडलेले होतें. बी. बी. सी. आय. वॅगन्समध्यें ७ फुटापर्यंत लांबीचें लाकूड घालण्यास परवानगी आहे, तर जी. आय. पी. रेल्वेमध्यें ५॥ फुटांपर्यंतच परवानगी आहे. गुजराथेंतून बी. बी. सी. आय. वॅगनसमधून लाकूड फक्त १९३२–३३ सालांतच आयात झालेले आहे. या पूर्वी सर्व इमारती लाकूड जी. आय. पी. वॅगन्समधून येई. व या वॅगन्समध्यें २।३ इतक्या बोगी वॅगन्स असत.

पुण्याजवळच्या सोलापूर, कल्याण वगैरे गांवीं इमारती लाकडांवर जकात आहे. त्यापेक्षां जास्त जकात येथें पडतें व म्हणूनच लाकडांचा धंदा दिवसेंदिवस बसत चालला आहे. ही गोष्ट पोटकमिटीच्या निदर्शनास आल्यामुळें पोटकमिटीनें असाही ठराव केला कीं, इमारत

लाकडावरील जकात शेकडा रु. ४-११-० इतकी लाकडांचे किंमतीवर आकारावी. या किंमतीमध्यें रेल्वेभाडे वाहतूक वगैरेचाही समावेश केला जावा.

मे. स्टँडिंग कमिटीनें ठराव नंबर ७९३ ता. ११-८-१९३२ च्या करून वरील रिपोर्टास मान्यता दिली आहे. आणि म्युनिसिपालिटीपुढें हा प्रश्न मंजुरीसाठीं ठेविला आहे.

क (१) ज्या मालावरील जकात मालाच्या किंमतीवर वसुल करण्यांत येते अशा मालाची आयात करणारे इसमांस नियम ६ (जे) खालीं ठराविक नमुन्यामध्यें खात्रीपत्रक लिहून द्यावे लागतें. म्यु. ॲक्टाचें कलम ९९ प्रमाणें म्यु. शी चालू खातें ठेवणारे खातेदारांकडून अशा खात्रीपत्रकांचे ऐवजीं त्यांच्या आयाती बाबत पट्टया घेण्यांत येत असल्याचें आढळून आलें. या पट्टया नियमांत सांगितलेल्या खात्रीपत्रकाचें नमुन्याहून वेगळ्या असून जकातीच्या अंमलदारानें पाहवयास मागितल्या असतां देण्याबद्दल त्यांवर उल्लेख नसतो, असें दोन्ही फार्मोची रुजुवात घातल्यावर कळून आलं. पट्टया नसल्यामुळें डिपाझिट भरून ज्या लोकांनी मालाची आयात केली त्या लोकांकडून डिपाझिट रकमेचा हिशेब होऊन पक्के पास झाल्यावर देखील नियमाप्रमाणें घेण्याची खात्रीपत्रकें लिहून घेण्यांत आली नाहींत. या तऱ्हेच्या अपूर्ततेबद्दल खुलासा करावा, व यापुढें नियमाप्रमाणें अंमलबजावणी होत असल्याचें पाहाण्याबद्दल मे. जकात सुपरिंटेंडेंट यांना कळवावें.

पॅरा १२ क.

जेव्हां हिशेब पुरा करण्यांत येतो तेव्हां ॲप्रेझर हे पट्टया तपासतात. म्हणून पूर्वीची यासंबंधींची अट कमी करून त्याऐवजीं अधिक स्पष्ट खात्रीपत्रक खातेदारांना पुरविण्यांत येतें. मे. हिशेब तपासनीस हे खातेदारांचेकडून मामूल खात्रीपत्रक घ्यावें असें म्हणतात, त्याप्रमाणें तें तक्त्यांस जोडण्यांत येतें.

(ड) वर उल्लेख केलेल्या आयातीबाबत ॲप्रेझर यांनी जरुर त्या पट्टया पाहून नक्की जकात घ्यावयाची असून त्याबाबत पक्क्या पासावर पट्टया पाहिल्याबाबत शेरा घ्यावयाचा असतो. असे असतांना कांहीं बाबतींत असें आढळून आलें कीः—

(१) ॲप्रेझर यांनीं वरील प्रमाणें शेरा पक्के पासावरून दिला नाहीं. (हरकतीपत्रकामधील बाब ११४ वर दाखविलेली उदाहरणें पहा.)

पॅरा नं. १२ ड (१).

पट्टयांवर अशा तऱ्हेचा शेरा देण्याची पद्धत नेहमींचीच आहे. तथापि याच बाबतींत "पट्टी पाहिली" म्हणून शेरा देण्याचें नजर चुकीनें राहून गेलेलें आहे.

(२) ॲप्रेझर यांनीं मालाची केलेली किंमत नाके कारकुनांनी म्युनिसिपल दरबारीप्रमाणें प्रथम केलेल्या किंमतीपेक्षां किती तरी कमी होती (हरकतीपत्रकातील बाब ११५ तील उदाहरणें पहा.

पॅरा नं. १२ ड (२)

किरकोळ खर्च आकारून बाजारांतील दर ठरविलेले असल्यामुळें नाकेदार ज्या किंमती आकारतात त्या ॲप्रेझर यांनीं बाजारभावाप्रमाणें ठरविल्याप्रमाणें असतात. त्यामुळें प्रथम पट्टया दाखविलेल्या भावापेक्षां त्या साहजिकच जास्त असतात.

(३) नाकेदार लोकांनी खातेदाराचे महिनेवार हिशेबांत ॲप्रेझर यांनी त्याच मालाबाबत दिलेल्या पक्के पासांत, आणि माल आयात करणारानें स्वतः ठेवलेल्या दरसहा हिशेबाचे तक्त्यांत मालाचा तपशील व किंमत याबाबत बरीच तफावत असल्याचें दिसून आलें. हरकतीपत्रकांतील बाब ११६ पहा.) वर उल्लेख केलेल्या तफावतींचे बाबतींत तपास करून त्याचा निकाल आमचेकडे कळवावा.

पॅरा नं. १२ ड (३)

तफावतीचें कारण उघड आहे. वस्तुतः मालाचे किंमतींत तफावत झालेली नाहीं. मालाचा तपशील देऊन जी पट्टी दिली जाते ती वरुनच जकातीची आकारणी करण्यांत येते. ह्या पट्टीवरूनच आयात होणाऱ्या मालाच्या बाबत खरी माहिती मिळते. व या माहिती वरूनच जकातीची आकारणी होते.

(ई) (१) मे. जकात सुपरिंटेंडेंट यांजकडील हुकूम नंबर २३ सप्टेंबर १९३१ नें खातेदारांनी आयात केलेला माल निर्गतीचा अगर जकात नियमांतील नियम ३ (२) १४ अ प्रमाणें जकात भरल्याचा दाखला दाखविल्यावांचून निर्गत होऊं दिला. ही पद्धत चुकीची असल्यानें बंद करावी.

पॅरा १२ ई (१)

मालाचे जकातीबद्दल डिपॉझिट ठेवणारांना जरूर त्या सूचना देण्यांत आलेल्या असून त्याचा एक तर्जुमा शेवटीं जोडला आहे.

(२) मालाची आयात करणारे इतर लोकांना नाकेदार हे निर्गतीचे दाखले देत व ते दाखले जकात परत मिळण्यासाठीं अर्जा बरोबर आले म्हणजे त्यावर मे. जकात सुपरिंटेंडंट सही करीत. जकात नियम १४ क अन्वयें हे दाखले मे. जकात सुपरिंटेंडंट यांनीं स्वतः द्यावयाचे असल्यामुळें या कामीं जरुर त्या सूचना देण्यास पाहिजेत.

(क) खातेदारांनीं केलेल्या आयाती बाबत पुढील दोष आढळून आले.

(१) मालाची आयात होतांना नियम ६ प्रमाणें आयातीचे दाखले अगर पास नाकेदारांनीं दिलेले नव्हते.

(२) नाक्यावर नाकेदारांनी ठेवलेल्या टिपणांतून आयात मालाचा तपशीलच टिपलेला असून जकात आकारणी टिपलेली नाहीं. वरील नंबर १ चे दोषाबाबत प्रत्यक्ष रक्कम वसूल न झाली तरी एकतर आयातीचा दाखला देण्यांत यावा अगर जकात माफ असणारे जिनसांप्रमाणें मोफत पास देण्यांत यावा. नाकेदारांनीं आयातीस परवानगी दिल्याबद्दल तशी चेकिंग इन्स्पेक्टरांस त्यामुळें समज पडेल.

नंबर २ चे बाबतींत, खातेदार यांचे खात्यावर प्रत्येक आयातीबद्दल बसणारी जकात मालाच्या पट्ट्याप्रमाणें अगर दरवारीप्रमाणें आपआपल्या टिपणांतून उतरण्यास सांगावें. खातेदारांनी ठेवलेल्या डिपाझिटचे बेतानें यामुळें आयातीची नोंद होण्यास त्यामुळें सोय होईल. खातेदारांनीं डिपाझिट दाखल भरलेल्या रकमापेक्षां जास्त रकमांची आयात खातेदारांनी केल्याची उदाहरणें दाखविण्यांत आलीं. कलम ९९ मधील तत्वास धरून ही पद्धत नसल्यामुळें इतःपर ती बंद करण्यांत यावी.

(ग) म्युनिसिपल नियमांप्रमाणें नाकेदार लोकांस आयातीबद्दल दाखले द्यावे लागतात. तथापि नाके नं. १६ वर असे दाखले शिपायांनींही दिल्याचें दिसून आलें. शिपायांनीं दाखले देणें नियमांस सोडून आहे. सदर दाखले नाक्यापासून १०० यार्डांचे अंतरावर असणाऱ्या खडकी स्टेशन नजीकचे रेल्वे क्रॉसिंगमधून जेव्हां माल येतो तेव्हां द्यावे लागतात. अशा तऱ्हेची व्यवस्था नियमांशी विसंगत असल्यामुळें नियमांत सुधारणा करीपर्यंत ती हिशेबतपासणींत ग्राह्य धरतां येत नाहीं.

(एच्) नाक्यावरून जें हडप ठेवलें जातें त्याबद्दल दर दिवसास दोन आणे प्रमाणें फी आकारली जाते. ही फी कोणत्या आधारावर घेण्यांत येते हें समजलें नाहीं. चालूं असलेल्या शिरस्त्याप्रमाणें नियमांत सुधारणा करण्याकरितां नियमास मंजुरी घेण्यांत येत आहे असें सांगण्यांत आलें. अशा तऱ्हेनें फी वसूल करण्याबाबत नियम केल्याशिवाय जी फी वसूल केली जात आहे ती गैर आहे.

(आय) नियम नं. १८ (क २) आणि १४ (ब ४) प्रमाणें एक रुपयाचे आंतील रकमेची जकात परत देतां येत नाहीं. नियम १८ प्रमाणें म्यु. कडे जमा व्हावयाची शेकडा १० टक्के कसर वजा केल्यानंतर उरलेल्या जकातीची परती एक रुपयाहून कमी जकात असल्यामुळें केल्याचेंही आढळून आलें. म्यु. कडे जमा होण्याची कसर ही सुद्धां परत रकमेस पात्र धरण्यांत आली. सध्यां चालूं असलेला परिपाठ नियमांशी विसंगत आहे. त्यामुळें तो

पॅरा १२ ई (२)

प्रचलित वहिवाटीस अनुसरून दुरुस्त केलेला पोटनियम मे. जनरल कमिटीपुढें बाब नं. १९६ नें मंजुरीसाठीं ठेवला आहे.

पॅरा १२ जी.

सध्यां चालूं असलेल्या वहिवाटीप्रमाणें सुधारलेला पोटनियम मे. जनरल कमिटीपुढें बाब नं. १०३ नें मंजुरीसाठीं ठेविला आहे.

पॅरा १२ एफ्. (१ व २)

खातेदारांकरितां डिपॉझिटच्या नियम नसल्यामुळें मे. जनरल बोर्डानें ठराव नंबर ८८१ ता. २९-३-३२ ने डिपाझिटबद्दल नियम मंजूर करण्यांत आले आहेत. व त्यांची एक प्रत शेवटीं जोडली आहे. त्या नियमांस अनुसरून सध्यां वहिवाट चालूं आहे. कलम ९९ याप्रमाणें अर्टीचा मसुदा मे. म्युनिसिपल वकील यांनीं सुचविला असून मे. लॉ कमिटीकडून सध्यां त्याचा विचार चालूं आहे.

पॅरा नं. १२ (आय)

जकात तेवढी परत करण्यांत येते. दहा टक्के कपात ही कसर म्हणून जकातीच्या रकमेवर आकारण्यांत येते. सध्यां अमलांत असणारी पद्धत नियमास पूर्णपणें अनुसरून आहे. निर्गत होणारे मालावर एक रुपयापेक्षां कमी रकम परत दिली जात नाहीं, तेव्हां १० टक्के कसर परत देण्याबाबतींत प्रश्नच उरत नाहीं.

एकतर थांबविण्यांत यावा अगर परिपाठाप्रमाणें नियमांत फेरबदल करावा.

(जे) जकात दरवारींतील खालीं दिलेल्या मालांवर दरवारींतील आकारापेक्षां जास्ती जकात, घेतल्याचें दिसून आलें. सध्यां चालू असणारें परिपाठाप्रमाणें नियम करण्याचा विचार चालू आहे. दरवारींतील दुरुस्त दरांना सरकार मंजुरी लौकर आणावी. सरकारी मंजुरी जोपर्यंत आलेली नाहीं तोपर्यंत हल्लीं होत असलेली जकात वसुली नियमबाह्य असल्यामुळें ती बंद करण्यांत यावी.

बाब नंबर

| | | | |
|---|---|---|---|
| ४२ | ५७ | ७९ | ८८ |
| ९२ | ९३ | ११० | १२१ |
| १२९ | १३८ | १४० | १५८ |
| १६२ | १६३ | १६४ | १६५ |
| १६६ | १६७ | १६८ | १६९ |
| १७४ | १७५ | १७६ | १८१ |
| १८२ | १८३ | १८४ | ... |

पॅरा १२ (जे)
या हरकतीबाबत मे. लॉ. कमिटी विचार करीत आहे.

कर्जाबाबत व्यवहारः—

( १३ ) सरकारनें म्युनिसिपालिटीस खालीं दिल्याप्रमाणें कर्जे बाजारांतून घेण्यास मंजुरी दिली.

| कर्जे | रकम | व्याजाचा दर |
|---|---|---|
| (१) ड्रेनेज कर्ज (स. ठ. ज. डि. नं. ३५९ ता. १९ नवेंबर १९३१. नें मंजूर) | ७७,९०० | ६॥ टक्के. |
| (२) नगररचनेची योजना (सरकार ठराव जनरल डिपार्टमेंट नंबर ८४१४ ता. ९ डिसेंबर १९३१ नें मंजूर.) | २,५८,००० | ६॥ टक्के. |
| (३) पाणीपुरवठा योजना (स. ठ. ज. डि. नं. ८६९३ ता. ५ फेब्रुवारी १९३२ नें मंजूर). | ३,००,००० | ६॥ टक्के. |

( ब ) सरकारी मंजुरी येतांच पहिल्या दोन कर्जाबाबत म्यु.नें ज्ञानप्रकाशच्या ता. १२ डिसेंबर १९३१ च्या अंकांत व केसरीच्या १५ डिसेंबर १९३१ च्या अंकांत जाहिराती देऊन टेंडरें मागविलीं. प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमध्यें लोकांचे माहितीसाठीं पुढीलप्रमाणें अटी कळविलेल्या होत्या.

" अर्जासोबत १० रुपये, मंजुरीनंतर १० रुपये आणि उरलेल्या रकमेची फेड, १० रुपयांचा एक याप्रमाणें आठ हप्त्यांत करावयाची. ता. २१ डिसेंबर १९३१ रोजीं सायंकाळीं ६ वाजेपर्यंत मोहोरबंद टेंडरें स्वीकारण्यांत आली होतीं.

मे. चीफ ऑफिसर यांनीं ता. २२ डिसेंबर १९३१ रोजीं टेंडरें फोडलीं. शंभरास ८५ पासून १०० पर्यंत भाव देण्यांत आलेल्या टेंडरांचे यादीवर मे. चीफ ऑफिसर यांनीं मे. स्टँडिंग कमिटीकडे त्याच दिवशीं पुढीलप्रमाणें शिफारस केली.

( १ ) आलेलीं सर्व टेंडरें नामंजूर करण्यांत यावींत.

( २ ) ड्रेनेज व नगररचना योजना यांचीं कर्जे शंभरास अनुक्रमें ९० व ९४ या दरानें घेण्यांत यावीं.

पॅरा नं. १३
मे. स्टँडिंग कमिटीनें नेमलेल्या पोट–कमिटीकडून या प्रश्नाबाबत चौकशी चालू आहे. पोट–कमिटीचा निकाल अजून व्हावयाचा आहे.

(३) मंजुरी न आलेलें पाणीपुरवठ्याचें कर्जही पण ९० चें भावानें घेण्यांत यावें.

(४) कर्ज–खरेदीस मार्च १९३२ अखेर सवड ठेवण्यांत यावी.

(५) कोणाचेंही नुकसान होऊं नये म्हणून हल्लीं टेंडरांतून दर दिलेल्या लोकांसही वर दिलेल्या दरांप्रमाणें कर्ज घेण्यास सवड ठेवावी. त्या लोकांनीं सध्यां काय दर दिलेले आहेत ते तेव्हां लक्षांत घेऊं नयेत

(क) वरीलप्रमाणें शिफारस करतांना मे. चीफ ऑफिसर यांनीं मे. स्टँडिंग कमिटीस कळविलें कीं, म्युनिसिपालिटीनें सरकार-कडून कर्ज घेतलें तरी त्यांवर ७॥ टक्के व्याज द्यावें लगेल. सरकारनें स. जा. ज. डि. नं. ३५९–अ ता. २७ जानेवारी १९३१ नें ७ टक्के दरानें रु. ७७,९०० चें कर्ज प्रत्यक्ष देऊं केलें असतां मे. चीफ ऑफिसर यांनीं सरकारी व्याज ७॥ टक्के पडेल असें विधान कसें केलें हें समजत नाहीं.

(५) मे. चीफ ऑफिसर यांच्या शिफारशींमुळें नागरिकांना रुपये ५३,२७० ची झूड येणार होती, तीं तीनही कर्जें मे. स्टँडिंग कमिटीनें दुसऱ्याच दिवशीं म्हणजे ता. २३ डिसेंबर १९३१ रोजीं भरलेल्या सभेंत मंजूर केलीं. अशा आर्थिक दृष्ट्या महत्वाच्या बाबतींत नाणें बाजारांतील परिस्थितीचें काळजीपूर्वक पर्यालोचन करणें अत्यंत जरूर असतांना, म्युनिसिपालिटीला रु. ५३,२७० इतक्या रकमेच्या तोट्यांत आणणाऱ्या या बाबतींत, टेंडरें उघडल्यापासून केवळ ३६ तासांच्या अवधींत, जनरल बोर्डाची संमति घेतल्यावांचून मे. स्टँ. कमिटीनें तातडीनें मंजुरी कशी दिली याचा खुलासा होत नाहीं. ह्यामध्यें पुढें दिल्याप्रमाणें चुका झाल्या.

(१) सन १९२० च्या ३८ व्या डेव्होल्यून ॲक्टाचें परिशिष्ट १ खालीं लोकल ॲथारीटीज लोन ॲक्ट १९१४ प्रमाणें कर्ज घेण्यांत आलें. पण या कायद्याखालीं कर्जाबाबतच्या सर्व अटींना लोकल ॲथॉरिटीची मंजुरी लागते. म्यु. कायद्याचें दुसरें कलमांत सांगितल्याप्रमाणें स्टँडिंग कमिटी ही "लोकल ॲथॉरिटी" नसल्यामुळें रु. ९० व ९४ या दरानें कर्ज उभारण्यास मंजुरी देण्यांत आली ती बरोबर नसल्यामुळें हिशेबतपासणींत ग्राह्य धरतां येत नाहींत.

(२) सरकारनें कर्ज घेण्यास मंजुरी दिली होती, ती- ६॥ टक्के दरानें ९० अगर ९४ भावानें. ६॥ दरानें नव्हे. दर्शनी किंमतीपेक्षां (Below par) कमी किंमतीस कर्ज विक्रीस काढण्यास सरकारनें स्पष्ट मंजुरी दिली नसल्यामुळें सरकारनें मंजुरी दिल्याशिवाय ह्या व्यवहारास हिशेबतपासणमिध्यें मान्यता देतां येणार नाहीं.

(३) सरकारची मंजुरी मिळतांच तावडतोब एकदम रक्कम कर्जाऊ घेण्यांत येईल असें म्युनिसिपालिटीनें कर्ज मागणीच्या अर्जांत लिहीलें होतें. तरीही पण कर्ज घेणारांकडून सप्टेंबर १९३२ पर्यंत हप्त्याहप्त्यानें पैसे स्वीकारण्यांत येत होतेच. मे. स्टँडिंग कमिटीनें पैसे भरण्याबाबत जी सवलत दिली ती म्युनिसिपालिटीच्या कर्जाच्या अटी व त्या अटींना अनुसरून सरकारनें जी मंजुरी दिली तीस विसंगत होती. सरकार ठराव जनरल डिपार्टमेंट नं. १३३९ ता. २३ डिसेंबर १९२२ अन्वयें म्युनिसिपालिट्यांना साधारणतः एप्रील महिन्यानंतर कर्ज घेण्यास मुभा नाहीं. ही चूक सरकारकडे कळवून तीस सरकारकडून माफी मिळवावी.

(४) सरकारकडून कर्ज काढण्याबाबत मंजुरी आली नव्हती तरी मे. स्टँडिंग कमिटीनें पाणी पुरवठ्याचें रुपये ३ लाखांचें कर्ज ९० चे दरानें काढण्यास व फेब्रुवारी व मार्च १९३२ महिन्यांत सरकारी मंजुरी ता. ५ फेब्रुवारी १९३२ रोजीं मिळाल्यानंतर त्याच दरानें, नाणें बाजार पुष्कळ चांगला सुधारला होता तरी, कर्ज देण्यास मंजुरी दिली हें गैर आहे. नाणें बाजारांत चांगलीच सुधारणा झालेली होती हें पुढील प्यारा "ई" वरून समजून येईल.

(ई) "१९ डिसेंबर १९३१ पर्यंतच्या नाणें बाजारांतील घडामोडींचे साप्ताहिक अहवालांतून कर्जाचे भाव अजमावण्यांत आले असावेत. त्या वेळीं भाव अगदीं कमी होते.

मे. चीफ ऑफिसर यांनीं स्टँडिंग कमिटीकडे केलेल्या शिफारशीसाठीं प्रमाणभूत घेतलेल्या कलकत्याच्या प्लेस सिडन्स आणि गौच कंपनीच्या ता. १८ डिसेंबर १९३१ च्या रिपोर्टावरूनही पण नाणें बाजार पुढें सुधारणार होता असा ध्वनि निघतो.

१८ डिसेंबरचें रिपोर्टाचा जरूरीपुरता उतारा:—

"सरकारी रोखे:—नाणें बाजारांतील भावांतील मंदीमध्यें जरी सुधारणा झालेली नसली तरी बाजार आणखी जास्त मंदावेल अशीं चिन्हें मात्र नाहींत. मागील आठवड्याप्रमाणें याही आठवड्यामध्यें मुंबई बाजारांत १९३४ चें व १९५५–६० चे रोख्यांशिवाय बाकीचे रोखे (कर्जें) विकले जात आहेत.

ता. ८ जानेवारी १९३२ व १५ जानेवारी १९३२ अखेर दोन्ही आठड्याचें रिपोर्टावरून नाणें बाजारांतील परिस्थिति सुधारण्याचीं चिन्हें जास्त दिसूं लागलीं होतीं असें दिसून येईल. या वेळीं कर्जाबद्दल फारशी मागणी नसून ती मंजूरही पण करण्यांत आलेली नव्हती. अशा परिस्थितींत कर्जविक्री बंद करून कर्जाचा भाव ठरविण्याच्या बाबतींत फेरविचार करणें अगदीं क्रमप्राप्त होतें. नाणें-बाजाराबाबतचे रिपोर्टांत पुढें दिल्याप्रमाणें मजकूर आहे.

ता. ८ जानेवारी १९३२ चा रिपोर्ट:—सरकारी रोखे:—गेल्या ता. १८ डिसेंबर १९३१ च्या रिपोर्टानंतर नाणें बाजार कांहींसा टिकून असला तरी कांहीं बाबतींत भाव बरेच खालावले आहेत.

तारीख १५ जानेवारी १९३२ चा रिपोर्ट:—

"सरकारी रोखे:–गेले कांहीं दिवस बाजार मंदीचाच होता. पण गेल्या दोन दिवसांपासून भावासंबंधानें चौकशा जास्त सुरू झाल्या असून एकूण एक रोख्यांना तेजीचा भाव चढत आहे. बहुतेक कर्जास भर किंमतीस गिऱ्हाईक मिळत आहे इतकेंच नव्हे तर जास्तही किंमत येत आहे. यामुळें बाजारांमधील घडामोड उत्तरोत्तर वाढत्या स्वरूपांत आहे."

(एफ्) मे. स्टँडिंग कमिटीचा सदर कर्जाबाबत अगदीं स्वस्ताईचे दर निश्चित करण्यांत काय हेतू असेल तो असो! जेव्हां तारीख ५ फेब्रुवारी १९३२ रोजीं पाणी पुरवठ्याचें कर्जास मंजुरी मिळाली व ता. ५ फेब्रुवारी नंतर बाकीच्या दोन कर्जाच्या एकूण रु. ३,३५,९०० रकमेपैकीं रु. १,९४,५०० चें कर्ज मिळण्याबद्दल लोकांकडून मागणी आली तेव्हां नाणें बाजाराची स्थिति पार बदललेली असून उद्भवलेल्या परिस्थितीस अनुसरून कर्जाचे दरांत फेरबदल करणें म्यु. स अगदीं जरूर होतें. कसें तें नाणें बाजाराबाबत पुढील बातम्यांच्या उताऱ्यांवरून कळून येईल.

तारीख ५ फेब्रुवारी १९३२ चा रिपोर्टः—

( १ ) " सरकारी शेअ्स:—बाजार उघडतांना सामसूम होती. परंतु ती बंद होतेवेळीं ती बराच तेजावर आलेला होता. व जवळ जवळ सर्व शेअर्सना मागण्या येत होत्या. फार करून विक्री अशी होत नव्हतीच. खरेदी करणारांना त्यांना लागत असणाऱ्या खरेदी- पैकीं थोडकाच भाग खरेदी करतां येऊन त्याकरितां पुरेपूर किंमत द्यावी लागत होती."

( २ ) ता. १९ फेब्रुवारी १९३२ अखेर आठवड्याचा रिपोर्टः—" सरकारी शेअ्स:—" शेअर्स विकले जात नसल्यामुळे अह वालाच्या आठवड्यांत बाजार अगदीं मंदावला होता पण एकंदरीनें परिस्थिति पाहतां बाजारांतील उलाढाल समाधानकारक होती.

सरकारी शेअर्समध्यें जी सरसकट सुधारणा झालेली आहे, तीवरून चांगली परिस्थिति निर्माण होण्याचें चिन्ह दिसतें. हीच स्थिति इतर शेअर्संबाबत होईल अशी आशा आहे.

( ग ) म्युनिसिपालिटीचे कर्जास त्याचवेळीं अगर थोडे दिवसांत यापेक्षां चांगला दर आला नसता असा अंदाज कशावरून केला, याबाबत मे. चीफ ऑफिसर यांना आम्ही विचारतां त्यांनीं कळविलें कीं,

" सरकारी शेअर्सबाबत नाणेबाजाराशीं माझा संबंध येत असे. मी अध्यक्ष अगर स्टँडींग कमिटी यांचेकडे शिफारस करण्या- पूर्वी जो हिशेब केलेला होता तो इत्थंभूत कागदोपत्रावरून दिसून येण्यासारखा आहे.

मे. चीफ ऑफिसर हे पुणें सेंट्रल को—ऑपरेटिव्ह बँकेचे एक डायरेक्टर असून ते नाणेबाजाराची परिस्थिती लक्षपूर्वक न्याहाळीत असत, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे वरील रिपोर्टांतून लिहिल्याप्रमाणें बाजारांतील शेअर्सच्या किंमती भराभर चढत असतांना, बाजारांत मंदी होती त्यावेळीं निश्चित केलेले दरांचा फेरबदल करण्याबद्दल सल्ला देत नाहींत व रु. ४,९५,००० चें कर्ज रु. ४२,११२ ची खोट येत असतांनाही ९० व ९४ च्या दरानें फेब्रुवारी व मार्च महि- न्याच्या अवधींत विक्रीस काढण्यास संमति देतात याचा विस्मय वाटतो. मे. चीफ ऑफिसर आणि मे. स्टँडिंग कमिटी यांनी बाजारा च्या सुधारलेल्या परिस्थितीकडे लक्ष देण्याचें सोडून जनरलबोर्डाला वस्तुस्थितीची जाणीव करून न देतां अगदीं पडत्या दरानें कर्ज विक्रीस काढून नागरिकांच्या हिताकडे डोळेझांक करावी ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे.

( ह ) कर्जाचे दर कसे ठरवले याबाबत जेव्हां प्रथमच आक्षेप घेऊन चौकशी केली तेव्हां मे. चीफ ऑफिसर यांनीं, रा. ब. हणमंतराम रामनाथ व रा. दा. वि. गोखले या दोन स्थानिक व्यक्तींचा सल्ला घेतला होता असें दिसते. वरील गृहस्थापैकीं दुसरे गृहस्थ हे पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष होते, व मे. चीफ ऑफिसर हे त्याच बँकेचे डायरेक्टर होते. नाणेबाजाराबाबत एकं- दरीनें सर्व बाबतींत विश्वसनीयः सल्ला घेतां आला असता अशा पुण्यामध्यें दोन शाखा असलेल्या इंपीरियल बँकेकडे कर्जे उभारणीबाबत दरदामांच्या अटींसंबंधीं चौकशी कर- ण्यात आली नाहीं हें चमत्कारिक वाटतें. कर्जे शेअर्सबाबत व नाण्यांबाबत कितीतरी मोठ्या प्रमाणांत अनुभव असलेल्या व मुंबई

इलाख्यांतल्या जवळ जवळ प्रत्येक बाजारपेठेला शाखा असलेल्या या बँकेनें मुंबई व इतर ठिकाणीं कर्ज खरेदीसाठीं कदाचित चांगली मदतही केली असती. एकूण ६,३५,००० रुपयांच्या कर्जापैकीं जवळ जवळ चार लाख रुपयांचें कर्ज पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें घेतलें, व सदर बँकेनें ९० चे दरानें घेतलेलें कर्ज जुलै महिन्यांत १०० दरानें, व सप्टेंबर महिन्यांत १०३ दरानें, ९४ दरानें विकत घेतलेलें कर्ज, जुलै महिन्यांत १०० दरानें, आगस्ट महिन्यांत १०३ दरानें, आक्टोबरांत १०६ दरानें आणि नोव्हेंबरमध्यें १०८ दरानें विकून टाकलें असें समजतें. या गोष्टी पाहिल्या म्हणजे मे. चीफ ऑफिसर यांच्या शिफारशीवरून मे. स्टँडिंग कमिटीने कर्जविक्रीचा दर ठरविला तो विचारपूर्वक ठरविलेला नव्हता, तसेंच थोडासा समंजस व चौकसपणानें या प्रश्नाचा विचार केला असता तर या व्यवहारांत म्युनिसिपालिटीला जी जबरदस्त खोट बसली ती बसली नसती. या व्यवहारासंबंधांत म्युनिसिपालिटीकडून कसोशीनें चौकशी करण्यांत येईल असा भरंवसा वाटतो.

### ७ पावतीपुस्तकें व रोखे यांचे कागदांचा हिशेब.

१४ (अ) पावती फार्म अगर पैशांचे पास यांची छपाई बंदोबस्त आणि जमाखर्च यांवर जितक्या कसोशीनें देखरेख पाहिजे होती तितकी ठेवलेली नसल्याचें दिसून आलें. पासांचेंच उत्पन्न दरसाल रु. २५०० इतकें येतें. म्युनिसिपल प्रेस मॅनेजर यांचेकडे पास वगैरे छापणें व त्यांचा हिशेब ठेवण्याचें काम दिलेलें आहे. त्यांनी एकंदर फार्म कसेकसे दिले यांचे जरी हिशेब ठेवलेले आहेत तरी एकंदर फार्म छापले किती, याचा हिशेब ठेविलेला नाहीं. शिवाय छापलेले फार्म चोरीस जाऊं नयेत अगर त्यांचा दुरुपयोग होऊं नये अशा बेतानें ते बंदोबस्तांत ठेवलेले नव्हते. कांहीं ऑफिसांनी पावती पुस्तकें छापखान्यांतून नेलीं. पण पावतीपुस्तकांचा हिशेब त्यांनीं ठेवला नाहीं. हूजुर ऑफिसांतच अनेक प्रकारच्या पावत्यांसाठीं पावती फार्म लागतात, पण त्या पावती फार्मोचा हिशेब ठेवण्यांत आलेला नाहीं. त्यामुळें छापून झालेले सर्व फार्म उपयोगांत येऊन त्यांतील जमा झालेल्या रकमा हिशेबांत घेतल्या होत्या अगर नाहीं याचा शोध हिशेब तपासणीमध्यें घेतां आला नाहीं. छापून तयार असणाऱ्या फार्मोवरील छपाईच्या आंकड्यावरून प्रत्यक्ष छापलेल्या फार्मोची संख्या कितपत जमते हें पाहाण्याचा प्रयत्न करण्यांत आला. तथापि कांहीं ठिकाणीं प्रत्यक्ष देण्यांत आलेल्या फार्मोशीं हा आंकडा न जमल्यामुळें व कित्येकदां फार्मोवर छापण्यांत आलेल्या प्रतींचा आंकडा नमूद केलेला नसल्यामुळें त्याचा उपयोग झाला नाहीं. एक आणा दराचे पासाचे फार्म नंबर ९ याच्या पुढें दिल्याप्रमाणें प्रति काढण्यांत आल्या होत्या असें दिसतें.

| | |
|---|---|
| मे १९२९ मध्यें | ४००० प्रती छापल्या |
| आक्टोबर १९३० मध्यें | ५००० ,, ,, |
| मे १९३१ मध्यें | ४००० ,, ,, |
| | एकूण १३००० प्रती छापल्या |

वरीलप्रमाणें छापून झालेल्या फार्मोतून खालीं नमूद केल्याप्रमाणें प्रति देण्यांत आल्या.

१४ (अ) म्युनिसिपालिटीचा छापखाना हा मे. म्युनिसिपल इंजिनियर साहेब यांचे ताब्यांत असून त्याबाबत जरुर ती देखरेख व व्यवस्था त्यांचेकडे आहे. छपाईच्या कामाची इशू व पावती पुस्तकें ठेवण्यांत आलेली असून हिशेब तपासणीचे वेळीं तीं चालू तारखेवर ठेविली होती. पावती रजिस्टरांची मागणी तपासणीस यांनीं केलेली नव्हती. त्यांनीं आपल्या हरकती दरेक फार्मोवर छपाईचा आंकडा लिहिलेला असतो त्यावरून काढलेल्या आहेत. त्यांनीं जर रजिस्टर पाहिलें असतें. तर जी हरकत काढलेली आहे तिचें कारण उरलें नसतें. पैशाच्या पासाबाबत रिसीट व इशू रजिस्टरांतून जो हिशेब दिलेला आहे, तो पुढें दिल्याप्रमाणें आहे.

| छपाईची तारीख | छापलेल्या फार्मोची संख्या |
|---|---|
| ४-४-२९ | १५०० |
| ५-४-२९ | ३००० |
| १३-६-२९ | १५०० |
| २७-१०-३१ | १२००० |
| | एकूण १८००० |

| | |
|---|---|
| १९२९–३० सालांत | ४००० प्रति |
| १९३०–३१ सालांत | २००० ,, |
| १९३१–३२ सालांत | ६००० ,, |
| १९३२–३३ सालांत | १२०० ,, |

एकूण १३२०० प्रति दिल्या.

या आंकड्यावरून एकंदर छापून झालेल्या प्रतीपेक्षां देण्यांत आलेल्या प्रती जास्त होत्या असें दिसून येईल. वापरण्यांत आलेल्या, फाटलेल्या पासाप्रमाणेंच मजकूर असणाऱ्या पासांच्या स्थलप्रति राखून ठेवण्याबाबत जरूर तितकी काळजीही पण घेण्यांत आलेली नव्हती. हरकतीपत्रकांत बाब नंबर १०५ यांतील तपशीलांत लिहील्यावरून दिसून येईल कीं, रेमार्केट इन्स्पेक्टर यांना रु. १९३–१२–० किंमतीच्या पासबुकांच्या स्थळप्रति दाखवितां आल्या नाहींत. देण्याची प्रत व स्थळप्रत यांवरील मजकूर तोच असल्याकारणानें कदाचित स्थळ प्रतींचाही उपयोग करण्यांत येऊन आलेले पैसे आत्मसात करण्यांत आले असावेत असेंही संभवतें. हरकतीपत्रकांतील बाब नं. ११० व १९४ पहा. मागणी केल्यापेक्षां वसुली खात्यास फार्मांचा पुरवठा जादा करण्यांत आल्याचें त्यावरून दिसून येईल. दरदामांचे वेगळाले किंमतीचे पास अगर पावतीचे फार्म वास्तविक पैशांइतक्याच काळजीनें वापरणें जरूर असल्यामुळें त्यांची निष्काळजीपणानें हाताळणी होणें धोक्याचें आहे. अशा तऱ्हेनें निष्काळजीपणानें फार्म वगैरेंचा उपयोग न व्हावा म्हणून आम्ही पुढीलप्रमाणें उपाय सुचवीत आहोत.

(१) मे. चीफ ऑफिसर यांजमार्फत मागणी आल्याशिवाय छापखाना मॅनेजरांनीं पावती फार्मांची छपाई व सांठा करूं नये.

(२) पावती फार्म जेवढे छापून झाले असतील तेवढे सर्व नगदी खात्यानें (अकौंट खातें) ताब्यांत घ्यावेत व त्यांचा योग्य हिशेब व बंदोबस्त ठेवावा. पैसा गोळा करणारे खात्यांकडे जसजसे लागतील त्याप्रमाणें फार्म त्यांजकडे देण्यांत यावेत.

(३) खात्यांच्या अंमलदारांनीं त्यांचेकडे देण्यांत आलेल्या फार्मांचा हिशेब ठेवावा, व फार्मांचा उपयोग होतांच त्यांच्या एकूण एक स्थळप्रति आपले ताब्यांत घेण्याकडे विशेष लक्ष द्यावें.

(४) यापुढें छापण्यांत यावयाच्या पावती पासांच्या स्थळप्रति हल्लींपेक्षां आंखूड छापण्यांत याव्या, म्हणजे त्या प्रत्यक्ष पासापेक्षां वेगळ्या दिसून येतील व चटकन त्या ओळखल्या जातील.

(ब) म्युनिसिपल कर्जाबाबत किती रोखे छापण्यांत आले होते, याचा हिशेब ठेवण्यांत आलेला नव्हता. त्यामुळें रु. ३२,७०० दर्शनी किंमतीचे रोखे, तारीख २९ डिसेंबर रोजीं केलेल्या हिशेब तपासणीचे वेळीं पाहवयास मिळाले नाहींत.

हरकतीपत्रकाच्या २२१ व्या बाबींत या न दाखविलेल्या रोख्यांचा तपशील दिलेला आहे. या कागदांबाबत खुलासा करावा.

पॅरा नं. १४ (ब)

हरकतीपत्रकाची बाब नं. २२१ यास उत्तर दिलें आहे त्यांत एकंदर छापलेल्या फार्मांचा, देण्यांत आलेले व रद्द केलेल्या तसेंच शिल्लक असलेल्या फार्मांचा तपशील देण्यांत आलेला आहे. वेळोवेळीं फार्म देण्यांत आले व रद्द करण्यांत आले याबाबतचा हिशेब मे. हिशेबतपासनीस यांनीं पाहिल्याचें दिसत नाहीं. याबाबत जो हिशेब दिलेला आहे त्यावरून फार्म हरवलेही नाहींत व जास्तीही दिले गेलेले नाहींत असें स्पष्ट दिसून येईल. रोखे घेणारांना व्याज देण्यांत आल्याचें जें रजिस्टर आहे, त्यावरूनही हेंच स्पष्ट होईल. आतां जास्त पद्धतशीर रीतीनें या बाबतींत हिशेब ठेवण्यांत आला आहे.

( क ) हे शेखे छापणें व त्यांचा हिशेब ठेवणें या बाबतींत खालीं दिल्याप्रमाणें दोष आढळून आले.

( १ ) हे शेखे एका स्थानिक छापखान्यामध्यें छापण्यांत आले असून वाजवीपेक्षां जास्त शेखे छापले जाणार नाहींत अशाबद्दल त्या छापखान्याचे मॅनेजराकडून हमी घेण्यांत आलेली नव्हती. जादा छापलेल्या शेख्यांचे कागदांचा दुरुपयोग होऊन घोंटाळे उपस्थित होऊं नयेत म्हणून यापुढें असे शेखे छापणें झाल्यास ते नाशीक येथें असणाऱ्या गव्हर्नमेंट सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसमधून छापून घ्यावेत.

पॅरा १४ ( क ) १.

पॅरा सी. १ मध्यें कर्जाचें शेखे छापण्याबद्दल उल्लेख आहे. हे शेखे सर्व्हेंट्स् ऑफ इंडिया सोसायटीच्या छापखान्यांत छापून घेतले असून सदर छापखान्यांत चुकभूल होण्याचा संभव फारच कमी आहे. अगदीं बारीकसारीक गोष्टीकडेही लक्ष द्यावें लागते, निदान सातआठ वेळां तर नुसती प्रुफें दुरुस्त करावी लागतात, या कारणामुळें सरकारी सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसमधून शेखे छापून घेण्याचें काम फारच गैरसोयीचें व खर्चाचें होईल.

( २ ) शेख्यांचें कागदांवर त्यांच्या किंमतीप्रमाणें अनुक्रम घालून त्यांचा हिशेब ठेण्यांत आलेला नव्हता.

पॅरा १४ ( क ) २

शेख्यांचे कागद किंमतवारीनें अनुक्रमानें लावलेलें नव्हते असें म्हणणें चुकीचे आहे. वेगवेगळ्या किंमतीचे शेखे वेगवेगळे अनुक्रमानें लावण्यांत आलेलें होते. सरकारी नमुन्यामध्यें आतां या शेख्यांचा हिशेब व खर्च लिहिण्यांत आलेला आहे.

( ३ ) शेख्यांचे कागदांची जमा व त्यांचा झालेला खप या बाबत हिशेब मे. चीफ ऑफिसर अगर म्यु. च्या दुसऱ्या कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्यानें तपासून पाहिलेला नव्हता किंवा असा हिशेब तपासल्याबद्दल जमाखर्चाचें पुस्तकावर कोठेंही सही केलेली नव्हती.

पॅरा १४ ( क ) ३

शेख्यांचे कागदांची जमा, खर्च व शिल्लक दाखविणारा हिशेब ठेवण्यांत आला असून त्यावर सह्या करण्यांत आलेल्या आहेत.

या शेखे-फार्मोचा दुरुपयोग होऊं नये एवढ्याकरितां पुढें दिल्याप्रमाणें उपाय आम्हीं सुचवीत आहोंत.

( १ ) सध्यां शिल्लक असलेल्या शेखे फार्मोची नोंद क्रमवार एका पुस्तकांत करून त्या फार्मोचा विनियोग कशा प्रकारें झाला हें लिहिण्यासाठीं पुरेशी जागा त्यांत सोडावी.

पॅरा १४ क ( ४-१ )

शेख्यांचे कोऱ्या फार्मोवर अनुक्रम नंबर घातलें आहेत.

( २ ) या हिशेबांमध्यें जमेची आणि खर्चाची प्रत्येक नोंद केल्यावर त्यावर मे. चीफ ऑफिसर आणि अकौंटंट यांनीं सही करावी.

( ३ ) कोरे शेखे-फार्म मे. चीफ ऑफिसर आणि अकौंटंट यांच्या ताब्यांत "गार्ड फाईल्स" मध्यें बंदोबस्तांत ठेवण्यांत यावें.

पॅरा १४ क ( ४-२ व ३ )

याप्रमाणें तजवीज होईल.

८ इतर वसुली.

१५. ( अ ) मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांस ता. २२ आगष्ट १९३० रोजीं रु. १००० व ता. २९ मार्च १९३१ रोजीं ५०० याप्रमाणें, फिर्यादींच्या बाबतींत किरकोळ खर्चासाठीं म्हणून अडव्हान्स देण्यांत आले. जसजसा खर्च होईल तसतशी त्यांनीं बिलें पाठवून अडव्हान्स रकमेची भरपाई करून घ्यावी अशाबद्दल त्यांस परवानगी देण्यांत आली होती. याबाबत जो हिशेब ठेवण्यांत आलेला आहे त्यामध्यें पुढें दिल्याप्रमाणें दोष आढळले.

( १ ) त्यांना देण्यांत आलेल्या अडव्हान्सच्या बेतांत खर्च करावयाचा सोडून त्यांनीं दरखास्त वसुलीचें पैसे त्यांजकडे आले तें याच हिशेबांत जमेस घेतले व त्यांतूनच खर्च केला.

पॅरा १५ अ. १

ता. १ जानेवारी १९३३ पासून ही पद्धत बंद केली आहे. प्रतिवादीकडून वसूल करण्यांत आलेल्या सर्व रकमा म्युनिसिपल खजिन्यावर जमा करण्यांत आल्या असून मे. सीनीयर ऑडिटर यांना गेल्या हिशेब तपासणीच्या वेळीं ह्या दाखविण्यांत आल्या आहेत.

( २ ) वकील लोकांकडून पैसे जमा होत त्यावेळीं त्यांना छापील नमुन्यांत पावत्या देण्यांत येत नसत. त्यामुळें आलेला पैसा योग्य रितीनें जमेस घेतला किंवा नाहीं हें पाहतां येईना.

पॅरा १५ अ ( २ )

पैसे पाठविणाऱ्या वकिलांना आतां छापील नमुन्यांत पावत्या देण्यांत येतात.

( ३ ) या हिशेबाबाबत असणारे शिल्लकेचा मेळ वेळोवेळीं घालण्यास हवा होता तसा तो घातला नाहीं. त्याचप्रमाणें म्युनिसिपल खजिन्यावर वेळोवेळीं भरलेल्या रकमांप्रमाणें अडव्हान्स रकमेचा खर्च लिहिलेला आहे कीं नाहीं हेंही पाहिलें नाहीं.

पॅरा १५ अ ( ३ )

मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांचेकडून बाकी हल्लीं तपासली जात असून म्युनिसिपल खजिन्यावर भरण्यांत आलेल्या रकमांबाबत दाखला मे. अकौंटंट यांचेकडून दरमहा घेण्यांत येत असतो.

(४) मे. वसुली सुपरिंटेंडेंट यांजकडून खर्च झालेल्या पण जमाखर्च करून ज्यांची भरपाई अडव्हान्स रकमेस करून घेतली नव्हती अशा खर्चांची पत्रकें ( Vouchers ) तारीखवारीच्या क्रमानें जुळून ठेवली नव्हती; अगर वसूल व्हावयाच्या रकमांचा खर्डा व रोख शिल्लक व एकूण रकम यांचा मेळ एकमेकांशीं घालण्यांत आलेला नव्हता. यामुळें मे. ऑडिटर यांना हें सर्व व्हावचर शोधून काढून व त्याची शिल्लक येणें असलेला ॲडव्हान्स व इतर येणें यांच्याशीं मेळ घालण्यास दोन दिवस खर्चावे लागले.

पॅरा १५ अ (४)

खर्चांची व्हावचरे व्यवस्थेशीर रीतीनें लावून: त्यांचा खर्डा तयार ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

(ब) या हिशेबाबाबत कांहीं घोर चुका आढळल्या म्हणून ता. १ एप्रिल १९३१ पासून ३ नोव्हेंबर १९३२ पर्यंतच्या हिशेबाची तपशिलवार तपासणी केली. तेव्हां रु. ५८१-६-१ इतकी रक्कम ( वेगवेगळ्या पांच रकमांची एकुणांत) ही म्युनिसिपल खजिन्यावर रक्कम भरली म्हणून अडव्हान्स हिशेबामध्यें खर्ची टाकण्यांत आली होती. पण ही रकम खजिन्यावर भरलेली नसून तिची अफरातफर केलेली असल्याचें दिसून आलें. या बाबतींत सविस्तर खुलासा आम्ही मे. अध्यक्ष व मे. कलेक्टर यांना पत्र नं. एल्. २।८-४२०७ तारीख ६ डिसेंबर १९३२ नें केलेला आहे. अफरातफर करणारे इसमावर खटला चालू असून त्याचा निकाल व्हावयाचा आहे.

पॅरा १५ ब.

खटल्याचा निकाल होऊन रा. प्रभुणे यांना २ वर्षे सक्तमजुरी व १००० रुपये दंडाची शिक्षा झाली.

(क) खात्यांचे अंमलदारांना देण्यांत येणाऱ्या कायम तसलमातींशिवाय फिर्यादी वगैरे कामांसाठीं किरकोळ तसलमाती देण्यांत येत असून त्यांचा हिशेब वेगवेगळ्या पुस्तकांतून ठेवलेला असतो. अंमलदार लोकांना दिलेल्या अनेक तसलमातींमुळें वर निर्देश केल्याप्रमाणें प्रकार होणें सुलभ असल्यामुळें त्यांना दिलेल्या किरकोळ तसलमाती त्यांजकडून परत घ्याव्या व जरूर तो खर्च त्यांना दिलेल्या कायम तसलमातींतून करण्यांस त्यांस सांगावें. जरूर भासेल तर त्यांच्या कायम तसलमाती वाढवून द्याव्या.

पॅरा १५ क.

वेगवेगळ्या खात्यांच्या अंमलदारांना देण्यांत आलेल्या इंगामी तसलमाती काढून घेण्याबाबत विचार चालू आहे. प्रत्येक खात्यांकडून तसलमातींबद्दल हिशेब ठेवण्यांत येत असले, तरी एक मुख्य अडव्हान्स रजिस्टर नगदी खात्यानें ठेवलेलें आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. वेळोवेळीं शिल्की अडव्हान्सबद्दल वेगवेगळ्या खात्यांचेकडे तक्ता पाठविला जातो, व अडव्हान्सची भरपाई करण्याबद्दल संबंध असणारे खात्यांना कळविण्यांत येतें.

वेगवेगळ्या खात्यांना वेगवेगळे अडव्हान्स देण्याऐवजीं त्यांच्या कायम तसलमातीच वाढवून द्याव्या कीं काय याचा विचार चालू आहे.

१६. (अ) कामें करण्याबद्दल घेतलेल्या अमानत रकमांचा जमाखर्च नियमानें व तत्परतेनें करण्यांत येत नसे असें दिसून आलें. कांहीं बाबतींत तर कामें करण्यासाठीं रकमा अमानत म्हणून आल्या असतां कामें प्रत्यक्ष होऊन गेलीं व रकमा भरणारांची बाकीही पण चुकती झाली, तरी अनामती पुढें १९३२-३३ सालापर्यंत ओढलेल्या होत्या. इंगामी पायखाने भाड्यानें दिले होते त्याबद्दलच्या अमानती याचप्रमाणें पुढें ओढलेल्या दाखविल्या तेव्हां हिशेब तपासणी चालू असतांनाच त्यांचा जमाखर्च करण्यांत आला. कित्येक अमानत बुकांवरून तीन चार वर्षांवर पडून राहिलेल्या किती तरी रकमा नजरेस आल्या. जर रकमा भरणारे लोकांना खरोखर पैसे परत मिळावयाचें असते तर त्यांनीं रकमा परत मागणी केल्यावांचून पडूं दिल्या असत्या असें शक्य दिसत नाहीं. अशा तऱ्हेच्या सर्व बाबतींत चौकशी करून मे. स्टँडिंग कमिटीचे नियमांपैकी नियम १० (अ) यांत उल्लेख केल्याप्रमाणें विन मागणी राहिलेल्या रकमा म्युनिसिपल खजिन्यास जमा कराव्या.

पॅरा १६ अ.

सर्व हिशेब आतां चालू तारखेवर लिहिले असून मे. स्टँडिंग कमिटीच्या सभांच्या नियमांतील नियम १० अ यास अनुसरून मागणी न करण्यांत आलेल्या सर्व रकमा जमा करण्यांत आलेल्या आहेत.

जमाखर्च शक्य तितक्या लवकर करून शिल्की बाक्या तिमाहीस निदान एकदां तरी तपासून पाहण्याची तजवीज करण्यांत आलेली आहे.

(ब) कामें केल्याबद्दल अमानत रकमेचा जमाखर्च करून घेण्याची पद्धत आहे ती सदोष असल्याचें दिसून आलें. रकमा अमानत ठेवल्या अशीं कामें करून झालीं कीं, खात्याचें अंमलदार अमानतींतून रकमा उचलून त्या जशाच्या तशाच म्युनिसिपल जमेस खासगी कामगिरींच्या रकमा म्हणून घेत. व अमानत ठेवणारांस खर्चापेक्षां वाढवा आलेला असे तो परत करीत. या पुढें अशा तऱ्हेचा जमाखर्च करतांना जमाखर्चीं चलनांचा उपयोग करावा व अनामत भरणारांचे नांवें रकमेचा खर्च लिहून जें काम झालें असेल त्या कामास जमा लिहावी. अमानत रकमांची परत जमा केली आहे किंवा नाहीं हें पाहण्याचा त्रास यामुळें चुकेल.

पॅरा १६ ब.
ही सूचना ता. १–४–३२ पासून अमलांत आणली आहे.

१७. पुष्कळदां मनी-ऑर्डरी व व्ही. पी. याबाबत आलेल्या रकमांची जमा तातडतीव करावयाची टाकून १० ते २० दिवसांपर्यंतही रकमा जमेंत टाकण्यास कसा विलंब लागला याचीं उदाहरणें हरकतीपत्रकाची बाब नंबर ९५ याबर नमूद आहेत. रकमा अफरातफर केल्याचीं तीन उदाहरणें सांपडलीं. त्याचा तपशील, मे. कलेक्टर व मे. अध्यक्ष यांजकडे तपास करून जरूर ते उपाय योजावेत म्हणून वेगळे रिपोर्टानें कळविला आहे. प्रचलित परिस्थितीप्रमाणें पोस्ट ऑफिसकडून जो पैसा येई तो हुजुर ऑफिसांतील हेडक्लार्क स्वीकारीत व त्याची रजिस्टरीं नोंद होण्याकरितां शिपायामार्फत दुसरे कारकुनाकडे हातोहात पोहोंचता करीत. नंतर भरणा घेणाऱ्या खात्यांकडे रकमा खजिन्यावर पाठविण्यासाठीं पाठविण्यांत येत. मनी ऑर्डरी नोंदणाऱ्या कारकुनाकडे हेडक्लार्क, अगर शिपाई पैसा देत त्यावेळीं पावत्या घेत नसत, त्यामुळें पैशांचा भरणा करण्यास उशीर झाला अगर पैशांची अफरातफर झाली तर त्याबाबतची जबाबदारी तेव्हांच नजरेस येण्यास साधन नसे. पैशांची अशा तऱ्हेनें हातोहात व खाल्या खात्यांकडे होणारी पोहोंच हानिकारक असल्यामुळें इलाज म्हणून असें सुचविण्यांत येतें कीं, (१) पोस्टखात्याकडून यावयाचा पैसा म्युनिसिपालिटीच्या जबाबदार अधिकाऱ्यानें शक्य तो मे. अकौंटंट यांनींच स्वीकारावा व त्याबद्दल त्यांनीं पावती द्यावी. (२) अशा रीतीनें पैसा स्वीकारणाऱ्या अंमलदारानें मनी-ऑर्डरीबाबत रजिस्टर स्वतः ठेवावें. (३) दिवसाअखेर अशा रीतीनें जमलेली सर्व रक्कम म्युनिसिपल खजिन्यावर पाठवावी. व (अ) मनी ऑर्डरींच्या कुपनांतून स्पष्ट खुलासा असेल तेव्हां संबंध असणारे बाबतींत ती रक्कम जमा करण्यांत येऊन त्या कामीं जबाबदार असणारे खात्यांकडे जमेबाबत नोंद त्यांचेकडील रजिस्टरांवर उतरण्यास कळवावें (ब) अथवा, रकमांचे जमेबाबत पूसतपास होणें असल्यास त्या अमानतीस जमा करण्यांत येऊन योग्य तो निर्णय ठाम होतांच त्या जरूर त्या खात्यास कायम जमेस घ्याव्या.

पॅरा १७
यंदाचें सालापासून डेपुटी अकौंटंट ह्यांनीं मनी-ऑर्डरी घेऊन त्यांची रक्कम त्याच दिवशीं म्युनिसिपल खजिन्यावर भरण्याबाबत नवीन पद्धत सुरू केलेली आहे. ज्या कामाबद्दल रक्कम आलेली असेल त्या कामांवर ती जमा करण्याबद्दल संबंध असणारे खात्यांना नुसतें कळविण्यांत येते. कारकुनांचेकडून पैशांची तजवीज होण्यास जाणारा वेळ यामुळें वाचणार आहे.

१८. पोस्ट खात्याकडून आलेला पैसा शिपायामार्फत हातोहात पोहोंचता करण्याशिवाय हुजूर ऑफिसकडे आलेल्या कितीतरी रकमा खजिन्यावर जमा व्हावयास हव्या होत्या, त्या जमादाराकडे सुरक्षितपणें ठेवण्याकरितां उशीरानें देण्यांत आल्याचें दिसून आलें. जमादाराकडे दिलेल्या रकमांबाबत त्यानें कोणाला पावत्या लिहून दिल्या नव्हत्या अगर रकमा जमा आल्या त्याबद्दल त्यानें टिपणही ठेवलें नव्हतें. हरकतीपत्रकांतील बाब ९४ मध्यें नमूद केलेल्या उदाहणावरून अशा किती तरी रकमा जमादाराकडे कित्येक काळ राहिल्याचें दिसून आलें. पुरेशी जामीनकी दिल्याखेरीज मोठ-

पॅरा १८ वा.
जमादार याचे ताब्यांत पैसे ठेवण्याची पद्धत यापूर्वींच बंद केली आहे. पैशांचा संबंध असणारे कारकुन त्याच दिवशीं खजिन्यावर पैसे भरतात.

मोठ्या रकमा कमी दर्जाच्या नोकरांकडे राहूं देणें हें बिनधोक नव्हे. यापेक्षां दुसरी कांही तरी पण सुरक्षितपणाची योजना करणें जरूर आहे.

## ९ कारखाना खात्याचे हिशेब

(१९) म्युनिसिपालिटीनें स्वतःचा कारखाना ठेवला असून त्यापासून माल मजकुरीं एकूण उत्पन्न रुपये ३७,९७१ झालें व खर्च रुपये ४१३२४ झाला. यापैकीं जमेच्या रकमेंत मजुरीवर शेंकडा १० व मालावर शेंकडा २॥ याप्रमाणें कामाच्या किंमतीवर आकारलेल्या नफ्याचा समावेश झालेला असून खर्चाच्या रकमेंतून मुद्दलावरील व्याज, यंत्रे, इमारती, हत्यारें वगैरेवरील झीज यांचा आकार वगळलेला आहे, कारखाना ही निम व्यापारी बाब असतां ती स्वयंसिद्ध (Self Supporting) कां नसावी याचा विचार म्युनिसिपालिटीनें करण्यासारखा आहे.

पॅरा १९ अ

कारखाना स्वयंसिद्ध (self-supporting) नाहीं असें म्हणणें बरोबर नाहीं. तो स्वयंसिद्ध आहे. शिलकेंत असलेल्या मालाची किंमत जमा बाजूकडे हिशेब तपासनीसांनी धरली नाहीं. १९३१–३२ सालची शिल्लक बाबीवरील वर्ष अखेर शिल्लक रुपये ५००० आहे. तसेंच कारखान्याचे उपयोगासाठीं १२०० रुपये खर्चून एक शेड बांधण्यांत आली. जमा बाजूकडे रु. ३७,९७१ ऐवजीं रु. ४२९७१ व खर्च बाजूकडे इमारतीवर कायम खर्च झालेल्या शेडची किंमत रु. १२०० वजा देऊन ऐन खर्चच तेवढा रु. ४०१२४, असे आंकडे धरावयास पाहिजेत हें यावरून कळून येईल.

(ब) कारखान्याकडील हिशेब पद्धतींतील दोष व हिशेबी स्वरूपाच्या चुका आढळल्या त्या पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

(१) आर्डरी व ऑर्डर पुस्तकः—कारखान्याकडे ठेवण्यांत आलेल्या आर्डर बुकामध्यें किरकोळ आर्डरींची नोंद करण्याकडे लक्ष पुरविलें गेलें नाहीं. सालमजकुरीं खासगी कामगिरी बाबत शंभरांवर आर्डरी आलेल्या असतां त्यांतल्या फक्त दोनच ऑर्डर बुकांस नोंदल्याचें आढळलें. यामुळें कारखान्याकडे आलेल्या सर्व ऑर्डरीप्रमाणें कामें करण्यांत आलीं अगर नाहीं आणि त्यांचा वसूल करून तो जमेस घेतला कीं नाहीं हें कळावयास मार्ग नाहीं. सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, सब ओव्हरसियर्स, मोटर मेकॅनिक्स वगैरे दुय्यम नोकरांकडून किरकोळ माल पुरवणें अगर काम करून देणेंबद्दल ऑर्डरी आल्यावरून त्याप्रमाणें तजवीज केल्यावर कामाबद्दलचा खर्च संबंध असणारे खात्यांचे अंमलदारांकडून मामुली मंजुरी आली नसतांनाही त्यांचे खात्यांवर टाकण्यांत आला. याचीं कित्येक उदाहरणें हरकती पत्रकांतील बाब नं. १७८ येथें नमूद आहेत. फसवेगिरी अगर कसूरीचे प्रकारांवर एक उपाय म्हणून मागणी करण्यास पात्र असणारे इसमांकडून येणाऱ्या ऑर्डरी ऑर्डर बुकांस अनुक्रमानें नोंदण्यांत याव्या.

(२) खासगी कामगिरी बाबत बाकीची वसुलीः—खासगी कामगिरी बाबत कामें करण्यापूर्वी कामें करून मागणारांकडून कामाचे किंमतीइतकी बयाणा रकम पुरी यावयास पाहिजे. तथापि अशी रकम घेतल्याशिवाय, इतकेंच काय पण प्रत्यक्ष माल तयार करून मागणीदारांच्या हवाली केला तरीही रकम आल्याशिवाय कामें करून देण्यांत आली. यामुळें या खात्यास बाकी वसूल होण्याची राहिली आहे.

पॅरा १९ (ब) २

कामाबाबत पूर्ण रकम आल्याखेरीज हल्लीं कोणाही खासगी इसमाचे काम हातीं घेण्यांत येत नाहीं. बाकी बहुतेक वसूल होत आलेली असून फक्त रुपये १०५ वसूल होण्याचे राहिले आहेत.

(३) म्युनिसिपल खात्यांबाबत होण्याचा जमाखर्चः—कारखान्याकडील येणें रकमेचा जमाखर्च करण्याची पद्धत सदोष असल्यामुळें या कामीं दाब जसा रहावयास हवा तसा राहिला नाहीं. सध्यां वेगवेगळ्या खात्यांकडे येणें असलेल्या रकमांचा दर महिन्यांत होत असलेल्या, माल–किंमती व मजुरी–खर्च यांच्या एकूण खर्चाच्या मानानें जमाखर्च होतांना नक्की कोणत्या कामावर माल अगर मजुरी वापरण्यांत आली, याचा तपशील देण्यांत येत नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक वेगवेगळ्या ऑर्डरींचे बाबतींत किती

पॅरा १९ (ब) ३

मे. हिशेब तपासनीस यांच्या सूचनाप्रमाणें दरएक बाबतींत तजवीज करण्यांत येत आहे.

खर्च झाला याचा तपशीलवार हिशेब ठेऊन तो संबंध असणाऱ्या खात्यांकडे कळविण्यांत येत नाहीं.

मोटर टायर्स, ट्यूब्ज वगैरे जिन्नस सोडून डेडस्टाक खात्यास जमा होण्याच्या इतर वस्तूबद्दल खात्यांच्या अंमलदाराकडून माल मिळाल्याबद्दल पावत्या अगर काम संपून तयार झाल्याबद्दल कंप्लीशन सर्टिफिकेटस् घेण्यांत आलेली नव्हती. दरमहा खर्चाची महिनेवार बिलें वर्कशॉपकडून तयार होऊन त्यांतील खर्च संबंध असणाऱ्या खात्यांकडून तपासला नसतांही परस्पर नगदीखात्याकडे तडक पाठविण्यांत येत असत. अशी स्थिती असल्यामुळें त्या त्या खात्यांवर टाकलेल्या खर्चाची कामें करण्यांत आलेलीं होती; अगर तीं करण्यांत आल्यावर त्यांवरील खर्च बरोबर टाकला होता किंवा नाहीं हें हिशेब तपासणींत कळण्यास मार्ग नाहीं. याबाबतींत होणारे घोटाळे व नुकसान टाळण्याकरितां असें सुचविण्यांत येत आहे कीं,

( १ ) कामाची मागणी भरुन पाठविण्याचा अधिकार असलेल्या अंमलदारानें मागणी भरुन पाठविल्याखेरीज काम हातांत घेऊं नये.

( २ ) सर्व ऑर्डरी, ऑर्डरबुकांत क्रमवार लिहून ठेवाव्या व माल व मजुरी प्रत्येक कामावर किती लागली याचीही नोंद ठेवावी.

( ३ ) वेगवेगळ्या खात्यांना पुरविलेल्या सामानाबाबत जमाखर्च करुन घेण्यापूर्वी दिलेल्या मालाबद्दल पोंच अगर नवीन किंवा रिपेर केलेल्या कामाबद्दल, काम पुरें झाल्याबद्दल सर्टिफिकेट संबंध असणारे खात्यांचे अंमलदारांकडून घेण्यांत यावें.

( ४ ) जीं कामें पुरीं झालेलीं असतील त्या कामांचा जमाखर्च, व कामांबाबतचा आकार दर्शविणारी बिलें ज्या त्या खात्यांकडे पाठवून तीं त्यांनीं बरोबर आहेत असें कबूल केल्यावर वेळोवेळीं करण्यांत यावी.

( ४ ) कारखान्याकडील माल व त्याचा बंदोबस्तः—कारखान्याकडे करण्यांत येण्याच्या अनेक कामाकरितां लागणारा माल हा स्टोअर कीपर देत व त्याबद्दलची नोंद माल खर्चाच्या कीर्दीत करीत; या बुकांतील रोजवार नोंदी स्टॉक बुकांत करण्यांत येत. पण कामासाठीं लागणाऱ्या या जिनसा कारखान्याकडील मागणीपत्रकांत भरून त्यावर वर्कशॉप सुपरिंटेंडेंट यांची सही घेतलेली नसल्याचीं अगर माल मिळाल्याबद्दल माल स्वीकारणारे इसमांच्या सह्याही मागणीपत्रकांवर नसल्याचीं बरींचशीं उदाहरणें नजरेस आलीं. कांहीं वेळां तर माल मिळाल्याबद्दलच्या सह्या रोजंदारीनें कामें करणाऱ्या इसमांच्याच घेतल्या होत्या. व माल कोणत्या कामासाठीं घेतला याबद्दलचा उल्लेख मागणीपत्रकांत करण्यांत आलेला नव्हता. अशा तऱ्हेच्या माहितीच्या आभावीं मागणी केलेला माल प्रत्यक्ष कामावर उपयोगांत आणला अगर तो योग्य रीतीनें खर्चीं घातला किंवा नाहीं हें नीट समजलें नाहीं. माल दिल्याच्या रोजकीर्दीवरही पण मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट तपासून तविर सह्या करीत नसत. माल मागविणें, बंदोबस्तानें ठेवणें कारखान्याकडे लागणारे मालाची तपासणी करणें, माल देणें व जवळजवळ वार्षिक वीस हजार रुपयांच्या मालाचा हिशेब ठेवणें, ह्या सगळ्या कामाची जबाबदारी वास्तविक

एका अनुभविक अशा द. म. ३० रु. रुपये पगाराच्या कारकुनावर ( स्टोअरकीपरवर ) टाकण्यांत आली होती.

कारखान्यांतील मालाचा बंदोबस्त, व माल देणें वगैरे मालावर मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट यांची सक्त देखरेख असणें जरुर आहे. कारखान्याकडील हिशेबांबाबत पुढील सूचना करीत आहोंत.

१ कारखान्याकडे अगर काम करण्याच्या जागेवर माल द्यावयाचा तो योग्य मागणीपत्रकांत कामाचें नाव, ऑर्डरीचा नंबर वगैरे माहिती भरुन त्यावर मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट यांची सही झाल्याखेरीज व माल मिळाल्याबद्दल मागणी करणारानें सही केल्याखेरीज देण्यांत येऊं नये.

२ माल खर्चाचें रजिस्टर अशा मागणीपत्रकांवरुन लिहावें व तें दररोज तपासून पाहून त्यावर मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट यांनीं सही करावी.

३ एकदां देण्यांत आलेला पण कामावर खर्च न झालेला माल, तावडतोब स्टोअरकीपरकडे परत करण्यांत येऊन त्याची जमा माल जमेच्या कीर्दीस घ्यावी.

स्टोअरकडील खतावण्यांतून पुढें दिलेले दोष आढळले.

( १ ) खतावण्यावर वारंवार बेरजा घेतलेल्या अगर शिल्का काढलेल्या नव्हत्या. वारंवार खपणारे मालाचे बाबतींत दरमहा व क्वचित खपणारे मालाचे बाबतींत तीन महिन्यांतून एकदां तरी निदान शिल्लक काढावी.

( २ ) एकाच जातीच्या पण वेगळ्या आकाराच्या मालाचा जमाखर्च एकाच सदरांत करण्यांत आला. हा माल नगावारी देण्यांत येत असल्यामुळें वेगवेगळ्या आकाराचे नगांचा तपशील स्टोअरमधील कीर्दीत वेगवेगळा देण्यांत यावा.

( ३ ) देण्यांत आलेल्या मालाची नोंद एकाच सदरांत नगावारी, डझनवारी वजनावारी अगर बंडलवारी करण्यांत येत असल्यामुळें खर्ची मालाची एकुणात व शिल्लक काढण्यास अतिशय अडचण पडते. मालाची जमा आणि खर्च शक्यतोंवर एकाच प्रकारानें करावी. अगर जरुरच वाटेल तर वेगवेगळ्या प्रकारासाठीं वेगवेगळे कॉलम आंखून, ज्याप्रमाणें पैशाचे हिशेबांत आंखलेले असतात तसे कोठे वेगवेगळ्या परिमाणाकरितां द्यावे.

( ४ ) एकूण मालाची शिल्लक १९३१–३२ सालांत केव्हांही घेण्यांत आलेली नसून चालूं हिशेब तपासणी होईपर्यंत कीर्दीतील शिल्लक माल व प्रत्यक्ष शिल्लक माल यांची रुजवात घातलेली नाहीं.

पॅरा १२ (ब) २

मे. हिशेब तपासनीस यांच्या सूचना लक्षांत घेतल्या असून त्याप्रमाणें तजवीज करण्याचें काम चालूं आहे.

( ५ ) वर नमूद केलेले दोष व घोटाळे यामुळें जेमतेम एक महिन्याची देवघेव तपासतां आली. या एका महिन्याचेच हिशेबांमध्यें मालाच्या बाक्या, कित्येकदां मूल्यवान जिनसांच्यादेखील पुढें ओढण्याच्या राहून गेलेल्या होत्या. त्या हिशेब तपासणी चालूं असतांना लिहिण्यांत आल्या. या राहून गेलेल्या नोंदी केवळ हिशेबांतील दोषच म्हणून होत्या अगर कसें हे शिल्की मालाची मोजदाद केलेली नसल्यामुळें कळण्यास मार्ग नाहीं. अशा परिस्थितीमध्यें एकंदर माल एखाद्या स्वतंत्र अंमलदारानें मोजून पाहून त्याची होणारी यादी खतावणींतील शिल्लकेबरोबर रजू घालण्यास पाहिजे.

पॅरा १९ (ब) ५

मे. हिशेब तपासणीस यांच्या सूचना लक्षांत घेतल्या आहेत.

( इ ) म्युनिसिपल कारखान्या(वर्कशॉप)कडील पैशांच्या देवघेवी:—कारखान्याकडील पैशांच्या देवघेवीवर मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट यांची देखरेख नसल्याचें दिसून आलें. कारखान्याकडे जमा होण्याच्या रकमांबद्दलच्या पावत्या एकजात कारखान्याकडील कारकून यांनींच दिलेल्या आहेत. अशा तऱ्हेनें जमा झालेल्या रकमांचा हिशेब कित्येक दिवस, कधीं कधीं तर एक एक दोन दोन महिनेपर्यंतही लिहिण्यांत येत नव्हता. मार्च १९३१ अखेर पर्यंत या रकमांच्या जमाखर्चाची कीर्द लिहिण्यांत येत असे, पण पुढें एप्रिल महिन्यापासून तीही पण लिहावयाची बंद केल्याचें दिसून आलें. ही कीर्द बंद कां केली याचा खुलासाही मिळाला नाहीं. कारखान्याकडील पैशांचे देवघेवीबाबत तपशीलवार तपासणी करतां, पैशांचे व्यवहार करणारा कारकून हा म्युनिसिपल पैशाचा अफरातफर करीत असे ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस आली. अशा रीतीनें त्यानें केलेली रुपये १५९-९-० रकमेची अफरातफर हिशेबांची तपासणी चालू असतांनाच मे. कलेक्टर यांजकडे तारीख २४ नवंबर १९३२ रोजीं पत्र नं. एल्. २/३ ३९२७ अन्वयें हिशेबतपासनीसांनी कळविली. याचें पर्यवसान कारकुनावर खटला होऊन, आरोप शाबीत झाल्यामुळें त्यास २०० रुपये दंड व सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा होण्यांत झाली.

पॅरा १९ व इ.

हिशेब तपासणी होईपर्यंत यापूर्वी वर्कशॉपकडील हेडक्लार्क ह्यांचे ताब्यांत पैसे असून तेच पैशाबाबतचे हिशेब ठेवीत असत. ही पद्धत कित्येक वर्षे चालू होती. अफरातफर झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण असून हेडक्लार्क यांजवर कायदेशीर काम चालविण्यांत आलें, व त्याजपासून पैसे वसूल करून घेऊन ते म्युनिसिपल फंडास जमा करण्यांत आलें आहेत. तथापि हिशेबनिसांच्या सूचनांस अनुसरून मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट यांनी या कामावर देखरेख ठेवण्याबाबत जरूर ती योजना आतां करण्यांत आलेली आहे.

खाजगी कामगिरीबाबत वेगवेगळ्या खात्यांचेकडून वसूल होण्याच्या रकमांचा भरणा मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट यांच्या हुकुमावरून तिहेरी चलनांनीं एकदम म्युनिसिपल खजिन्यावर करण्याची नवीन पद्धत अमलांत आणण्यांत येत आहे. या व्यवस्थेमुळें हिशेबतपासनिसांनीं दर्शविल्याप्रमाणें संभवणाऱ्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाहीं.

( क ) कारखान्याकडील सन १९३१–३२ च्या खतावणींत पान ३६ वर प्रत्यक्ष शिल्लक असलेल्या ४२ कांचेच्या तावदानांचे ऐवजीं १०३ तावदानें शिल्लक असल्याचें नमूद आहे. हीं जास्त तावदानें कोठलीं अशाबद्दल विचारतां असें सांगण्यांत आलें कीं, जरी जास्त दिसणारीं ६१ तावदानें दिल्याबद्दल उल्लेख असला तरी तीं प्रत्यक्ष दिलीं नाहींत. अशा तऱ्हेची काल्पनिक नोंद खतावणीस कां नमूद करण्यांत आली याचा खुलासा होणें जरूर आहे.

पॅरा १९ ( क ).

हिशेबतपासणी चालू असतांनाच ह्या हरकतीबाबत खुलासा करण्यांत आला होता. कारखान्याचे उपयोगाकरितां कोठीवरून ( स्टोअरमधून ) आणखी ६१ कांचा आणल्या होत्या. बुकांवर जरी कांचांचा खर्च लिहिला होता तरी कांचा प्रत्यक्ष देण्यांत आलेल्या नव्हत्या. त्यामुळें शिल्लकेंत माल वाढला. खर्च टाकलेला पुन्हां हिशेबांत जमेस घेण्यास हवा होता, पण ही चूक झालेली आहे. जरूर तशी दुरुस्ती आतां करण्यांत आलेली आहे.

( ड ) सन १९३०–३१ सालामध्यें रु. ५७४–४–० खर्चून मोटारचे बरेंचसें फुटकळ सामान खरेदी करण्यांत आलें. यासंबंधीं कारखान्याचें स्टोअरच्या खतावणीचें पृष्ठ ८५० येथ नोंद आहे. यापैकीं सन १९३०–३१सालांत फक्त रुपये ४७–८–० चेंच सामान उपयोगांत आलें. नवीन वर्षाचें सुरवातीस जेव्हां नवीन खतावणी उघडली तेव्हां या सामानाची शिल्लक नमूद करण्यांत आली नाहीं. अगर या सामानांतून जें कांहीं सामान पुढें देण्यांत आलें त्याचाही खर्च खतावणींत दाखविला नाहीं. मोटारीच्या फुटकळ सामानाचा विनियोग कशा प्रकारें झाला याबद्दल नीट चौकशी करून त्याचा खुलासा सरकारकडे कळवावा.

पॅरा १९ ( ड ).

१९३१–३२ सालांतील जमेच्या खतावणीवर पुढें न ओढलेल्या मोटारीच्या सुट्या भागांबद्दल शिल्लका हिशेबतपासणीमध्यें दाखविण्यांत आल्या होत्या, त्या आतां हिशेबांत धरल्या असून शिल्लक असलेल्या मालांत त्या जमेस घेण्यांत आलेल्या आहेत. पुढील हिशेबतपासणीचे वेळीं तपासनिसांना त्या दाखविण्यांत येतील.

( ई ) स्टोअरकडील खतावणी सन १९३१–३२ ची पान ६२१ यावरील नोंदीवरून कारखान्याकडे तीन Ampere ॲम्पियर मीटर्स आणली होतीं. त्यापैकीं ता. ३० जून १९३१ रोजीं एक देण्यांत आलें, व शिल्लकी दोन राहिलीं. सन १९३२–३३ सालाकरितां हा शिल्लकी माल पुढें ओढला नाहीं. पण प्रत्यक्ष शिल्लक असलेला माल पडताळून पाहतां तीन मीटर्स शिल्लक असल्याचें नजरेस आलें. मागाहून मीटर्स विकत घेतलेली नसतां तीन मीटर्स शिल्लकेंत सांपडली यावरून ३० जून १९३१ या तारखेस खर्ची टाकलेले एक मीटर चुकीचें दिसतें. या तऱ्हेच्या गैरशिस्तपणाबद्दल खुलासा केला जावा.

पॅरा १९ ( ई ).

प्रथम तीन ॲम्पीयर मीटर्स विकत घेण्यांत आलीं होतीं. त्यांतलें एक अगोदर देण्यांत आलें व दुसरें नंतर खरेदी करण्यांत आलें. याबाबतचें बिल वेळेवर न मिळाल्यामुळें जमेची नोंद करावयाची राहून गेली याबद्दल दिलगिरी वाटते. एका वेळेस तीन मीटर्स शिल्लकेंत ठेवण्याची नेहमींची पद्धत आहे.

(१०) किरकोळ खर्च.

२० (अ) सन १९३२-३३ सालासाठीं म्युनिसिपालिटीस लागणाऱ्या सर्व प्रकारच्या जिनसांबद्दलचे मक्त्याचे भाव (टेंडर्स) पुणें म्युनिसिपल ग्याझेटमध्यें जाहिरात देऊन मागविण्यांत आले, व पुणें म्युनि. ग्याझेटांतील जाहिरातीचा उल्लेख टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई क्रॉनिकल व फ्री प्रेस या पत्रांतून एक एकदां जाहिरात देऊन प्रसिद्ध करून देण्यांत आला. म्युनिसिपालिटीस दरसाल लाखोंवारी रुपयांचा माल लागतो ही गोष्ट लक्षांत घेतां म्यु. ग्याझेटाहून पुष्कळ मोठा खप असणाऱ्या वर्तमानपत्रांमधून यावावतच्या जाहिराती एक दोन अंकांतून जरी दिल्या असत्या तर कदाचित म्युनिसिपालिटीस फायदाच झाला असता.

पॅरा २० (अ).

हा प्रश्न वैयक्तिक मतावर अवलंबून आहे. यापूर्वी देण्यांत आलेल्या जाहिरातीमुळें कोणत्याही प्रकारानें तोटा झालेला नाहीं असा प्रत्यक्ष अनुभव आहे.

(ब) मुंबई बरो म्युनिसिपल ॲक्टाचें ५० वें कलमांत, मे. चीफ ऑफिसर यांनीं, म्युनिसिपालिटीस जेव्हां एक हजार रुपयांपेक्षां जास्त किंमतीचा माल विकत घ्यावयाचा असेल, अगर कंत्राटानें तेवढा खर्च येणारे काम करवून घेणें असेल, तर स्थानिक वर्तमानपत्रामधून अशाबद्दल माल घेणें अगर काम करणेंबद्दल दर मागविण्याकरितां ७ दिवस अगोदर जाहिरात यावी असें सांगितलें आहे. या बाबतींत कायद्यानें घातलेल्या अटींचा अवलंब करण्यांत आला नाहीं. याचें उदाहरण, हजार रुपयांपेक्षां जास्त किंमतीचा माल विकत घेतांना अगर दोन किंवा तीन हजार रुपयांपेक्षां जास्त खर्च होण्याचीं मक्त्याचीं कामें मंजूर करतांना वर उल्लेख केलेली जाहिरात देण्यांत आली नाहीं हें देतां येईल. हें बेकायदेशीर आहे. पुष्कळ वेळां तर किरकोळ कंत्राटी कामें, ड्रेनेज किंवा वॉटर वर्क्स इंजिनियर यांनींच पसंत केलीं. वस्तुतः, म्यु. कायद्याचें कलम ४८ (४) प्रमाणें मे. चीफ ऑफिसर यांनीं, कंत्राटें (मक्त्याचीं कामें) मंजूर करावयास हवीं होतीं, व कलम ४९ (ब) प्रमाणें कंत्राटदारांकडून त्यांनीं करार लिहून घ्यावयास हवे होते.

पॅरा २० (ब).

हिशेबतपासणीच्या वर्षामध्यें ड्रेनेजचीं कामें करण्याकरितां लोकांकडून परसेंटेज रेटनें पीस वर्कचीं टेंडरें मागविलीं व त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करून आमच्या शिफारशीसह मे. ड्रेनेज सब-कमिटीकडे सादर करण्यांत आला. कामांचे बाबतींत ज्या कंत्राटदारांना पसंती देण्यांत आलेली आहे अशांचा तक्ता करून म्युनिसिपालिटीच्या दरापेक्षां ९ टक्के दरांनीं कमी दरांचीं कामें मे. ड्रेनेज सब-कमिटीनें मंजूर केलीं.

(२१) म्यु. नें ठेवलेलें डेडस्टॉक रजिस्टर म्हणजे जंगम मालमत्तेचें पुस्तक सदोष असून त्यांत विकत घेतलेल्या मालाचा तपशील टिपण्यांत येत नसल्यामुळें कांहीं कालांनंतर विकत घेण्यांत आलेला माल रजिस्टरांत शोधण्यास अडचण पडते. हल्लीं या रजिस्टरांमध्यें माल नोंदतांना वस्तूंचा उल्लेख फक्त नगावारी केला जातो त्या वस्तूंची खरेदीची तारीख, किंमत, आकार, माप वगैरे, अगर बनावटीचा (मेकर) तपशील देण्यांत येत नाहीं. अशा तऱ्हेची माहिती दिलेली नसल्यामुळें कमी किंमतीचे डाग भारी किंमतीच्या डागांऐवजीं बदलणेंही शक्य होईल. तरी हें टाळण्यासाठीं मालाचा सर्व तपशील रजिस्टरांस नमूद करण्यांत यावा. म्हणजे मागाहून केव्हांही जरी तपासणी केली तरी जिनसा नक्की पडताळून पाहतां येतील. जंगम मालमत्तेपैकीं पुष्कळसे डाग पडताळून पाहतां कित्येकदां बाजारांतून खरेदी केलेले तर कित्येकदां म्युनिसिपल कारखान्यांत तयार झालेले डाग या रजिस्टरांस नोंदलेल्याचेच आढळले नाहींत. त्याचप्रमाणें कारखान्यांत तयार झालेल्या मुताऱ्या, कपाटें, टेबलें, वगैरेंची नोंद रजिस्टरांत नव्हती. ती हिशेबतपासणी चालू असतांना करण्यांत आली. यापुढें म्युनिसिपालिटीनें विकत घेतलेला माल, तो ताब्यांत घेणाऱ्या अंमलदाराकडून त्याबद्दलची "नोंद डेडस्टॉक रजिस्टरांत अमूक पानावर करण्यांत आली आहे," असा स्पष्ट लेख आल्यावांचून माल खरेदीच्या बिलांची रक्कम देण्यांत येणार नाहीं अशी तजवीज करावी.

पॅरा नं. २१.

मे. हिशेबतपासणीस यांचे सूचनेप्रमाणें सध्यांच्या डेडस्टॉक रजिस्टरामध्यें नवीन रकाने घालावे लागणार आहेत. हें काम सध्यां चालू आहे. मे. हिशेबतपासनीस यांच्या सूचनाप्रमाणें डेडस्टॉक रजिस्टर ठेवण्यांत येत असून पुढील हिशेबतपासणीचे वेळीं तें दाखविण्यांत येईल.

(२२) १९३१–३२ सालामध्यें अनाथ व बेवारशी अशा ६७ इसमांस मूठमाती देण्याकरितां रु. ११५५ इतकी रक्कम खर्च करण्यांत आली. प्रत्येक दहन अगर दफन करण्यास १७-४-० खर्च आला. या बाबतींत सध्यां चालू असलेला परिपाठ असा आहे कीं, मयत असणाऱ्या इसमांचे हितसंबंधी एक दोघां म्युनिसिपल सभासदांच्या मदतीनें पंधरा ते वीस रुपयेपर्यंत खर्च मिळविण्यासाठीं अर्ज देतात, व अर्जावरील सभासदांच्या शिफारशीप्रमाणें रकमा मृतांचे संबंधीयांना देण्यांत येतात. अनाथ प्रेतांची विल्हेवाट लावण्याचें काम अशा बाबतींत जरी म्युनिसिपालिटीकडून होत असलें तरी दहन अगर दफन करण्याचें म्युनिसिपालिटीवर बंधन आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. हें अनाथ व बेवारशी प्रेतासंबंधीं, मग गरीबांची तर गोष्ट दूरच. वास्तविक हें काम सरकारचें आहे, व त्याबद्दल सरकारकडून म्युनिसिपालिटीस दर मयतामागें तीन रुपयेप्रमाणें खर्च देण्यांत येत आहे. १९२५ च्या बरोज म्युनिसिपल ॲक्टामध्यें गरीब व बेवारशी मृतांच्या अंत्यविधीस खर्च करण्याची तरतूद नसल्यामुळें सरकारकडून मिळणाऱ्या खर्चापेक्षां फाजील खर्च म्युनिसिपालिटीनें करूं नये. गरीब पण जे वस्तुतः बेवारशी नाहींत अशा मृतांच्या अंत्यविधीसाठीं केलेल्या खर्चाची मागणी म्यु. नें सरकारकडे केलेली आहे ती बरोबर आहे. व सरकार ठराव जनरल डिपार्टमेंट नंबर १६७५ ता. ८ मे १८८२ अन्वयें केलेली आहे याबद्दल मे. कलेक्टरसाहेब चौकशी करतील अशी आशा आहे.

पॅरा नं. २२.

हिशेब तपासणीस यांनीं काढलेली हरकत लक्षांत घेऊनही म्युनिसिपालिटीनें मे. जनरल कमिटीचा ठराव नं ३८१ तारीख २७।१।३३ चा करून अमलांत असलेली पद्धत पुढें चालू ठेवण्याचें ठरविलें आहे.

(२३) भंगी लोक हे हंगामी नोकर असल्यामुळें त्यांना ग्रॅच्युइटी देण्यांत आली हें गैर आहे, अशाबद्दल मागील सालच्या तपासणी पत्रकांत ७ वें प्याऱ्यांत नमूद केलें आहे. सन १९३१-३२ सालामध्यें रुपये १७,३८५ इतके याच कामीं पुन्हां खर्च केलें आहेत. हा खर्च नियमबाह्य आहे ह्मणून तो हिशेब तपासणींत मंजूर करतां येत नाहीं. या खर्चास, तसेंच गेल्या सालांतही केलेल्या याच खर्चास सरकारी मंजुरी घेण्यांत यावी, व अशा तऱ्हेचा खर्च यापुढें करण्यांत येऊं नये.

पॅरा नंबर २३.

अशा तऱ्हेचा खर्च करणें प्रत्यक्ष व्यवहारांत येणाऱ्या अडचणी लक्षांत घेतां अगदीं जरूर असून तो न करून चालणार नाहीं. म्यु. बरोज ॲक्टाचें कलम ५८ एस्.. खालीं केलेल्या नियम नंबर १० स अनुसरून मागील काळापासून देण्याच्या रकमांना कायदेशीर संमति देण्याबद्दल ठराव करून तो सरकारकडे मंजुरीसाठीं पाठविला. तो सरकारकडून ठराव नंबर एस्. ९१/१६४ ता. १९-४-३३ नें मंजूर करण्यांत आला आहे.

(२४) वेगवेगळ्या खात्यांना देण्यांत आलेल्या कायम तसलमतींची भरपाई करतांना असें दिसून आलें कीं, हा खर्च करण्यांत आलेल्या रकमांचा तपशील दिल्याशिवाय तसलमात बिलें मंजूर करण्यांत आली. मार्च १९३२ मधील व्हावचर नं ५१० व ५११ यावरून असें दिसतें कीं, रु. ७६–३–० व रु. ८९–१२–३ याप्रमाणें रकमा रा. प्रेस मॅनेजर यांस, त्यांनीं बिलामध्यें तसलमातखर्चाचा तपशील दिल्याशिवाय देण्यांत आल्या. तसलमातीचें भरपाईसाठीं पुन्हां पुन्हां तीच व्हावचरें देतां येऊं नयेत याकरितां कायम तसलमतीच्या खर्चाची भरपाई करतांना खर्चाची तपशीलवार पत्रकें घेऊन तीं मंजूर करतांना रद्द करण्यांत यावीत व फाईलांतून बांधून ठेवावींत.

पॅरा नं. २४.

सूचना लक्षांत घेतल्या आहेत. व त्याबाबत जरूर ते हुकूम ताबे कामगारांना देण्यांत आलेले आहेत.

(२५) व्हावचर नंबर ५५८ प्रमाणें मार्च १९३२ महिन्यांत पुणें शहरांतील भंगी लोकांच्या को-ऑपरेटिव्ह सोसायटीस रु. ५,००० ॲडव्हान्स म्हणून देण्यांत आले. को ऑपरेटिव्ह सोसायट्यांना मदत करण्याबद्दल म्युनिसिपल कायद्यांत कोठेंच सांगितलेलें नसल्यामुळें यापुढें अशा तऱ्हेनें खर्च करूं नये. ज्या व्याजानें

पॅरा नं. २५.

मे. जनरल कमिटीच्या ठरावाप्रमाणें द. सा. द. शें. ६ रु. दरानें व्याजासह रकमेची पूर्णपणें वसुली करण्यांत आलेली आहे. याबाबतच्या सूचना ध्यानांत घेतल्या आहेत.

सोसायटीस रकम कर्जाऊ दिली आहे त्या व्याजानें सोसायटीकडून सदर रकमेची भरपाई करून घ्यावी.

(२६ अ) पुष्कळदां म्युनिसिपल अधिकारी व नोकर यांना वाहनें खरेदी करण्यासाठीं अॅडव्हान्स म्हणून रकमा देण्यांत आलेल्या आहेत. सरकार ठराव जनरल डिपार्टमेंट नं. एस. ९१–६४ तारीख ४ नोव्हेंबर १९३० अन्वयें मंजूर झालेल्या म्युनिसिपल नियमांप्रमाणें अशा तऱ्हेच्या अॅडव्हान्स रकमा डेव्होल्यूशन रूल ३७ ई खालीं फायनॅनशिअल रूलसच्या १३ व्या विभागांत सांगितल्याप्रमाणें देण्याव हव्या. यांतील नियम २९८ अ प्रमाणें या रकमांवर व्याजही आकारणें जरूर आहे. तथापि अशा तऱ्हेनें रकमांवर म्यु. नें व्याज आकारल्याचें दिसत नाहीं. ज्यांना रकमा देण्यांत आल्या होत्या अशा सर्व लोकांकडून त्यांचे रकमाप्रमाणें व्याज आकारुन तें वसूल करावें. या अडव्हान्स रकमांना मे. स्टँडिंग कमिटीनें मंजुरी दिलेली आहे. पण वास्तविक पाहतां ही मंजुरी देण्याचा अधिकार नियम नंबर ३ प्रमाणें म्युनिसिपालिटीचा आहे म्हणुन मे. जनरल कमिटीची मंजुरी या अडव्हान्स दिलेल्या रकमांचे खर्चीस घ्यावी. एका बाबतींत तर अडव्हान्स घर बांधण्यासाठीं म्हणून दिलेला असल्याचें दिसून आलें. घरें बांधण्यासाठीं अडव्हान्स देण्यास नियमांचा पाठिंबा नसल्यामुळें यापुढें अशा कामासाठीं अडव्हान्स देण्यांत येऊं नये. या अडव्हान्स दिलेल्या रकमेची वसूल होण्याची शिल्लक राहिलेली बाकी तांतडीनें वसूल करावी.

पॅरा नं. २६ अ.

वाहनें खरेदी करण्यासाठीं देण्यांत आलेल्या अॅडव्हान्स रकमांवर व्याजाची आकारणी करण्यांत येते ती कर्जाची रकम पूर्णपणें फेडल्यावर सरतेशेवटीं हप्त्याचे वेळीं करण्यांत येते. व्याजाची वसुली पैसे देण्यांत आलेल्या सर्व बाबतींत करण्यांत आलेली आहे. १९३३ च्या साल सुरवातीपासून अशा प्रत्येक बाबींत मे. जनरल कमिटीची मंजुरी घेण्यांत येत आहे. घर बांधण्यासाठीं अॅडव्हान्स दिलेली रकम व्याजासह पूर्वीच वसूल झालेली आहे.

(ब) म्युनिसिपालिटीनें लावलेल्या फिर्यादी चालविण्यास खर्चाकरितां वकील लोकांना वेळोवेळीं रकमा दिलेल्या असून दोन दोन तीन तीन वर्षें झालीं तरी अजून त्यांजकडून हिशेब येत नाहींत. त्यांना म्युनिसिपालिटीकडून पैसे मिळावयाचे असल्यास कदाचित् त्या रकमांचा हिशेब देण्यास ते दिरंगाई करीत असावेत व कदाचित् त्यांनीं आपले खर्चाबद्दल पैसे वळतेही करून घेतले असण्याचाही पण संभव आहे. हें गैर आहे. वकील लोकांना अडव्हान्स दिलेल्या सर्व प्रकरणांचे बाबतींत कसोशीनें चौकशी करून वकील लोकांकडून त्यांच्या मागण्या दर्शविणारीं बिलें घेऊन नंतर पैशांचे हिशेब मिटविण्याची व्यवस्था करावी.

पॅरा २६ ब.

वकील लोकांना देण्यांत आलेल्या अॅडव्हान्स रकमांची भरपाई बहुतेक करण्यांत आलेली आहे। अडव्हान्स रु. २५१ चा हिशेब लौकरच करण्यांत येईल.

(क) म्युनिसिपालिटीनें ठेवलेलें अडव्हान्स रजिष्टर जितकें काळजीपूर्वक ठेवावयास पाहिजे तसें ठेवलें नाहीं हें दिसून आलें. हें अॅडव्हान्स रजिष्टर म्हणजे लाखांवरी उलाढालीचें, अनेक लोकांचे देणें घेण्याचें हिशेब असलेलें, पुष्कळवेळा तर कित्येक म्युनिसिपल नोकरांचेही हिशेब देणें घेणीं त्यांत लिहिलेलें टिपण असल्यामुळें फारच महत्वाचें आहे. वसूल केलेल्या रकमांच्या नोंदी मे. अकौंटंट यांनीं तपासून पाहून बरोबर असल्याबद्दल त्यांवर आपली सही केलेली नव्हती. त्याचप्रमाणें पैशांची वळतावळत केल्यामुळें जे हिशेब लिहिण्यांत आले त्या वळतावळतीच्या व्यवहारासंबंधींच्या नोंद्यावरून कोणाही अधिकाऱ्याची सही केलेली नव्हती. यापुढें अशे कोष्ठकीं लिहिण्याच्या मजकुरावर मे. अकौंटंट यांनीं सही करण्याचा परिपाठ ठेवावा.

पॅरा २६ क.

अडव्हान्स रजिष्टर पद्धतशीर ठेवण्यांत आलेलें आहे. तें काळजीपूर्वक आणखी कसें ठेवावयाचें तें समजत नाहीं. भरपाई झालेल्या रकमांवर सह्या करण्यांत आलेल्या आहेत. व नकी राहिलेल्या बाक्या वर्ष अखेर लिहिण्यांत येऊन पुढील सालसुरवातीसह लिहिल्या आहेत. अडव्हान्स रजिस्टर कोणीतरी कारकुनानें लिहिलेलें नसून डेपुटी आकौंटंट तें लिहितात व मे. आकौंटंट तें तपासतात.

(२७) (अ) प्राव्हिडंटफंडांतून कामगारांना कर्ज भरपूर देण्यांत आलें. प्रस्तुत अमलांत असलेले नियमान्वयें असें कर्ज देतां येत नाहीं. या कर्जमंजुरीकरितां आधार म्हणून प्राव्हिडंट फंड

पॅरा २७ अ.

प्राव्हिडंट फंडाचे नियमांपैकीं नियम नंबर ११ (१) हा पुढीलप्रमाणें आहे.

नियमांचा ११ वा नियम दाखविण्यांत आला, पण अत्यंत निकडीच्या कारणांखेरीज वांटून दिलेल्या नफ्याच्या हिश्शामधून रकमा कर्जाऊ देतां येत नाहींत. हा नियम हरघडी लागणाऱ्या किरकोळ कर्जासाठीं केलेला नसल्यामुळें अशीं कर्जे मंजूर करतां येत नाहींत. याकरितां यापुढें प्राव्हिडंटफंडाचे रकमेंतून कर्ज देणें एकतर बंद करावें, अगर सध्यां चालू असलेल्या वहिवाटीप्रमाणें नियम तरी बदलून घ्यावेत.

(ब) सांप्रत उपयोगांत असलेला प्राव्हिडंट फंडाच्या कीर्दीचा नमुना सदोष आहे. त्यामध्यें कर्जाऊ देण्यांत आलेल्या रकमा व परत फेड झाल्याच्या रकमांच्या नोंदी करण्यास सोय नाहीं. सरकारी खात्यांतून उपयोगांत असलेला प्राव्हिडंट फंडाच्या कीर्दीचा नमुना जर म्यु. नें उपयोगांत आणला तर प्राव्हिडंट फंडाचे हिशोबांचें काम फारच सुलभ होईल.

(२८) (अ) तारीख १६ मार्च १९३२ रोजीं म्युनिसिपालिटीनें १९३१–३२ चें दुरुस्त अंदाजपत्रक मंजूर झालें, त्यावेळीं मार्च १९३२ अखेर एकूण नक्की व अंदाजी खर्चांचा समावेश त्यामध्यें करण्यांत आलेला होता. असें असूनही कित्येक कामांवरील खर्च अंदाजाबाहेर वाढत गेलेला आढळून आला. या खर्चांचा तपशील हरकतीपत्रकाची बाब १९६ यांत इत्थंभूत दिलेला आहे. अंदाजपत्रकांत खर्चाचा तरतूद नसतांनाही म्यु. नें मुंबई म्युनिसिपल ॲक्टाचे कलमाखालीं केलेला नियम ३१ (ब-१) व ३२ (३) यांना सोडून आकौन्ट खात्यानेंही पण दुरुस्त अंदाजपत्रकांत रकमांची तरतूद करून अगर वाढलेल्या खर्चास जनरल कमिटीची मंजुरी घेण्याचें सोडून बिलें मंजूर केलीं. म्युनिसिपल खर्च आटोक्यांत राखण्याचें जर कोणतें साधन असेल तर, अंदाजपत्रकांतील 'मंजूर रकम' हेंच असतांना मंजूर रकमेपेक्षांही खर्च वाढला तरी अकौन्ट खात्याकडून म्युनिसिपालिटीनें ॲक्टाचें कलम २०९ (२) मध्यें सांगितल्याप्रमाणें अंदाजपत्रकांत दुरुस्ती केल्यावांचून अगर रकम वाढवून दिल्यावांचून बिलें मंजूर करावयास नको होतीं. अंदाजपत्रकांतील तरतुदीपेक्षां वाढलेल्या खर्चास आतां मंजुरी घ्यावी.

(ब) कांहीं कामावर फार मोठ्या रकमा तर कांहीं कामावर अगदीं लहान रकमा खर्च पडल्यावरून अंदाजपत्रक नक्की वस्तुस्थितीशीं मेळ घालून तयार करण्यांत आलें नव्हतें, असें दिसतें. जरूरीपेक्षां कमी रकमांची तरतूद केल्यानें कामांत हरघडी गैरसोय व त्रास पडतो व जरूरीपेक्षां जास्त रकमांचा पुरवठा केल्याकारणानें उधळपट्टीस चालना मिळून विनाकारण खर्च वाढतो, तेव्हां अंदाजपत्रकाची आंखणी करतांना जितकी काळजी व कसोशी घ्यावी तितकी थोडीच होणार आहे.

(२९) नवीन शाळेच्या उद्घाटनसमारंभासाठीं रुपये २९–८–० ची रकम खर्च करण्यांत आली. एकूण सभासदांच्या दोन तृतीयांश इतक्या सभासदांची सदर खर्चास संमति पाहिजे होता. सदर मंजूरी घेण्यांत यावी, अथवा ज्यांच्या हुकुमावरून रकम खर्च पडली त्यांचेकडून रकम वसूल करून घ्यावी.

कामगाराचा पगार जर १०० हून जास्ती असेल तर अगदीं अडचणीच्या प्रसंगीं वाटून दिलेल्या नफ्यांतून १०० रुपयांहून जास्त राहिलेल्या रकमेंतील कोणताही भाग, व जर पगार ५० रुपये अगर त्याहून जास्त असेल तर ५० रुपयापेक्षां जास्त राहिलेल्या रकमेंतील कोणताही हिस्सा म्यु. नें देण्यास हरकत नाहीं.

पॅरा २७ (ब)

सन १९३३–३४ पासून प्रॉव्हिडंट फंडाची कीर्द सरकारी प्राव्हिडंट फंडाच्या नमुन्यांत ठेवण्यांत आली आहे.

पॅरा २८ (अ व ब) दुरुस्त अंदाजपत्रक आक्टोबर महिन्यांत तयार करण्यांत येतें. त्यावेळीं ठरलेल्या पांच महिन्यांत नक्की खर्च किती करावा लागेल याचा नक्की अंदाज लागणें अशक्य असतें. कारण पुष्कळदां आकस्मिक बाबी पुढें येऊन त्यांवर खर्च करावा लागतो. ही जास्त वाढव्याचीं कामें प्रथम मे. स्टॅ. कमिटी मंजूर करते. प्रथम मंजुरी घेण्यांत आलेली नाहीं असा कोणताही खर्च अंदाजपत्रकांतील रकमांचे आवाक्याबाहेर करण्यांत येत नाहीं.

अंदाजपत्रकाचे भाग दोन, ते चालू कामें व नवीन कामें हे होत. चालू कामावर अंदाजपत्रकापेक्षां जास्त रकमा विशेष खर्चीं पडलेल्या नाहींत. फक्त नवीन कामांवरच कायतो कांहीं बाबतींत अंदाजापेक्षां जास्त खर्च झाला. हा वाढलेला खर्च विशेषतः लक्ष्मी रोड टिळकरोड व नवीन नळांचीं कामें यावरून झालेला असून त्यासाठीं रकमा प्लॉट विक्री आणि कर्ज यांतून मिळावयाच्या आहेत. या योजना प्रथमतः म्युनिसिपालिटीनें मंजूर केल्या असून जशी पैशाची सवड असेल त्या मानानें त्यांचीं कामें होतात.

म्युनिसिपालिटीनें वार्षिक जमाखर्चास सरतेशेवटीं मंजुरी दिलेली असल्यामुळें नवीन मंजुरी घेण्याचे कारण आहे असें वाटत नाहीं.

पॅरा २९

म्युनिसिपालिटीनें ठराव नं. ५०२ ता. ३०–१–३० व ठ. नं. २८३ ता. ९–१०–३१ चे करून नवीन धंदे शिक्षणाची शाळा उघडण्याचें ठरविलें व त्या बाबतींत सर्वाधिकार देऊन एक पोट कमिटी नेमली. या पोटकमिटीनें खर्च मंजूर केलेला आहे. म्हणून जनरल कमिटीच्या मंजुरीची आतां जरूरी नाहीं.

(३०) पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक व बँक ऑफ इंडिया यांचेकडून म्युनिसिपालिटीनें घेतलेल्या ओव्हरड्राफ्टवर बँकांस रु. १२३२-१३-० इतकें व्याज दिलें. लोकल अथॉरिटीज लोन्स ॲक्टाखालीं करण्यांत आलेल्या तरतुदीशिवाय अन्य मार्गानें कर्ज घेण्याचा म्युनिसिपालिटीस अखत्यार नसल्यामुळें याबाबत करण्यांत आलेला खर्च हिशेब तपासणीमध्यें मान्य करतां येत नाहीं. ही बाब सरकारकडे कळवून सरकारकडून या झालेल्या खर्चास माफी मिळवून घ्यावी.

पॅरा ३०

ही बाब सरकारकडे कळविण्यांत येऊन सरकारकडून जरूर ती मंजुरी मिळविण्यांत आली आहे.

(३१) हुजूर ऑफिस मधील कारकून रा. वि. वा. जोशी यांना निवडणुकीसंबंधीं काम करण्याकरितां रु. ५८५ ची रकम पोस्टखर्चासाठीं अडव्हान्स म्हणून देण्यांत आली होती. या रकमेचा विनियोग केल्याचे हिशेब ज्या पुस्तकांत लिहिण्यांत आले होते, त्यावर हिशेब ठेवण्याच्या सर्वसाधारण पुस्तकांप्रमाणें नंबर घालण्यांत आलेले नव्हते, कीं म्यु. चा शिक्काहि त्यावर मारलेला नव्हता. बाजूस दिल्याप्रमाणें गट रकमा उतरून दररोजचा खर्च टिपण्यांत आला होता. दररोज झालेल्या खर्चाचा तपशील किंवा किती पत्रांवर पोस्टेज लावलें त्याचा खुलासा मागतां तो मिळाला नाहीं. कदाचित हा तपशील ठेवण्यांत आलेला नसावा. कारकूनानें ठेवलेल्या हिशेबांतील खर्चाच्या नोंदी अगर नोंदीची एकुणात बरोबर असल्याबद्दल मे. चीफ ऑफिसर अगर त्यांचे पर्सनल असिस्टंट यांनीं तपासून सह्या केलेल्या नव्हत्या. तथापि कारकूनानें ठेवलेला हिशेब मान्य करण्यांस येऊन त्यांस देण्यांत आलेल्या अडव्हान्स रकमेचा जमाखर्च करण्यांत आला. हल्लीं सस्पेंड असलेल्या या कारकुनानें इतर पैशांची अफरातफर केल्याचें पाहिले म्हणजे निवडणुकीबाबत खर्चाचे हिशेब त्यानीं ठेविले आहेत ते अविश्वसनीय वाटतात. खर्चाचा तपशील मिळाल्याशिवाय हे हिशेब तपासणीमध्यें मान्य करतां येत नाहींत.

पॅरा ३१

निवडणुकीचें काम म्युनिसिपालिटीस थोड्या अवधींत करावयाचें होतें व तें फार वाढलें होतें. नांवें दाखल करण्याबाबत लोकांना सूचना द्यावयाच्या होत्या वगैरे कामें होतीं. खर्चाच्या रकमेबद्दलचा खर्डा त्यावेळीं तयार करण्यांत आला होता पण आतां तो गहाळ झाला आहे. जरूर ते माहितीचे तक्ते बिलें मंजूर करतांना पडताळून पाहाण्यांत आले होते. बिलें मे. चीफ ऑफिसर यांनींहि पडताळून पाहिलेलीं आहेत. हेडक्लार्क रा. रा. व्ही. व्ही. जोशी हे कांहीं महिन्यापूर्वी निवर्तल्यामुळें सध्यां जास्त पुरावा देण्यास साधन नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते.

(३२) खर्चाचें व्हाउचर नंबर ७८३ प्रमाणें मार्च १९३२ मध्यें रुपये १,०५,८०३-७-८ चा जमाखर्च करून घेण्यांत आला. नगररचना योजनेच्या हद्दींत (टाऊनप्लॅनिंग) करण्यांत आलेले ड्रेनेज व पाणीपुरवठा यांवर झालेला खर्च नगरयोजनेवर घालण्यांत आला. सरकारी जाहीरनामा जनरल डिपार्टमेंट नं. १२२२ तारीख १७-१-१९३१ यांत नगररचनेच्या योजनेच्या खर्चामध्यें ड्रेनेज व पाणीपुरवठा याचा अंतर्भाव केलेला नसल्यामुळें हा खर्च नगररचना योजनेवर घालतां येत नाहीं. म्हणून तो पुन्हां परत घेऊन जमाखर्च लिहावा.

पॅरा ३२

हरकतीकडे लक्ष देण्यांत आलें असून जरूर तो जमाखर्च पुन्हां करून घेण्यांत येत आहे.

३३ (अ) १९३१-३२ सालांत म्युनिसिपालिटीनें जें ड्रेनेजचें काम केलें त्यावर रु. ७७९०० चें ड्रेनेज कर्ज घेण्यांत म्यु. चा जो रु. ८७९० चा तोटा झाला तो खर्ची टाकण्यांत आला आहे. ड्रेनेज योजनेचा खर्च सरकार व म्युनिसिपालिटी यांनीं निम्मा निम्मा सोसावयाचा आहे, तेव्हां म्युनिसिपालिटीस झालेल्या तोट्याचा हिस्सा या खर्चाची वांटणी होण्याच्या रकमेंत लिहूं नये तर तो वजा घालण्यांत यावा.

पॅरा ३३ (अ)

नवीन ड्रेनेजच्या कामावर सन १९३२-३३ सालामध्यें रकम जमेस धरुन जरुर तो जमाखर्च करण्यांत आलेला आहे.

(ब) तसेंच पुष्कळसा मुरुम, माती, दगड वगैरे माल ड्रेनेजसाठीं खोदाई करतांना निघाला तो शहराच्या इतर भागांमध्यें रस्ते रिपेअरीच्या कामासाठीं आणि पर्वतीतळें बुजविण्याकरितां वापरण्यांत आला. ड्रेनेज कामावरील माल म्युनिसिपालिटीच्या कामा-

पॅरा ३३ (ब)

याप्रमाणें तजवीज करीत आहोंत.

साठीं वापरण्यांत आला त्या मालाची किंमत ड्रेनेज कामाच्या खर्चातून वजा करण्यास पाहिजे होती. कारण ड्रेनेज कामाचा खर्च सरकार व म्युनिसिपालिटी यांचे दरम्यान विभागण्यांचा आहे. आम्ही पाठविलेल्या हरकतीपत्रकाच्या ( Objection Statement ) २२६ व्या बाबींत लिहिलेल्या कामांतून वरीलप्रमाणें तजवीज आतां करण्यांत यावी.

( ३४ ) अ. १९२९–३० सालांत २७००० चौरसफूट बांबूचा तट्ट्या खरेदी करण्यांत आला. यापैकीं सालमजकुरी ६६२० चौरस फूट उपयोगांत आणला, २३६० चौरसफूट १९३०–३१ मध्यें व ५०७० चौरसफूट १९३१–३२ मध्यें उपयोगांत आणून उरलेला रु. १६१८४ किंमतीचा १२९५० चौ. फूट तट्ट्या मोडून गेला व निकामी ठरला म्हणून मे. स्टँडिंग कमिटीच्या ठराव नं. २३०६ ता. ३० मार्च १९३२ च्या मंजुरीनें खर्ची टाकण्यांत आला. म्युनिसिपल मालमत्तेचें नुकसान झालें तर म्युनिसिपल मालमत्तेचे पंच या नात्यानें म्यु. चे जनरल बॉडीस त्यांची नुकसानी बाबत योग्य ती काळजी घेतली असतांही नुकसान झालें अशाबद्दल खात्री पटल्यास नुकसानीची रकम खर्ची घालतां येतें. लवकर नाश पावणारा असा पुष्कळसा माल सांठवून ठेवून तो कुजूं दिला यांचें कारण उगमत नाहीं. म्युनिसिपालिटीपुढें मंजुरीसाठीं हा प्रश्न आल्यावर याची कसोशीनें चौकशी होऊन नुकसानीची जबाबदारी कोणावर आहे हें मंजुरी देण्यापूर्वी निश्चित करण्यांत येईल असा भरंवसा वाटतो.

पॅरा ३४ अ

१९२९–३० सालांत भंगी लोकांनीं संप केल्यामुळें हंगामी फ्लशिंग पद्धतीचे पायखाने तयार करण्यासाठीं बांबू तट्टे आणावे लागले. पण सुदैवानें संप तीन दिवसांहून जास्त टिकला नाहीं. ही गोष्ट चौकशी अंतीं हिशेब तपासनीस यांना समजून आली असती. ह्या तट्ट्यांचा शक्य तेवढा कसोशीनें उपयोग करण्यांत आल्यानंतर तट्ट्याबाबत रकम मार्फीत टाकण्याखेरीज दुसरें गत्यंतर नव्हतें. पायखान्यासाठीं आडोसा म्हणून कांहीं वेळ उपयोग करूनसुद्धां तट्ट्यासारख्या मालाची नाशवंत परिस्थिती लक्षांत घेतां मे. स्टँडिंग कमिटीनें केलेली गोष्ट योग्यच झाली. तथापि मे. एक्झामिनरसाहेब यांनीं कळविल्याप्रमाणें प्रकरण म्युनिसिपालिटीपुढें ठेवीत आहोंत.

( ब ) त्याचप्रमाणें मे. स्टँडिंग कमिटीनें ठराव नंबर २३०७ ता. ३० मार्च १९३२ चा करून ३३८५ विटांची मोडतोड झाली म्हणून रु. ८१–८–० ही रकम खर्ची टाकली. बाबतीपेक्षां फाजील मोडतोड कां झाली याची चौकशी करून मे. जनरल कमिटीची मंजुरी या खर्चास घेण्यांत यावी.

पॅरा ३४ ब.

सन १९२९–३० मध्यें कोठीखात्यानें एकंदर १७९००० विटा खरेदी केल्या. त्यांतल्या ३३८५ विटांची फूटतूट झाली. फूटतूट झालेल्या विटांचें प्रमाण शेंकडा २ इतकें पडलें. माल किती हाताळला गेला हें पाहिलें म्हणजे फूटतुटीचें प्रमाण कमीच पडलेलें आहे. तथापि मे. एक्झामिनर यांनीं कळविल्याप्रमाणें म्युनिसिपालिटीपुढें हा प्रश्न विचारासाठीं ठेवीत आहोंत.

( ३५ ) म्यु. नें विकत घेतलेल्या पुस्तकांचा हिशेब पाहातां असें आढळून आलें कीं, मुंबई बरो म्युनिसिपल ॲक्टाच्या ५१ प्रति म्यु. च्या ५० सभासदांस वाटण्यांत आला. या पन्नास सभासदांपैकीं २९ सभासद पुनः निवडून आले होते, व त्यांना मागील अमदानींत कायद्याच्या पुस्तकांच्या प्रति देण्यांत आलेल्या होत्या. मे. पर्सनल असिस्टंट टु दी चीफ ऑफिसर यांना विचारतां, त्यांनीं सांगितलें कीं, सभासदांकडून पुस्तकें हरवल्यामुळें अगर सांडल्यामुळें नवीन प्रति द्याव्या लागल्या. म्युनिसिपल सभासदांना अशा रीतीनें मोफत पुस्तकें देणें वास्तविक योग्य नाहीं. विशेषतः एकदां पुस्तकें दिलीं गेलीं होतीं, तेव्हां त्यांजकडून पुस्तकांची किंमत मागून घेण्यास कांहीं हरकत आहे असें वाटत नाहीं. ज्या सभासदांनीं एकदां दिलेल्या पुस्तकाच्या प्रति हरवल्या त्यांच्याकडून प्रति पुन्हा त्यांना देण्यांत आल्या म्हणून किंमत वसूल करावी कीं नाहीं याचा जरूर विचार करावयास पाहिजे.

पॅरा नं. ३५

बरोज ॲक्टाच्या प्रति आजपर्यंतच्या वहिवाटीस अनुसरून सभासदांना वाटण्यांत आल्या. म्युनिसिपल कारभार सुव्यवस्थित रीतीनें व सूज्ञपणानें चालण्याचें कामीं यामुळें उपयोग होणार असतांना याकामीं जो खर्च झाला त्याबाबत वास्तविक हरकतीचें कांहीं कारण दिसत नाहीं. म्युनिसिपालिटींत पुन्हां निवडून आलेले सभासदांचे दर त्रैवार्षिक मुदतीनंतर सभासदत्व संपते. त्यामुळें निवडणुकीनंतर ते नवनिच निवडलेले समजले पाहिजेत. नवीन सभा अस्तित्वांत येतांना सभासदांना पुस्तकांचा पुरवठा करणें हें अगदीं वाजवी आहे.

३६ ( अ ) निवडणुकीकरितां ४५०० रुपयांची तरतूद अंदाज पत्रकांत करण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष खर्च रु. ८४६९–६–० झाला. जास्त खर्च झाला त्याला मंजुरी घेतली नाहीं. स्टेशनरी व छापखान्यार यांकरितां निवडणुकीचे दिवशीं

पॅरा नं. ३६ अ.

अंदाजपत्रकांत मंजुरी दिली त्याखेरीज जो जास्त खर्च झाला त्याला वार्षिक जमाखर्चाच्या ताळेबंदाबरोबरच ठराव नं. ८७ ता. ६–५–१९३२ नें मंजुरी देण्यांत आली आहे.

पोलिंग स्टेशनांकडून देण्यांत आलेल्या जिनसांची किंमत जवळजवळ हजार रुपयांच्या घरांत आली. पोलिंग स्टेशनांवरून स्टेशनरी दिली त्याचा तपशील ठेवलेला नाहीं. टिकाऊ स्वरूपाच्या जिनसा एकदां दिल्यावर त्या परत येतात कीं, नाहीं, या गोष्टीकडे लक्ष देण्यांत आलेलें नव्हतें.

खालीं दिलेल्या वस्तु हरवल्याचें आढळून आलें:—

| नगाचें नांव | नगसंख्या | किंमत रु. |
|---|---|---|
| १ काम्या | २४ | १२—०—० |
| २ चाकू | ५० | १६—११—० |
| ३ टोचे | ३० | ६—४—० |
| ४ फायलींचे पुठे | १३६ | ६८—०—० |
| ५ शिक्यांच्या पॅड पेट्या | ५७ | १७—०—० |
| ६ रबरी शिक्के | ५० | २०—०—० |
| ६अ दिवे | २१ | २६—४—० |
| ७ कुलपें | १०० | ७५—०—० |
| ८ कागद ठेवण्याच्या टोपल्या | ७ | १०—८—० |
| | एकूण | २५१—११—० |

पॅरा ३६ (अ)

निवडणुकीच्या दिवशीं निकडीची मागणी आल्यामुळें जरूरी-प्रमाणें स्टोअर खात्यानें स्टेशनरी दिली. निवडणुकीचा दिवस हा म्युनिसिपल कारभारामध्यें अत्यंत धामधुमीचा दिवस असल्यामुळें गर्दींत मागणीपत्रकावर मागणी लिहून घेण्याचें राहून गेलें. तथापि या बाबतींत पुरा व बरोबर हिशेब ठेवण्यांत आला असून तो पुढील हिशेब तपासणीचे वेळीं हिशेब तपासनिसांना दाखविण्यांत येईल.

हे जिन्नस हरवले त्याबद्दल जबाबदार कोण होते याची चौकशी केल्याचें दिसत नाहीं. या बाबतींत चौकशी करून नंतर जनरल बोर्डाचे मंजुरीनें ही रक्कम खर्ची टाकण्यांत यावी.

(ब) वर नमूद केलेल्या वस्तूंखेरीज मांडव घालण्यासाठीं म्हणून खालीं दिलेले जिन्नस उपयोगांत आणले होते:—

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| (१) | ४०० बारीक बांबू ... | ३७—८—० |
| (२) | ७२४ तारापुरी बांबू ... | १४५—०—० |
| (३) | कळक काठ्या (मरीव) ... | ४८—८—० |
| (४) | ३०० वार खादी ... | १३१—४—० |
| | एकूण... | ३६२—४—० |

पॅरा (३६ ब) म्युनिसिपालिटीकडून जे मंडप उभारण्यांत आले त्यांचेकरितां हें सामान उपयोगांत आणलेलें आहे. एकदां उपयोग केलेल्या या सामानाची किंमत पूर्वीइतकी राहिली नाहीं. या सामानाचा लिलांव एकदां तारीख १५–२–३३ रोजीं करण्याचें ठरविलें होतें पण कोणीही लिलावासाठीं आलें नाहीं. तथापि पुन्हां त्याचा लिलांव करण्यांत येईल.

मांडव सोडल्यावर या मालाचें काय झालें, हें कळणें जरूर आहे. जर हे जिन्नस कोठीकडे परत केलें असतील तर त्यांचा लिलांव करून टाकणें जरूर आहे. नाहीं तर ठेवणीमुळें ते निकामी व्हावयाचे.

(३७) म्युनिसिपल नोकरीमध्यें इसम असतांना जर तो मयत झाला तर त्याच्या वारसांना ग्रॅच्युइटी देण्यांत यावी, अशाबद्दल सरकार ठराव जनरल डिपार्टमेंट नं. एस्. ९१ (६४) तारीख १५ डिसेंबर १९३१ नें नियम मंजूर केलेला आहे. या नियमाची अंमलबजावणी नियम मंजुरीच्या तारखेपूर्वीपासून करण्याबद्दल ठरावांत उल्लेख नसल्यामुळें ठरावाचे तारखेपासून म्हणजे १५ डिसेंबर १९३१ पासूनच तो अंमलांत यावयास पाहिजे. असें असतांना नियम मंजूर होण्यापूर्वी रु. ११०४–१०–६ इतकी रक्कम ग्रॅच्युईटी दाखल खर्च करण्यांत आली. हा खर्च तपासणीमध्यें मान्य करतां येत नाहीं. बेकायदां झालेला हा खर्च एक तर परत वसूल करावा अगर मागील तारखेपासून ठरावाची अंमलबजावणी करण्यास मंजुरी आणवावी.

पॅरा ३७

सरकारनें तूर्त ग्रॅच्युइटीबद्दलचा नियम रद्द केला आहे. या वेळेस म्यु. ॲक्ट सन १९२५ चा १८ वा याचें ५८ वें कलम दुरुस्त करण्याचा प्रश्न विचारांत असून सरकारनें मागाहून ५८ अ हें कलम म्यु. ॲक्टांत सामील केलें. या कलमामुळें म्यु. चा मूळचा ग्रॅच्युईटीबाबतचा नियम कायम ठरला. यावरून या बाबतींत म्यु. चा नियम सरकारनें कायमचा रद्द केलेला नव्हता असें दिसून येईल. सरकारनें नियम बदलणार असल्याबद्दल स्पष्ट कळविलें होतें. अशा परिस्थितींत संबंध असणारे इसमांकडून पैसे परत वसूल करणें गैर व अवास्तविक होणार आहे.

(३८) शहरांतील मिळकतींच्या गहाणाच्या तारणांवर घरमालकांना म्यु. ॲक्टाचें कलम १९४ पोट कलम अ च्या आधारावर फ्लशिंगचे पायखान्याकरितां कर्जाऊ रकमा दिल्या जातात. या कर्जाची फेड दरमहा हप्त्यांनी तीन ते चार वर्षांचे अवधींत करावयाची असते. गहाणखतामध्यें लिहून दिल्याप्रमाणें वेळचेवेळीं हप्त्यांच्या रकमा कर्ज घेणारांनीं भरल्या नसूनही त्यांजवर फिर्यादी करण्यांत आल्या नाहींत. तारीख ३१ मार्च १९३२ रोजीं याप्रमाणें कर्जाऊ दिलेली रक्कम रु. ६९०० इतकी कर्जदाराकडे तुंबली होती. कर्जाची परत फेड होण्याच्या रकमांपैकीं कांहीं रकमा तर १९२९ सालांत कर्ज दिलें होतें, त्याबाबत आहेत.

(ब) कलम १९४ ( १ ) अ खालीं घरमालकांना देण्यांत आलेल्या मदतीबाबत रक्कम वसूल करतां आली नाहीं तर घरांतील भाडेकऱ्याकडून रक्कम वसूल करण्याचा अधिकार कलम १९४ (२) प्रमाणें म्युनिसिपालिटीस पोहोंचतो. या विषयीं चौकशी करतां गहाणखतामध्यें अशा तऱ्हेच्या अटींच्या अभावामुळें कायद्यामध्यें सांगितल्याप्रमाणें तजवीज करण्यास अडचण पडते, असा खुलासा मिळाला. दिवाणी दावे लावून रक्कम वसूल करण्याची यातायात करण्यापेक्षां इतःपर ऋणकोकडून लिहून घेण्याचें करारपत्रकांतच योग्य ती दुरुस्ती करावी अशी सूचना आहे.

पॅरा ३८

माहे मार्च १९३२ अखेर येणें असलेल्या रु. ६९०० इतक्या बाकीपैकीं रु. ३९०० रक्कम वसूल करण्यांत आलेली आहे हें सोबत जोडलेल्या पत्रावरून कळून येईल. वसूल व्हावयाची राहिलेली रक्कम यथावकाश वसूल करण्यांत येत आहे. सन १९२९–३० मध्यें देण्यांत आलेल्या अडव्हान्स रकमांची परत फेड सन १९३२–३३ मध्यें पूर्णत्वानें करण्यांत आलेली आहे.

पॅरा ३८ ब.

मे. सरकारी तपासनीस यांची सूचना यापुढें अंमलांत येईल. मे. तपासनीस यांनी सुचविल्याप्रमाणें तजवीज करण्याबाबत कांहीं अडचणी मे. म्यु. वकील यांना कळविल्या होत्या. सदरबद्दल त्यांनी दिलेल्या अभिप्रायाची नक्कल या सोबत माहितीसाठीं जोडली आहे. ( परिशिष्ट पहा. )

(३९) ऑब्जेक्शन स्टेटमेंटमधील १२४ वी बाब पहातां असें आढळून येईल कीं, वेगवेगळ्या सहा घरांना ड्रेनेज घरजोड दिल्याबद्दल घरमालकांकडून एकूण रुपये २५९३८११८३ म्यु. स यावयाची होती. ही म्यु. स येणें असलेली रक्कम मे. स्टॅं. क. नें ठ. नं. १८१४ व २०२८ अनुक्रमें तारखा ११ जानेवारी १९३२ व १८ फेब्रुवारी १९३२ चे करून रकमांची वसूली होण्यासारखी नाहीं म्हणून माफींत टाकली. या बाबतींत कागदपत्र पाहतां या घरजोडांबद्दल घरमालकांची मागणीही नव्हती. घर मालकांनीं काम केलें नाहीं म्हणून म्यु. ॲ. कलम १९२ (५) प्रमाणें म्यु. नें काम करून दिलेलें नव्हतें. घरजोडांचे काम मे. अध्यक्ष साहेब यांचें पत्र नं. १६७५ तारीख ६–७–१९२८ प्रमाणें मे. एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर यांचेकडून करण्यांत आलें होतें. हा खर्च कोणी द्यावयाचा याचा निकाल लावण्यासाठीं मे. म्यु. वकील यांचा कायदेशीर सल्ला मागितला असतां घरमालकांकडून रकम वसूल करून घेतां येणार नाहीं असें त्यांनीं कळविलें. ज्यांच्या हुकुमावरून हीं कामें करण्यांत आलीं, त्यांनीं खर्चाची रकम वसूल करण्याबाबत जरूर ती खात्री पटवून घेतल्यावांचून जें खाजगी काम करवून घेतलें त्यास म्यु. च्या या झालेल्या या तोट्याबद्दल जबाबदार कां धरूं नये याचा खुलासा करावा.

पॅरा ३९—मे. एक्झीक्युटिव्ह इंजिनियर पुर्ण ड्रेनेज कंस्ट्रक्शन यांचेकडून ड्रेनेज लाइनी घालण्याचें काम चालूं असतांनाच सदर भागांतील वस्तींत अनारोग्यता राहूं नये म्हणून त्या कामाबरोबरच जादा घरजोडाचें काम करण्याचें हातीं घेण्याचें इष्ट वाटलें. त्यामुळें होणारी आरोग्य सुधारणा आणि म्यु. उत्पन्नांत वाढ लक्षांत घेऊन मे. ए. इं. यांनींही पण ही जादा घरजोडींचीं कामें तांतडीनें केलीं. या कामीं कायदेशीरपणाला बाध येणार नाहीं अशी तजवीज करण्याची शक्य तों काळजी घेण्यांत येईल. एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन मे. स्टॅंडिंग कमिटीनें हरकतींत दर्शविलेल्या रकमेचा जमाखर्च करण्यास परवानगी दिली.

( ४० ) स्टेबल इन्स्पेक्टर यांनी ठेविलेल्या रजिस्टराप्रमाणें आरोग्यखात्याकडील कचरा वाहतुकीसाठीं उपयोग केलेल्या बैलांची संख्या, अडजस्टमेंट ( जमाखर्चाच्या ) शिलकांप्रमाणें महिनेवार आरोग्यखात्याकडे खर्ची टाकलेल्या संख्येशीं जमत नाहीं. याचा मासला म्हणून एप्रील १९३१ या महिन्याचे तफावतविषयीचा तपशील पुढें दिल्याप्रमाणें आहे.

पॅरा ( ४० )

ऑडिट नोटमध्यें दर्शविलेले आकडे मार्च १९३१ बद्दलचे असावेत, एप्रिल १९३१ बद्दल नव्हे असें दिसतें. मे. विशेष तपासनीस यांनीं सुचविल्याप्रमाणें अगदीं काटेतोलपणानें कामाची विभागणी करण्यास अडचण आहे. कामास असणाऱ्या एकूण १०९८० बैलजोड्यांचे दिवसांत ११३ बैलजोड्याच काय त्या कामावांचून बसून होत्या. याबाबतींत आंकडा शक्य तेवढा कमी राहील याबद्दल शक्य तेवढी खबरदारी घेण्यांत येईल.

| तारीख. | दररोज रु.१-१०-० प्रमाणें आरोग्य खात्याकडे खर्ची टाकलेल्या बैलजोड्या. | स्टेबल इन्स्पेक्टरचें रजिस्टरप्रमाणें आरोग्य-खात्याकडील गाडी-वानांनीं प्रत्यक्ष उपयोगांत आणिलेल्या बैलजोड्या. | तफावत. |
|---|---|---|---|
| १ | | २८ | २ |
| २ | | २९ | १ |
| ४ | | २१ | ९ |
| ५ | दर दिवशीं ३० | २४ | ६ |
| ६ | | २३ | ७ |
| ८ | | २८ | २ |
| १० | | २८ | २ |
| २१ | | २२ | ८ |
| | | एकूण तफावत.... | ३७ |

यावरून असें दिसून येईल कीं, आरोग्यखात्याकडे प्रत्यक्ष उपयोग करण्यांत आला नसतांनाही ३७ बैलजोड्यांचा रुपये ६०-२-० इतका खर्च या खात्यावर घालण्यांत आला. अशा तऱ्हेचा खर्च दर महिन्यांत चालू होता. याबाबतींत चौकशी केली तेव्हां असें सांगण्यांत आलें कीं, आरोग्यखात्याकडे देण्यांत आलेल्या जोड्या कित्येकदां गाडीवाले कामावर आले नसले म्हणजे उपयोगांत येत नसत. गैरहजर राहाणारे गाडीवानांस गैरहजेरीचा पगार देण्यांत येत नसे, व त्यांचे खाडेही मांडले जात. गाडीवाला एक दिवस कामावर न आल्यामुळें म्युनिसिपालिटीस बैलास खाणें घालणें वगैरेबद्दल रु. १॥ इतका विनाकारण खर्च आला हें पाहिलें म्हणजे हल्लीं इतके बैल कामास ठेवण्याची कितपत जरूरी आहे हा प्रश्न पुढें उभा राहातो. खाडे करणाऱ्या गाडीवाल्यांचें काम करण्याकरितां एकदोन गाडीवाले जास्त ठेवावे. बैलजोडी कामाशिवाय विनाकारण बसवून ठेवण्यापेक्षां खर्चाचे दृष्टीनें एक गाडीवाला जास्त ठेवलेला पत्करला.

(४१) म्युनिसिपालिटीच्या बऱ्याच मोटारी असून त्यांचा अपघातासंबंधीं विमा उतरलेला आहे. विम्याचे हप्त्याबद्दल म्यु. दरसाल दोनहजार रुपयांवर रक्कम खर्च करीत असून गेल्या दोन तीन वर्षांत विमाकंपनीकडून अपघातांत मोटारी मोडल्या असतांही नुकसान भरपाईची मागणी केल्याचें पाहण्यांत नाहीं. नुकसान भरपाई मिळण्याइतके मोटारींना अपघात झाले नसावेत हें संभवत नाहीं. मार्च १९३२ मधील व्हाउचर नंबर ५४९ प्रमाणें अपघातांत मोटारीस इजा झाली म्हणून रु. १०९० चे मोटारीचे सुटे भाग विकत घेण्यांत आल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. हिशेब तपासणी चालू असतांना सदर अपघाताबद्दल विमाकंपनीकडे नुकसान भरपाईची मागणी केली होती किंवा नाहीं, याबद्दल तपास केला पण तिला उत्तर मिळालें नाहीं. याबाबतींत चौकशी करावयास हवी. मोटारीचें नुकसान झालें असतां विमाकंपनीकडे नुकसान भरपाई मुळींच मागितली जात नाहीं यावरून म्युनिसिपल मोटारींना नुकसान मागण्याइतक्या भयंकर स्वरूपाचे अपघात होत नाहींत ही गोष्ट उघड होते. असें असतांना

४१. विमापत्रकांत नमूद केलेल्या अटींस अनुसरून विमा-कंपनी ही पन्नास रुपयेपेक्षां कमी झालेल्या नुकसानीस जबाबदार नाहीं, पन्नास रुपयांहून जास्त तोटा झाला तरच कंपनीकडून तो मागतां येणार आहे. आतांपर्यंत दोन अपघात झाले व त्याबाबत रु. १३९-०-३ व रु. ३६०-१२-० इतके विमाकंपनीकडून वसूल करण्यांत आले आहेत. अपघातांत जाया झालेल्या लॉरीसाठीं सुटे भाग आणण्याकरितां खर्च झाला तो लक्षांत घेऊन मे. हिशेब तपासनीस यांनीं हरकत काढलेली आहे. त्यांनीं जर या बाबतींत जरूर तो पत्रव्यवहार मागविला असतां तर हरकतीची कांहीं जरुरी उरली नसती. मे. हिशेबतपासनीस यांची वेगळा विमाफंड ठेवण्याबाबत सूचना अवास्तव वाटते. कारण मोटार अपघाताचे विम्यांत तिऱ्हाईत व्यक्तींची हमी ही पण येतेच.

म्युनिसिपालिटी दरसाल २००० रुपये मोटारींचे विमे उतरण्याप्रीत्यर्थ खर्च करते हें किती श्रेयस्कर आहे याचा विचार करणें अगत्याचें आहे. या कामीं म्युनिसिपालिटीनें स्वतःचा एक विमा फंड ठेवला तर तें कितपत काटकसरीचें होईल हीही गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे.

## ११. कोठीखात्याकडील हिशेब.

४२ (अ) म्युनिसिपालिटीच्या वेगवेगळ्या खात्यांना लागणारा माल विकत घेणें व पुरविणें या कामासाठीं म्युनिसिपालिटीचें एक स्वतंत्र खातें आहे. सालोसाल माल खरेदी व वांटणी यांवर दोन लाखांवर खर्च होत असतो. विकत घेतलेला माल नाका नंबर ५ वरील कोठीवर, कांहीं गणेश पेठेंत तर कांहीं स्टोअर कीपरकडे म्युनिसिपल कचेरीमध्यें सांठविण्यांत येतो. हजारावारी नग सांठविले असतां माल किती शिल्लक आहे. ह्याची तपासणी केल्याचें दिसून आलें नाहीं. ही गोष्ट हिशेब तपासणीमध्यें नमूद केल्यावर मे. चीफ ऑफिसर यांनीं ड्रेनेज स्टोअरकडील माल तपासून घेण्याची तजवीज केली. याप्रमाणें कोठीकडील सर्व मालाची तपासणी होऊन, पुस्तकांत नमूद असलेल्या मालाच्या संख्येबरोबर प्रत्यक्ष शिल्लक असलेला माल किती भरतो हें पाहण्याची तजवीज करावी.

४२ अ. ड्रेनेज कामावरून व हल्लीं पाणीपुरवठ्याकरितां लागणारा माल एवढाच काय तो जास्त माल म्यु. टी आपलेजवळ कामाकरितां ठेवते. माल टेंडर घेणारांचेकडून जसा जरूर लागेल तसा आणविण्यांत येत असतो. म्यु.स जवळ सांठवावा लागत नाहीं. असें आहे तरी शिल्लक असणारे मालाचा पडताळा प्रत्यक्ष जागेवर असणाऱ्या मालाशीं घेण्याचें काम चालूं आहे.

(ब) हरकती पत्रकामधील ११८ वी मधील बाब पाहिली तर कंत्राटदारांस देण्यांत आलेल्या मालांतून त्यांनीं पनेलें व खरी बुर्चे ( दट्टे ) किंमत अदमासें रुपये २५५८१२ चे परत केलें ही गोष्ट मे १९३२ मध्यें केलेल्या नोटीशींतील तपशिलावरून दिसून येते. परंतु कंत्राटदारांकडून परत आलेला माल जमेच्या कीर्दीमध्यें जमेस घेतल्याचें निदर्शनास आलें नाहीं. हरकती पत्रकांतील बाब ११९ पाहिली तर नोटीशींमध्यें लिहिल्याप्रमाणें इतर सात कंत्राटदारांकडून जवळ जवळ ७२३ रुपये किंमतीचा माल त्यांस देण्यांत आलेला, अगदीं हिशेब तपासणी चालूं होती त्या वेळेपर्यंत परत आलेला नव्हता. खरी बुर्चे व पेनेले यासेरीज सुमारें ९८६ रुपये किंमतीचा इतर जातीचा माल कंत्राटदारांकडे पडून होता. ही गोष्ट हरकती पत्रकांत बाब नंबर १२० यांत नमूद केलेली आहे. रु. २५५-१२-७ चा माल कंत्राटदारांकडून परत आलेला असून त्याचा जमाखर्च अजून पुढें आलेला नाहीं. कामें होऊन गेलीं, तरी कंत्राटदारांकडून अजून रुपये १७०९ किंमतीचा माल यावयाचा राहिलेलाच आहे. हा माल परत मागून घेण्यांत कालापव्यय कां होत आहे, याची चौकशी करावयास पाहिजे.

( क ) यावरून असें दिसून येईल कीं, वाजवीपेक्षां कंत्राटदारांस मालाचा फाजील पुरवठा गटावारीनें करण्यांत आला असून गरजेपेक्षां जास्त माल देण्यांत आला, तो कंत्राटदाराकडून तांतडीनें परत घेण्याकडे लक्ष दिल्याचें दिसत नाहीं. एका कंत्राटदाराकडे तर रु. ५४६-८-२ किंमतीचा माल बिन उपयोग शिल्लक राहिलेला होता. हरकतीपत्रकांतील १२१ व १२२ नंबरच्या बाबी पाहिल्यास अशा तऱ्हेनें शिल्लक राहिलेला माल १२ कंत्राटदारांकडे असल्याचें आढळून येईल.

४२ ब व क. हरकती पत्रकांतील बाबी नंबर ११८ व १२२ यांस उत्तरें दिलीं आहेत त्यावरून मालाची जमा ड्रेनेज खतावणीस घेतलेली आहे असें कळून येईल. ही जमेची नोंद नजरचुकीमुळें करावयाची राहिली होती. सामान शिल्लक ठेवणारे बरेचसे कंत्राटदार हे १९३२-३३ मध्येंही कामें करीत होते त्यामुळें त्यांचेजवळ शिल्लक असलेल्या मालाचा कायम जमाखर्च आदिटचें वर्षांत करण्यास अडचण होती. तथापि ड्रेनेज कामें आतां संपुष्टांत येत आहेत व त्याप्रमाणें अखेरचे जमाखर्चेही पण मालाबाबत पुरे करण्यांत येत आहेत. हरकती पत्रकांतील ११८ ते १२२ च्या बाबतींत नमूद करण्यांत आलेल्या रु. २५११-४-९ किंमतीच्या मालाची परत. मे. टाऊन प्लॅनिंग इंजिनियर यांचेकडे वसुलीसाठीं सोंपविण्यांत आलेली असून जरूर ती भरपाई त्यांचेकडून भांबुर्ड्यांतील इतर ड्रेनेज कामावरोबर चालूं सालांत व्हावयाची आहे. रु. ७६४ किंमतीच्या मालाची परत जमा अगर जमाखर्च करण्यांत आलेला असून आणखी रुपये ७६४ इतके किंमतीच्या मालाचा हिशेब लौकरच दाखविण्यांत येत आहे. व जरूर तेथें वर्ष अखेरपर्यंत कंत्राटदारांकडून वसूल करण्यांत येणार आहे. कंत्राटदारांचेकडून जर रकम आली नाहीं तर ती त्यांच्या डिपॉझिटमधून अगर बिलांतून वसूल करण्यांत येईल.

## हरकत

( ड ) जरूरीपेक्षां जादा माल देण्यांत आला तसाच जरूरीपेक्षां जादा माल खरेदी करून तो शिल्लकी ठेवण्यांत आल्याचेंही पण दिसून आलें. १९३०–३१ सालांत अगर तत्पूर्वी खरेदी केलेला कांहीं माल १९३१–३२ साल संपलें तरी उपयोगांत आला नाहीं, हें शिल्लकी मालाच्या खालीं दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल.

| मालाचें नांव. | १९३०–३१ अखेर शिल्लकी नग. | १९३१–३२ मध्यें कामास आलेले नग. | १९३१–३२ अखेर शिल्लकी नग. |
|---|---|---|---|
| टेपर्ड पाईप .... .... | ४८ | ० | ४८ |
| ७″ × ७″ टी .... ... | १७ | ० | १७ |
| ७″ × ४″ टी .... ... | १५१ | ० | १५१ |
| ६″ × ४″ टी .... ... | ६९ | २ | ६७ |
| १२″ × ४″ टी .... ... | २४ | ० | २४ |
| सॅडल पीस १२″ .... .... | ६१ | ८ | ५३ |
| मुतारी भांडीं .... .... | १५ | ० | १५ |
| ड्रूप पाईप ६″ ... ... | ७१ | ११ | ६० |
| सॅडल पीसेस ७″ .... ... | १६३ | ९३ | १६९ |
| सदर १९३१–३२ सालांतील खरेदी ... | ९९ | ... | ... |
| वादोळे गली ट्रूप ... ... | १६२ | ९२ | ७० |
| तीन तोंडी ट्रूप ... ... | ४३६ | ५ | ४३१ |
| चिनी पाईप ७″ .... ... | १६२ | २० | १४२ |

( ई ) १८″ पाण्याच्या नळाची ४३०० फूट लांब लाईन टाकावयाचें एस्टिमेट होतें. पण कामासाठीं माल मागवितांना ४४१६ फूट नळ व ११४.२५ इतके स्पेशल्स मागविण्यांत आले. ४३०० फूट नळांचे ऐवजीं ४५३०·२५ फूट माल घेतला त्याबद्दल जवळ जवळ १५०० रुपये खर्च जास्त आला. अशा तऱ्हेच्या खरेद्या करतांना त्यांना लागणारा पैसा हा जबर व्याज देऊन कर्जाऊ घेतलेल्या रकमेंतून आलेला आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. वाजवीपेक्षां जास्त माल मागवून तो पडून राहिल्यामुळें होणाऱ्या माल खरेदीच्या खर्चावर विनाकारण व्याज बसत आहे. ही कर भरणारे नागरिकांना सरळ खोट येत आहे.

( फ ) प्यारा २० ( ब ) मध्यें दर्शविलेल्या दोषांखेरीज म्युनिसिपालिटीच्या कोठांसंबंधीच्या हिशोबांमध्यें खालीं दिल्याप्रमाणें दोष आढळून आले.

(एफ्) याच तपासणीपत्रकांमधीलः—

प्यारा १९ (बी) ५ मध्यें उल्लेख केलेल्या चुकांखेरीज, मध्यवर्ती स्टोअरच्या हिशेबांत खालीं दिल्याप्रमाणें चुका व विसंगति दिसून आल्या.

## उत्तर

पॅरा ४२ ( ड )

१९३०–३१ सालांत कांहीं माल खरेदी करण्यांत आला होता असाबद्दल ऑडिटर काय आधारानें म्हणतात हें कळत नाहीं. ऑडिटरांनीं जर यापेक्षां खोल व दूरवर पहाणी केली असती तर म्युनिसिपालिटीनें शिल्लक ठेवलेल्या मालाबाबत युक्तता त्यांना पटली असती व हरकत नमूद करण्याचेंही कारण पडलें नसतें.

पॅरा ४२ ( ई )

म्युनिसिपालिटीनें सरकारकडून जवळ जवळ २ मैल लांबीचे १४ इंची नळ विकत घेतले. हे नळ घालतांना महाग पडणारे स्पेशल कॉलर्स वापरण्याऐवजीं १८ इंची नळांचे तुकडे काटकसरीच्या दृष्टीनें वापरण्यांत आले. तसेंच १४ इंची जुन्या नळांच्या खरेदीमुळें १८ इंची ( कास्ट आर्यन पाईप ) नळांचे लांबींतही थोडाफार फरक करावा लागला. पाण्याचे नळांचे हें काम टिकाऊ स्वरुपाचें असल्यामुळें अशा तऱ्हेचे फेरबदल करणें अगदीं आवश्यक होतें. या कामीं होणारे जादा खर्चाकडे म्यु. चें लक्ष होतें. तथापि नळाचें काम चिरकाल स्वरुपाचें असल्यामुळें काम शक्य तेवढ्या काटकसरीनें करून पुरें करण्याबद्दल खास खबरदारी घेण्यांत आलेली होती.

(१) स्टोअर कडील खतावण्यां वेळोवेळीं तपासलेल्या नव्हत्या, व त्यांतील आंकड्यांच्या रास्तपणाबद्दल त्यांवर स्टोअरचे अंमलदार इंजीनियर यांनीं सह्या केलेल्या नव्हत्या.

(२) स्टोअरमधील शिल्की माल वारंवार तपासलेला नव्हता, आणि खतावणीमधील मालाच्या शिल्केबरोबर प्रत्यक्ष शिल्क असलेल्या मालाची रुजवात घेतली नव्हती.

प्यारा ४२ ( एफ् ) १ व २
यापुढें याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल.

(३) पुष्कळदां मागणी करणाऱ्या अंमलदारांशिवाय इतर इसमांना माल देण्यांत आला. असा माल देण्याबद्दल मागणी करणारे अंमलदारांकडून माल देण्याबद्दल लिहून आलेलें नसतांही माल देण्यांत आला.

प्यारा ४२ एफ् ३.
स्टोअरमधून मागणी केलेला माल स्वीकारण्याचें काम फक्त या कामासाठीं नेमलेल्या इसमांनी करावें अशाबद्दल वेगवेगळ्या खात्यांच्या अंमलदारांना हुकूम देण्यांत आलेले आहेत. स्टोअर खात्यानें पाठविलेलीं बिलें मालाची मागणी करणारे अधिकाऱ्यांचे कडून पटविली जात असल्यामुळें वर दिल्याप्रमाणें तजवीज करण्यामध्यें तादृश महत्त्व आहे असें वाटत नाहीं.

(४) माल निर्गतीचे कागदांवरुन पेन्सिलीनें सह्या करण्यांत आलेल्या होत्या.

(५) मागणीपत्रकांत मागणी: करण्यांत आली असून तो माल पुरविण्यांत आला नव्हता. असा माल स्टोअरकीपरकडे देण्यांत आलेल्या मागणी पत्रकांवरुन खोडण्यांत आलेला नव्हता.

(६) माल निर्गतीबाबत दाखले दिलेले .हिशेबतपासणींत सांपडले नाहींत. हे दाखले हिशेबतपासणी चालू असतांना देण्यांत आले.

प्यारा ४२ (४, ५ व ६) यांतील सूचना यापुढें माहितीसाठीं लक्षांत ठेविल्या असून संबंध असणारे ताबेकामगारांना याबाबत जरुर ते हुकूम देण्यांत आले आहेत.

(७) मालाची मागणी करणाऱ्या अंमलदारांकडून कित्येक वेळां माल खरेदी करण्यांत आला, व त्याचा उपयोगही करण्यांत आला. त्या मालाचा जमा व खर्च यांच्या पोकळ नोंदी स्टोअर-खतावणीवर माल वापरल्यानंतर कित्येक दिवसांनीं करण्यांत आल्या.

प्यारा ४२ (७) एफ्.
अगदीं निकडीच्यावेळीं फारच जरुर पडेल तेव्हां असें करण्यांत येतें. जर वस्तुस्थितीप्रमाणें घडणाऱ्या गोष्टी केवळ कागदी मेळ घालून लपविण्याच्या नसतील तर असें होणें अपरिहार्य आहे.

(८) स्टोअरखात्याचे मुख्य अंमलदार मे. म्यु. इंजिनियर यांच्या सह्या झालेल्या नव्हत्या तरी मागणीपत्रकें मान्य केल्याचे दिसून आलें.

प्यारा नं. ४२ ( एफ् ) ८.
ज्यावेळीं इंजिनियर यांची सही मिळणें अशक्य असतें अशा वेळीही अगदीं जरुरीच्या कामासाठीं म्हणून माल द्यावा लागतो. कारकुनानें माल दिल्यास हिशेबी हरकत येऊं नये म्हणून मागाहून इंजिनियर यांची सही घेतली नाहीं ही चूक आहे. तथापि अशा देवघेवींची एकंदर संख्या लक्षांत घेतली तर अशा तऱ्हेचे दोष क्वचितच आढळून येतात.

(९) हरकतीपत्रकांतील बाब नंबर २३८ वर नमूद केलेलीं उदाहरणें पाहातां एकूण जमेपेक्षां माल जास्त खर्च झाल्याचें दिसून आलें.

पॅरा नं. फ (९) ४२
हरकतींत नमूद केलेला माल हा वजनावारी व मापांवारी विकत घेतला जातो. व त्याची निर्गतही तशीच केली जाते. नगावारी त्याची मोजणी केली जात नाहीं. वेगवेगळ्या खात्यांना माल वाटावा लागतो त्यामुळें थोडाफार फरक ( मालाच्या नगावारींत ) राहाणें उघड आहे. मालाची जमाबाजू यामुळेंच जास्त दिसून येते.

(१०) (१) ड्रेनेज लायनींच्या कामावरील जुन्या मालाचा हिशेब तात्काल व बरोबर करण्यांत आलेला नव्हता. उदाहरणार्थ, मार्च १९३२ मध्यें ९८३ फूट जुना माल दरफुटास तीन आणे दरानें आकारण्यांत आला. ( हरकतीपत्रकाची बाब नं. २२८ पहा. ) या

प्यारा ४२ एफ् १०
नवीन ड्रेनेज लाईनी घालतांना जो जुना माल वापरण्यांत आला त्याचा बरोबर हिशेब ठेवलेला असून प्रत्येक लाईनीच्या कामावरुन चांगले स्थितींत किती माल निघाला याचा तपशील दाखविणारा

**हरकत**

या मालाची जमा स्टोअरचे हिशेबांत दृष्टीस पडली नाहीं. काढतांना कांहीं नळ फुटले व बाकीचे कामावरच वापरण्यांत आले होते असें सांगण्यांत आलें. उपयोगी व किंमतीच्या वस्तूंबाबत अशा तऱ्हेची संदिग्ध विधानें हिशेब तपासणींत मान्य करतां येत नाहींत. नळ फुटले असतील तर ते किती फुटले, किती वापरण्यांत आले व ते कोणत्या कामावरून व कितींचा समावेश स्टोअरच्या हिशेबांत घेण्यांत आलेला आहे, याचा नक्की व स्पष्ट खुलासा करणें जरूर आहे. जेथें कामावर नळ वापरण्यांत आले असतील तेथें त्याबाबत किंमत कोठें व कशी खर्च टाकण्यांत आलेली आहे, याचाही हिशेब दाखविण्यास पाहिजे. नळ काढतांना जर ते उपयुक्त स्थितींत काढले तर तीन आणे फुटाप्रमाणें दर द्यावयाचा होता. कंत्राटदारांनी जर ते मोडले तर तीन आणे प्रमाणें दर देणें व्यवहार्य नाहीं. याप्रमाणें देण्यांत आलेल्या दराबद्दल खुलासा करावयास हवा. एकंदर सालांत नळ काढले किती व त्यांचा हिशेब करण्यांत आला तो कशाप्रकारानें याबद्दलचे माहितीचे तक्ते ड्रेनेज इंजिनियरकडून मागवून घेऊन काढलेल्या नळांच्या हिशेबांचा मेळ घालण्यास पाहिजे.

**उत्तर**

हिशेब वेगळ्या रजिस्टरामध्यें ठेवण्यांत आलेला आहे. प्रत्येक लायनीच्या कंप्लीशन रिपोर्टमध्यें जुना माल किती वापरण्यांत आला याचा उल्लेख करण्यांत आलेला आहे. यावरून जुने नळांचे हिशेबाबाबत कसा तरी हिशेब ठेवण्यांत आला आहे असें म्हणणें मुळींच बरोबर होणार नाहीं. वरील गोष्ट लक्षांत घेतली असतांना मोडलेला व निकामी झालेला माल चटकन लक्षांत येण्यासारखा आहे. मे. हिशेब तपासनीस यांनी सूचना केल्याप्रमाणें नळांचे किंमती बाबतची नोंद कंप्लीशन रिपोर्टांतून नेहमीं नमूद करण्यांत येतें. जुने नळ खोदाई मधून काढून कामाचे जाग्यावर नेण्याबद्दल दर रनिंग फुटास तीन आणे प्रमाणें आकार देण्याची आजपर्यंतची पद्धत आहे. म्युनिसिपालिटीनें चालू ठेवलेली हीच पद्धत पब्लिक हेल्थ वर्क्स डिव्हिजन याही खात्यांत अमलांत आहे. यापुढें मात्र कामावरून जुना माल चांगले स्थितींत निघाल्यास कामावरून तो वापरल्याचा व मोडल्यामुळें निकामी झाल्याचा हिशेब तपशीलवार ठेवण्यांत येईल.

**हरकत**

( २ ) त्याचप्रमाणें माती, मुरूम, दगड वगैरे कितीतरी माल ड्रेनेज लाईनी व पाणीपुरवठ्याच्या लाईनी घातल्यानंतर उरला, तो उकरलेल्या जागेवरून दुसरीकडे रस्तेरिपेरीच्या कामावर वापरण्यासाठीं नेण्यांत आला. माल उचलण्याचा खर्च ड्रेनेज व पाणीपुरवठा या खात्यांवर टाकण्यांत आला. माल आला किती व तो वापरला किती याबद्दल तपशीलवार हिशेब ठेवण्यांत आला नाहीं, अगर रस्त्यावर माल किती पसरला याचें तपशीलवार मोजमाप मांडून ठेवलेलें नाहीं. दुसऱ्या कामावरून अशा रीतीनें वापरण्यांत आलेल्या मालाचें मोल ज्या कामावरून तो माल निघाला त्या कामावरून कमी केलेलें नाहीं. यापुढें अशा तऱ्हेनें जमाखर्च करावा. हरकती पत्रकाच्या २२६ व्या बाबींत वाढवा निघालेला माल दुसऱ्या कामावरून वापरण्यांत आला अशीं उदाहरणें नमूद करण्यांत आलीं आहेत. या मालाचा खप कसा करण्यांत आला त्याबद्दल तपशील देऊन माल पसरला त्याची झालेली किंमत संबंध असणाऱ्या कामांस खर्ची टाकावी.

**उत्तर**

पॅरा ४२ फ १० (२)

ड्रेनेज व नवीन नळांचीं कामें झाल्यानंतर त्यामध्यें निघालेल्या मुरुम व डबर यांचा तपशीलवार हिशेब ठेवण्यांत आला असून ज्या रस्त्यांच्या कामासाठीं तो वापरण्यांत आला त्या रस्त्यांच्या कंप्लीशन रिपोर्टांतून तो नमूद करण्यांत आलेला आहे. वापरण्यांत आलेल्या मालाची किंमत जमेस धरून लिहिलेलें रजिस्टर यापुढें दाखविण्यांत येतील.

**हरकत**

( ११ ) कामें संपून गेल्यावर कंत्राटदार लोकांकडून शिल्की माल आला तो स्टोअरकडे जमा करण्यांत न येतां सब ओव्हरसियर अगर मिस्त्री लोक यांनीं आपले पोट खतावणीमध्यें शिल्कींत ठेवून घेतला. नवीन माल खरेदी करतांना एकंदर शिल्लक माल किती आहे, हें कळावें म्हणून परत आलेला माल मध्यवर्ती कोठीस जमा व्हावयास पाहिजे.

**उत्तर**

पॅरा ४२ एफ् (११)

कामें संपल्यावर कामावरून परत आलेला अगर कंत्राटदाराचेकडून परत आलेल्या फाजील मालाचा हिशेब दर्शविणारीं रजिस्टरें सब् ओव्हरसियर व मेस्त्री लोकांनीं ठेवलेलीं आहेत. दर महिन्याचे शेवटीं मुख्य स्टोअरकडून मालाचें बिल येतांच शिल्की मालाचा तक्ता प्रत्येक ताबेकामगार स्टोअर खात्याकडे देतो. यामुळें बराचसा ताळा मिळतो. हा माल जरुरीप्रमाणें नवीन कामावरून वापरला जातो. नवीन माल जेवढा लागेल तेवढ्याचीच मागणी करण्यांत येते. व वाहातुकींत जास्त खर्च करून मुख्य स्टोअरकडे माल परत करण्याचें कारणच उरत नाहीं.

**हरकत**

( १२ ) मध्यवर्ती स्टोअरमधून कंत्राटदार, सब् ओव्हरसियर्स अगर मिस्त्री यांना वेगवेगळ्या कामांकरितां दिलेला माल किती होता याचें मोजमाप प्रत्यक्ष माल किती वापरण्यांत आला हें कळल्यावांचून समजण्यास मार्ग नाहीं.

**उत्तर**

पॅरा नं. ४२ एफ् (१२)

स्टोअरखात्याकडून एकदम कंत्राटदाराकडे मालाचा पुरवठा करण्यांत येत नाहीं. जो माल द्यावयाचा तो त्याबद्दल जबाबदार असणाऱ्या ताबेकामगारामार्फत देण्यांत येतो. कामें पुरीं झाल्यानंतर जे कंप्लीशन रिपोर्टस् तयार करण्यांत येतात. त्यामध्यें स्टोअरकडून आणलेल्या मालाचा उल्लेख केलेला असल्यामुळें स्टोअरकडून मागणी केलेला माल प्रत्यक्ष उपयोगांत आणला आहे कीं नाहीं हें कळून येतें.

(ग) वरील प्यारा ४२ (अ ते फ) यांत दर्शविलेल्या स्टोअरकडील अनेक चुका पाहिल्या, म्हणजे मालाची खरेदी, सांठवणी आणि पुरवठा याबाबत जरूर तेवढी काळजी व दूरदृष्टी उपयोगांत आणलेली नसल्याचें उघड होतें. मध्यवर्ती स्टोअरकडे ठेवलेली खतावणी अगर सब्—ओव्हरसियर व मेस्त्री यांनीं ठेविलेली मालाबद्दल शिल्केची पोट खतावणी यांची तपासणी मे. इंजिनियर यांनीं केल्याचें, अगर हिशेबांतील शिल्केबरोबर प्रत्यक्ष शिल्केचा मेळ घेतल्याचें दिसून आलें नाहीं. १९३२ च्या नवंबरांत अगदीं हिशेब तपासणीसाठीं जेव्हां हिशेब घेतले, तेव्हांपर्यंत स्टेशनरी मालाच्या खतावणीमधील बेरजा घेतलेल्या नव्हत्या, मालाची शिल्क काढलेली नव्हती अगर शिलका पुढें ओढलेल्या नव्हत्या. तसेंच मध्यवर्ती स्टोअरमधील कित्येक हिशेबांत तपासणींत चुका दाखवी-पर्यंत एकुण ती घेतलेल्या नव्हत्या. अगर बाक्याही काढलेल्या नव्हत्या. ह्या हिशेबांतील नोंदीच्या खरेपणाबद्दल मे. म्यु. इंजिनियर यांनीं हिशेबांवर सही केली नव्हती. शिल्की मालाची नोंद घेण्यांत आलेली नसल्यामुळें बुकांतील शिलकेबरोबर प्रत्यक्ष शिलक असलेला माल आहे किंवा नाहीं, तो नसल्यास त्यांत किती फरक आहे त्याचप्रमाणें खतावणीस टिपावयाचा राहून गेलेला मालही हस्त दोषाची हिशेबी चूक असून तीमुळें मालाचें नुकसान झालेलें नाहीं अगर तादिकामगारांनी कांहीं उपद्व्याप केलेले नाहींत- हें सांगतां येत नाहीं. हरकती पत्रकांतील बाब नंबर २१२ यावरून दिसून येईल कीं, मे. हेल्थ ऑफिसर यांनीं आपले खात्यांतील एका रखवालदारानें कांहीं वस्तु हरवल्या म्हणून त्याजकडून रुपये ७ वसूल करून घेऊन रा. स्टोअरकीपर यांजकडे दिले. ही रकम म्युनिसिपालिटीकडे जमा होणेस पाहिजे होती. तथापि चमत्काराची गोष्ट ही कीं, स्टोअरकीपर यांनीं तेवढ्या रकमेच्या वस्तु खरेदी करून त्या स्टोअर खतावणीस जमा केल्या. हरवलेले जिन्नस खरेदी करण्यास त्यांना परवानगी देण्यांत आल्याबद्दल त्यास सांगतां येईना. म्युनिसिपल जिनसांच्या खरेदीबाबत अगदीं साधा परिपाठ या बाबतींत पाळण्यांत आलेला नसल्यामुळें जरी ही गोष्ट दोषाई असली तरी या बाबतींत झालेला व्यवहार शंकायुक्त वाटतो. स्टोअरसारख्या महत्त्वाच्या हिशेबाकडे अविश्वासयुक्त नजरेनें जर पाहिलें नाहीं तर काय घोटाळे उद्भवतील व त्यांबाबत हें खातें ताब्यांत असणारे अंमलदारांवर कशी जबाबदारी येईल ही गोष्ट संबंध असणारे अधिकाऱ्यांच्या मनावर ठसविणें अत्यंत आगत्याचें आहे.

पॅरा नं. ४२ ग.

४२ ए व एफ् पर्यंतच्या प्याऱ्यांना उत्तरें दिलेली पाहिली तर प्यारा नं. ४२ ग मध्यें केलेली विधानें अतिशयोक्तीची असून वस्तुस्थिती भडक रंगात चितारून दाखविल्याचें कळून येईल. कार्य-क्षमता उच्च प्रकारची असावयास पाहिजे हें खरें. मे. हिशेब तपासनीस यांनीं सुचविल्याप्रमाणें जबाबदार अधिकाऱ्यांना या बाबतींत किती काळजीनें लक्ष देणें जरूर आहे याबद्दल कळविलें आहे.

## १२ पब्लिक वर्क्स (लोकोपयोगी कामें)

४३. झालेल्या कामाची मूळ माहिती मेझरमेंट बुकांत असल्यानें हें पुस्तक विशेष महत्त्वाचें असतें. परंतु मेझरमेंटच्या तारखा व मोजणी झालेल्या कामासंबंधीच्या इतर बाबींवरून असें आढळून आलें कीं, मेझरमेंट बुकें कामाच्या जागेवर भरलेली नव्हती. वाटर वर्क्स इंजिनिअर (मि. तांबोळकर) यांनीं असें कबूल केलें कीं, कामावर नेमलेल्या हाताखालच्या नोकरांनीं ठेवलेल्या कच्च्या टिपणावरून तीं बुकें तयार केली होतीं, व ज्या ज्या वेळेस ते कामाच्या जागेवर पाहणी करण्यास जात होते त्या त्या वेळेस ते सदर पुस्तक तपासीत होते. परंतु ड्रेनेज इंजिनियर (मि. दळवी) यांच्या देखरेखीखालीं चाललेल्या ड्रेनेजच्या कामाच्या बाबतींत

पॅरा नंबर ४३.

मे. डेव्हलपमेंट इंजिनियर यांचा खुलासाः—लाईनींचें काम टेस्ट देण्याकरितां पुरें झालेलें असलें म्हणजे कामाची मापें घेण्यांत येतात. यावेळीं खोदाई केलेली सर्व उघडी असते. व चरामध्यें वेगवेगळे थर जमिनींत लागलेले स्पष्ट दिसतात. याच वेळीं भरणीचेंही माप घेण्याची नेहेमींची पद्धत आहे. कारण भरणीचेंही माप खोदाई इतकेंच भरतें. व पुढें भरणी खचूं नये म्हणून अदमासें ९″ मापाचा माल मुद्दाम जास्त ठेवण्यांत येतो. या कारणामुळें मे. हिशेब तपासनीस यांनीं ६ इंची नळा इतका माल कमी करण्याबद्दल लिहिले आहे. तसें करतां येणार नाहीं.

अशा तऱ्हेची टिपणेही मिळूं शकली नाहींत. परंतु एकाच तारखेस मोजणी केलेल्या कामांच्या प्रकारावरूनच असें आढळून आलें कीं, एकाच तारखेस ती सर्व मापें नोंदणें अशक्य आहे. उदाहरणार्थ ड्रेनेज पाईप घालतांना प्यावी लागणारी मापें, ज्यांत चर खोदाई जुने नळ काढणें, नवीन नळ पुन्हां घालणें, चर पुन्हां भरून काढणें, चर भरल्यानंतर शिल्लक राहिलेला माल नेणें वगैरे बाबींचा समावेश होतो अशा सर्व मापांची नोंद एकाच तारखेस केलेली होती. सर्व काम संपून चर पुन्हां भरल्यानंतर खोदाई करतांना लागलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींतील खोदकामाची मापें अगदीं बिनचूक नोंदणें कसें शक्य झालें हें समजत नाहीं. ह्या सर्व मापांवर इंजिनिअर यांच्या मुख्त्यारीच्या सह्या होत्या, परंतु चरांत खोदतांना लागलेल्या निरनिराळ्या तऱ्हेच्या जमिनिच्या खोदाईची मापें व अशा खोदाईकरतां दिलेले निरनिराळे दर म्हणजे साध्या मातींतील खोदाईस रु. १६४ मऊ मुरमास रु. २८५ कठीण मुरमास रु. ५ कच्च्या खडकांतील खोदाईस रु. १०८१२ व पक्क्या खडकांतील खोदाईस रु. १७ हीं बरोबर आहेत याबद्दल चर भरून काढल्यानंतर त्यांची कशी खात्री झाली हें समजत नाहीं. या कामीं हजारो रुपये खर्च झाले असतां आणि खोदाईंत लागणाऱ्या निरनिराळ्या तऱ्हेच्या जमिनीची पाहणी प्रथम केली नसून व या कामाचें सविस्तर एस्टिमेट तयार नसतां झालेलें प्रत्यक्ष काम व त्याची मोजणी यावर इंजिनिअर यांनी फार दक्षतेनें देखरेख करावयास हवी होती; परंतु नोंद केलेल्या मापांपैकीं शेंकडा कांहीं तरी मापें इंजिनिअर यांनी खात्री करून घेण्याकरतां स्वतः मोजल्याचें, मापांच्या नोंदीवरून दिसत नाहीं. त्याचप्रमाणें रोड मटेरीअलचें कलेक्शन व पसरणें यांचीं मापें एकाच तारखेस नोंदलेली आहेत. व मटेरिअल पसरल्यानंतर या मापांवर इंजिनिअर यांनीं सह्या केल्या आहेत. उदाहरणार्थ मार्च १९३२ च्या व्हावचर नं. ७०८ मध्यें १५४९५ घनफूट मुरमाची किंमत आदा केली आहे, आणि कलेक्शन व पसरणें यांची मापें ता. २१ मार्च १९३२ रोजीं नोंदली आहेत. मटेरिअल पसरल्यानंतर कलेक्शन बरोबर होतें कीं नाहीं याबद्दल त्यांची कशी खात्री झाली हें समजत नाहीं.

कामाची ठेवलेली सर्व रजिस्टरें अपुरीं होतीं व ज्या उद्देशानें तीं ठेवण्यांत आलीं होतीं तो उद्देश साध्य होत नव्हता. कामें पूर्ण झाल्याबद्दल कंप्लीशन सर्टिफिकेट्स नसलेली मागील वर्षांचीं अपुरी कामें १९३१–३२ च्या रजिस्टरांत ओढलेलीं नाहींत. बऱ्याच बाबींवर १९३१–३२ सालीं खर्च झालेली रक्कम त्या त्या बाबींच्या नांवें खर्ची घातलेली नाहीं. व प्रत्येक कामावर होत असणारा वाढता खर्च काढलेला नाहीं. केलेल्या नोंदी बरोबर आहेत कीं, नाहीं हें बघण्याकरितां इंजिनिअर यांनीं तपासण्या पाहिजेल्या नाहींत. व त्यांवर त्यांच्या सह्याही नाहींत. अर्थात् पब्लिक वर्क्सकडील खर्चाची विश्वसनीय व बरोबर माहिती दाखविणारीं हीं रजिस्टरें आहेत असें म्हणतां येत नाहीं.

(४४) कामाबाबत ठेवलेलीं रजिस्टरें अपुरीं होतीं, व ज्याकरितां हीं रजिस्टरें ठेवावयाचीं असतात तो हेतु त्यांवरून पुरा होण्यासारखा नव्हता. जीं कामें पुरीं झालीं नसल्यामुळें त्याबाबत कंप्लीशन सर्टीफिकेटस् देण्यांत आलेलीं नव्हतीं त्यांची नोंद

८५ ते १०० पृष्ठांवर उल्लेख केलेल्या घ. नं. ४२० गंजच्या लायनीबाबत तर लिहिण्यांत आलेली मापें मुख्यतः चेंबर्स व मॅनहोल्स यांचींच आहेत. जमिनींतील थरांबद्दल वेगवेगळ्या जागीं जशीं मापें घेतलेलीं आहेत तसतसा खुलासा मापें मांडतांना आलेला आहे.

सबओव्हरसिअर लोकांनीं घेतलेलीं मापें बरोबर आहेत कीं, नाहीं हें पाहाण्याकरितां मे. ड्रे. इंजिनियर हे कंत्राक्टदाराचे खर्चानें जरूर पडेल तेव्हां नेहेमींचे देखरेखीशिवाय ट्रायल पिटस् घेतात. त्यामुळें जमिनीमधील वेगवेगळ्या पृष्ठभागांतील खोदाईबाबत खात्री पटवून घेणें सुलभपणें शक्य होतें.

मालाचीं मापें मे. ड्रेनेज इंजिनियर हे स्वतः माल ज्या दिवशीं सांठविण्यांत येतो त्याच दिवशीं जागेवर जाऊन घेतात व त्याची नोंद कामावर देखरेख करणारे इसमांचे डायरींत करण्यांत येते. नंतर हीं मापें मेझरमेंट बुकांत उतरण्यांत येतात.

मे. टाऊन प्लॅनिंग इंजिनियर यांचा खुलासाः—

वेगवेगळ्या भूपृष्ठांतील खोदाईचीं मापें लेव्हलस्, वाहतुक व मालाची उचल यांवर अवलंबून असल्यामुळें एकाच मेझरमेंट पुस्तकांमध्यें नोंदणें कठीण आहे. या कारणाकरितां तपशीलवार तक्ते ( कच्चा खर्डा नव्हे ) प्रत्येक बाबतींत जाग्यावरच, परंतु लाईन पूर्ण होऊन टेस्ट घेतल्यानंतर भरणी करतांना तयार करण्यांत येतात. याचप्रमाणें तपशीलवार माहिती ताबेकामगारांना देण्यांत आलेल्या नोंद पुस्तकांतून सरकारी कचेऱ्यांतूनही देण्यांत येते. ही तपशीलवार माहिती तपासून नंतर ताबडतोब मेझरमेंट बुकांतून मापें मांडण्यांत येतात.

पॅरा ४४:—नगर रचनेकडील व नवीन नळांचे कामांचीं रजिस्टरें हिशेब तपासणी चालू असतांना मे. हिशेब तपासनीस यांना दाखविण्यांत आलेली होतीं व त्याबाबत त्यांनीं हरकत घेतली नाहीं. मे. डेव्हलपमेंट इंजिनियर यांचे कचेरीनें ठेवण्याचीं कामांचीं रजिस्टरें आत

नवीन वर्षाच्या कामाबाबतच्या रजिस्टरांतून पुढें घेतलेली नव्हती. आणि एकूण खर्च किती झाला याचा कामवार आंकडाही काढलेला नव्हता. रजिस्टरांतील नोंदी पाहिल्या असल्याबद्दल त्यांवर नोंदी पाहून त्या बरोबर असल्याबद्दल इंजिनियर यांची त्यांवर सही नव्हती. यामुळें अशा रजिस्टरांवरुन पब्लिक वर्क्सकडील कामावरें झालेला खर्च बरोबर व वास्तविक असल्याची खात्री देतां येत नाहीं.

पुरीं करुन घेण्यांत आलेली आहेत. सुमारें ६० कंप्लीशन रिपोर्ट वेगवेगळ्या मेस्त्री लोकांचेकडून खुलाशाकरितां पाठविण्यांत आलेले होते. मिस्त्री लोकांचेकडुन खुलासे आल्यानंतर कंप्लीशन रिपोर्ट कामें पुरीं झालेल्या सालांतच नोंदण्यांत आले पुढील वर्षांत माल अगर मजुरी यांवर खर्च झालेला नसल्यामुळें नोंदी पुढील सालांत ओढण्याची जरुरी नाहीं.

४५. मे. वाटरवर्क्स इंजिनियर आणि मे. डेव्हलपमेंट इंजिनियर यांचे देखरेखीखालीं करण्यांत आलेल्या एकाच तऱ्हेच्या कामाकरितां दिलेल्या दरांतील तफावत पुढें दिल्याप्रमाणें होती.

| कामाचें नांव | ड्रेनेज खात्यानें दिलेला दर | (नवीन नळ) पाणी-पुरवठा खात्यानें दिलेला दर. |
|---|---|---|
| | रु. आ. पै | रु. ... |
| मातींतील खोदाई | १– ४–० | ०–१४–० |
| मऊ मुरुमांतील खोदाई | २– ५–० | १– ८–६ |
| कठीण मुरुमांतील खोदाई | ५– ०–० | ३– ८–० |
| मऊ खडकांतील खोदाई पांच फूटापर्यंत | १०–१२–० | ६– ० ० |
| पांच फुटाखालीं खोदाई | ११– ४–० | ६– ०–० |
| खडीमधील खोदाई | २– ५–० | १–१२–० |
| खोदाईवरील भरणी, राखणी व दिवाबत्ती | १– ४–० | ०– ८–० |

एकाच कामाकरितां, कित्येकदां अगदीं जवळ जवळ काम चाललें असतांना ड्रेनेज खात्याला पाणी पुरवठा खात्यापेक्षां जास्त दर कां पडावा हें कळत नाहीं. वरील प्रत्येक खात्यामध्यें दोन लाखा पेक्षां जास्त खर्च झाला असून दोन्ही खात्यांमधून वर उल्लेख केल्या प्रमाणें कामें कितीतरी मोठ्या प्रमाणांत करण्यांत आली होती. एका खात्याहून दुसऱ्या खात्यास दर जास्त कां पडले याची म्युनिसिपालिटीनें चौकशी करावयास पाहिजे.

पॅरा नं. ४५.

एकाच तऱ्हेच्या कामाबाबत दोन वेगवेगळ्या खात्यांतील दर जरी वेगळे असले तरी त्यांच्या फरकाचें कारण त्या कामांची वस्तुस्थिती पाहिली असतांना चटकन कळून येण्यासारखें आहे. ड्रेनेज कामाकरितां करावयाची खोदाई पांच फूटापासून २० फूटापेक्षांही जास्त खोल जाते, तर पाण्याच्या नळांकरितां करावयाची खोदाई क्वचितच चार फुटांहून खोल करावी लागते. सव्वा दोन फूट रुंदीच्या चरामध्यें इतकें खोल काम करणें जास्त अवघड व खर्चाचें असत. चिनी पाईप हे ठिसूळ असल्यामुळें त्यांच्या लाईनीसाठीं करण्याची जमीन काळजी घेऊन व योग्य व नक्की उतारानें तयार करावी लागते. वास्तविक पाहिलें असतां ड्रेनेजचीं कामें जास्त कसोशीनें व नक्की उतारानें करावी लागतात. त्यामुळें त्यांवर जास्त वेळ व लोक लागतात व खर्चही जास्त होतो.

मे. डिवीब तपासनीस यांनीं सुचविल्याबरहुकुम हा प्रश्न म्युनिसिपालिटीपुढें विचारासाठीं ठेविला आहे.

४६. ड्रेनेज कामांवरील खोदाईमधील भरणी केल्यानंतर वाढवा राहिलेला माल उचलण्याचे बाबींत बराच खर्च झालेला आहे. अशा तऱ्हेचा खर्च पाणी पुरवठा खात्याच्या खोदाईत झालेला नाहीं. खोदाईमध्यें एकूण खोदाई केलेल्या क्षेत्रफळाची २५ ते ३० इतके मालाचा वाढवा राहतो, व तो नंतर उचलून न्यावा लागतो. तथापि खोदाई केलेल्या जागेंत पुन्हां भरणी केली व ती मधील माल मसाला ठेंचून भरला तर शेंकडा २५ ते ३० इतका माल शिल्लक राहून तो वाहून न्यावा लागेल हें असंभवनीय दिसतें. असा जर तो शिल्लक राहाता तर पाणी पुरवठा योजनेकडेसुद्धां तो शिल्लक उरला असता. परंतु तिकडे तो क्वचितच शिल्लक राहिला. कांहीं बाबतींत तर वाढवा कमालीचाच आला. उदाहरण म्हणून मार्च १९३२ चें व्हावचर नं. ६३५ चें पाहातां एका लाईनीच्या कामावर खोदाई ८६९ घ. फूट निघाली. ही भरणीस उपयोगांत आली. व ४०० घ. फूट वाढवा निघाला तो वाहून नेण्यासाठीं रु. ७–०–० इतका खर्च झाला. मोजमापांचें बुकांतील नंबर १३९

पॅरा ४६. पाण्याचे नळांचे कामापेक्षां ड्रेनेजचे कामांवर खोदाई जास्त करावी लागून ( त्याबाबत अन्यत्र खुलासा केलेलाच आहे. ) कितीही काळजीपूर्वक भरणीचें काम केलें तरी पूर्वीप्रमाणें जमिनीची जुळणी पक्केपणानें होत नाहीं. काम जितकें जास्त खोल तितका उकीर वाढवा जास्त. अशी स्थिती असल्यामुळें वाढवा माल दुसरीकडे वाहून न्यावा लागतो.

वरील २ रे पानावर रस्त्याचे कडेस राहिलेला वाढवा वाहून नेण्याबद्दल कांहीं मोजमापें दिलीं आहेत. पुणें शहरामधील गर्दीच्या अरुंद रस्त्यांवर रहदारीस मार्ग मोकळा ठेवून इतके रुंद ढीग कसे ठेवतां आले याबद्दल शंका येते. खोदाईचें काम चालूं असतांना टाकलेला माल भरणीच्यावेळीं पुन्हां उकरण्यांत आला होता ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे रस्त्याचे कडेस इतक्या लांबवर १० इंच उंची एकजात राहाणें अशक्य दिसतें.

४७ (अ) मंजूर झालेल्या अंदाजांत (एस्टिमेटस्) फेरबदल करण्यांत आले व अंदाजांतून तरतूद न केलेलीं कामें करण्यांत आलीं. केलेल्या फेरफारांना अगर मूळ अंदाजांत तरतूद न केलेल्या कामांना मंजुरी घेतल्याचें दाखवितां आलें नाहीं. लहानसान, अशा कित्येक बाबींपैकीं पुढें दिलेली कांहीं थोडीं उदाहरणें आहेत.

| | पाणीपुरवठा कामें. | | खर्च. |
|---|---|---|---|
| [१] | १४ इंची नळ घालणें | ... | ३८,७६०–११–९ |
| [२] | १० ” | .... | १०,६५५—७–१० |
| [३] | ८ ” | ... | ८,६०८–११—७ |
| [४] | ५ ” | ... | ७,७५३—७—५ |
| [५] | ४ ” | ... | ३,३४१—१—१ |
| [६] | ३ ” | .... | २,११४–१०–११ |

जास्त करण्यांत आलेलीं कामें म्युनिसिपालिटीकडे कळवून त्यास मंजुरी घेण्यांत यावी.

(४७ अ) पाणी पुरवठ्यासाठीं म्युनिसिपालिटीनें सरकारकडून जुने नळ विकत घेतले. १५, १२ व १० इंची नळांऐवजीं या नळांचा उपयोग करण्यांत आला. यामुळें एकूण अंदाजपत्रकांत फरक झालेला नाहीं. मे. स्टँडिंग कमिटीनें मंजुरी दिलेल्या अंदाजपत्रकांत या फेरबदलाचा समावेश करण्यांत आलेला आहे. सरकारी हिशेब तपासनीस यांचे सूचनेस अनुसरुन या फेरबदलाला मे. जनरल कमिटीची मंजुरी घेण्यांत येत आहे.

(ब) कामाचे मूळ अंदाज, टेंडरें, दरवाऱ्या, करारनामे वगैरे महत्वाचे कागद इंजिनियर खात्यांत अगर सब् ओव्हरसियर लोकांचे हवाली करण्यांत आले होते; नगदी खात्याकडे त्यांच्या मूळ अगर नकला देण्यांत आलेल्या नव्हत्या. कामाबाबतची इत्थंभूत माहिती जरुरीप्रमाणें इंजिनियर खात्याकडून मागवावी लागली. नगदीखात्याकडे हे कागदपत्र नसतांना पब्लिक वर्क्स खात्याच्या कामांचीं बिलें तपासली कशी, व मंजूर कशीं केलीं हें समजत नाहीं. अनेक कारणामुळें यापुढें अंदाज, टेंडरें, करारनामे वगैरे मूळ व अव्वल कागद मुख्य ऑफिसांतील दप्तरीं ठेवणें व त्यांच्या जरुर त्या नकला इंजिनियर खात्याकडे माहितीसाठीं पाठविणें जरुर आहे.

(४७ ब) कामाबाबत मूळ अंदाज, टेंडर्स, दरपत्रकें व करारनामें, कंप्लिशन सर्टिफिकेटस् वगैरे इंजिनियर खात्याकडे रेफरन्सकरितां हरघडी लागतात. ही पद्धत आज कित्येक वर्षे अंमलांत आहे. इंजिनियर ऑफिस हें अकौन्ट ऑफिसच्या अगदीं नजीक व त्याच इमारतींत असल्यामुळें जरुर लागेल तेव्हां चटकन जरूर ते कागद बिलांबाबत तपासणीसाठीं आणतां येण्यासारखे आहेत. हें समजून येईल. तथापि तपासनिसांच्या सूचनेस अनुसरुन यापुढें तजवीज ठेवीत आहोंत.

(४८) हरकतीपत्रकाच्या २६१ व्या बाबींत १९१०–११ सालामध्यें पुरीं झालेलीं कित्येक कामें नमूद केलीं आहेत. तथापि चालू हिशेब तपासणी संपेपर्यंतही त्या कामाबाबतची कंप्लीशन सर्टिफिकेटस् म्हणजे कामें पुरीं झाल्याबाबतचे दाखले तपासणीसाठीं दाखविण्यांत आले नाहींत. जवळजवळ दोन वर्षांइतका उशीर दाखले देण्याचे कामांत कां होत आहे याबद्दल चौकशी होणें जरुर आहे.

हरकतीपत्रकांतील बाब नंबर २५६ पाहिली तर, नगदी खात्याकडून कामासंबंधीची सरते शेवटचीं बिलें मंजूर करतांना कामाचे पुरेपणाचे दाखले (कंप्लीशन सर्टिफिकेटस्) मागण्यांत येत नाहींत हें दर्शवितां येईल.

(४८) ज्या कामाबद्दल सरतेशेवटचीं बिलें केलीं जातात त्याबाबत बहुतेक वेळीं कामाचे पुरेपणाचे दाखले (कंप्लीशन सर्टिफिकेटस्) देण्यांत येतात. तथापि कामें पुरीं होतांच त्याबाबत पुरेपणाचे दाखले (कंप्लीशन रिपोर्ट) तावडतोब देण्याबाबत आतां सूचना देण्यांत आलेल्या आहेत. या बाबतींत ऑडिट नोटमधील ४४ वा पॅरा व हरकतीपत्रकांतील २५६ वी बाबत यांना उत्तरें देण्यांत आलेलीं पाहावींत.

## १३ सर्व साधारण.

(४९) पैशांचा व्यवहार करणोरे सर्व कायम व हंगामी कारकुनांना म्युनिसिपल नियमामध्यें सांगितल्याप्रमाणें जामीन द्यावा

पॅरा ४९.

संबंध असणारे इसमांकडून आतां जामीन घेतले आहेत.

लागतो. जकात खात्याकडील पांच कारकुनांनीं सदरप्रमाणें जामीन न दिल्याचें आढळून आलें. त्या कारकुनांचेकडून आतां जामीन घेण्याची व्यवस्था करावी. ( हरकती पत्रकांमधील बाब नं. ११२ यांतील तपशील पाहा. )

( ५० ) पैशांबाबत घोटाळे व अफरातफरीचें प्रकारः— वेगवेगळ्या खात्यांच्या अंमलदारांनीं हिशेबासंबंधीं पावतीबुकें पैशांचा भरणा करण्याचीं चलनबुकें वगैरे रजिस्टरांकडे विशेष कसोशीनें लक्ष्य दिलें नाहीं, यामुळें पैसा गोळा करणारे कामगारांना पैशाबाबत अफरातफर व घोटाळे करण्यास सवड मिळाली. रु. २४१५–७–४ इतक्या रकमेची अफरातफर केल्याचें प्रकार हिशेब तपासणींत उघडकीस आले ते वेगवेगळ्या पांच रिपोर्टांनीं मे. अध्यक्ष व मे. कलेक्टर यांजकडे कळविलेले आहेत. अफरातफरीच्या अनेक प्रकारांची थोडक्यांत यादी पुढील प्रमाणें आहे.

( अ ) मे. वसुली सुपरिंटेंडंट यांच्या देखरेखी खालील वसुली खात्यामध्यें—

| | रु. |
|---|---|
| ( १ ) पाण्याचा नळ देण्याबद्दल घेण्यांत आलेल्या डिपॉझिट रकमांतून ... | ५४७—०—० |
| ( २ ) वेळोवेळीं जमा झालेल्या म्यु. करांतून ... ... | १,११७—१—० |
| ( ३ ) मे. वसुली सु. यांना निकडीच्या कामाकरितां दिलेल्या तसलमातींतून | ५८१—१—० |
| ( ब ) मे. वर्कशॉप सुपरिंटेंडंट यांच्या देखरेखीखालीं "वर्कशॉप" खात्यामध्यें ... | |
| ( १ ) खाजगी कामगिरीबद्दल घेण्याच्या रकमेंतून ... ... | १५६—९—४ |
| ( क ) मे. चीफ् ऑफिसर यांच्या देखरेखी-खालच्या हुजूर ऑफिसांमध्यें ... | |
| ( १ ) म्युनिसिपालिटीकडे आलेल्या प्रत्येकीं रु. २–८–० च्या तीन मनीऑर्डरी आल्या त्यांच्या रकमेबद्दल रा. वि. वा. जोशी यांजकडून ... ... | ७—८—० |
| ( २ ) मतदारांच्या याद्या विकल्या त्याबद्दल आलेल्या रकमेंबद्दल रा. खोले यांजकडून ... ... | ५—१५—० |
| एकुण रु... | २,४१५—७—४ |
| ( १ ) यांतून वजा ३१ मार्च १९३२ रोजीं आलेल्या जादा भरण्यामुळें | रु. ३२८—१—० |
| ( २ ) अजून भरावयाची अफरातफर झालेली रक्कम. ... ... | २,०८७—६—४ |

पॅरा नं. ५० व ५१.

या प्यारिग्राफांतून केलेलीं विधानें भरमसाट आहेत. हिशेबी कामांतील निष्काळजीपणा, बेपर्वाई अगर असमाधानकारक परिस्थिती ही एकदम १९३१–३२ सालांत उपस्थित झाली कीं काय ! हा विचारार्ह प्रश्न आहे. यापूर्वीच्या सालांचे हिशेब सरकारी हिशेब-तपासनीसांनीं तपासलेले आहेत व त्यांच्या सूचनांप्रमाणें कामाबाबत तजवीज ठेवण्याची शक्य ती खबरदारी घेण्यांत येत आहे. शक्य तेवढ्या ठिकाणीं आडिटनोटमधील प्याऱ्यांत स्पष्ट खुलासा केलेला आहेच. त्यांबाबत पुनरुक्ती करण्याचें कारण नाहीं. या बाबतींत कांहीं प्रश्नांचा विचार खास या कामासाठींच नेमलेल्या पोट् कमिटी-कडून चालू असून कांहीं कामें जनरल कमिटीपुढें आहेत. त्याचा निकाल लागतांच तो पत्रानें कळविण्यांत येईल.

(२) प्रत्यक्ष अफरातफर केलेल्या रकमांशिवाय, आलेले पैसे दिरंगाईनें जमा करण्याचें अगर आठ दहा दिवसांपासून महि-न्यापर्यंत पैशांचा भरणा करण्याचे ठेवल्याचे प्रकार पुष्कळच नजरेस आले. ते हरकती पत्रकांतील बाबी ९५ व १८७ येथें नमूद केले आहेत.

पैशांचा भरणा करण्यांत दिरंगाई केल्याबद्दल चौकशी करण्यांत आली नाहीं अगर याबद्दल जबाबदार असणारे इसमां-विरुद्ध शिस्त बसेल अशा तऱ्हेनें कारवाई करण्यांत आली नाहीं ही वस्तुस्थिती पाहिली म्हणजे म्युनिसिपालिटीकडे आलेला पैसा ताबडतोब खजिन्यावर भरण्याबद्दल जो नियम आहे त्याकडे खात्यांचे अंमलदार लोक क्वचित् लक्ष देत, ही गोष्ट प्रत्ययास आल्यावांचून राहात नाहीं. ज्या इसमांनीं प्रत्यक्ष अफरातफरी केल्या अशांनी त्या त्या रकमा आणून भरल्या नाहींत तर म्युनिसिपा-लिटीच्या झालेल्या तोट्यास स्वतःच्या बेफिकिरीमुळें जे अंमलदार कारणीभूत झाले त्यांच्यावरील तोट्याची जबाबदारी सुटणार नाहीं.

(३) वरीलप्रमाणें हकीकतीवरुन एक गोष्ट स्पष्ट होते व ती ही कीं, खात्यांचे अंमलदारांची त्यांचे खात्यासंबंधीं ठेवण्यांत आलेल्या हिशेबी पुस्तकांची तपासणी अगर त्यावरील देखरेख अगदीं असमाधानकारक होती. हिशेबीपुस्तकांतून दुरुस्त्या अगर मजकूर बदलून दुसरा लिहिण्याची उदाहरणें पुष्कळच दिसून आलीं. पण यापैकीं थोड्याच गोष्टींकडे अधिकाऱ्यांचें लक्ष गेलें होतें. हिशे-बांच्या चोखपणासाठीं वारंवार जरुर असणाऱ्या तपासणी फेरतपा-सणी वगैरे केल्या नाहींतच, पण महिनेवार होणाऱ्या उलाढालीच्या एकूणातींही हुजूर ऑफिसांतील खातेवारीशीं रुजूं पाहिलेल्या नव्हत्या असें दिसून आलें. वर्कशॉपकडील हिशेबी पुस्तकांवरुन मे. वर्कशॉप सुपरिंटेंडेंन्ट यांनीं कोठेंही सही केलेली नव्हती.

वसुली खात्याकडील नगदी व्यवहाराचे हिशेब चोख ठेवले जातात कीं नाहीं हें पाहाण्याचें बाजूसच राहिलें पण ठरावबंदातील वसुल व्हावयाच्या रकमा व प्रत्यक्ष वसूल झालेल्या व कर्दीस जमा केलेल्या रकमा पहातां त्यांत कमालीचा फरक असल्याचें दिसून आलें. पावती बुकांचा हिशेब आणि बंदोबस्तही समा-धानकारक नव्हता. वर्ष संपून गेलें तरी पुढील पानें रद्द न करतां वसूल करणाऱ्या कारकुनांच्याजवळ पावतीबुकें तशींच राहूं देण्यांत आलीं होती. उपयोग केल्यामुळें संपून गेलेल्या पावती-बुकाच्या स्थळप्रती आणि पैसे वसूलीचे पास कारकुनांच्याकडून परत मागून घेऊन त्यांचा दुरुपयोग न व्हावा म्हणून बंदोबस्तांत ठेविली नाहींत. याच पत्रकांत आलाहिदा उल्लेख केल्याप्रमाणें दिसून येईल कीं, म्युनिसिपालिटीच्या निरनिराळ्या खात्यांस पुरविण्यांत आलेले पैसे वसुलीचे पास व पावती पुस्तकांची छपाई व पुरवठा यांवर देखरेख असावयास पाहिजे तशी नव्हती. म्युनिसिपालिटीच्या खात्या-खात्यांतून अशा तऱ्हेचा गैदीपणा व बेफिकिर असल्यामुळें पैशाच्या बाबतींत अफरातफरी व कुलंगडीं उपस्थित होऊन तीं उघडकीस आलीं नाहींत यांत नवल तें काय ?

(५१) या तपासणीपत्रकांत आणि हरकतीपत्रकांत नमूद केलेल्या अनेक घोटाळ्यावरुन एका खजिनदाराच्या बुकांशिवाय

बाकी एकंदर हिशेबी कामांची व्यवस्था असमाधानकारक होती. अंमलदाराच्या देखरेखेतील ढिलाईमुळें पैशांच्या मानगडी व अफरातफरी यांना कसा वाव मिळाला हें ५० वे प्यान्यांत वर आलेंच आहे. जमाबंदीबाबत नियम कानू आणि खर्चाबाबतीत नियंत्रण वगैरेंची अंमलबजावणी तपासणीमध्यें हरकती काढूनही जशी सक्तीने व जारीनें व्हावयास पाहिजे होती तशी झाली नाहीं. यामुळें कर भरणारे नागरिकांचा कायदेशीर रीतीनें म्युनिसिपालिटीस मिळावयाच्या उत्पन्नाची वसुली न झाल्यामुळें. तोटा होत आहे. ( प्यारिग्राफ ६, ७, ८, १२, २३, २६, व ३७ पहा. ) कर वसुलीचें कामही समाधानकारक नव्हतें. रु. १९८८८ इतकी कराची रकम वसूल होण्यास मार्ग नाहीं म्हणून माफीत टाकली, तरी सालअखेरीस गेल्या सालअखेरीपेक्षां बाकी रु. १६११८ नीं जास्त वाढलीच. ( प्यारा ४ व ५ पहा ) करबाकी वसूल करण्याकरितां निर्वाणीचे उपाय जवळजवळ योजलेच नाहींत. वेगवेगळ्या करांबाबत हजारोंवर लोकांकडून रकमा येणें असतांना फक्त १३ वारंटें बजावण्यांत आली.

म्युनिसिपालिटीची १९३१–३२ सालामधील कर्जासंबंधीची उलाढाल अशी आहे.

मे. स्टँडिंग कमिटीनें ड्रेनेज व पाणी पुरवठ्याचें रु. ३,७७,९०० चें कर्ज ९० व ( नगररचनेचे रुपये २,५८,००० ) ९४ दरानें उभारलें व अशा रीतीनें सरकारनीं मंजूर केलेला व्याजाचा दर ६॥ टक्के असतांना या कर्जावरील व्याजाचा दर ७.२५ व ६.९ टक्के असा अनुक्रमें पडला. प्रयत्न केला असता तर म्युनिसिपालिटीला जास्त: फायदेशीर रीतीनें कर्ज मिळालें असतें. कर्जाबाबतचा व्यवहार स्टँडिंग कमिटीनें अगदीं घाई–घाईनें केला. सरकारनें मंजुरी दिलेल्या अटी व्यतिरिक्त वेगळ्या अटीवर कर्ज घ्यावयाचें होतें तर त्या अटी वगैरे ठरविण्यास मे. जनरल बोर्डाच्या मंजुरीवर सरकारची पसंती घ्यावयास हवी होती. या रु. ६,३५,९०० च्या कर्जास जबर व्याज द्यावें लागून शिवाय दलाली स्टांपड्यूटी कसर व इतर किरकोळ खर्च मिळून जवळ जवळ ६०,००० रुपये खर्च नागरिकांवर जास्त बसला. ( पॅरा १३ अ व ह पहा. ) स्टोअरकडील हिशेबांचे बाबतींत जी देखरेख ठेवलेली होती ती अफरातफरी अगर उधळपट्टी यांस पायबंद घालणारी नव्हती. ( पॅरा ४२ पहा. ) तोच प्रकार छापखान्यांत छापलेल्या पावतीबुकें, फार्म वगैरे बाबतींत. ( पॅरा १४ ) कर्जाचे रोखे छापणें व बंदोबस्तांत ठेवणें या कामीं असणारी देखरेख तर अगदीं असमाधानकारक होती. (पॅरा १४ ब) पब्लिक वर्क्स खात्यावरील खर्चाचे कागदपत्र अपुरे असून ते कितपत वास्तविक व बरोबर आहेत हें सांगतां येत नाहीं. ( प्यारे ४३ ते ४८ ) मंजुरी घेतल्यापेक्षां कामांतून फरक करून व बराच पैसा खर्च करून जादा कामें इंजिनियर खात्यांकडून करण्यांत आली. त्या कामांस म्यु. ची मंजुरी घेतल्याचें दाखवितां आलें नाहीं. ( पॅरा ४७ अ ) १९३०–३१ सालांत झालेल्या कामाबाबत १९३१–३२ सालांत त्या कामांवरून कांहीं एक खर्च झाला नसतांहीं कामें पुरीं झाल्याचें दाखले अगदीं हिशेब तपासणी संपेपर्यंत देण्यांत आलेले नव्हते. ड्रेनेज कामावरील खर्चावर सरकार व

म्युनिसिपालिटी यामध्यें निम्मेनिम फाळणी व्हावयाची आहे. असें असून रु. ७७९० इतकी रकम विभागणीस पात्र नसतांही या खात्याकडे खर्चीत लिहिली गेली. ड्रेनेज कामावर निघालेला कितीतरी :माल म्युनिसिपालिटीच्या दुसऱ्या :कामांवर वापरण्यांत आला, असून या मालाची होणारी किंमत सरकार व म्युनिसिपालिटी यामध्यें वाटणी व्हावयाच्या रकमेंतून वास्तविक कमी करावयास हवी होती. पण ती तशी केली नाहीं. (पॅरा ३३ अ व ब पहा) अंदाजपत्रकामध्यें मंजूर केलेल्या रकमांचे आंवाक्यामध्यें खर्च व्हावयास हवा होता. तसा तो झाला नसून अंदाजपत्रकांतील मंजूर रकमेबाहिर खर्च गेल्यावरोबर दुरुस्त आंकड्यांस म्युनिसिपालिटीची मंजुरीही पण तांतडीनें घेण्याकडे लक्ष्य देण्यांत आलेलें नव्हतें. ( पॅरा २८ व ३६ पहा. )

(ब) Extraordinary receipts and expenditure—इतर बाबीपासून जमाखर्च—असाधारण जमा व खर्च यासकट म्युनिसिपालिटीस ३० लाखांवर रकमेच्या जमाखर्चाची जबाबदारी पडत आहे. पण या जबाबदारीच्या मानानें हिशेब ठेवणें व हिशेब तपासणी याकामांकडील व्यवस्था अगदीं अपुरी आहे. ड्रेनेज आणि डेव्हलपमेंट ( नगररचना ) या खात्यांचीं कामें दोघां इंजिनियरांचे देखरेखीखालीं होत असून त्याच्यावर वार्षिक सुमारें तीन ते चार लाख रुपयांवरें होत असलेल्या खर्चाची प्रत्येकीं जबाबदारी आहे. असें असता त्यांना हिशेबी कामांत सहाय्य करण्यासाठीं लायक अशा हिशेब जाणणाऱ्या इसमांची मदत देण्यांत आलेली नाहीं. त्याचप्रमाणें म्युनिसिपल खात्याचें हिशेबांची अंतर्गत तपासणी करण्यासाठीं एका जनरल कमिटीस तेवढा जबाबदार असणाऱ्या हिशेब तपासनीसाची योजना पण म्युनिसिपालिटीनें केलेली नाहीं. म्युनिसिपल नियम नं. २३ व ३२ प्रमाणें ह्या कामाची जबाबदारी मे. चीफ ऑफिसर व म्यु. अकौंटंट यांजवर पडते.

वेगवेगळ्या खात्यांमधील तबिकामगारांनीं लिहीलेल्या हिशेबी जमाखर्चावर नीट लक्ष ठेवून जर ते वेळोवेळीं तपासले तर हें काम साध्य होण्यास कठीण नाहीं. कांहीं हिशेबी पुस्तकें अपुरीं व अस्ताव्यस्त स्थितींत लिहीलेली होती, त्यावरून ती वेळोवेळीं तपासलीं नव्हतीं असें दिसून आलें. कामाचा, विशेषकरून पब्लिकवर्क्स खात्याकडील अनुभव नाहीं असे अकौंटंट, अंमलदार व त्यांचे मदतीला दिलेले कारकून हिशोबाचे ज्यांचें ज्ञान यथातथाच आहे असें अस-असल्यामुळें विद्यमान हिशेब व तपासणीची पद्धती, तीस लाख रुपयांवर रकमेची उलाढाल करणाऱ्या म्युनिसिपालिच्या कारभाराचें दक्षपणानें नियंत्रण ठेवण्यायोग्य आहे असा विश्वास वाटत नाहीं.

म्युनिसिपल नियम नं. २३ मध्यें सांगितलेलीं कामें उरकण्याकरितां मे. चीफ ऑफिसरसाहेब यांनीं अधिक काळ खर्च करावयास पाहिजे या गोष्टीची जरूरी पटवावयास हवी असें नाहीं.

५२. हिशेबांची तपासणी सुरु असतांना हिशेब तपासनीसांना अंमलदार आणि नोकरवर्ग यांचेकडून हरएक प्रकारचें सहाय्य मिळालें हें नमूद करण्यास आनंद वाटतो. हिशेब तपासणी सुरु असतांना मे. अध्यक्ष साहेब यांनीं स्वतः मन घालून हिशेब तपासणीचें

कामांत फार काळजीपूर्वक लक्ष दिलेलें होतें, याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत.

५३. या तपासणीपत्रकांस व पूर्वी नं. एल् २/३/५९८८ नें तारीख ११ मार्च १९३३ रोजीं पाठविलेल्या हरकती पत्रकास उत्तरें देऊन त्यांचा लवकर निकाल करावा अशी विनंती आहे. या तपासणीपत्रकांस देण्याचीं उत्तरें त्याच्या वेगवेगळ्या तीन प्रति करून आमचेकडे पाठवावी.

[ सही ] डी. एन्. नगरकट्टी,

असिस्टंट एक्झामिनर लोकल फंड अकौंटस्.

## परिशिष्ट १ लें

### तक्ता नं. १

करांच्या वसुलीच्या बाक्या.

| बाब. | | ३१ मार्च १९३०. | ३१ मार्च १९३१. | ३१ मार्च १९३२. |
|---|---|---|---|---|
| घरपट्टी ... | ... | ५२,०६६ | ५९,९७५ | ७०,९४७ |
| भंगीपट्टी ... | ... | १९,८६६ | २०,८०२ | १८,६४८ |
| बिगर पायखानापट्टी | ... | १२,०१२ | १३,१२१ | १२,७२८ |
| ड्रेनेज ... | ... | ३०,५२२ | ३६,७०७ | ४४,४१२ |
| सेसपूल ... | ... | १,१४२ | १,००७ | ८९१ |
| गाडीपट्टी ... | .... | ३९६ | १५५ | ३६६ |
| पाणीपट्टी .... | ... | ५,८७४ | १,५९३ | १,६६० |
| सर्वसाधारण पाणीपट्टी | .... | ८,९८२ | ९,३४२ | ९,०७१ |
| कुत्रापट्टी ... | .... | ३ | ० | ४ |
| हॉटेलपट्टी ... | ... | ८४ | ५७ | १५० |
| | | १,३०,९४७ | १,४२,७५९ | १,५८,८७७ |

### तक्ता २

जमाखर्चाचा खर्डाः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षारंभींची शिल्लक ( स्कूलबोर्डाकडील वरून ) | | ... | | २९,८३१ |
| प्रत्यक्ष करांपासून उत्पन्न ... | ... | ... | १३,६९,४८५ | |
| अप्रत्यक्ष करांपासून उत्पन्न | ... | ... | ६,०५३ | |
| मालमत्तेपासून उत्पन्न ... | ... | ... | १,४८,८५४ | |
| इतर किरकोळ उत्पन्न .... | ... | .... | १,५६,१७८ | |
| सरकारी देणग्या ... | ... | ... | २२,१४१ | |
| इतर बाबींपासून उत्पन्न ... | ... | ... | ११,५३,७७९ | |
| अडग्हाण व कर्जाऊ ठेवी | ... | ... | १४,६२,८५८ | |
| शाळाखात्याकडील देणग्या | .... | .... | १,७८,७५० | |
| धंदेखात्याचे उत्पन्न .... | ... | ... | १,२५,९५५ | |
| | | | ४६,२४,०५३ | ४६,२४,०५३ |

खर्चः—

| | | | |
|---|---|---|---|
| चालू खर्च .... ... | ... | ... | १६,९९,३०५ |
| नवीन कामांवरील खर्च .... | ... | .... | ११,२६,८३९ |
| विशेष खर्च ... | .... | .... | १७,३८६ |
| कर्ज व अनामत .... | ... | ... | १५,४४,८७७ |
| धंदेखात्यावरील .... | ... | ... | १,३३,५३७ |
| | | एकूण.... | ४५,२१,९४४ |

४५,२१,९४४

बाकी.... १,२७,९४४

## ऑडिट नोट पॅरा ३१ मध्यें नमूद केलेल्या दररोजच्या खर्चाबाबत तक्का.

| तारीख. | | | | रक्कम. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु. | आ. | पै |
| ६ नोव्हेंबर १९३१ | .... | .... | .... | ३७ | २ | ० |
| ७ नोव्हेंबर १९३१ | .... | ... | ... | १५ | १ | ० |
| ” ” | .... | ... | ... | ३१ | १५ | ० |
| २८ नोव्हेंबर १९३१ | .... | ... | ... | ८३ | ९ | ६ |
| २९ नोव्हेंबर १९३१ | .... | ... | ... | १७ | ० | ० |
| ५ डिसेंबर १९३१ | ... | ... | ... | २३ | ११ | ० |
| २८ डिसेंबर १९३१ | .... | ... | ... | ३२३ | ११ | ० |
| १७ फेब्रुवारी १९३२ | ... | ... | ... | २ | ८ | ६ |
| २५ फेब्रुवारी १९३२ | ... | ... | ... | ४ | ७ | ३ |
| २७ फेब्रुवारी १९३२ | ... | ... | ... | ४ | १२ | ० |
| | | | | ५४३ | १४ | ३ |

## परिशिष्ट २—ऑडिट नोट, पॅरा २ (अ) मध्यें उल्लेख केलेल्या माहितीचा तक्ता.

म्युनिसिपालिटीनें उभारलेली कर्जें व त्यांची परतफेड होण्याची तरतूद दर्शविणारा तक्ता.

| क्रमांक | कर्ज उभारण्यास मंजुरी. | कर्ज उभारण्याचें कारण. | कर्जाची रकम रुपये | कर्ज कोणापासून घेतले. | वार्षिक हप्ता. | कर्जभरपाई रकमेची शिलक. | अजून देणें शिलक असल्याची बाकी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रु. आ. पै | रु. | रु. आ. पै |
| १ | सरकार ठराव फडणिशी खातें नं. २६४२ ता. १५ आगस्ट १९११ ... | ड्रेनेज | १०,००,००० | सरकारकडून | ५०,३२२—०—० | .... | ७,३८,६९२-१५—० |
| २ | सरकार ठराव फडणिशी खातें नं. ६७४ ता. १० जून १९२३ ... | प्राथमिक शिक्षणाच्या शालागृहें बांधणें. | ५२,००० | बाजारांत | ४,२३२—०—० | ४६,१२० | ५,८८०—०—२ |
| ३ | „ „ जनरल डिपार्टमेंट नं. ३५९ ता. १९ मार्च १९२६ .... | ड्रेनेज सुधारणा योजना. | १,३०,००० | सरकारकडून | १०,१६२—०—० | ... | १,२०,५०८-११—० |
| ४ | „ „ „ „ नं. ३५६ ता. २३ एप्रिल १९२६ .... | ड्रेनेज सुधारणा योजना. | २,६५,००० | सदर | २०,७१४-१०—० | ... | २,४७,५७०—३—० |
| ५ | „ „ „ „ नं. ३५६ ता. २६ मार्च १९२७ ... | ड्रेनेज सुधारणा योजना. | २,९०,००० | सदर | २२,६६८-१३—० | ... | १,७३,३०५—४—० |
| ६ | „ „ „ „ नं. ३५९ ता. २४ मार्च १९२८ ... | ड्रेनेज सुधारणा योजना. | १,५७,००० | सदर | ११,३४५-१२—० | .... | १,४८,२९४—२—० |
| ७ | „ „ „ „ नं. ३५९ ता. २६ मार्च १९२९ .... | ड्रेनेज सुधारणा योजना. | २,२५,००० | सदर | १५,३९९—०—० | ... | २,१५,२४७-१२—० |
| ८ | „ „ „ „ नं. ३५९ ता. २९ मार्च १९३० .... | ड्रेनेज सुधारणा योजना. | २,२५,००० | सदर | १७,१४०—८—० | ... | २,११,००१-१५—० |
| ९ | „ „ „ „ नं. ६८७८ ता. २३ मे १९२९ ... | लक्ष्मी रोड | १,७५,००० | बाजारांत | १४,५७८—०—० | ३०,९५४ | १,४४,०४६—१—४ |
| १० | „ „ „ „ नं. ३५९ ता. १९ नोव्हेंबर १९३१ .... | ड्रेनेज | ७७,९०० | सदर | १,५०९—०—० | .... | ६८,११४—०—० |
| ११ | „ „ „ „ नं. ८४१४ ता. ९ डिसेंबर १९३२ ... | नगररचनेची योजना | २,५८,००० | सदर | २१,९९३—०—० | .... | १,५२,४०६—७-१० |
| १२ | „ „ „ „ नं. ८६९३ ता. ५ मार्च १९३२ .... | पाणीपुरवठा | ३,००,००० | | ,८१२—०—० | ... | २,८९,७५८—०—० |
| | | एकूण... | ३१,५४,९०० | | १,९५,८७६-१०—० | | २६,२५,७०५—६—६ |

[ १७ वें  विरून उल्लेख केलेल्या रोख्याचे दरावावतचा तक्ता.]

२ सरकारी रोख्याचे दर

| रोख्याचें नांव | रोखे घेतांना घेणेची किंमत मे स्टॅ. क. नें दर तारीख १८–१२–१९३२ रोजीं ठरविली | पाणी पुरवठ्याचें कर्ज विकलें जात असतांना बाजारभावाचें दर. फेब्रुवारी व मार्च १९३२ मध्यें | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ५।२।३२ | १०।२।३२ | १९।२।३२ | ७।३।३२ | ११।३।३२ |
| १ १९३९–४४ चें ५ दराचें कर्ज ... | ७९ १/२ ( दर्शनी ) | ८० १/४ | ८० १/४ | ८३ १/४ | ८८ १/२ | ९० |
| २ १९३९–४७ चें ५ दराचें कर्ज .... | ७९ १/२ | ८० १/४ | ८० १/२ | ८३ ५/८ | ८७ १/२ | ८८ १/२ |
| ३ १९४५–५५ चें ५ दराचें कर्ज ... | ९० १/४ | ९२ | ९२ ५/१६ | ९४ | ९८ १/२ | ९९ |
| ४ १९३१ चे ६ दराचे रोखे .... | ९९ १/४ | १०० | १०० | १०० ५/८ | १०० ७/१६ | १०० १/२ |
| ५ १९३३–३६ चे ६ दराचे रोखे ... | ९३ ५/८ | ९६ १/४ | ९६ १/४ | ९८ | ९९ १/२ | ९३ ३/४ |
| ६ १९३५ चे ६ १/२ दराचे ट्रेझरी बॉण्ड ... | ९९ ७/८ | १०१ ३/८ | १०१ ३/८ | १०१ ३/१ ५/१६ | १०२ | १०२ |

पॅरा ४६ मध्यें उल्लेख केलेलीं मापें पुढीलप्रमाणें आहेत:—

| नंबर | लांबी फूट. | रुंदी फूट. | उंची फूट | माप घनफूट. |
|---|---|---|---|---|
| १ | १५ | १० | १० | १२५ |
| १ | ९५ | ११ | १·३ | २,२५६ |
| १ | २० | १८ | १० | ४०५ |
| १ | ३२ | १३ | १० | ३४६ |
| १ | ४० | १३ | १० | ४४३ |

## परिशिष्ट क.

**१९३१-३२ च्या ऑडिट नोटचा पॅरा ३८ यास अनुसरून फ्रशिंगचे पायखाने करण्याकरितां घरमालकांना कर्जे दिली त्याबाबत वसुलीचा तक्ता.**

| वर्ष | कर्जाऊ दिलेली रक्कम रु. आ. पे | वसूल केलेली रक्कम रु. आ. पे | वसूल होणें राहिलेली बाकी रु. आ. पे |
|---|---|---|---|
| **१९२९-३०** | १७००—०—० | ३०८—७—२ | १३९१—८—१० |
| **१९३०-३१** | | | |
| १९२९-३० सालांत देण्यांत आलेल्या कर्जाची वसुली ... ... .... | १३९१—८—१० | ६३४—१०—६ | ७५६—१४—४ |
| १९३०-३१ सालांत दिलेलें कर्ज .... | ४५००—०—० | ९९४—०—० | ३५०६—०—० |
| एकूण रु... | ५८९१—८—१० | १६२८—१०—६ | ४२६२—१४—४ |
| **१९३१-३२** | | | |
| १९२९-३० सालांत दिलेल्या कर्जाची वसुली. | ७५६—१४—४ | ३५३—८—० | ४०३—६—४ |
| १९३०-३१ सालांत दिलेल्या कर्जाची वसुली. | ३५०६—०—० | २११३—६—९ | १३९२—९—८ |
| १९३१-३२ मध्यें देण्यांत आलेलें कर्ज ... | ७०७५—०—० | १९७०—०—३ | ५१०४—१५—९ |
| एकूण रु... | ११३३७—१४—४ | ४४३६—१५—० | ६९००—१५—४ |
| **१९३२-३३** | | | |
| १९२९-३० सालांत दिलेल्या कर्जाची वसुली. | ४०३—६—४ | ४०३—६—३ | .... |
| सदर १९३०-३१ ... ... | १३९२—९—३ | ५५५—१५—३ | ८३६—१०—० |
| सदर १९३१-३२ ... .... | ५१०४—१५—९ | २७४३—०—० | २३६१—१५—९ |
| एकूण... | ६९००—१५—४ | ४००२—५—७ | २८९८—९—९ |

या रकमांत माफीत घातलेल्या रकमांचा समावेश केलेला नसून प्रत्यक्ष वसूल करण्यांत आलेल्या या रकमा आहेत.

एस्. आर. भागवत,

चीफ ऑफिसर.

## परिशिष्ट ड.

### १९३१–३२ च्या ऑडिटनोटचा पॅरा ३८ व याची पुरवणी.

मे. म्युनिसिपल वकील यांचा अभिप्रायः—

म्यु. ॲक्टाचें कलम १९४ (२) प्रमाणें संबंध असणाऱ्या मिळकतीमध्यें राहणाऱ्या भाडेकरी लोकांकडून म्युनिसिपल करांची रकम वसूल करण्यास व त्याप्रमाणें अट करारामध्यें घालण्यास हरकत नाहीं. परंतु त्याचा फारसा उपयोग होणार नाहीं. कारण भाडेकरी हा घरमालकाला देणें असलेली बाकी रकम तेवढीच अगर पुढें तो घरमालकाला देणार येवढीच रकम फार तर म्युनिसिपालिटीस देईल. परंतु जर घरमालकाला भाडेकऱ्यांकडून बाकी येणें नसेल तर घरमालकानें भाडेकऱ्यावर नोटीस बजावून त्याला जागा सोडण्यास भाग पाडलें तर भाडेकऱ्याकडून रकम वसूल करतां येणार नाहीं.

खरी नक्कल.

एस्. आर. भागवत,
चीफ ऑफिसर.

## परिशिष्ट अ.

ऑडिट नोट पॅरा १२ (क) १ याचें उत्तरालगत.

नं.

पुणें शहर म्युनिसिपालिटी.

जकात कचेरी.

तारीख

मे. जकात सुपरिंटेंडेंट, पुणें शहर म्युनिसिपालिटी,

पुणें शहर;

यांजकडेः—

मेसर्स.

विषयः—चालू खातें.

मे. सरकारी हिशेबतपासनीस यांच्या सूचनेवरून यापुढें जकात वसुलीसाठीं खातेदार लोकांचे-कडे दरमहा इसम पाठविण्याची पद्धत म्युनिसिपालिटीनें बंद केलेली आहे.

यापुढें तुम्ही आपली जकात, मालाची आयात होणारें नाक्यावर दर पंधरा दिवसांनीं भरीत जावी. कारण जकातीचा पोट नियम ६ के याप्रमाणें आयात मालाबाबतच्या पट्टया आयातीचे तारखेपासून १५ दिवसांचे आंत दाखल करावयाच्या असतात.

आयात होऊन नंतर बाहेर जाणारा असा कांहीं माल यावयाचा असेल तर त्याबाबतची जकात आपणांस अगोदर द्यावयास हवी. जर निर्गत होणाऱ्या मालाचे जकातीची परती ( रिफंड ) पाहिजे असेल तर त्याकरितां जकातीच्या पोट नियमांस अनुसरून जरूर ती तजवीज करण्यांत येईल. कळावें.

जकात सुपरिंटेंडेंट,

पुणें शहर म्युनिसिपालिटी.

# पुणें शहर म्युनिसिपालिटी

## जकात खातें.

### खातेदारांचे नियम.

जकातीस पात्र असलेला जो माल बाहेरुन पुणें सिटी म्यु. ॲक्ट्रॉय लिमिटमध्यें वेळोवेळीं आयात करणेंत येईल तो खातेदारापासून मे. चीफ ऑफिसर ठरवितील ती रक्कम डिपॉझिट ठेवून घेऊन सदरील आयात होणारे मालांवर तावडतोब जकात न घेतां त्यांचे नांवें चालू खातें ठेवून सोडण्यांत यावा. सदरील व्यवस्था ठराविक मुदतीअखेर समजण्यांत यावी. या मुदतीअखेर ठेवलेली डिपॉझिटची रक्कम म्युनिसिपालिटीनें त्यांचेकडे कांहीं रक्कम देणें राहिली असल्यास ती कापून घेऊन परत करण्यांत यावी. या व्यवस्थेबाबत खातेदारांनीं पाळावयाच्या अटी येणेंप्रमाणें:—

(१) ज्याचें नांवें चालू खातें ठेवलें आहे त्यानें अगर त्याचे गुमास्त्यानें आपलें खात्यावर माल सोडणेंस कळवावा, व त्याबरोबर रेल्वे रसीदीची पावती जोडावी म्हणजे माल आयात करणाराची सही घेऊन माल सोडण्यांत येईल.

(२) खातेदारांस प्रत्येक महिन्याचा तक्ता दिला जाईल तो त्यास मिळतांच १० दिवसांत रुजवात घेऊन जकातीचा एकूण आंकडा त्याबाबत नेमलेल्या म्युनिसिपल ऑफिसरांस देऊन जकात भरुन म्यु. टीची ऑफिशिअल रसीद घ्यावी. त्याप्रमाणें तो ( खातेदार ) करण्यास चुकल्यास त्याजकडे जी मागील बाकी देणें असेल ती वसूल करणेंकरितां बॉम्बे सिटी म्यु. ॲक्ट,१८ सन १९२५ चा यांतील चॅप्टर ८ अन्वयें म्यु. कराची बाकी वसूल करणेंबाबत जे नियम आहेत त्या अन्वयें बाकी वसूल करणेची तजवीज म्यु. टी कडून करणेंत येईल. व शिवाय त्यानें ठेविलेलें डिपॉझिटचे रकमेंतून ही बाकी वसूल करणेंत येईल. व त्यांचे नांवें चालू खातें बंद करण्यांत येऊन माल जकातीचे पैसे रोख भरलेवाचून सोडणेंचें बंद करण्यांत येईल.

(३) प्रत्येक महिन्याचा हिशोब पुरा होणेंपूर्वींच आयात मालापैकीं कांहीं माल निर्गत झाल्यास तो माल कोणते तारखेस आयात झालेल्या मालापैकीं आहे, त्याची खात्री करुन देऊन निर्गतीचा दाखला घेऊन तो दाखला नाकेकारकुनाजवळ देऊन त्याची नोंद चालू खात्याचे हिशेबी ठेवण्याची तजवीज करावी. येणेंप्रमाणें व्यवस्था ठेवल्यास हिशोबात निर्गतीच्या नियमाप्रमाणें विचार करणेंत येईल.

(४) निर्गत झालेले मालावरील जकातीची रक्कम खातेदाराचे नांवें जमा करुन घेतांना त्यांतून म्यु. जकात नियमांप्रमाणें शेंकडा १० टक्के कापून घेऊन रक्कम जमा करणेंत येईल.

**D. G. KALE,**
जकात सुपरिंटेंडेंट.

**S. R. BHAGWAT,**
चीफ ऑफिसर.

# पुणें शहर म्युनिसिपालिटी

## हेल्थ खात्याचा सन १९३२-३३ चा ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट

**शहरचें क्षेत्र आणि चतुःसीमाः**—अहवालाच्या सालीं शहराच्या हद्दींत व क्षेत्रफळांत कांहीं फेरफार झाला नाहीं.

### १. जननमरणाची नोंद

**लोकसंख्याः**—१९३१ च्या खानेसुमारींत गणती केल्याप्रमाणें शहरची लोकसंख्या १,६२,९०१ असून त्यापैकीं ८६,७८४ पुरुष आणि ७६,११७ स्त्रिया आहेत. पर्वती गांवाची ३६६ लोकसंख्या यांत सामील केली म्हणजे एकंदर लोकसंख्या १,६३,२६७ होते. परंतु अहवालाच्या कामाकरितां पर्वतीसुद्धां एकंदर लोकसंख्येचा आंकडा न धरतां मूळ लोकसंख्याच धरली आहे.

**जननः**—या सालीं एकंदर जननसंख्या ५,३२७ असून गेल्या सालीं ती ५,०७२ होती. लोकसंख्येच्या दर हजारास जननाचें प्रमाण ३२.६७ पडत असून गेल्या सालीं तें ३१.१३ होतें. यावरून जननांचें प्रमाण समाधानकारक आहे असें दिसून येईल.

**उपजत मृत्युः**—अहवालाच्या सालीं उपजत मृत्यु ३३५ असून त्याच्या पूर्वीच्या सालीं ते २४२ होते. पुढील तक्त्यावरून उपजत मृत्यु धरून व ते सोडून जननसंख्या किती होती हें दिसून येईल.

| वर्ष | उपजत मृत्यु धरून जनन व मरण | | | | उपजत मृत्यु सोडून जनन व मरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जनन | जननांचें हजारीं प्रमाण | मृत्यु | मृत्यूंचें हजारीं प्रमाण | जनन | जननांचें हजारीं प्रमाण | मृत्यु | मृत्यूंचें हजारीं प्रमाण |
| १९२८–२९ | ४,६२९ | ३४.७४ | ५,२६४ | ३९.५४ | ४,४६८ | ३३.५३ | ५,२६४ | ३९.५४ |
| १९२९–३० | ५,४२५ | ४०.७२ | ६,४९६ | ४८.८० | ५,२३४ | ३९.२८ | ६,४९६ | ४८.८० |
| १९३०–३१ | ५,०९६ | ३८.२५ | ५,०१७ | ३७.६९ | ४,४८० | ३६.६३ | ५,०१७ | ३७.६९ |
| १९३१–३२ | ५,३१४ | ३२.६२ | ५,७१२ | ३५.०५ | ५,०७२ | ३१.१३ | ५,७१२ | ३५.०५ |
| १९३२–३३ | ५,६६२ | ३४.७४ | ५,४१९ | ३३.१९ | ५,३२७ | ३२.६७ | ५,४१९ | ३३.१९ |

उपजत-मृत्यु मृत्युसंख्येंत धरले नाहींत.

पुढील तक्त्यावरून गेल्या पांच वर्षांतील महिनेवार जननसंख्या कळून येईल.

| महिने | १९२८–२९ | १९२९–३० | १९३०–३१ | १९३१–३२ | १९३२–३३ | १९३२–३३ मध्यें खबर दिलेली जननसंख्या. | १९३२–३३ मध्यें चौकशीत कळलेली जनन सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल | २१३ | ३९८ | ४८० | ४७६ | ४२४ | २३९ | १८५ |
| मे | २४३ | ३८३ | ४२२ | ३७० | ४३५ | २६३ | १७२ |
| जून | १९० | ३५५ | ३४८ | ३९२ | ३७८ | २४९ | १२९ |
| जुलै | २२९ | ३६९ | ४३० | ४७० | ४२१ | २६६ | १५५ |
| ऑगस्ट | ३२४ | ४०३ | ४७६ | ६७५ | ४६६ | ३१३ | १५३ |
| सप्टेंबर | २१९ | ४०९ | ४३२ | ४५६ | ५४० | ३४९ | १९१ |
| आक्टोबर | २७५ | ४५४ | ४४१ | ४५६ | ५०८ | ३३३ | १७५ |
| नोव्हेंबर | २४७ | ४८९ | ४०५ | ४३५ | ४७३ | ३१९ | १५४ |
| डिसेंबर | २१७ | ४७५ | ३७९ | ४१७ | ४४५ | ३१४ | १३१ |
| जानेवारी | २३३ | ४२७ | ३३९ | ३८२ | ४०७ | २७२ | १३५ |
| फेब्रुवारी | १७९ | ५०३ | ३२५ | ३६४ | ३६७ | २५३ | ११४ |
| मार्च | २२८ | ५७४ | ४०३ | ३९५ | ४६३ | २७५ | १८८ |
| एकूण... | २,७९७ | ५,२३९ | ४,८८० | ५,२८८ | ५,३२७ | ३,४४५ | १,८८२ |

अहवालाच्या सालीं खबर दिलेली जननसंख्या व चौकशींत कळलेली जननसंख्या दोन निर-निराळ्या कॉलममध्यें दाखविली आहे.

जास्तींत जास्त जननसंख्या सप्टेंबर १९३२ महिन्यांत होती व फेब्रुवारी १९३३ महिन्यांत ती सर्वांत कमी होती.

**एकंदर मृत्यु:**—अहवालाच्या सालीं एकंदर मृत्यु ५,४१९ असून पूर्वीच्या सालीं ते ५,७१२ होते. मृत्युसंख्येचें लोकसंख्येच्या दर हजारीं प्रमाण या सालीं ३३·१९ होतें व गेल्या सालचें प्रमाण ३५·०५ होतें.

पुढील तक्त्यामध्यें स्त्री-पुरुषांचे पेठवार मृत्यु व त्यांचें लोकसंख्येशीं दरहजारीं प्रमाण दिलें आहे.

| पेठ | एकूण मृत्यु | | | १००० लोकसंख्येला मृत्यूचें प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | |
| शुक्रवार | ३७५ | ३४४ | ७१९ | ४१·६० |
| वेताळ | १३९ | १३२ | २७१ | ३९·४२ |
| गंज, घोरपडे | १६१ | १५३ | ३१४ | २७·६२ |
| रविवार | २३६ | १९८ | ४३४ | ३४·१२ |
| गणेश | ११२ | ८८ | २०० | ४०·०३ |
| बुधवार | १५० | १४१ | २९१ | ३१·७५ |
| सदाशिव | २६८ | २५६ | ५२४ | २९·७१ |
| नारायण | १०८ | १०६ | २१४ | ३०·८६ |
| शनवार | १६५ | १५८ | ३२३ | ३०·३८ |
| भवानी | १७० | १६७ | ३३७ | २८·८९ |
| नाना | २१८ | १९४ | ४१२ | ४३·२१ |
| रास्ते, निहाल | ९१ | ९० | १८१ | २५·८८ |
| कसबा | २७४ | २५० | ५२४ | ३५·३० |
| सोमवार | १०५ | १११ | २१६ | २८·४१ |
| मंगळवार | ७३ | ७० | १४३ | ३२·५० |
| भांबुर्डा | १५५ | १४२ | २९७ | २९·११ |
| पुलाची वाडी | १० | ९ | १९ | |
| | २,८१० | २,६०९ | ५,४१९ | |

महिनेवार व स्त्री-पुरुषवार मृत्युसंख्या दाखविणारा तक्ता.

| महिना | एकूण मृत्यु | | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | | |
| एप्रिल | २४६ | २५७ | ५०३ | |
| मे | २३१ | २५३ | ४८४ | |
| जून | १८९ | १८३ | ३७२ | |
| जुलै | १९७ | १७९ | ३७६ | |
| ऑगस्ट | २२३ | १७२ | ३९५ | |
| सप्टेंबर | २५८ | २४४ | ५०२ | |
| आक्टोबर | २२९ | २५७ | ४८६ | |
| नोव्हेंबर | २५४ | २०८ | ४६२ | |
| डिसेंबर | २२६ | २०६ | ४३२ | |
| जानेवारी | २५८ | १९८ | ४५६ | |
| फेब्रुवारी | २०१ | १७६ | ३७७ | |
| मार्च | ३९८ | २७६ | ५७४ | |
| एकूण | २,८१० | २,६०९ | ५,४१९ | |

मार्च १९३३ मध्यें सर्वांत जास्त मृत्यु नोंदले गेले असून जून १९३२ महिन्यांत ते सर्वांत कमी होते.

जातवार मृत्यु व त्या जातींच्या लोकसंख्येच्या दर हजारीं मृत्यूंचें प्रमाण पुढील तक्त्यावरून कळून येईल.

| जाती | लोकसंख्या | १००० लोकसंख्येशीं मृत्यूंचें प्रमाण | एकंदर मृत्यु |
|---|---|---|---|
| हिंदु | १,४२,०१२ | ३४·३८ | ४,८८२ |
| मुसलमान | १५,०३८ | ३१·३८ | ४७२ |
| इतर जाती | ५,८५१ | ११·११ | ६५ |
| एकूण | १,६२,९०१ | | ५,४१९ |

**बालमृत्युः**—अहवालाच्या सालीं बालमृत्यु २,०६४ असून पूर्वीच्या सालीं ते २,१२६ होते. पुढील तक्त्यामध्यें बालमृत्यूंचे महिनेवार आंकडे दिले आहेत.

| महिने | बालमृत्यु | शेरा |
|---|---|---|
| एप्रिल | २०७ | |
| मे | १९२ | |
| जून | १३८ | |
| जुलै | १६१ | |
| ऑगस्ट | १५७ | |
| सप्टेंबर | २२७ | |
| आक्टोबर | १९३ | |
| नोव्हेंबर | १६३ | |
| डिसेंबर | १४६ | |
| जानेवारी | १५२ | |
| फेब्रुवारी | १२४ | |
| मार्च | २०४ | |
| एकूण | २,०६४ | |

जास्तींत जास्त बालमृत्यु सप्टेंबर १९३२ महिन्यांत असून सर्वांत कमी फेब्रुवारी १९३३ महिन्यांत होते.

**मुलांचे मृत्युः**—या सालीं तीन वर्षांखालील मुलांची मृत्युसंख्या २,८२६ असून पूर्वीच्या सालीं २,९६७ होती.

पुढील तक्त्यावरून उपजत मृत्यु वगळले असतां गेल्या पांच वर्षांत लहान मुलांची मृत्युसंख्या काय होती हें दिसून येईल.

| वर्ष | उपजत मृत्यूंची संख्या | तीन वर्षांचे आंतील शिशु मृत्यूंची संख्या उपजत मृत्यु सोडून |
|---|---|---|
| १९२८–२९ | १६१ | २,८२२ |
| १९२९–३० | १९१ | ३,६७९ |
| १९३०–३१ | २१६ | २,५१० |
| १९३१–३२ | २४२ | २,९६७ |
| १९३२–३३ | ३४५ | २,८७६ |

अहवालाच्या सालीं झालेले बालमृत्यु आणि लहान मुलांचे मृत्यु पुढील तक्त्यांत महिनेवार दिले आहेत.

| महिने | ५ वर्षांचे आंतील मुलांच्या मृत्यूंची संख्या बालमृत्यू धरून | बालमृत्यु |
|---|---|---|
| एप्रिल | २८९ | २०७ |
| मे | २६९ | १९२ |
| जून | २०२ | १३८ |
| जुलै | २१४ | १६१ |
| ऑगस्ट | २२८ | १५७ |
| सप्टेंबर | ३०३ | २२७ |
| आक्टोबर | २६४ | १९३ |
| नोव्हेंबर | २३४ | १६३ |
| डिसेंबर | १९८ | १४६ |
| जानेवारी | २११ | १५२ |
| फेब्रुवारी | १७१ | १२४ |
| मार्च | २९३ | २०४ |
| | २,८७६ | २,०६४ |

अहवालाच्या सालीं सांथीच्या रोगानें झालेले मृत्यु पुढील तक्त्यामध्यें दिले आहेत.

| जात | देवी | | | प्लेग | | | कॉलरा | | | गोवर | | | जंतुजन्य रोगांपासून एकंदर मृत्यु. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| हिंदु ... | १५ | २६ | ४१ | १६ | ६ | २२ | १ | २ | ३ | ७४ | ७६ | १५० | १०६ | ११० | २१६ |
| मुसलमान ... | १ | ३ | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ८ | ४ | १२ | १० | ७ | १७ |
| इतर जाती... | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | २ | ० | २ |
| | १६ | २९ | ४५ | १८ | ६ | २४ | १ | २ | ३ | ८३ | ८० | १६३ | ११८ | ११७ | २३५ |

या सालीं उंदीर व घुशी यांचा संहार केल्याचे आंकडे महिनेवार खालील तक्त्यांत दिले आहेत.

| महिने | उंदीर | घुशी |
| --- | --- | --- |
| एप्रिल | ४,२७१ | ७९ |
| मे | ३,७६७ | १२४ |
| जून | ३,५२३ | ७९ |
| जुलै | ९,१५२ | १६६ |
| ऑगस्ट | ११,६१३ | ३६९ |
| सप्टेंबर | १०,८९१ | ३१० |
| आक्टोबर | १०,१२१ | ४८४ |
| नोव्हेंबर | १०,५८० | ५१४ |
| डिसेंबर | १४,८४४ | ८०४ |
| जानेवारी | ११,७८५ | ८१४ |
| फेब्रुवारी | ५,८१६ | ५४६ |
| मार्च | ६,०६९ | ४७४ |
| | १,०२,४३२ | ४,७६३ |

११८ मेलेले उंदीर तपासण्यांत आले व त्यांपैकीं ४६ प्लेग दूषित आढळले. व मेलेल्या वीस घुशीं-पैकीं १० दूषित आढळून आल्या.

**इनॉक्युलेशन**:—प्लेगच्या रोग्याच्या संसर्गात रहाणाऱ्या व त्या भागांत वसती करणाऱ्या इतर लोकांना तावडतोब इनॉक्युलेशन करण्यांत आलें. म्युनिसिपल दवाखान्यावरील सहा डॉक्टरांशिवाय दोन स्पेशल टोंचणारे डॉक्टर नेमण्यांत आले. अहवालाच्या साल अखेरपर्यंत २१,६६८ लोकांना टोंचलें.

**घरें धुणें व शुद्ध करणें**:—शहरांतील सर्व दूषित घरें धुवून शुद्ध केलीं.

**कॉलरा**:—या सालीं कॉलऱ्यापासून तीन मृत्यु झाले असून गेल्या सालीं १५ झाले होते.

**देवी**:—देवीपासून ४५ मृत्यु झाले असून पूर्वीच्या सालांत ते ६ होते.

**गोंवर**:—अहवालाच्या सालीं गोवरापासून १६३ मृत्यू झाले. पूर्वीच्या सालांत ते ६९ होते.

**हिंवताप**:—हिंवतापानें ४३२ मृत्यू झाले. मागच्या वर्षी ४०९ झाले होते.

पुढील तक्त्यांत, अहवालाच्या सालांत, हिंवतापानें झालेली मृत्युसंख्या महिनेवार व पेठवार दाखविली आहे.

## मलेरिया

| अनुक्रम नंबर | पेठ | | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शुक्रवार | ... | १ | ४ | ५ | ३ | २ | ४ |
| २ | वेताळ | ... | १ | १ | ० | ० | १ | १ |
| ३ | गंज, घोरपडे | ... | १ | २ | ३ | २ | ० | ० |
| ४ | रविवार | ... | २ | ० | ० | १ | १ | ३ |
| ५ | गणेश | ... | १ | १ | ३ | १ | ३ | ० |
| ६ | बुधवार | ... | ० | २ | १ | ० | ० | २ |
| ७ | सदाशिव | ... | ३ | १ | ० | ५ | १ | ४ |
| ८ | नारायण | ... | २ | १ | १ | २ | ० | ० |
| ९ | शनवार | ... | ३ | ० | ० | ४ | १ | २ |
| १० | भवानी | ... | २ | ४ | १ | २ | ४ | १ |
| ११ | नाना | ... | ४ | ० | २ | ४ | २ | ७ |
| १२ | राम्ते, निहाल | ... | ० | ३ | १ | ० | ० | १ |
| १३ | कसबा | ... | १ | २ | ३ | ५ | ३ | ६ |
| १४ | सोमवार | ... | ० | १ | ० | १ | ० | ३ |
| १५ | मंगळवार | ... | ० | १ | ० | १ | १ | ३ |
| १६ | भांबुर्डा | ... | २ | ३ | १ | १ | ५ | २ |
| १७ | पुलाची वाडी | ... | ० | १ | ० | ० | ० | ० |
| | | | २३ | २७ | २१ | ३२ | २४ | ३९ |

## सन १९३२-३३

| आक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एकूण बेरीज | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ६ | ५ | ४ | ५ | ५४ | |
| १ | १ | ३ | ४ | ४ | १ | १८ | |
| ३ | ३ | ६ | ३ | ४ | ५ | ३२ | |
| ३ | ३ | ३ | १ | ४ | ० | २१ | |
| १ | ३ | २ | ३ | २ | ३ | २३ | |
| १ | १ | ० | २ | १ | १ | ११ | |
| ४ | ० | ३ | ० | ४ | १ | २६ | |
| २ | १ | २ | ० | २ | ५ | १८ | |
| १ | ४ | १ | ३ | १ | १ | २१ | |
| ५ | ६ | ४ | ६ | ४ | ९ | ४८ | |
| २ | ३ | ३ | ३ | ३ | ११ | ४४ | |
| ० | १ | १ | १ | २ | १ | ११ | |
| २ | ३ | ० | ५ | ३ | ५ | ३८ | |
| ० | ० | ० | ३ | ३ | २ | १३ | |
| ३ | ५ | ० | १ | १ | २ | १८ | |
| २ | ५ | ५ | २ | १ | ५ | ३४ | |
| ० | १ | ० | ० | ० | ० | २ | |
| ३७ | ४८ | ३९ | ४२ | ४३ | ५७ | ४३२ | |

**क्षय:**—क्षयानें या सालीं ५०७ माणसें मेलीं, पूर्वीच्या सालांत ती संख्या ५११ होती. क्षयरोगानें झालेले पेठवार मृत्यु पुढील तक्त्यांत दिले आहेत:—

| पेठ | क्षयानें झालेली मृत्यूंची संख्या |
|---|---|
| शुक्रवार | ९० |
| वेताळ | २९ |
| गंज, घोरपडे | ३० |
| रविवार | ५६ |
| गणेश | १९ |
| बुधवार | ३१ |
| सदाशिव | ४१ |
| नारायण | १७ |
| शनवार | २६ |
| भवानी | ३२ |
| नाना | ३५ |
| रास्ते, निहाल | १८ |
| कसबा | ४५ |
| सोमवार | १८ |
| मंगळवार | ४ |
| भांबुर्डा | १४ |
| पुलाची वाडी | २ |
| | ५०७ |

पुढील तक्त्यावरून क्षयरोगानें झालेले महिनेवार मृत्यु कळून येतील.

| महिने | क्षयरोगानें झालेली मृत्युसंख्या. |
|---|---|
| एप्रिल १९३२ | ४४ |
| मे „ | ४७ |
| जून „ | ३१ |
| जुलै „ | ३६ |
| ऑगस्ट „ | ४० |
| सप्टेंबर „ | ३० |
| आक्टोबर „ | ५१ |
| नोव्हेंबर „ | ५० |
| डिसेंबर „ | ३८ |
| जानेवारी १९३३ | ५३ |
| फेब्रुवारी „ | ३८ |
| मार्च „ | ४९ |
| | ५०७ |

**हागवण आणि आमांशः**—हागवणीनें २४४ व आमांशानें १२ असे मृत्यु अहवालाच्या सालांत झाले. मागील सालीं ते अनुक्रमें २६६ व १० होते.

## २. आरोग्य खात्याचा कारभार

आरोग्य खात्याच्या अधिकारी मंडळींत या सालीं एक सॅनिटरी इन्स्पेक्टरची वाढ झाली आहे. शहरच्या वाढत्या लोकसंख्येमुळें व पर्वती गांवाचा समावेश शहरहद्दींत झाल्यानें वरील इन्स्पेक्टर यांची नेमणूक झाली आहे. या खेरीज अधिकारी मंडळींत दुसरा फेरफार झालेला नाहीं.

**म्युनिसिपालिटीचे धर्मार्थ दवाखानेः**—म्युनिसिपालिटीचे सात धर्मार्थ दवाखाने असून त्यांपैकीं सहा इंग्रजी व एक आयुर्वेदिक आहे. ता. २५ आक्टोबर १९३२ रोजीं भांबुर्डा येथें उघडण्यांत आलेल्या नवीन दवाखान्यानें आपली आवश्यकता सिद्ध केली आहे.

अहवालाच्या सालीं ह्या दवाखान्यांत किती रोग्यांनीं औषध घेतलें हें पुढील तक्त्यावरून दिसून येईलः—

| नंबर | दवाखान्याचें नांव | नवे रोगी | जुने रोगी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | लकडीपूल | ९,१४४ | २९,७४६ | ३८,८९० |
| २ | सदाशिव पेठ (आयुर्वेदिक) | ८,०८९ | ४१,३१४ | ४९,४०३ |
| ३ | शनिवार पेठ | ७,९७५ | २२,२०४ | ३०,२२९ |
| ४ | कसबा पेठ | १०,३५६ | २९,१०३ | ३९,४५९ |
| ५ | गंज पेठ | ९,३८४ | ३०,४७२ | ३९,८५६ |
| ६ | भवानी पेठ | ९,२३४ | २३,२०७ | ३२,४४१ |
| ७ | भांबुर्डा पेठ<br>(ता. २५-१०-३२ पासुन) | ३,३७८ | ९,२४५ | १२,६२३ |
| | एकूण | ५७,५६० | १,८५,३४१ | २,४२,९०१ |

**सांसर्गिक रोगांचें इस्पितळः**—शहर म्युनिसिपालिटीच्या हद्दींतील १९१ रोग्यांना या इस्पितळांत औषधोपचार करण्यांत आले. गेल्या सालीं १७७ रोग्यांना करण्यांत आले होते. या इस्पितळास अहवालाच्या सालीं म्युनिसिपालिटीनें रुपये १२, ४३९ चालू खर्चाचा हिस्सा म्हणून दिले.

सन १९३२-३३ सालांत शहरच्या हद्दींतून जे रोगी या इस्पितळांत घेण्यांत आले, त्यांमध्यें कोणच्या रोगाचे लोक कोणच्या महिन्यांत किती घेण्यांत आले तें खालील कोष्टकांत दिलें आहे

| अनुक्रम नंबर | रोग | एप्रिल १९३२ | मे " | जून " | जुलै " | ऑगस्ट " | सप्टेंबर " | आक्टोबर " | नव्हेंबर " | डिसेंबर " | जानेवारी १९३३ | फेब्रुवारी " | मार्च " | एकंदर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कांजण्या | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ५ | ४ | १७ |
| २ | डांग्या खोकला | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ३ | धनुर्वात | ५ | १ | १ | २ | १ | २ | १ | ० | २ | ३ | १ | ४ | २३ |
| ४ | घटसर्प | १ | १ | ० | २ | १ | १ | १ | ० | ० | २ | १ | ० | १० |
| ५ | इसब | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ६ | गोंवर | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | २ | १२ | १७ |
| ७ | गालगुंड | ० | १ | १ | ० | ४ | ५ | ० | ० | ४ | १४ | ४ | ० | ३३ |
| ८ | खरूज | ० | १ | ० | २ | ० | १ | ० | १ | २ | १ | ३ | १ | १२ |
| ९ | एन्फ्ल्युएन्झा | ० | ० | २ | ० | २ | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | ७ |
| १० | विसर्प | ० | ० | ० | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | १ | ० | ५ |
| ११ | कुत्रा चावणें | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| १२ | त्वग्रोग | ० | ० | ० | १ | २ | ० | १ | २ | ० | ४ | ९ | ० | १८ |
| १३ | एन्फ्लुक्युरा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| १४ | अतिसार | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ३ |
| १५ | मस्तिष्कावरणदाह | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| १६ | पुरळ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १७ | फेव्हर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| १८ | देवी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ० | ४ |
| १९ | प्लेग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ | २० | २६ |
| २० | सेल्युलायटीज | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| २१ | हिंवताप | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| २२ | निमोनिया | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकूण | १० | ६ | ५ | ९ | १४ | १२ | ५ | ५ | ११ | ३३ | ३३ | ४८ | |

अहवालाच्या साली या इस्पितळांत शहर म्युनिसिपालिटीच्या हद्दीतून गेलेल्या रोग्यांची जातवारी व रोगवारी पुढील तक्त्यावरून समजेलः—

| अनुक्रम नंबर | जात | कांजण्या | डांग्या खोकला | धनुर्वात | घटसर्प | इसब | गोवर | गालगुंड | खरूज | एन्फ्ल्युएन्झा | विसर्प | कुत्रा चावणें | क्षयरोग | अतिसार | मस्तिष्कावरणदाह | पुरळ | फेन्गस | देवी | प्लेग | सेल्युलायटीज | हिवताप | निमोनिया | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ख्रिश्चन | ६ | १ | ० | १ | १ | १४ | ४ | ३ | १ | ० | ० | ६ | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ० | ० | ४१ |
| २ | मराठा | २ | १ | १० | २ | ० | ० | ८ | २ | १ | ० | १ | ५ | ३ | १ | १ | ० | १ | ६ | ० | १ | ० | ४५ |
| ३ | सोनार | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| ४ | महार | ० | ० | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| ५ | ब्राह्मण | ० | ० | २ | २ | ० | ० | १७ | १ | ३ | ३ | ० | ३ | ० | १ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३४ |
| ६ | मलबारी | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ३ |
| ७ | मांग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | १ | १ | ० | ८ |
| ८ | भोई | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ९ | वनिया | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| १० | कोळी | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ११ | मुसलमान | १ | ० | १ | १ | ० | ३ | १ | १ | ० | २ | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १५ |
| १२ | परदेशी | २ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| १३ | तेली | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| १४ | माळी | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| १५ | मद्रासी | २ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| १६ | ज्यू | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| १७ | जैन | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १८ | रजपूत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १९ | बोहरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २० | धोबी | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २१ | लिंगायत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| २२ | मारवाडी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० | ४ |
| २३ | कामाटी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |  | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ४ |
| २४ | साळी | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| २५ | गौळी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| २६ | शिंपी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| २७ | चांभार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
|  | एकंदर | १७ | २ | २३ | १० | १ | १७ | ३३ | १२ | ८ | ५ | ३ | १८ | ३ | २ | १ | १ | ४ | २६ | २ | २ | १ | १९१ |

**म्युनिसिपालिटीच्या दायाः**—अहवालाच्या सालीं म्युनिसिपालिटीच्या दोन्ही दायांनीं मिळून ४६० बाळंतपणें केलीं. गेल्या सालीं ४२२ केलीं होतीं. या सुईणींनीं केलेल्या बाळंतपणांची जातवारी पुढील तक्त्यांत महिनेवार दिलेली आहे.

| महिने | हिंदु | मुसलमान | खिश्चन | इस्रायल | महार | मांग | भंगी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल १९३२ | २४ | १३ | ० | ० | ० | ३ | १ | १३ |
| मे " | २३ | ५ | ० | ० | २ | ३ | ० | ६ |
| जून " | २७ | ४ | ४ | ० | १ | २ | १ | ३३ |
| जुलै " | ३४ | १० | १ | ० | १ | ० | १ | ४७ |
| ऑगस्ट " | २९ | ८ | ० | ० | १ | १ | ० | ३९ |
| सप्टेंबर " | २१ | ७ | २ | ० | २ | १ | १ | ३४ |
| आक्टोबर " | ३६ | ४ | १ | ० | १ | २ | २ | ४६ |
| नोव्हेंबर " | २२ | १० | ० | ० | २ | ३ | १ | ३८ |
| डिसेंबर " | २५ | ७ | ० | १ | ० | २ | ० | ३५ |
| जानेवारी १९३३ | २० | ९ | ० | १ | १ | ४ | ० | ३५ |
| फेब्रुवारी " | २२ | १६ | ० | ० | २ | ३ | ० | ४३ |
| मार्च " | २४ | ५ | ० | ० | ० | ४ | ० | ३३ |
| एकूण ... | ३०७ | ९८ | ५ | २ | १३ | २८ | ७ | ४६० |

**नोटिसा व खटले:**—पुढें दिलेल्या तक्त्यांमध्यें अहवालाच्या सालीं आरोग्य खात्यानें केलेल्या नोटिसा त्यांच्या निकालासह पेठवार दिल्या आहेत.

| क्र. नं. | पेठ | घरवाल्यांनीं कामें केलीं त्यांचा आकडा | रद्द केलेल्या नोटिसांचा आंकडा | कायदेशीर खटले भरले त्यांचा आंकडा | तजवीज अद्याप चालू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शुक्रवार ... | ३०१ | २० | ३५५ | ३४ | ७१० |
| २ | वेताळ ... | १३० | १० | १६७ | ६१ | ३६८ |
| ३ | गंज, घोरपडे, गुलटेकडी | ८० | ० | ११९ | ७५ | २७४ |
| ४ | रविवार ... | ३११ | १६ | २५४ | १४ | ५९५ |
| ५ | गणेश ... | ७३ | ११ | ३९ | १२ | १३५ |
| ६ | बुधवार ... | १५७ | १२ | १३६ | १६ | ३२१ |
| ७ | सदाशिव ... | २०७ | ८२ | ४४३ | ६४ | ७९६ |
| ८ | नारायण ... | १३२ | ० | १९ | ३ | १५४ |
| ९ | शनवार ... | २१५ | ६६ | १७ | १० | ३०८ |
| १० | भवानी | ३०४ | ३ | २८० | ६५ | ६५२ |
| ११ | नाना ... | ३०५ | ४ | १५९ | २४ | ४९२ |
| १२ | रास्ते न्याहाल ... | १९५ | ८ | १०० | १९ | ३२२ |
| १३ | कसबा ... | १९९ | ४२ | २२२ | ० | ४६३ |
| १४ | सोमवार ... | ११८ | १३ | ११५ | ११ | २५७ |
| १५ | मंगळवार ... | ९३ | ९ | १२२ | १४ | २३८ |
| १६ | भांबुर्डा ... | १८३ | १४ | २०५ | २० | ४२२ |
| १७ | पुलाची वाडी ... | ५८ | २ | ५० | ४० | १५० |
| १८ | पर्वती ... | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण ... | ३,०६१ | ३१२ | २,८०२ | ४८२ | ६,६५७ |

अहवालाच्या सालीं म्युनिसिपल मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत दाखल केलेल्या खटल्यांचे निकाल पुढील तक्त्यावरून दिसून येतील.

मे. स्पेशल मॅजिस्ट्रेटसाहेब म्यु. लि. पुणें यांचे कोर्टांत दाखल केलेल्या खटल्यांच्या निकालाचा तक्ता.

| महिना | सजा झालेले | दंड | काढून घेतले | सोडून दिले | कमी केले | काढून टाकले | एकूण | फिर्यादी प्रत्येक महिन्यांत दाखल केल्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| माहे मार्च १९३२ अखेर शिल्लक खटले | | रु. आ. पै. | | | | | | | ३६५ |
| एप्रिल १९३२ | २८३ | ५६६—४—० | १९८ | १८ | ११ | ४ | ५१४ | ५९७ | |
| मे " | १४५ | ३४१—८—० | १२४ | ११ | १० | २ | २९२ | ३२० | |
| जून " | ३०५ | ५१४—८—० | २०८ | १५ | ६३ | ७ | ४९८ | ४७२ | |
| जुलै " | २३५ | ४३८—८—० | १७२ | १९ | १८ | ४ | ४४८ | २३३ | |
| ऑगस्ट " | २३३ | ४२३—०—० | २०८ | ९ | ११ | ६ | ४६७ | ६०३ | |
| सप्टेंबर " | १३६ | ४२०—४—० | १४९ | १८ | ५ | ३ | ३११ | २७५ | |
| ऑक्टोबर " | १८४ | २६६—६—० | ११४ | १२ | ८ | ६ | ३२४ | २९९ | |
| नोव्हेंबर " | २०० | २६५—४—० | १२३ | २१ | ३ | २ | ३४९ | ४३७ | |
| डिसेंबर " | २३३ | २३८—४—० | १४३ | ११ | १९ | ३ | ४०९ | १६४ | |
| जानेवारी १९३३ | १२५ | १४४—०—० | ४६ | ७ | १३ | ० | १९१ | ४२२ | |
| फेब्रुवारी " | २७० | ३०४—१२—० | ७४ | ६ | ४९ | ३ | ४०२ | ३२३ | |
| मार्च " | २६६ | २५२—१२—० | १३६ | १७ | ८८ | २ | ५०९ | ४८८ | |
| मार्च १९३३ अखेर शिल्लक खटले | | | | | | | | ( १२८+१६०=२८८ ) | |
| एकूण | २५,१५ | ४,१७५—६—० | १,६९५ | १६४ | २९८ | ४२ | ४,७१४ | ४६३३ | |

कोंडवाडे:—म्युनिसिपालिटीच्या दोन्ही कोंडवाड्यांत अहवालाच्या सालीं किती जनावरें घातलीं व त्यांचेबद्दल दंड वगैरे किती वसूल झाला हें पुढील तक्त्यांत दिलें आहे:—

| कोंडवाड्याचें नांव | जनावरें कोंडल्याची संख्या | दंड | खाण्याचा खर्च रु. | अनामत रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|
| रेमार्केट | १,६९२ | ५५७—१०—० | ३७०—२—९ | ... | ९२७—१२—९ |
| अंबरखाना | १०,५५४ | २,४६२—१४—० | २४१०—१०—३ | ९०—५—९ | ४,९६३—१४—० |
| एकूण | १२,२४६ | ३०२०—८—० | २७८०—१३—० | ९०—५—९ | ५,८९१—१०—९ |
| मागल्या वर्षी | १३,८७० | ३२२४—८—० | २८२८—१३—३ | २३५—१—३ | ६,२८८—६—६ |

भंगी:—पाटीचे पायखाने कमी झाल्याकारणानें अहवालाच्या साल अखेरपर्यंत ४४ भंगी कमी करण्यांत आले. व त्यांना ग्रॅच्युइटी म्हणून रु. ८,८११—७—० देण्यांत आले. आतां कामावर असलेल्या भंगी लोकांची संख्या ७८ आहे.

ड्रेनेज:—ड्रेनेज कुंड्यांची संख्या ११,१९८ वरून ११,६७५ पर्यंत वाढली आहे. भांबुर्ड्यांस ड्रेनेजचे नळ टाकण्याचे कामांत प्रगति होत असून अहवालाच्या सालीं त्या पेठेंतील खड्डे व पाटीचे पायखाने यांची संख्या अनुक्रमें ४९ व १९७ पर्यंत उतरली आहे. मागल्या वर्षी या भागांतील खड्डे व पाटीचे पायखाने यांची संख्या अनुक्रमें १७२ व ३५१ अशी होती.

पुढील तक्त्यावरून ड्रेनेजच्या कामाची पुणें शहरांत गेल्या तेरा वर्षांत कशी प्रगति झाली हें दिसून येईल.

| साल | खासगी पाटीच्या हगऱ्या | सेसपूल खड्डे | ड्रेनेज कुंड्या | खाजगी फ्लशिंग पायखाने | सार्वजनिक फ्लशिंग पायखाने |
|---|---|---|---|---|---|
| १९२०–२१ | ६७८१ | ... | ७००० | २७ | ... |
| १९२१–२२ | ७९४१ | ... | ७१५५ | ९१ | २ |
| १९२२–२३ | ८१८९ | ११४८ | ७१६० | ९१ | १२ |
| १९२३–२४ | ८६७६ | ... | ७९०६ | १३७ | १४ |
| १९२४–२५ | ९५८८ | ... | ८१७८ | ४२६ | २६ |
| १९२५–२६ | ८४०६ | ८८४ | ८६६५ | ५६५ | ४२ |
| १९२६–२७ | ९३९७ | ७५७ | ८८७६ | ११४० | ७१ |
| १९२७–२८ | ८३५३ | ६५६ | ९५७१ | १७२९ | १५३ |
| १९२८–२९ | ७६२९ | ५९५ | ९९७० | २१०६ | २०७ |
| १९२९–३० | ६८०९ | ४६२ | १०१९४ | ३७९३ | ३३७ |
| १९३०–३१ | ४००० | ३१२ | १०७९१ | ७१२७ | ४६९ |
| १९३१–३२ | १६८६ | २८४ | १११६८ | ९३६० | ५१४ |
| १९३२–३३ | ४३८ | ८९ | ११६७५ | १०३०३ | ५४० |

**कच्चीं गटारें**:—या गटारांत कांहीं सुधारणा झाली नाहीं व गेल्या दोन वर्षांत विशेषतः पावसाळ्यांत त्यांच्यापासून झालेला बराचसा उपसर्ग अद्याप तसाच चालू आहे.

**सार्वजनिक पायखाने**:—शहरांतील सार्वजनिक फ्लशिंग पायखान्यांच्या हगऱ्यांची संख्या आतां ५१४ वरून ५४० पर्यंत वाढली आहे.

**सार्वजनिक मुताऱ्या**:—शहरांतील सार्वजनिक फ्लशिंग मुताऱ्यांची संख्या सध्यां २१२ आहे. कांहीं अस्तित्वांत असलेल्या मुताऱ्या काढून टाकण्यांत आल्या.

**खाजगी पायखाने**:—खाजगी फ्लशिंग पायखाने १०,३०३ आहेत. गेल्या सालीं ९,३६० होते. या सालांत पाटीच्या पायखान्यांची संख्या १,६०६ वरून ४३८ पर्यंत कमी झाली आहे.

**वॉश प्रिव्हि हातानें पाणी टाकून स्वच्छ करण्याचे पायखाने**:—वॉश प्रिव्हींची एकंदर संख्या २२९ वरून ३२२ पर्यंत वाढली आहे.

**खड्डे**:—शहरांतील मैल पाण्याच्या खड्ड्यांची संख्या २८५ वरून ८९ पर्यंत उतरली आहे. यांपैकीं एकट्या भांबुर्ड्यास ४९ खड्डे आहेत.

**कचरा वहातूक**:—कचरा डेपोकरितां जागा पसंत करण्याचा प्रश्न फिरून उपस्थित झाला आहे. कारण पर्वती सर्व्हे नं. १२८ ची म्युनिसिपालिटीनें पसंत केलेली जागा सरकारला मान्य नाहीं. आतां पूना पौड रस्त्यावरील जागा कायम करण्याशिवाय म्युनिसिपालिटीस गत्यंतर नाहीं. या नवीन जागेकडे कचरा वहातूक करण्याचें काम नेहमींच पण विशेषतः पावसाळ्यांत खर्चाचें, त्रासदायक व एकंदरींत सोईचें गैरसोईचें होणार आहे. तरी देखील ही नवीन जागा कचराडेपोसाठीं उपयोगांत आणण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

कचरावहातुकीचें काम म्युनिसिपालिटीनें स्वतःच केलें. व गाडीवाल्यांनीं व इतर कनिष्ट नोकरांनीं या बाबतींत कांहीं त्रास दिला नाहीं. म्युनिसिपालिटीचे बरेच बैल पायाच्या व तोंडाच्या रोगानें अजारी होते.

अहवालाच्या सालांत कचरा व खतविक्रीपासून झालेलें उत्पन्न त्याच्या पूर्वीच्या सालांतील उत्पन्नासह पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

| बाब | १९३१–३२ | | | १९३२–३३ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै |
| गाडवांचे पास | ५१० | ० | ० | ६० | ० | ० |
| कचऱ्यांच्या गाड्या | ४१६६ | १३ | ११ | ५,४६९ | १२ | ९ |
| कचरा पेट्या | २५४ | ४ | ० | ३५२ | ७ | ० |
| अंबिल ओढा डेपो | ३३४१ | ८ | ० | २,४१७ | १२ | ० |
| एकूण | ८२७२ | ९ | ११ | ८,२९९ | १५ | ९ |

**घरें धुवून शुद्ध करणें:**—घरें धुण्याच्या कामावर एक मोकादम व तीन बिगारी असून त्यांनीं या सालांत शहरांतील ५४४ घरें धुवून शुद्ध केलीं. या लोकांनीं सार्वजनिक मुताऱ्या देखील डिसूइन्फेक्ट केल्या. प्रत्येक मुतारी आठवड्यांतून एकदां धुतली गेली.

**मांस मार्केटें व कमेले:**—यांची संख्या पूर्वीइतकींच आहे. नवीन बांधलेल्या मासेमार्केटांतील बहुतेक सर्व गाळे रिकामे आहेत व या गोष्टीकडे म्युनिलिपालिटीचें लक्ष वेधलें आहे. अहवालाच्या सालीं म्युनिसिपालिटीच्या कत्तलखान्यांत कापल्या गेलेल्या शेळ्या-मेंढ्यांची संख्या ४८,९६९ असून पूर्वीच्या सालीं ती ५३,७४४ होती. कोंढव्याच्या कत्तलखान्यांत कापलेल्या जनावरांची संख्या २,१८९ असून पूर्वीच्या सालीं ती २०८३ होती. बकरकटाई फी व म्युनिसिपालिटीच्या मांसमार्केटांतील गाळ्यांचें भाडें यापासून या सालीं रु. १०,६५२–१३–० उत्पन्न आलें असून पूर्वीच्या सालांत तें रु. १०,७७२–१०–० होतें. या सालीं १५९ म्हशी व १,४३६ बकरीं कापण्यास नालायख म्हणून कापूं दिलीं नाहींत. पूर्वीच्या सालीं ही संख्या अनुक्रमें १८६ व १५४६ अशी होती.

**शहरच्या गरजा:**—शहरच्या पुढील गरजांचा पुनरुल्लेख करण्यांत येत आहे.

( १ ) अरुंद बोळांत फरशी करणें.
( २ ) पावसाळी गटारें पक्कीं करणें.
( ३ ) कत्तलखाने शहरच्या बाहेर नेणें.
( ४ ) स्त्रिया व मुलें यांजकरितां स्त्री-डॉक्टरच्या देखरेखीखालीं एक दवाखाना स्थापणें.
( ५ ) वेश्यांना हद्दीबाहेर काढणें.
( ६ ) महारोग्यांना गांवाबाहेर ठेवणें.
( ७ ) दुभत्या गुरांचे गोठे शहराबाहेर नेणें.
( ८ ) सोईस्कर ठिकाणीं स्नानाकरितां घाट बांधणें.

**सर्व साधारण विचार:**—अहवालाच्या सालीं शहराच्या आरोग्यांत बरीच सुधारणा झाल्याचें दिसून येईल. या सालीं जननसंख्या २५५ नें वाढली आहे व लोकसंख्येच्या दरहजारीं जननाचें प्रमाण ३२·६७ पडलें. मागील वर्षी ३०·१३ पडलें होतें. अहवालाच्या सालीं मृत्यूचें प्रमाण ३३·१९ पडलें.

पूर्वीच्या वर्षी ३५.०५ पडलें होतें. सन १८९५-९६ पासून मृत्यूचें हें प्रमाण सर्वात कमी आहे. याचें श्रेय नेहमींप्रमाणेंच शहराच्या आरोग्याच्या बाबतींत अगदीं तत्पर असलेल्या आरोग्य खात्यालाच देतां येईल.

## प्लेग

अहवालाच्या वर्षाअखेरीस प्लेगला सुरवात झाली. त्या वेळीं तो फक्त अगदीं तुरळक स्थितींत होता. मार्च अखेरीस एकंदर प्लेग–मृत्यू संख्या २४ होती. शहरचें सर्वसाधारण आरोग्य नेहमींप्रमाणेंच होतें. प्लेगची पहिली केस १४ जानेवारीला झाली. ती परगांवाहून लागून आलेली होती. यापूर्वी मेडिकल ऑफिसर ऑफ हेल्थ व त्यांचा नोकरवर्ग साथीला तोंड देण्यास जय्यत तयार होता. सभोंवतालच्या खेड्यांच्या निकट सान्निध्यांत पुणें शहर आहे. या सर्व खेड्यांत प्लेगची सांथ सुरू होती. प्लेगदूषित अशा कोल्हापूर,सातारा, मिरज, सांगलीसारख्या इतर कित्येक ठिकाणांशीं मोटार लाऱ्यांच्या दळणवळणामुळें तेथील लोकांची भर पुणें शहरांत सतत पडत होती. दक्षिण हैद्राबाद-सारख्या दूरच्या ठिकाणाहून देखील लोक या शहरांत रहाण्यास येत होते. यामुळें शहरांत प्लेगचा प्रसार होणें संभवनीय वाटलें होतें. १९३२ च्या सप्टेंबर महिन्यांत शहरांत घुशी वावरतांना दिसूं लागल्या. व मागोमाग सर्व पेठांतून उंदरांचा सुळसुळाट झाला. मे. मेडिकल ऑफिसर ऑफ हेल्थ व त्यांचा नोकरवर्ग या प्राणघातक प्राण्यांचा संहार करण्यांत इतका व्यग्र झाला होता कीं, एके दिवशींच ७०० उंदीर व २७ घुशी पकडून त्यांचा नाश करण्यांत आला. मराठी वृत्तपत्रांतून जाहिराती देऊन व ३० सप्टेंबरच्या टाईम्स ऑफ इंडियाच्या साप्ताहिक पुरवणींत एक जादा प्यारा देऊन मेडिकल ऑफिसर ऑफ हेल्थ यांनीं सर्व नागरिकांना उंदरांचा व घुशींचा नाश करण्याबद्दल व दूषित हवेंतून येणाऱ्या लोकांना आपल्याजवळ राहूं न देण्याची खबरदारी घेण्याबद्दल सूचना आणि विनंति केली होती. प्लेगची लस व तसेंच ती टोंचण्याचें साहित्य अगदीं तयार ठेवण्यांत आलें होतें. वर निर्देश केल्याप्रमाणें पहिली बाहेरून लागून आलेली केस भवानी पेठेंत झाली. ही केस झाल्यानंतर शहरांत तुरळक प्लेग चालूं असल्यामुळें मेडिकल ऑफिसर ऑफ हेल्थ यांनीं प्लेगचें उच्चाटन करण्याला स्वतःस सर्वस्वीं वाहून घेतलें होतें. मेडिकल ऑ. ऑ. हेल्थ यांनीं प्रत्येक केस स्वतः तपासून पाहिली. आसपासच्या घरांत रहाणाऱ्या व त्यांच्याशीं संबंध येणाऱ्या सर्व लोकांस ताबडतोब टोंचण्यांत आलें. ज्या ज्या घरांत प्लेग केसीस झाल्या त्यांना जमिनीसुद्धां सर्व भिंतीस चुना सफेती देण्यांत आली. लागण झालेल्या व भोंवतालच्या इतर घरांत उंदीर पकडण्याचा उपक्रम जोरांत सुरूं करण्यांत आला. बिगाऱ्यांची संख्या दुप्पट करण्यांत येऊन मूषक-संहाराचें कार्य अधिक जोमानें सुरूं करण्यांत आले. वर्षाअखेरीपर्यंत प्लेग आटोक्यांत आल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. कारण त्यावेळेपर्यंत प्लेगच्या अवघ्या २४ केसिस झाल्या होत्या. मे. अध्यक्षसाहेब डॉ. नायडू यांनीं प्लेग व त्याच्या प्रसाराविरुद्ध योजण्यांत आलेल्या सर्व उपायांवर देखरेख केली व त्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. प्लेग-साथीच्या विरुद्ध झगडण्यासाठीं ज्या ज्या गरजा भासल्या त्या तत्परतेनें मंजूर करून स्टँडिंग कमिटीचे चेअरमन मे. डॉ. गोरे व इतर सभासद यांनीं जी मदत केली तिजबद्दल मी त्यांचा अभारी आहें. भवानी व त्या लगतच्या पेठांतून दोन डॉक्टर नेमून टोंचण्याचें कार्य सुरूं करण्यांत आलें होतें. व याचा परिणाम म्हणजे मार्च अखेरीस २१,००० लोक टोंचले गेले. मे. मेडिकल ऑफिसर ऑफ हेल्थ यांच्यासमवेत डॉ. गोरे यांनीं आठवड्यांतून दोनदां दूषित भागांतून हिंडून तेथल्या परिस्थितीची पहाणी केली व ती समाधानकारक असल्याचें त्यांना आढळून आलें.

शेवटीं आमचे चीफ सॅनिटरी इन्स्पेक्टर श्री. गोडबोले व कॉन्झरव्हन्सी सुपरिंटेंडेंट श्री. ए. आर. देशपांडे यांनीं एकनिष्ठपणें केलेल्या मदतीबद्दल व तसेंच आरोग्य खात्यांतील इतर नोकर लोकांनीं प्लेगचें उच्चाटन करण्यासाठीं अशा कठिण प्रसंगीं देखील मीं सांगितलेल्या योग्य त्या सूचना अमलांत आणून सतत प्रामाणिकपणें मदत केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों.

**केरशा डी. खंबाटा,**
एल्. आर. सी. पी., डी. पी. एच्.,
मेडिकल ऑफिसर ऑफ हेल्थ,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

# पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## स्कूलबोर्डाचा वार्षिक अहवाल.

## सन १९३२–३३.

मे. व्ही. ए. गडकरी, चेअरमन स्कूलबोर्ड.
पुणें शहर म्युनिसिपालिटी,

यांजकडून—

मे. रा. ब. हणमंतराम रामनाथ. प्रेसिडेंट लोकल ॲथॉरिटी.
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

यांजकडे—

ॲड. ऑफिसर स्कूलबोर्ड ह्यांनीं स्कूलबोर्डाचा सन १९३२–३३ सालचा अहवाल तयार केला. तो सोबत आपणांकडे पाठविला आहे.

**सर्वसाधारण प्रगति:**—आर्थिक बाबतींत परिस्थिती बरीच बिकट आहे. तरी शिक्षणाची प्रगति कायम ठेवण्यांत आली आहे. विद्यार्थ्यांची संख्या चालू सालीं ११,५४४ पासुन वाढ होऊन १२,२०१ झाली.

**नोकरवर्ग:**—सरकारी निर्णयास अनुसरुन अटेंडन्स ऑफिसरची जागा ता. १–५–३३ पासून कमी करावी लागली. ह्या तारखेपासूनच एक कारकून व एक शिपाई ह्यांच्या जागा कमी केल्या.

" बी " गटच्या सक्तीच्या शिक्षणाच्या योजनेला आर्थिक परिस्थिती बिघडल्यामुळें सरकारनें मंजुरी दिली नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. ह्या योजनेचा एकंदर खर्च अंदाजानें १३,५९४ रु. येईल. आमचें मतें हा सर्व खर्च लोकल ॲथॉरिटीनें सोसण्याचें ठरवावें व सरकारचे सांपत्तिक स्थितींत सुधारणा होईपर्यंत गव्हर्नमेंट ग्रँटची हकानें मागणी करण्यांत येणार नाहीं असा स्पष्ट उल्लेख करुन सरकारची मंजुरी मिळविण्याचा प्रयत्न करावा.

**शाळागृहें.**—शाळांची अत्यंत आवश्यकता ज्या वस्तींत भासते त्या ठिकाणीं शाळांस सोईच्या इमारती मिळणें दिवसेंदिवस फार कठिण होत चाललें आहे. म्हणून स्कूलबोर्डाची अशी आग्रहाची विनंती आहे कीं, लोकल ॲथॉरिटीनें खालील शाळांकरितां लवकर इमारती बांधून द्याव्या.

१ मुलींची शा. नं. १५ मंगळवार पेठ.

२ मुलींची शा. नं. ६ कसबा पेठ.

३ मुलींची शा. नं. १३ उर्दू मोमिनपुरा.

४ मुलांची शा. नं. २१ अस्पृश्य वर्गाकरितां.

५ मुलींची शा. नं. ४ शनीचा पार सदाशिव पेठ ( तिसरा मजला बांधून देणें ).

शिक्षकांस ड्यूटी अलावन्स देण्यासंबंधीं प्रकरणाचा लवकर निकाल देण्याविषयींही लोकल ॲथॉरिटीस विनंति करीत आहोंत.

आभार:—लोकल ॲथॉरिटीनें स्कूलबोर्डावर पितृवत् प्रेम करून त्याचा सांभाळ केला ह्याबद्दल स्कूलबोर्ड फार आभारी आहे. लोकल ॲथॉरिटीनें बांधलेल्या इमारतींचें भाडें ( रु. १०,००० ) स्कूलबोर्डास माफ केलें ह्याबद्दल लोकल ॲथॉरिटीचे विशेष आभार मानण्यांत येत आहेत. आमच्या सहकारी मित्रांनीं स्कूलबोर्डाचीं कामें करतांना आनंदानें सहकारिता केली ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभार जाहीर रीतीनं मानितो. मि. वाघळे ॲड. ऑफिसर व त्यांचे हाताखालील नोकरवर्ग ह्यांनीं स्कूलबोर्डानें आंखलेलें कामाचें धोरण प्रामाणिकपणानें पाळिलें ह्याबद्दल त्यांचेही आभार मानणें युक्त आहे.

आपला नम्र सेवक,
वि. आ. गडकरी.
चेअरमन स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

# पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## स्कूलबोर्डाच्या कामाचा वार्षिक अहवाल.

## सन १९३२–३३.

मे. जी. बी. वावळे, बी. ए., एल्. टी.,
अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी,
यांजकडून.

मे. व्ही. ए. गडकरी, अॅडव्होकेट,
चेअरमन, स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी,
यांजकडे.

स्कूलबोर्ड खात्याचा सन १९३२–३३ सालाच्या कामाचा अहवाल पुढें दिल्याप्रमाणें सादर करण्यांत येत आहे.

२. स्कूलबोर्डाची घटना:—सन १९२३ सालच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याप्रमाणें स्कुलबोर्डाची मुदत मे. लोकल अॅथॉरिटीच्या मुदतीबरोबर चालूं ठेविली आहे. मे. लोकल अॅथॉरिटीची तीन वर्षांची मुदत ता. ३१ मार्च १९३२ रोजीं संपली. म्हणून साहजिकच चालूं वर्षी स्कूलबोर्डाच्या सभासदां-मध्यें बदल झाला. मागील स्कूलबोर्डानें ता. १ एप्रील १९३२ पासून ता. २५ ऑगस्ट १९३२ पर्यंत आपला कारभार चालूं ठेविला होता. नवीन स्कूलबोर्डानें ता. २६ ऑगस्ट पासून हा कारभार आपले हातीं घेतला. ता. २५–८–३२ रोजीं मे. व्हि. ए. गडकरी यांची चेअरमनचे जागीं निवड झाली व मे. आर. एल. वाळवेकर यांची व्हाइस चेअरमन म्हणून निवड करण्यांत आली.

३. गेल्या स्कूलबोर्डांतील खालीलप्रमाणें ता. २५–८–३२ पर्यंत सभासद होते. ते स्कूलबोर्डा-च्या किती सभांस सदर मुदतींत हजर राहिले ह्याबद्दलचा आंकडा त्यांचे नांवापुढें देण्यांत आला आहे.

| | | | हजर सभा |
|---|---|---|---|
| | चेअरमन | | |
| १ | मे. महंमदअली दोस्तमहंमद पीरमहंमद. | ( सरकारनियुक्त ) | ३ |
| | व्हाइस चेअरमन. | | |
| २ | मे. रुस्तुम अर्सिपदियर इराणी, बी. ए. जी. | ( सर्वसाधारण सभासद ) | २ |
| | सभासद. | | |
| ३ | प्रो. एस्. आर. कानिटकर, एम. ए. | ( सर्वसाधारण सभासद ) | २ |
| ४ | मे. एल्. आर. करळे. | ( ,, ) | १ |
| ५ | मे. बी. जी. जगताप, बी. ए. बी. टी. | ( शिक्षण तज्ज्ञ ) | २ |
| ६ | मे. बी. जी. पाटोळे | ( मागासलेल्या वर्गांतर्फे ) | ३ |
| ७ | मे. म्हमूभाई हाशमभाई | ( सर्वसाधारण सभासद ) | ३ |
| ८ | मे. रा. ब. ल्लूभाई दामोदरदास | ( सरकारनियुक्त ) | १ |
| ९ | मे. लालमहंमद माणिकसाहेब चौधरी | ( मुसलमानांतर्फे ) | ३ |
| १० | मे. पी. एन्. राजभोज | ( अस्पृश्यांतर्फे ) | ० |
| ११ | मिसिस चंद्राबाई शिंदे | ( स्त्री सभासद ) | २ |

नवीन स्कुलबोर्डाचा कारभार ता. २६ ऑगस्ट १९३२ पासून सुरूं झाला. या स्कुलबोर्डाच्या सभांस सभासद किती वेळां हजर राहिले याबद्दल माहिती खालीं दिली आहे.

| | | | हजर सभा |
|---|---|---|---|
| | चेअरमन. | | |
| १ | मे. वि. ए. गडकरी ॲडव्होकेट | ( सर्वसाधारण सभासद ) | १२ |
| | व्हाइस चेअरमन. | | |
| २ | मे. रघुनाथ लहानुसा वाळवेकर | ( सर्वसाधारण सभासद ) | १२ |
| | सभासद. | | |
| ३ | मे. गणपत बाळाजी बोरवणकर | ( शिक्षण तज्ज्ञ ) | १२ |
| ४ | मिसेस चंद्राबाई शिंदे | ( स्त्री सभासद ) | १३ |
| ५ | मे. बाबुराव नारायण सणस | ( मागासलेल्या वर्गातर्फे ) | ९ |
| ६ | मे. सोमाजी मनाजी सोनवणे | ( अस्पृश्य वर्गातर्फे ) | १४ |
| ७ | मे. कायमखान मालूखान | ( मुसलमानांतर्फे ) | १२ |
| ८ | खा. ब. महंमद सलाउद्दीन करीमुद्दीन | ( सर्व साधारण सभासद ) | ७ |
| ९ | प्रो. एस्. आर. कानिटकर एम. ए. | ( ,, ) | ११ |
| १० | मे. डॉ. डी. के. गोरे | ( सरकारनियुक्त ) | १२ |
| ११ | मे. एल्. आर. करळे | ( ,, ) | १४ |
| १२ | मे. रा. ब. लल्लूभाई | ( ,, ) | १३ |

**स्कूलबोर्डाच्या सभाः**—चालू वर्षी स्कूलबोर्डाच्या एकंदरींत १७ सभा बोलाविण्यांत आल्या. त्यांपैकीं प्रत्यक्ष काम १६ सभांमध्यें झालें. १ सभा कोरम नसल्यामुळें तहकूब करण्यांत आली. गतवर्षी २४ सभा बोलाविल्या होत्या त्यांपैकीं १८ सभांमध्यें काम झाले होते. व ६ सभा कोरम नसल्यामुळें तहकूब केल्या होत्या.

**सब–कमिट्याः**—या वर्षी पुढील चार सब–कमिट्या चालू ठेवण्यांत आल्या. काटकसरीमुळें टेंडर कमिटीस व सामान विकत घेण्यासाठीं नेमिलेल्या कमिटीस काम नव्हतें.

१ शाळेस जागा पसंत करण्याकरितां नेमलेली कमिटी.

२ सक्तीच्या शिक्षणाबाबत नेमलेली कमिटी.

३ वार्षिक चढाओढीचे सामने व खेळ याबाबत कमिटी.

४ बजेट कमिटी.

याखेरीज आणखी कांहीं सब कमेट्या महत्वाच्या कामाची बारकाईनें चौकशी करून त्याबाबत स्कूलबोर्डास आपलें मत कळविण्याकरितां किंवा कायमचा निकाल करण्याकरितां नेमल्या होत्या.

५ **स्कूलबोर्ड ऑफिसः**—मि. जी. बी. बावळे बी. ए. एल्. टी. हेच बोर्डाच्या ॲड. ऑफिसरचे जागीं काम करीत होते. शिवाय तीन सुपरवायझर, एक अकाउंटंट एक हेडक्लार्क व चार इतर कारकून ऑफिसमध्यें कामावर आहेत.

जी. आर. इ. डी. नं. एस. ७८ ता. १३–१–१९३२ अन्वयें परीक्षा नसलेल्या दोन कारकूनांच्या बदल्या लोकल ॲथॉरिटीच्या ताब्यांतील खात्यांत करण्यांत आल्या. १ आक्टोबर १९३२ पासून बी. कॉम. परीक्षा पास असलेल्या एका नवीन इसमाची नेमणूक अकाउंटटचे जागीं करण्यांत आली. आतां ऑफिसांतील बिल कारकुनांखेरीज सर्व नोकर वर्ग मॅट्रीक व त्यापुढील परीक्षा पास झालेला आहे. बिल कारकूनाची नोकरी १२ वर्षां हून जास्त झाली आहे. व सन १९३३ च्या प्रायमरी एज्युकेशन ॲक्टच्या नियमाप्रमाणें डॉयरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांजकडून त्यांस परीक्षेची माफी देण्यांत आली आहे.

सक्तीच्या शिक्षणाची अम्मलबजावणी करण्याकरितां अटेन्डन्स ऑफिसर, एक कारकून व एक शिपाई येणेप्रमाणें नोकर वर्ग चालूं सालीं कामावर होता. या नोकरवर्गाची नेमणूक करण्याकरितां सरकारनें दिलेल्या मंजुरीची मुदत ता. १८ मार्च १९३३ रोजीं संपल्यामुळें त्यांची नेमणूक कायमची चालूं ठेवण्याची योजना मंजुरीसाठीं सरकारकडे पाठविण्यांत आली होती. सक्तीच्या शिक्षणाबाबत करावयास लागणारीं कामें ॲड. ऑफिसर ह्यांस सुपरवायझरांच्या मदतीनें करितां येणें शक्य आहे. ह्या कारणास्तव गव्हर्मेंटनें अटेन्डन्स ऑफिसरची नेमणूक चालूं ठेवण्यास मंजुरी दिली नाहीं. स्कूलबोर्डानें ह्या प्रश्नाचा विचार करून अटेन्डन्स ऑफिसर व त्यांचे हाताखालील नोकर यांच्या जागा ता. १ मे १९३३ पासून कमी केल्या व गव्हर्मेंटच्या पत्रास अनुसरून तजविज ठेवण्यांत येत आहे.

६ म्युनिसिपल शाळा:—सक्तीच्या शिक्षणक्षेत्रांतील नवीन शाळा धरून एकंदर म्यु. शाळांची संख्या ५७ भरते. ह्यांपैकीं ३२ मुलांच्या २५ मुलींच्या शाळा आहेत. त्यांचें वर्गीकरण पुढें दिल्याप्रमाणें आहे.

| मुलांच्या शाळा. | | | | मुलींच्या शाळा. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | उर्दू | गुजराथी | तेलगु | मराठी | उर्दू | गुजराथी | तेलगु |
| २३ | ७ | १ | १ | १८ | ७ | ० | ० |

सदर शाळासंबंधीं सविस्तर माहिती परिशिष्ट नं. ६ अ व ब मध्यें दिली आहे.

पूर्ण प्राथमिक शाळा:—खालीं दिल्याप्रमाणें ७ पूर्ण प्राथमिक शाळा आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | म्यु. शा. नं. | १ | मुलांची | मराठी भाषा बोलणाऱ्या मुलांकरितां |
| २ | ,, | ८ | ,, | ,, |
| ३ | ,, | १५ | ,, | ,, |
| ४ | ,, | ५ | मुलींची | मुलींकरितां |
| ५ | ,, | ६ | ,, ... | ,, |
| ६ | ,, | १० | उर्दू मुलांची ... | मुसलमान मुलांकरितां |
| ७ | ,, | १३ | ,, मुलींची ... | मुसलमान मुलींकरितां |

शिक्षणाच्या दृष्टीनें मागासलेल्या वस्तींतील मुलांमुलींच्या सोईकरितां सन १९३३–३४ सालापासून म्यु. शा. नं. ९ मुलांची व म्यु. शा. ९ मुलींची या शाळाही पूर्ण प्राथमिक केल्या आहेत.

वरील सात पूर्ण प्राथमिक शाळांतून व्ह. फा. परीक्षेस बसलेल्या मुलांमुलींचे परीक्षांचे निकालही फार समाधानकारक आहेत हें पुढें दिलेल्या कोष्टकांतील माहितीवरून दिसून येईल.

| शाळेचें नांव | | परीक्षेस पाठविले | पास | |
|---|---|---|---|---|
| नं. १ मुलांची | ... | २२ | १९ | |
| नं. ८ मुलांची | ... | ४९ | ३९ | ४ बाहेरून |
| नं. १० उर्दू मुलांची | ... | १६ | ११ | |
| नं. १५ मुलांची | ... | १४ | ७ | |
| नं. ५ मुलींची | ... | २७ | २१ | |
| नं. ६ मुलींची | ... | २५ | २१ | |
| नं. १३ मुलींची | ... | — | — | |

हे निकाल त्या शाळांस भूषणावह आहेत.

शिक्षक व शिपाईण बाया.—म्यु. शाळांतील कामावर असलेल्या स्त्री व पुरुष शिक्षकांची एकंदर संख्या ३९२ असून ह्यांपैकीं २०१ ट्रेन्ड आहेत. येथें एक गोष्ट नमूद करण्यांत येते कीं, प्रायमरी एज्युकेशन रुल नं. २८ मध्यें ट्रेन्ड शिक्षकांचे कमींत कमी शेकडा प्रमाण ठरवून दिलें आहे. त्यापेक्षांही म्यु. शाळांत ट्रेन्ड शिक्षकांचे शें. प्रमाण जास्त आहे. सरकारनें मंजूर केलेली शिक्षकांची संख्या दिल्याप्रमाणें आहे.

| शिक्षकांची वर्गवारी | ऐच्छिक शिक्षणांकरितां मंजूर जागांची संख्या | सक्तीच्या शिक्षणाकरितां मंजूर जागांची संख्या. | एकूण |
|---|---|---|---|
| तिसरे वर्ष पास | २८ | ... | २८ |
| दुसरे वर्ष पास | २९ | ... | २९ |
| पहिले वर्ष पास | ८७ | ३७ | १२४ |
| व्ह. फा. पास | १६८ | १ | १६९ |
| परीक्षा पास नसलेले | १३ | ... | १३ |
| | ३२५ | ३८ | ३६३ |

या ३६३ जागांपैकीं क्वालिफाईड शिक्षकांच्या ४४ जागा सरकारनें जी. आर. इ. डी. नं. एस. ८६ (४८). १९-१२-३२. अन्वयें सक्तीच्या शिक्षण क्षेत्राबाहेरील ७ नवीन शाळांकरितां मंजूर केल्या आहेत. या शाळा प्राथमिक शिक्षणाचा ताबा घेतल्यानंतर सरकारची आगाऊ मंजुरी न घेतां मे. लोकल ॲथॉरिटीनें उघडल्या होत्या. सरकारच्या सांपत्तिक स्थितींत सुधारणा होईपर्यंत या ४४ जागांकरितां होणाऱ्या खर्चावर सरकारची ग्रँट मिळणार नाहीं.

खालीं दिल्याप्रमाणें शिक्षकांचे सुधारून वाढविलेलें शेड्यूल सरकारकडे मंजुरीसाठीं बरेच दिवसां पूर्वी पाठविण्यांत आलें आहे. त्याचा सरकारकडून अद्याप निकाल व्हावयाचा आहे.

| शिक्षकवर्ग | | जागांची संख्या |
|---|---|---|
| तिसरे वर्ष पास | ... | १० |
| दुसरें वर्ष पास | ... | ४० |
| पाहिलें वर्ष पास | ... | १४० |
| क्वालीफाईड | ... | १५० |
| परीक्षा पास नसलेले | ... | १५ |
| | | ३७५ |

सक्तीच्या शिक्षणक्षेत्रांतील ( ग्रूप ए ) शाळा, शिक्षक, शिपाईण बाया वगैरेबाबत योजना कायमची मंजुरी मिळण्यासाठीं गव्हर्नमेंटकडे पाठविली असून याविषयीं सरकारचा निर्णय अद्याप मिळावयाचा आहे.

म्युनिसिपल ( दिवसांच्या ) शाळांमध्यें ५७ शिपाईण बाया कामावर आहेत. त्यापैकीं ४७ शिपाईणबायांच्या जागांस सरकारची मंजुरी मिळालेली आहे.

| ऐच्छिक शिक्षणांकरितां | | सक्तीच्या शिक्षणाकरितां | | |
|---|---|---|---|---|
| ६ जागा—दरमहा १२ रुपये पगार | | १० जागा—दरमहा १२ रुपये | | |
| १५ जागा—दरमहा १० रुपये पगार | | | | |
| १५ जागा—दरमहा ९ रुपये पगार | | | | |
| ३६ | + | १० | = | ४६ |

शिपाईण बायांच्या बाकीच्या ११ जागांस ( सक्तीच्या शिक्षणक्षेत्राबाहेरील नवीन उघडलेल्या ७ शाळांच्या जागा धरून ) सरकारची मंजुरी नसल्यानें या जागाकरितां झालेल्या खर्चावर सरकारी ग्रँट मिळत नाहीं.

विद्यार्थीः—चालू वर्षी दिवसाच्या सव म्यु. शाळांतील विद्यार्थ्यांची एकंदर संख्या १२,०२१ होती. गतवर्षी एकंदर ११,५४४ विद्यार्थी होते. शाळांतील हजेरीचें मानही समाधानकारक होतें. मुलांच्या शाळांतील पटावरील मुलांची सरासरी ६५०७·३ व हजर मुलांची सरासरी ५१९५ होती. ( गतवर्षी पटावरील मुलांची सरासरी ६४१४·१ व हजर मुलांची सरासरी ५२८८·६ होती. मुलींच्या शाळांतील चालू सालची पटावरील मुलींची सरासरी ४९०३·६८ व हजर मुलींची सरासरी ३९७०·८७ होती. गतवर्षीचे हे आंकडे अनुक्रमें ४५२८·९ व ३६०५·७ होते. जास्त माहिती परिशिष्ट नं. १ ( अ ते इ ) मध्यें दिली आहे.

७ म्युनिसिपल रात्रींच्या शाळाः—या वर्षी फक्त एक रात्रींची शाळा उर्दू मुलांची शाळा नं. ३२ मध्यें चालू होती. गतवर्षी २ शाळा होत्या. नारायण पेठेंजवळील एक रात्रींची शाळा पुरेसे विद्यार्थी नसल्यामुळें बंद करावी लागली. या बाबतींत आलेल्या अनुभवावरून स्कूलबोर्डाचें असें मत झालें आहे कीं, प्रौढ वयाच्या मनुष्यांकरितां काढलेल्या रात्रींच्या शाळा मिशनरी तत्वावर केवळ परोपकार बुद्धीनें काम करणाऱ्या संस्था मार्फतच यशस्वी रीतीनें चालविल्या जातील. शाळा नं. ३२ मध्यें चालू असलेल्या रात्रींच्या शाळेंतील पटावरील मुलांची वार्षिक सरासरी ३० व हजर सरासरी १५·७ होती.

८ मदतीच्या शाळाः—या वर्षी ' अ ' वर्गातील २७ शाळा व ' ब ' वर्गातील ११ शाळा चालू होत्या. गतवर्षी ' अ ' वर्गातील २९ शाळा व ' ब ' वर्गातील १२ शाळा होत्या. ' अ ' वर्गातील (१) सोमवंशीय सरस्वती विद्यालय व (२) चर्च ऑफ स्कॉटलंड मिशनची शाळा सदाशिव पेठ या दोन शाळा आणि ' ब ' वर्गातील मद्रेसा ए फैजुल इस्लाम ही शाळा एकूण तीन शाळा चालू वर्षी बंद झाल्या. सरस्वती मंदीर सोसायटीतर्फे चालविण्यांत आलेल्या प्राथमिक शाळेस ' अ ' वर्गाची शाळा व गुजराथ विद्या मंदिरानें चालविलेल्या शाळेस ' ब ' वर्गाची शाळा म्हणून मे. स्कूलबोर्डानें मान्यता दिली. या शाळांतील विद्यार्थी पटावरील व हजर मुलांची सरासरी खर्च ग्रँटची रक्कम वगैरेबाबत विशेष माहिती परिशिष्ट नं. ८ ( अ व ब ) मध्यें दिली आहे.

अॅड. ऑफिसर ह्यांनीं खासगी मदतीच्या शाळांस व त्याचप्रमाणें म्यु. शाळांस आगाऊ न कळवितां भेटी दिल्या. त्यांनीं खाजगी शाळांची वार्षिक तपासणी सुपरवायझरांची मदत घेऊन सप्टेंबर १९३२ ते डिसेंबर १९३२ पयत केली. ह्या शाळांतून ट्रेंड शिक्षकांचें प्रमाण समाधानकारक आहे. परंतु वैयक्तिक मालकीच्या कांहीं खासगी शाळांतून वयोवृद्ध पेन्शनर शिक्षक नेमिले आहेत. त्यांच्या हातून आस्थापूर्वक शिक्षणाचें काम होत नाहीं.

प्राथमिक शिक्षणाच्या १९२३ च्या कायद्याप्रमाणें ग्रँटची आकारणी करतांना खासगी शाळांनीं केलेल्या खर्चांपैकीं वाजवी खर्च कोणता हें ठरविण्याचा अधिकार स्कूलबोर्डास दिलेला आहे. म्हणून या बाबतींत सुपरवायझरांच्या माहितीकरितां स्कूलबोर्डानें नियम तयार केले. ह्या नियमांस अनुसरून व प्रायमरी अॅक्टांत दिलेल्या नियमाप्रमाणें अॅड. ऑफिसर ह्यांनीं खासगी शाळांस ग्रँटची रक्कम देण्याविषयीं शिफारशी केल्या व त्यांस स्कूलबोर्डानें आपली मान्यता दिली. ' अ ' वर्गातील शाळांस ४३,६४६ रु. व ' ब ' वर्गातील शाळांस १४९८ रु. ग्रँटकरितां खर्च झाले. आर्थिक परिस्थिती बिघडल्यामुळें सरकारी हुकुमाप्रमाणें ग्रँटची रक्कम देतांना शेकडा २० टक्के कपात करावी लागली.

बालदिनः—या वर्षी स्थानिक कमेटीनें ठरविल्याप्रमाणें ता. १६ जानेवारी १९३३ रोजीं अत्यंत उत्साहानें ' बालदिन ' साजरा करण्यांत आला. त्या दिवशीं झालेल्या सांघिक कवायतींत दुसऱ्या इयत्तेपासून वरील वर्गांत असलेल्या सुमारें ५००० विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता. नेक नामदार गव्हर्नरसाहेबांकडून आलेला संदेश या प्रसंगीं वाचून दाखविण्यांत आला.

**वार्षिक चढाओढीचे सामने व खेळ:**—म्यु. शाळांतील मुलांमुलींच्या खेळांचे सामने ता. १५ मार्च ते १९ मार्च १९३३ पर्यंत भरविण्यांत आले. मुलांच्या खेळांचे सामने म्यु. शाळा नं. ८ मुलांची, कबुतरखाना व व नुतन मराठी विद्यालय येथील क्रीडांगणावर झाले. मुलींच्या खेळांच्या सामन्याकरितां नवीन मराठी शाळेचा असेंब्ली हॉल उपयोगांत आणिला म्यु. तील ४८ शाळांतर्फे पाठविण्यांत आलेल्या ८५० मुलांनीं व ५२१ मुलींनीं या खेळांत भाग घेतला होता.

यशस्वी संघास व मुलांमुलींस बक्षिसें वाटण्याचा समारंभ स्कूलबोर्ड ठरावाअन्वयें मे. वि. आ. गडकरी ॲडव्होकेट चेअरमन स्कूलबोर्ड ह्यांचे अध्यक्षतेखालीं करण्यांत आला. ह्या वर्षी म्यु. शा. नं. ९ मुलांची नानापेठ या शाळेनें सर्व मुलांच्या शाळाकरितां ठेविलेला चालेंज कप मिळविला. उर्दू शाळाकरतां स्वतंत्र ठेवलेला " चॅलेंज " कप उर्दू मुलांची शा. नं. १० या शाळेनें मिळविला.

मे. रा. ब. लल्लूभाई दामोदरदास स्कूलबोर्ड मेंबर ह्यांनीं या वर्षी फक्त मराठी मुलींच्या शाळाकरितां म्हणून चांदीचा एक मोठा ' चालेंज कप ' त्यांच्या पत्नी सौ. अमथीबाई ह्यांच्या नांवानें दिला. तो चालूवर्षी म्यु. शा. नं. २ मुलींची या शाळेनें मिळविला.

शिवाय वैयक्तिक खेळांतील सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या नं. १ व नं. २ च्या यशस्वी मुलांमुलींकरितां चार चांदीचे पेले मे. वि. आ. गडकरी चेअरमन स्कूलबोर्ड मे. र. ल. बाळेकर व्हाइस चेअरमन स्कूलबोर्ड व मे. रा. ब. लल्लूभाई दामोदरदास यांनीं स्कूलबोर्डाचे हवाली केले होते. ते अनुक्रमें म्यु. शा. नं. २१ मुलांची व १६ मुलांची आणि ९ मुलींची व ६ मुलींची या शाळांतील मुलांनीं व मुलींनीं जिंकले. वरील उदार देणगी दिल्याबद्दल मे. स्कूलबोर्ड सदर सद्गृहस्थांचे आभारी आहे.

त्याचप्रमाणें मि. प्रतापसिंग परदेशी म्यु. कौन्सिलर व मि. बापूराव नारायणराव सणस स्कूलबोर्ड सभासद ह्यांनीं कुस्तीमध्यें प्रविणता दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां ७ चांदीचे बिल्ले दिले. ह्याबद्दल त्यांचेही स्कूलबोर्ड आभारी आहे.

वरील मुख्य बक्षिसाशिवाय १२३ वस्तु—( चांदीचे पेले, पदकें, बांगड्या वगैरे ) निरनिराळ्या खेळांतील विजयी विद्यार्थ्यांस बक्षिसें म्हणून वाटण्यांत आल्या.

**मिडलस्कूल स्कॉलरशिप परीक्षा:**—ह्या चढाओढीच्या परीक्षेत म्यु. शा. नं. १ मुलांची या शाळेंतील ४ विद्यार्थी आणि नं. ६ मुलांची या शाळेंतील एक विद्यार्थी यशस्वी झाले. ही गोष्ट सदर शाळेंतील वर्गशिक्षकांस व हेडमास्तरांस भूषणास्पद आहे.

**चित्रकलेचें प्रदर्शन**—ड्रॉइंग टीचर्स असोसिएशन पुणें ह्या संस्थेतर्फे श्रीशिवाजी मेमोरियल मिलिटरी स्कूलमध्यें चित्रकलेचें प्रदर्शन दाखविण्यांत आलें होतें. त्यांत मुलांची शा. नं. १ व मुलींच्या शाळा नं. १, २ व १७ या शाळांतील मुलांमुलींनीं तयार केलेल्या नमुन्यांस बक्षिसें मिळाली. ही गोष्ट सदर कामांत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांस व शिक्षकांस भूषणावह आहे.

**वार्षिक परीक्षा:**—प्रायमरी एज्युकेशन रुल नं. ३७ अन्वयें स्कूलबोर्डानें इ. ४ थीची वार्षिक परीक्षा घेण्याची व्यवस्था केली. ज्या प्राथमिक शाळा सेकंडरी स्कूलसना जोडल्या आहेत त्यांना हा नियम लागूं केला नाहीं. इयत्ता ५ व ६ ह्यांतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याकरितां मुख्य अध्यापकांची कमेटी नेमण्यांत आली. ह्या कमेटीच्या कामावर मे. ॲड. ऑफिसर व सुपरवायझर ह्यांनीं देखरेख ठेविली होती. सर्व शाळेच्या मुख्य अध्यापकांस त्यांच्या शाळेंतील बालवर्ग ते इ. ३ रीची वार्षिक परीक्षा घेण्याचा अधिकार दिला होता. सर्वांनीं आपलें कर्तव्य प्रामाणिकपणानें केले हें नमूद करण्यास आनंद वाटतो. परिशिष्ट नं. २ व मध्यें परीक्षांच्या निकालाबद्दल माहिती दिली आहे.

**शाळांची वार्षिक तपासणी:**—म्यु. शाळांस सुपरवायझर आणि ॲड. ऑफिसर ह्यांनीं आगाउ सूचना न देतां भेटी दिल्या. यांची वार्षिक इन्स्पेक्शनही ॲड. ऑफिसर ह्यांनीं सुपरवायझरांच्या मदतीनें.

घेतली. एकंदरीत सर्व शाळांची प्रगति समाधानकारक दिसून आली. प्रत्येक शाळेसंबंधानें वेगवेगळे शेरे त्या शाळेच्या इन्स्पेक्शन रिपोर्टांत लिहिले आहेत. शहरांतील कांहीं भागांत प्लेग झाल्यामुळें शाळांच्या नेहमींच्या कामांत थोडासा व्यत्यय आला.

शिवाय मे. डी. अ. डे. ए. इन्स्पेक्टर पुणें मे. इन्स्पेक्ट्रेस ऑफ गर्ल्स स्कूल आणि मे. डे. ए. इन्स्पेक्टर फॉर उर्दु स्कूल्स ह्यांनीही कांहीं म्यु. शाळांची तपासणी केली. उर्दू मुलींच्या शाळांत ट्रेन्ड व क्वालिफाईड शिक्षकांची उणीव असल्याचें त्यांच्या रिपोर्टांवरून दिसून येते. स्कूलबोर्डानें ट्रेन्ड शिक्षकिणी नोकरीसाठीं मिळविण्याचा पुष्कळसा प्रयत्न केला. परंतु या बाबतींत त्यांस पुरेसें यश मिळालें नाहीं. इतर शाळांतून ट्रेन्ड शिक्षक व क्वालिफाईड शिक्षक जरूर तेवढे आहेत. या शाळांतून देण्यांत आलेलें शिक्षण एकंदरींत समाधानकारक असल्याबद्दल सरकारी अधिकारी यांनीं आपले मत व्यक्त केले आहे. परिशिष्ट नं. ८ ( अ, ब ) मध्यें शाळासंबंधीं विशेष माहिती दिली आहे.

## जमा

परिशिष्ट नं. १ मध्यें स्कूलबोर्डास लोकल ऑथॉरिटीकडून व सरकारकडून मिळालेल्या पैशांच्या रकमांची माहिती देण्यांत आली आहे. शिल्लक धरून एकंदर जमेची रकम रु. ३,१०,६५९–१२–२ होती. गतवर्षी रु. ३,२६,३१५–११–११ जमा होती. निरनिराळ्या बाबींच्या रकमेंत वाढ अगर कमी जमा का झाली ह्याबद्दल कारणें पुढें दिली आहेतः—

**फीचें उत्पन्नः**—या सदरांत गतवर्षी रु. ४,७२५–१०–९ रकम जमा असून चालू वर्षी रु. ४,६१७–१ फीचें उत्पन्न झालें. म्हणजे रु. ९८–९–९ कमी झालें. सर्व मुलींच्या शाळांस फी माफ असल्याचें इतरत्र सांगितलें आहेच.

**उर्दु शाळांतील मुसलमान मुलींस स्कॉलरशिपा देण्याकरितां होणाऱ्या खर्चावर सरकारी ग्रँटः**–सरकारकडून या बाबतींत बक्षिसें व स्कॉलरशिपा देण्याकरितां डेटम लाइन खेरीज जादा ग्रँट रु. १०० ची मिळाली.

**हेडमास्तर व फर्स्ट असिस्टंट मास्तर ह्यांस हजेरी अलावन्स देण्याकरितां सरकारी ग्रँटः**—चालू वर्षी या बाबींचा निर्देश करून ग्रँटची रकम सरकारकडून मिळाली नाहीं.

**इमारतीकरितां ग्रँटः**–चालू वर्षी स्कूलबोर्डास या कामाकरितां ग्रँट मिळाली नाहीं.

**शिक्षणसाहित्याकरितां ग्रँटः**—या कामीं ग्रँट मिळाली नाहीं.

**देणग्याः**—मे. लोकल ऑथॉरिटीचे हवालीं असलेल्या देणग्यांच्या रकमांवरील व्याज रकम रु. ४५८ बक्षिसें वाटण्याकरितां मिळालें. त्याची देणग्या देणाऱ्यांच्या अटींप्रमाणें निरनिराळ्या शाळांस बक्षिसें देण्यांत आलीं.

**म्यु. हद्दींतील सेत्रजमिनीवरील लोकल फंडः**—एकंदर रकम रु. ९९५–१५–२ जमा झाली.

**प्राथमिक शिक्षण फंडः**—प्रायमरी एज्युकेशन रूल नं. १४१ अन्वयें स्कूलबोर्डानें ता. १ एप्रिल १९३९ पासून प्रायमरी एज्युकेशन फंड या नांवानें बँक ऑफ इंडिया ( सिटी ब्रँच ) मध्यें स्वतंत्र खातें ठेविलें आहे. स्कूलबोर्ड व लोकल ऑथॉरिटी यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें लोकल ऑथॉरिटीकडून दरमहा हप्त्यांची रकम नियमितपणें मिळण्याची व्यवस्था झाली आहे. स्कूलबोर्डास मिळालेल्या रकमांचा एकंदर हिशेब पुढीलप्रमाणें आहे.—-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सन १९३२–३३ सालाकरितां मंजूर बजेट | रु. | २,९५,०२०––०–० |
| २ | स्कूलबोर्डाकरितां सन १९३२–३३ सालीं मिळणारी म्यु. फंडाची रक्कम | रु. | १,६८,४०६––०–० |
| ३ | म्यु. फंडा व्यतिरिक्त स्कूलबोर्डाचे उत्पन्नाची रक्कम | रु. | १,४२,२५३–१२–२ |
| | एकूण रक्कम | रु. | ३,१०,६५९–१२–२ |

## खर्च

परिशिष्ट नं. ४ मध्यें स्कूलबोर्ड ऑफिस म्युनिसिपल प्राथमिक शाळा आणि इतर खर्चाच्या खात्यासंबंधानें सविस्तर माहिती दिली आहे. प्राथमिक शिक्षणासाठीं चालू सालीं एकंदरीत रु. २,८५,६६७–६–२ खर्च झाला असून गतवर्षी झालेल्या खर्चाची रक्कम रु. ३,११,६०१–०–२ होती. निरनिराळ्या कामासाठें खर्च कमीजास्त झाल्याबद्दल माहिती पुढें देण्यांत येत आहे.

**स्कूलबोर्ड ऑफिस व ऑफिसचा सादिल:**—एकंदर खर्च रु. १५,०५५-५ चालू सालीं झाला. गतवर्षी रु. १५,७२१–६–७ खर्च झाला होता. ऑफिस-सादिलवारांत काटकसर केल्यामुळें रु. ६६६–१–७ खर्च कमी झाला.

**शिक्षक व शिपाई यांचा पगार (पेन्शन व प्रॉव्हिडंटसुद्धां):**—या सदराखालीं झालेला चालू सालचा खर्च रु. १,४९,५६६ झाला. गतवर्षी रु. १,६५,०५९–१४–८ खर्च झाला होता. तां. १ आगष्ट १९३२ पासून लोकल ॲथॉरिटीनें ठरविलेल्या स्केलप्रमाणें पगार देण्याचें बंद केलें. या कारणानें खर्च कमी झाला.

**शाळांच्या इमारतींचें भाडें:**—स्कूलबोर्डानें चालू सालीं रु. ४०,७८५–१२ इमारत भाडें दिलें. गतवर्षी रु. ३७,८३८–१३ भाडें दिलें होतें. गेल्या वर्षापासूनचें लोकल ॲथॉरिटीनें बांधलेल्या शाळागृहांचें भाडें देणें राहिलें होतें. यामुळें रक्कम वाढली आहे.

**पाणीपट्टी व इतर कर:**—स्कूलबोर्डानें याबाबत रु. १,५४३–१५–९ चालू सालीं भरले. गतवर्षी रु. २२०९–१–१० भरले होते.

**फर्निचर:**—काटकसरीच्या धोरणामुळें चालू सालीं फक्त . १८९–१४–११ फर्निचरकरितां खर्च केले. गतवर्षी रु, १८६२–०–६ खर्च केले होते.

**शाळांचा सादिलवार व शिवणसामान:**—स्कूलबोर्डानें काटकसरीच्या धोरणानें चालू सालीं या कामीं रु. २,७५४–७–७ खर्च केले. गतवर्षी रु. ३,२०९–६ खर्च केले होते.

**नवीन पुस्तकें व नकाशे:**—या वर्षी काटकसर म्हणून या कामासाठीं फक्त रु. ७६–९ खर्च केले. गतवर्षी रु. ७४७–५ खर्च केलें होते.

**शाळांच्या इमारतींची दुरुस्ती:**—काटकसरीच्या धोरणामुळें रु. २०७३–२–१ या वर्षी दुरुस्तीसाठीं खर्च केले. गतवर्षी रु. ४९८२–८–८ खर्च केले होते.

**मे. लोकल ॲथॉरिटीचे ताब्यांत असलेल्या देणग्यांचें व्याजांतून दिलेलीं बक्षिसें:**—अटींस अनुसरून रु. ४५–८ चीं बक्षिसें वाटलीं.

**शिक्षक वाचनालय:**—काटकसरीच्या धोरणामुळें या वर्षी या बाबीसाठीं फक्त रु. ७८–५–७ खर्च करण्यांत आले. गेल्या वर्षी रु. ३१६–६–११ खर्च केले होते.

**बाळ वाचनालय:**—काटकसरीच्या धोरणामुळें बालवाचनालयांकरितां यंदा फक्त रु. १९–८ खर्च केले. गुदस्त सालीं रु, १८१–८ खर्च केले होते.

हस्तव्यवसाय:—काटकसरीच्या धोरणामुळें रु. १५ ह्या बाबीसाठीं खर्च केले. गतवर्षी रु. ७८४-९ खर्च केले होते.

ग्रॅच्युइटी:—चालू सालीं ग्रॅच्युइटी देण्यासाठीं रु. ५६९-११ खर्च केले. गतवर्षी रु. ३४८ खर्च केले होते. कांहीं शिपाईंग वाया कमी केल्यामुळें खर्च जास्त झाला.

नवीन प्राथमिक शाळा:—या बाबीसंबंधीं चालू सालीं खर्च केला नाहीं. कारण लोकल ॲथॉरिटी स्वतःच्या इमारती तयार करून स्कूलबोर्डास भाड्यानें देत असते.

रात्रीच्या शाळा:—चालू सालीं या शाळांकरितां ४४१ रु. खर्च आला. गतवर्षी रु. १३०९-१२ खर्च केले होते. बारा रात्रीच्या शाळा मुलांची संख्या कमी झालेमुळें बंद केल्या. सबब खर्च कमी झाला.

खाजगी शाळांकरितां ग्रँट:—चालू सालीं ४४,२४४ रु. ग्रँटकरितां खर्च केले. गेल्या वर्षी ५०,२७७ रु. ग्रँट देण्यांत आली होती, दोन खाजगी शाळा बंद झाल्या आणि ग्रँट देतांना शें. २० टक्के कपात केली म्हणून चालू सालीं खर्च कमी झाला.

भोकरवाडी शाळेस ग्रँट:—लोकल ॲथॉरिटी व डिप्रेस्ड क्लास मिशन ह्यांच्यामध्यें झालेल्या करारा-प्रमाणें वार्षिक ग्रँट रु. २५० नेहमींप्रमाणें देण्यांत आली.

वार्षिक खेळांचे सामने:—ह्या कामीं चालू सालीं रु. २२६-११ खर्च केले. गतवर्षी रु. ५८-१ खर्च केले होते.

बॉय स्काऊटचें शिक्षण:—या कामाकरितां केलेल्या खर्चावर सरकारकडून ग्रँट मिळत नाहीं. सबब या वर्षी स्काउटच्या शिक्षणासाठीं रक्कम खर्च केली नाहीं.

सक्तीचें शिक्षण व खानेसुमारी:—ह्या कामाकरितां चालू सालीं रु. २०,४२६-४-११ खर्च केले. गतवर्षी रु. २३,७००-६-९ खर्च केले होते.

मोटार लॉरी:—मोटार लॉरी चालू ठेवण्याकरितां ह्या वर्षी रु. २,१४६-१२-८ व गतवर्षी रु. १४९६-१४ खर्च आला होता.

स्वयंपाक व धोबी काम:—ह्या विषयांचें शिक्षण देण्याकरितां चालू सालीं रु. १५५-६-६ खर्च करण्यांत आले.

हा अहवाल संपविण्यापूर्वी सुपरवायझर, अकाउंटंट, हेडक्लार्क व इतर कारकून ह्यांनीं आपलीं कामें आनंदानें सहकारिता करून केलीं ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों.

आपला नम्र सेवक,
ऑ. वी. वाबळे.
ॲड. ऑफिसर, स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

# पुणें शहरांत सुरुं केलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा अहवाल.

## सन १९३२-३३.

पुणें शहरांतील नाना, भवानी, गंज घोरपडे व गुलटेकडी ह्या पेठांत सक्तीचें व मोफत शिक्षण सुरुं करण्याचें योजनेस सरकारनें मंजुरी दिल्यानंतर लोकल अॅथॉरिटीनें ता. २ डिसेंबर १९२९ पासून वरील पेठांतून सदर शिक्षण देण्यास सुरवात केली.

**नोकरवर्ग:**—( जी. आर. इ. डी. नं. एस्. ७८ (४८) ता. १८ मार्च १९३० ) ह्या ठरावाप्रमाणें सरकारनें एक अटेंडन्स ऑफिसर व एक शिपाई ह्यांच्या जागा तीन वर्षे चालूं ठेवण्यास परवानगी दिली. मे. लोकल अॅथॉरिटीनें वरील जागांशिवाय आणखी एक कारकून नेमण्यासही मेहेरबानीनें मंजुरी दिली. ह्या नोकर वर्गाची मुदत १८ मार्च १९३३ रोजीं संपल्यामुळें त्यांच्या जागा सक्तीचें शिक्षण सुरूं असेपर्यंत पुढें चालूं ठेविण्यास मंजुरी मिळावी अशी योजना सरकारास सादर करण्यांत आली. परंतु मे. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन ह्यांचेकडील पत्र नं. एस्. ९९/४१ (५)-डी. ता. २५ एप्रील १९३३ अन्वयें सदर योजनेस मंजुरी न मिळाल्यानें वरील सर्व नोकरवर्ग ता. १ मे. १९३३ पासून कमी करण्यांत आला.

**शाळा:**—ह्या वर्षी सक्तीच्या शिक्षणाच्या १२ शाळा ( ६ मुलांच्या व ६ मुलींच्या ) चालूं होत्या शिवाय मुलांची शा. नं. ७ व १६ ह्या शाळांस दोन वर्ग जोडण्यांत आले आहेत.

**विद्यार्थी:**—ह्या शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ता. ३१ मार्च १९३३ रोजीं १३९० होती. गतवर्षी ह्या तारखेस ही संख्या १४४९ होती. गतवर्षी मुलगे ७१५ व मुली ७३४ होत्या. चालूं वर्षी मुलांची व मुलींची संख्या अनुक्रमें ६९६ व ६९४ होती. शिवाय सदर पेठांतील म्युनिसिपालिटीच्या पूर्वी चालूं असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या १३०५ ( मुलगे ८०९ व मुली ४९६ होती. गतवर्षी ही संख्या १४४४ ( मुलगे ९७५ व मुली ४६९ ) होती. त्याचप्रमाणें सदर पेठांतील खाजगी शाळांत चालूं वर्षी ९२२ विद्यार्थी ( गतवर्षी ९२५ ) शिकत होते. एकूण चालूं वर्षी सक्तीच्या शिक्षणक्षेत्रांतील शाळांमध्यें ता. ३१ मार्च १९३३ रोजीं २११६ मुलगे व १५०२ मुली होत्या. गतवर्षी या शाळांतील मुलांची व मुलींची संख्या सदर दिवशीं अनुक्रमें २३१० व १५०२ होती. ह्यावरुन म्युनिसिपल शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या १९७ नें व खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ३ नें कमी झाल्याचें दिसून येईल. सक्तीच्या शिक्षणक्षेत्रांत प्लेग चालूं झाल्यानें ही संख्या कमी झाली.

एकंदर २६१७ विद्यार्थ्यांपैकीं १४८० मुलगे १०८८ मुली एकूण २५६८ विद्यार्थी ६ ते ११ वर्षे वयाचे होते. सविस्तर माहिती सोबत परिशिष्ट नं. ५ मध्यें दिली आहे.

**शिक्षक:**—शिक्षकांच्या ३८ मंजूर जागांपैकीं १९ शिक्षक १ लें वर्ष पास, १८ स्त्री शिक्षक १ लें वर्ष पास व एक व्हर्नाक्युलर फायनल पास अशा शिक्षकांकरितां आहेत. ता. ३१ मार्च १९३३ रोजीं ३६ शिक्षक मुलामुलींच्या शाळांतून कामावर होते.

**खर्च:**—चालू वर्षी बजेटमध्यें २४१०५ रु. खर्च करण्यास मंजुरी मिळाली होती. सदर रकमेपैकीं ह्या खात्यास रु. २०४२६-४-४ खर्च झाले. गव्हर्मेंटनें नैमित्तिक खर्च ६०२५ धरुन एकंदर २९२३४ खर्च करण्यास मंजुरी दिली आहे. विशेष बाबींची माहिती खालीं दिल्याप्रमाणें आहे—

खर्च

| | नित्य | नैमित्तिक |
|---|---|---|
| (अ) शिक्षकवर्ग | रु. | रु. |
| १ शिक्षकांचा पगार (१७ × ३० × १२) अधिक (२५ × १२) | १३६२० | |
| २ प्रॉव्हिडंट फंड | ८५१ | |
| (ब) शिपाई (१० × १२ × १२) | १४४० | |
| (क) भाडें व कर | ४१९५ | |
| (ड) सादील | ९९० | |
| (इ) फर्निचर | ७५३ | ६०२५ |

एकंदर रु. २१८४९ अधिक ६०२५ = २७८७४

ह्याखेरीज अटेंडन्स ऑफिसर व त्यांचे हाताखालील नोकराकरितां ११६० रु. खर्च करण्यास मंजुरी मिळाली आहे.

सक्तीची वजावणी:—शाळेंत जाण्याचें वय असलेले ४०५ विद्यार्थी ( १८३ मुलगे आणि २२० मुली ) शाळेंत हजर राहिले नाहींत म्हणून पालकांस सदर विद्यार्थी शाळेंत पाठविण्याबद्दल नोटिसा पाठवून कळविलें. सदर भागांत प्लेग चालू झाल्यानें फक्त ३९ नोटिसा काढण्यांत आल्या. मुख्यत्वेंकरून पालक किंवा आईबाप ह्यांची समजूत घालून मुलें शाळेंत पाठविण्याविषयीं त्यांचीं मनें वळविण्यांत आलीं. ह्याप्रमाणें स्कूलबोर्ड व पालक ह्यांच्या परस्परांच्या सहकारितेनें इष्ट कार्य साध्य झालें. योग्य वेळ आली म्हणजे जरूर त्या ठिकाणीं पालकांवर फिर्यादी करण्याची व्यवस्था हातीं घेण्यांत येईल. ह्या सक्तीच्या शाळा सरकारी अधिकाऱ्यांच्या पाहण्यांत येऊन त्यांजकडून त्यांची तपासणीही करण्यांत आली. शाळांचें काम पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

बी ग्रुप:—सोमवार, मंगळवार, कसबा, भांबुर्डा आणि येरंडवणें ह्या पेठांतून सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी करण्याची ( बी ग्रुप ) योजना सरकारकडे मंजुरीकरितां पाठविली होती. परंतु हल्लींची सांपत्तिक स्थिति समाधानकारक नसल्यामुळें सरकारनें ह्या योजनेस मंजुरी देण्याचें नाकारलें.

आपला नम्र सेवक,
जी. बी. वाबळे.
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

# मुसलमानांचें शिक्षणासंबंधीं माहिती.

**शाळा:**—चालू सालीं मुसलमान मुलांच्या शिक्षणाकरितां असलेल्या उर्दू शाळांची संख्या सक्तीच्या शिक्षणक्षेत्रांतील मुलींची शाळा धरुन एकंदर १४ होती. ह्या १४ शाळांपैकीं ७ शाळा मुलांच्या व ७ शाळा मुलींच्या शिक्षणाकरितां आहेत. फक्त शा. नं. १० खेरीज इतर मुलांच्या शाळांमध्यें फी ठेविलेली नाहीं. शा. नं. १० मध्यें ठेविलेली फीही मराठी शाळांतून ठेविलेल्या फीच्या मानानें फारच कमी आहे. सर्व मुलींच्या शाळांस फी पूर्णपणें माफ आहे. फक्त एक उर्दू रात्रीची शाळा सोमवार पेठेंत आहे.

जैनाबाई दोस्तमहंमद पीरमहंमद मुसलमान मुलींची पूर्ण प्राथमिक शाळा ही देणगी देणारे सद्-गृहस्थ व लोकल ॲथॉरिटी ह्यांच्या दरम्यान ठरलेल्या अटीस अनुसरुन नेहमींप्रमाणें स्कूलबोर्डानें चालविली आहे.

**विद्यार्थी:**—ता. ३१ मार्च १९३३ रोजीं पटावरील विद्यार्थ्यांची संख्या ( सक्तीच्या मुलींच्या शाळेसुद्धां ) १५८९ होती. गतवर्षी ही संख्या १५२६ होती. मुलांच्या शाळेंतील आणि मुलींच्या शाळेंतील ही संख्या अनुक्रमें ९८२ व ६०७ होती. गतवर्षी ही संख्या अनुक्रमें ९९४ व ५३२ होती. मुलांच्या शाळेंतील व मुलींच्या शाळेंतील हजेरीची सरासरी अनुक्रमें ७०२ व ४०३·८ होती. गतवर्षी ही सरासरी अनुक्रमें ७५७·४ व ३५९·६ होती. रात्रीच्या शाळेंतील पटावरील मुलांची सरासरी ३२ होती. व हजर मुलांची सरासरी १५.७ होती.

**सक्तीच्या शाळा:**—ह्या शाळेंत ता. ३१ मार्च १९३३ रोजीं पटावरील मुलींची व हजर मुलींची सरासरी अनुक्रमें ८५ आणि ५३·१ होती. गतवर्षी अनुक्रमें ६३ व ४२·४ होती.

**शिक्षक:**—ह्या शाळांत कामावर असलेल्या ५५ शिक्षकांपैकीं २५ शिक्षक ट्रेंड आहेत. गतवर्षी ५६ शिक्षकांपैकीं २७ ट्रेंड होते. कांहीं ट्रेंड शिक्षक पेन्शनांत निघाल्यामुळें व मयत झाल्यामुळें हा फरक घडून आला. कांहीं जास्त ट्रेंड शिक्षकिणी मिळविण्याकरितां स्कूलबोर्डानें बरेच प्रयत्न केले व त्यांत थोडें यशही आलें. अझीझाबी अहंमदखान ( ट्रेंड १ लें वर्ष पास ) ह्या शिक्षकिणीस गव्हर्मेंट सेंट्रल झनाना शाळेंतून बदलून लवकरच इकडे घेण्यांत येईल. परीक्षा पास नसलेल्या एका शिक्षकिणीचे ऐवजीं परीक्षा पास झालेली एक शिक्षकिण नेमण्यांत आली. पहिलें वर्ष पास असलेल्या तीन ट्रेंड शिक्षकांस दुसरे वर्षाचें ट्रेनिंगचे शिक्षणाकरितां पाठविण्याचें स्कूलबोर्डानें ठरविलें. पूर्ण प्राथमिक उर्दू शा. नं. १० करितां ह्या शिक्षकांची जरूरी आहे.

मुसलमान समाजांत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून लोकल ॲथॉरिटीनें कांहीं सवलती दिल्या आहेत. मुलींची संख्या ५३२ ची वाढून ६०७ झाली ह्यावरून ह्या सवलतींचा उपयोग असल्याचें सिद्ध होतें. स्कूलबोर्ड पराकाष्ठेचे प्रयत्न करीत आहे तरी सुद्धां जरूर त्या परीक्षा पास असलेल्या उर्दू शिक्षकिणी मिळूं शकत नाहींत, ही गोष्ट मोठ्या कष्टानें नमूद करावी लागते. एकंदर १९ स्त्री शिक्षकांपैकीं फक्त ५ ट्रेंड ५ उर्दू फायनल परीक्षा पास असलेल्या व इतर योग्य परीक्षा पास न झालेल्या आहेत. सरकारनें लोकल ॲथॉरिटीशीं पूर्ण सहकार्य करुन कांहीं ट्रेंड स्त्री शिक्षक दिल्याशिवाय ही स्थिती सुधारणें शक्य नाहीं. मुलींच्या शाळेंत वृद्ध ट्रेंड शिक्षक नेमण्यासही लोकमत बरेंच विरुद्ध आहे. ह्या कारणास्तव हल्लींच्या स्थितींत समाधान मानण्याखेरीज स्कूलबोर्डास दुसरा उपाय नाहीं.

**उर्दू शिक्षण विषयक मासिकें:**—रिसाला रहनुमे तालिम आणि हस्मत हीं मासिक पुस्तकें शिक्षकांच्या व मुलांच्या उपयोगाकरितां घेण्यांत येत आहेत. उर्दू शा. नं. १० मध्यें मासिक सभा भरविण्यात येतात. त्यावेळीं उर्दू सुपरवायझरांच्या देखरेखीखालीं शिक्षणविषयक व्याख्यानें व पाठ देण्यांत येतात.

**शाळागृहें:**—शा. नं. १० खेरीज इतर उर्दू शाळा भाड्याच्या इमारतींत भरतात. लोकल ॲथॉरिटीनें दरवर्षी स्वतःच्या मालकीच्या इमारती बांधण्याची योजना हातीं घेतली असल्यामुळें शाळागृहांसंबंधीं ही अडचण आतां समाधानकारक रीतीनें दूर होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

क्रीडांगणें:—शा. नं. २०, २२ आणि १० ह्या शाळांकरितां दोन क्रीडांगणांचा उपयोग करण्यांत येत आहे.

खर्च:—उर्दू शाळांतील मुलांच्या शिक्षणाकरितां ( सक्तीच्या शिक्षणक्षेत्रांतील शाळेखेरीज ) लोकल ॲथॉरिटीनें सुमारें ३७३३८ रु. खर्च केले. गतवर्षी ३७७४० रु. खर्च केले होते. चालू वर्षी सांपत्तिक परिस्थिती बिघडल्यामुळें फर्निचर व शिक्षणसाहित्य ह्यांमध्यें कपात केल्याकारणानें एकंदर खर्च गेल्यासालापेक्षां ४०२ रु. कमी झाला.

सुपरव्हिजनः—उर्दू शाळांवर दक्षतेनें देखरेख करण्याकरितां व त्यांची एकंदर कार्यक्षमता सुधारण्याकरितां मि. मिर्झा अहंमद बेग उर्दू सुपरवायझर ह्यांनीं प्रत्येक शाळा चालू वर्षी सुमारें १४ वेळां पाहिली. खालेरीज उर्दू सुपरवायझरांस जी. आर. इ. डी. नं. एस. ७८ (४५) १८ मार्च १९३० अन्वयें सक्तीच्या उर्दू शाळांसंबंधीं काम पाहण्याकरितां अटेंडन्स ऑफिसरचे अधिकार दिले आहेत. सदर उर्दू सुपरवायझर हे तिसरें वर्षाचे ट्रेनिंगची परीक्षा पास असून त्यांच्या मॅट्रिक्युलेशन व स्कूलफायनल ह्या इंग्रजी परीक्षाही पास झाल्या आहेत.

स्पेशल विषयः—उर्दू शाळा नं. १० मध्यें वरच्या तीन वर्गांत इंग्रजी भाषा हा जादा विषय शिकविण्यांत येतो. सदर वर्गांतील ९३ विद्यार्थी या योजनेचा फायदा घेत आहेत. ह्यापैकीं ६८ विद्यार्थी वार्षिक परीक्षेस बसले व ५२ पास झाले. देणगी देणारे सद्गृहस्थ व लोकल ॲथॉरिटी ह्यांच्या दरम्यान ठरलेल्या अटींस अनुसरून दरमहा १० रु. खर्च करून धोबीकाम व स्वयंपाक ह्यांचें शिक्षण जैनाबाई दोस्त महंमद पीर महंमद ह्या मुलींच्या पूर्ण प्राथमिक शाळेंत देण्यांत येत असते.

इन्स्पेक्शन व वार्षिक परीक्षा:—ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर ह्यांनीं उर्दू सुपरवायझरांच्या मदतीनें चालू सालीं सर्व उर्दू शाळांची वार्षिक तपासणी मार्च आणि एप्रील १९३३ मध्यें केली. वार्षिक परीक्षा एप्रिल महिन्यांत पहिल्या तीन आठवड्यांत घेण्यांत आल्या. उर्दू शाळा नं. १० मधून १६+१ विद्यार्थी व्हरनाक्युलर फायनल परीक्षेस पाठविण्यांत आले व त्यांपैकीं ८ पास झाले.

वार्षिक खेळांचे सामनेः—मार्च १९३३ महिन्यांत वार्षिक चढाओढीच्या खेळांचे सामने करविण्यांत आले. ह्या खेळामध्यें उर्दू शाळांतील मुलांनीं निरनिराळ्या वैयक्तिक आणि सांघिक खेळांच्या सामन्यांत आपलीं नांवें नोंदवून भाग घेतला होता. बक्षिस समारंभ मे. व्ही. ए. गडकरी चेअरमन स्कूलबोर्ड पुणें शहर म्युनिसिपालिटी ह्यांचे अध्यक्षतेखालीं ता. २१ मार्च १९३३ रोजीं झाला. तीन मुसलमान सभासदांच्या नांवें ठेविलेला ' चॅलेंज कप ' उर्दू शाळा नं. १० मुलांची या शाळेनें मिळविला. मे. चेअरमन साहेब ह्यांनीं देऊं केलेला चांदीचा पेला मास्टर पापाभाई आपाभाई ह्या शाळा नं. २३ मधील विद्यार्थ्यास मिळाला.

देणगी:—शा. नं. २३ च्या शाळागृहाचे मालक महंत बाबूदास गुरु द्वारकादास ह्यांनीं दिलेली रक्कम ३ रुपये व मिसेस अहंमदअली ह्यांजकडून मिळालेली रक्कम २१० रुपये अनुक्रमें मुसलमान मुलांस व मुलींस स्कॉलरशिप म्हणून खर्च केली. उदारपणानें दिलेल्या ह्या देणगीबद्दल मि. दोस्तमहंमद पीरमहंमद ह्यांच्या कुटुंबीयांचें अभिनंदन करणें योग्य आहे.

उपसंहारः—लोकल ॲथॉरिटीनें मुसलमान समाजाकरितां विशेष सवलती दिल्यामुळें ह्या वर्षी मुसलमान मुलींची संख्या ७३ नें वाढली. परंतु बहुतेक मुली दुसरी फार तर तिसरी इयत्ता झाल्याबरोबर शाळा सोडतात. साक्षरता टिकाऊ राहण्याच्या दृष्टीनें हें चांगलें नाहीं. विद्यार्थ्यांनीं निदान ४ थी इयत्ता पूर्ण केली पाहिजे. सर्वांस साक्षर करण्याची स्कूलबोर्डाची महत्त्वाकांक्षा आहे म्हणून पालकांनीं स्कूलबोर्डाशीं सहकारिता करावी अशी त्यांस विनंति आहे.

जी. बी. वाबळे.
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह आफिसर, स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## तक्ता नं. १.

सक्तीचे क्षेत्रांतील, सक्तीच्या शाळांमधील ३१–३–३३ रोजीं पटावरील
मुलांची संख्या दाखविणारा तक्ता.

[ ग्रूप 'ए' नाना, भवानी, गंज, घोरपडे व गुलटेकडी. ]

| अनुक्रम नंबर | शाळा नंबर. | शाळेचा प्रकार | पेठ | घर नंबर. | ३१ मार्च १९३३ रोजीं पटावरील संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुलगे | मुली | एकूण |
| १ | मुलांची शाळा नं. ९. | मराठी | नाना | २६१ | २८९ | ... | २८९ |
| २ | " शा. नं. २६ | मराठी | गंज | ९०२ | ७९ | २९ | १०८ |
| ३ | " २७ | तेलगू | भवानी | ११५२ | ५२ | १४ | ६६ |
| ४ | " २८ | मराठी | गुलटेकडी | ... | ९ | ९ | १८ |
| ५ | " २९ | मराठी | भवानी | ४४६ | ५४ | ... | ५४ |
| ६ | " ३१ | मराठी | घोरपडे | ३२ | ३२ | .... | ३२ |
| ७ | " ७ क्लास | मराठी | भवानी | १३५७ | ५० | ... | ५० |
| ८ | " १६ क्लास | मराठी | गंज | १०८ | १३१ | .... | १३१ |
| ९ | मुलींची शाळा नं. १४ | मराठी | भवानी | १३५७ | ... | १६३ | १६३ |
| १० | " १७ | मराठी | नाना | २६१ | ... | १९९ | १९९ |
| ११ | " २२ | उर्दू | भवानी | ७७२ | ... | ८५ | ८५ |
| १२ | " २३ | मराठी | भवानी | भंगीहट्टी | .... | ६१ | ६१ |
| १३ | " २४ | मराठी | गंज | १०३ | ... | १०३ | १०३ |
| १४ | " २५ | मराठी | घोरपडे | ३७ | .... | ३१ | ३१ |
| | | | | एकूण... | ६९६ | ६९४ | १३९० |

जी. बी. वाघळे,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## तक्ता नं. २.

सक्तीचें क्षेत्रांतील सक्तीचे शाळांशिवाय म्यु. शाळांतील ता. ३१-३-३३ रोजीं पटावरील संख्या दाखविणारा तक्ता.

| अनुक्रम नंबर | शाळा नंबर | शाळेचा प्रकार | पेठ | घर नंबर. | ता. ३१।३।३३ रोजा पटावरील संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुलगे | मुली | एकूण |
| १ | मुलांची शाळा नंबर ७ | मराठी | भवानी | १३५७ | १३६ | ... | १३६ |
| २ | ,, ,, १६ | ,, | गंज | १०८ | १०३ | ... | १०३ |
| ३ | ,, ,, १८ | उर्दू | ,, | १८० | १५० | ... | १५० |
| ४ | ,, ,, २० | ,, | भवानी | १०३१ | १३२ | ... | १३२ |
| ५ | ,, ,, २१ | मराठी | नाना | ७३४ | १२६ | ५३ | १७९ |
| ६ | ,, ,, २३ | उर्दू | ,, | ३५५ | १५४ | ... | १५४ |
| ७ | मुलींची शाळा नंबर ७ | मराठी | गंज | ८० | ८ | १०६ | ११४ |
| ८ | ,, ,, १० | उर्दू | भवानी | १०२१ | .... | ६४ | ६४ |
| ९ | ,, ,, ११ | ,, | नाना | ४९० | .... | ६५ | ६५ |
| १० | ,, ,, १३ | ,, | गंज | १७१ | .... | २०८ | २०८ |
| | | | | एकूण ... | ८०९ | ४९६ | १३०५ |

जी. बी. वाबळे,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## तक्ता नं. ३.

[ 'ए' ग्रूप नाना, भवानी, गंज, घोरपडे व गुलटेकडी ]
सक्तीचें क्षेत्रांतील खाजगी मदतीच्या शाळांमधील ता. ३१–३–३३ रोजीं
पटावरील संख्या दाखविणारा तक्ता.

| अनुक्रम नंबर | शाळेचें नांव. | शाळेचा प्रकार | पेठ | घर नंबर | ता. ३१–३–३३ रोजा पटावरील संख्या. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुलगे | मुली | एकूण |
| १ | डी. सी. मि, स्कूल | मराठी | नाना | भोकरवाडी ८९६ | १६० | ... | १६० |
| २ | एम. ई. मि. स्कूल | ,, | ,, | ,, | ६० | ३० | ९० |
| ३ | श्री शिवाजी मराठा प्रा. स्कूल ब्रँच | ,, | भवानी | धर्मशाळा | १०९ | २ | १११ |
| ४ | डी. सी. मि. स्कूल | ,, | ,, | भंगीहट्टी | ३१ | ३ | ३४ |
| ५ | डी. एस. बारी | ,, | गंज | २५८ | ३९ | ... | ३९ |
| ६ | डी. सी. मिशन मुलींची | ,, | नाना | भो. वाडी | ... | ६४ | ६४ |
| ७ | यु. एफ. सी. मिशन | उर्दू | ,, | .... | १२ | ७२ | ८४ |
| ८ | सी. एस्. एम्. स्कूल | मराठी | गंज | घसेटीपूल | .... | १०७ | १०७ |
| ९ | एम. ई. मि. स्कूल | ,, | ,, | महारवाडा | ५४ | ३४ | ८८ |
| १० | टी. एस. पाठक स्कूल | ,, | ,, | विठोबाचें दे. | १४५ | .... | १४५ |
| | | | | एकूण .. | ६१० | ३१२ | ९२२ |

## तक्ता नं. ४

सक्तीच्या क्षेत्रांतील सर्व शाळांमधील पटावरील विद्यार्थ्यांची
संख्या दाखविणारा तक्ता.

| अनुक्रम नंबर | शाळेचा प्रकार | ता. ३१–३–३३ रोजीं पटावरील संख्या. | | |
|---|---|---|---|---|
| | | मुलगे | मुली | एकूण |
| १ | सक्तीच्या म्यु. शाळा | ६९६ | ६९४ | १३९० |
| २ | म्यु. इतर शाळा | ८०९ | ४९६ | १३०५ |
| ३ | खाजगी मदतीच्या शाळा | ६१० | ३१२ | ९२२ |
| | एकूण... | २११५ | १५०२ | ३६१७ |

जी. बी. वावळे,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## तक्ता नं. ५

ग्रुप 'ए' नाना, भवानी, गंज, घोरपडे व गुलटेकडी.

पुणें शहर म्यु. सक्तीच्या क्षेत्रांतील शाळांमधील ६ ते ११ वर्षें वयाच्या विद्यार्थ्यांची जातवारी दाखविणारा तक्ता सन १९३२–३३

| सक्तीच्या क्षेत्रांत ता. ३१–३–३३ रोजा शाळेंत जाणारे ६ ते ११ वर्षें वयाचे विद्यार्थी | | पटावरील विद्यार्थ्यांची जातवारीनें संख्या. | | | | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुढारलेले | जैन | मध्यम | मागासलेले | | | मुसलमान | खिश्चन | इतर | एकुण | |
| | | | | | अस्पृश्य | इतर मागासलेले | एकूण मागासलेले | | | | | |
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| म्युनिसिपल शाळा. | मुलगे... | ५१ | ३६ | ३८६ | १३४ | ८३ | २१७ | ३०६ | १३ | १६ | १०२५ | |
| | मुली.... | ५५ | २४ | ३४० | १०२ | ७८ | १८० | २२४ | १३ | ६ | ८४२ | |
| | एकूण... | १०६ | ६० | ७२६ | २३६ | १६१ | ३९७ | ५३० | २६ | २२ | १८६७ | |
| खाजगी मदतीच्या शाळा. | मुलगे... | ३ | १२ | २५२ | १३७ | ... | १३७ | १८ | २९ | ४ | ४५५ | |
| | मुली... | २९ | ... | ४७ | ७३ | ६ | ७९ | ४४ | ३३ | १२ | २४४ | |
| | एकूण... | ३२ | १२ | २९९ | २१० | ६ | २१६ | ६२ | ६२ | १६ | ६९९ | |
| एकूण.... | मुलगे | ५४ | ४८ | ६३८ | २७१ | ८३ | ३५४ | ३२४ | ४२ | २० | १४८० | |
| | मुली | ८४ | २४ | ३८७ | १७५ | ८४ | २५९ | २६८ | ४६ | १८ | १०८६ | |
| | एकूण.... | १३८ | ७२ | १०२५ | ४४६ | १६७ | ६१३ | ५९२ | ८८ | ३८ | २५६६ | |

जी. वी. वायळे,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

# परिशिष्ट १

ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट स्कूलबोर्ड

सन १९३२–३३ सालचा म्युनिसिपल प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचा जातवारीचा तक्ता.

| जात | मुलांच्या शाळा | | मुलींची शाळा | | एकुण | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३१ मार्च १९३३ | ३१ मार्च १९३२ | ३१ मार्च १९३३ | ३१ मार्च १९३२ | ३१ मार्च १९३३ | ३१ मार्च १९३२ | |
| ब्राह्मण | १३६४ | १३३६ | २२७१ | २०९७ | ३६३५ | ३४४३ | |
| इतर हिंदू | ३७८५ | ३७२५ | २१८४ | १९८७ | ५९६९ | ५७१२ | |
| महार मांग | ५०० | ५१९ | १४५ | १८० | ६४५ | ६९९ | |
| ॲबॉरिजंन्स | ११ | ३ | .... | ... | ११ | ३ | |
| मुसलमान | १०८४ | १०९८ | ६१० | ५३६ | १६९४ | १६३४ | |
| ज्यू | ९ | ९ | ७ | ८ | १६ | १७ | |
| पार्शी | ३ | ... | ... | .... | ३ | ... | |
| ख्रिश्चन | ३३ | २६ | १५ | २० | ४८ | ४६ | |
| एकुण... | ६७८९ | ६७१६ | ५२३२ | ४८२८ | १२,०२१ | ११,५४४ | |

जी. वी. वावळे,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणे शहर म्युनिसिपालिटी.

## परिशिष्ट १ ( अ ब ब )

विद्यार्थ्यांची वयवारी व सामाजिक स्थिती याबद्दलचें वर्गीकरणाचा तक्ता सन १९३२-३३.

| शाळा | ५ ते ८ वर्षे | | ८ ते १२ वर्षे | | १२ ते १५ वर्षे | | १५ चे वर | | एकूण | | विवाहित | | अविवाहित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली |
| मुलांच्या शाळा .... | २२२५ | १९३ | ३०८९ | १७९ | ८३९ | १० | २५४ | ... | ६४०७ | ३८२ | ७३ | १५ | ६३३४ | ३६७ | ६४०७ | ३८२ |
| मुलींच्या शाळा ... | ९८ | १८४६ | २६ | २६२२ | .... | ५३६ | ... | १०४ | १२४ | ५१०८ | .... | १३४ | १२४ | ४९७४ | १२४ | ५१०८ |
| एकूण ... | २१२३ | २०३९ | ३११५ | २८०१ | ८३९ | ५४६ | २५४ | १०४ | ६५३१ | ५४९० | ७३ | १४९ | ६४५८ | ५३४१ | ६५३१ | ५४९० |
| एकंदर एकूण... | [illegible]३६२ | | ५९१६ | | १३८६ | | ३५८ | | १२,०२१ | | २२२ | | ११,७९९ | | १२,०२१ | |



G. B. Wab'e,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## परिशिष्ट १ क

विद्यार्थ्यांचे पालकांच्या धंदेवारीचा तक्ता. सन १९३२-३३.

| | मुलांच्या शाळा. | | मुलींच्या शाळा | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुलगे | मुली | मुलगे | मुली | मुलगे | मुली |
| इनामदार .... | १९ | १ | ४ | ५४ | २३ | ५५ |
| सरकारी नोकर ... | १०२९ | ४१ | ४४ | १४४० | १०७३ | १४८१ |
| खाजगी नोकर ... | ९८७ | ३८ | ४० | १२७९ | १०२७ | १३१७ |
| व्यापारी .... | १०२० | १९ | १४ | ७२८ | १०३४ | ७४७ |
| शेतकरी ... | ३२९ | १२ | ५ | २२४ | ३३४ | २३६ |
| मजूर .... | १३८२ | १४७ | ७ | ५५१ | १३८९ | ६९८ |
| इतर धंदा असलेले लोक .... | १६४१ | १२४ | १० | ८३२ | १६५१ | ९५६ |
| एकूण | ६४०७ | ३८२ | १२४ | ५१०८ | ६५३१ | ५४९० |

जी. वी. वावळे,
ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## परिशिष्ट १ ( ड )

म्युनिसिपल प्राथमिक शाळांतील पटावरील मुलांची संख्या व रोजची सरासरी हजेरी दाखविणारा

तक्ता सन १९३२–३३.

| शाळा | पटावरील मुलांची संख्या. | | | | रोजचे हजेरीची सरासरी. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९३२–३३ | १९३१–३२ | वाढ | कमी | १९३२–३३ | १९३१–३२ | वाढ | कमी |
| मुलांच्या शाळा | ६५०७·३ | ६४१४·१ | ९३·२ | .... | ५१९५·० | ५२६८·६ | ... | ७३·६ |
| मुलींच्या शाळा | ४९०३·६४ | ४५२८·९ | ३७४·७४ | ... | ३९७०·८७ | ३६०५·७ | ३६५·१७ | ... |
| एकुण | ११४१०·९४ | १०९४३·० | ४६७·९४ | ... | ९१६५·८७ | ८८७४·३ | ३६५·१७ | ७३·६ |

जी. वी. बावळे,
ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## परिशिष्ट २

शिक्षकांची वर्गवारी दाखविणारा तक्ता सन १९३२-३३.

| शाळा | हेडमास्तर्स | | हेडमिस्ट्रेस | | पुरुष असिस्टंट | | स्त्री असिस्टंट | | एकूण | | सर्व तक्त्यांची एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | |
| मुलांच्या शाळा . | २९ | ३ | ... | ... | ८४ | ११७ | २ | ... | ११५ | १२० | २३५ |
| मुलींच्या शाळा .. | ... | ... | २१ | ४ | .... | ... | ६५ | ६७ | ८६ | ७१ | १५७ |
| एकूण ... | २९ | ३ | २१ | ४ | ८४ | ११७ | ६७ | ६७ | २०१ | १९१ | ३९२ |
| | ३२ | | २५ | | २०१ | | १३४ | | ३९२ | | ३९२ |

जी. बी. वाघळे,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी

## परिशिष्ट २ (अ)

तारीख ३१ मार्च १९३३ रोजीं असलेल्या ट्रेंड शिक्षकांचा प्रत्येक वर्गाचे सर्टिफिकेटाचे माहितीचा तक्ता.

| लायकी | शिक्षक | | शेरा |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | |
| तिसरें वर्ष .. | १२ | १७ | |
| दुसरें वर्ष ... | २२ | २१ | |
| पहिलें वर्ष .. | ७९ | ५० | |
| एकूण ... | ११३ | ८८ | |

जी. बी. वाघळे,
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## परिशिष्ट नं. २ अ.

३१ मार्च १९३३ रोजीं असलेल्या उर्दू शाळांतील शिक्षकांचें वर्गीकरणाचा तक्ता.

| शाळा | हेडमास्तर्स | | हेड मिस्ट्रेसेस | | पुरुष शिक्षक | | स्त्री शिक्षक | | एकूण | | एकंदर सर्व तक्त्याची |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | |
| मुलांच्या शाळा | ७ | .... | ... | ... | १३ | १६ | | ... | २० | १६ | ३६ |
| मुलींच्या शाळा | ... | ... | ४ | ३ | ... | .... | १ | ११ | ५ | १४ | १९ |
| एकूण | ७ | ... | ४ | ३ | १३ | १६ | १ | ११ | २५ | ३० | ५५ |
| ट्रेंड व अनट्रेंडची एकूण | ७ | | ७ | | २९ | | १२ | | ५५ | | ५५ |

G. B. Wable.
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## परिशिष्ट २ अ.

**३१ मार्च १९३१ रोजीं मराठी शाळांमध्यें असलेल्या शिक्षकांचें वर्गीकरणाचा तक्ता.**

| शाळा | हेडमास्तर्स | | हेड मिस्ट्रेसेस | | पुरुष असिस्टंट | | स्त्री असिस्टंट | | एकूण | | सर्व तक्त्याची एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | ट्रेंड | अनट्रेंड | |
| मुलांच्या शाळा | २२ | ३ | ... | ... | ७१ | १०१ | २ | .... | ९५ | १०४ | १९९ |
| मुलींच्या शाळा | ... | .... | १७ | १ | ... | ... | ६४ | ५६ | ८१ | ५७ | १३८ |
| एकूण | २२ | ३ | १७ | १ | ७१ | १०१ | ६६ | ५६ | १७६ | १६१ | ३३७ |
| ट्रेंड व अनट्रेंड शिक्षकांची एकूण | २५ | | १८ | | १७२ | | १२२ | | ३३७ | | ३३७ |

जी. बी. वाघळे.
ॲडमिनीस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड,
पुणे शहर म्युनिसिपालिटी,

## परिशिष्ट नं. ३

सन १९३२-३३ सालचा जमेचा तक्ता. ( म्यु. प्रा. शाळा ).

| अ. नं. | बाबी | प्रत्यक्ष सन १९३२-३३ करितां रु. | आ. | पै | प्रत्यक्ष सन १९३१-३२ करितां रु. | आ. | पै. | वाढ रु. | आ. | पै | कमी रु. | आ. | पै | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिल्लक सालगुदस्त.. | १४७१४ | ११ | ९ | ३२०६ | ५ | ० | ११५०८ | ६ | ९ | ... | ... | ... | |
| १ | प्राथमिक शाळांची फी .... | ४६१७ | १ | ० | ४७१५ | १० | ९ | ... | ... | ... | ९८ | ९ | ९ | |
| २ | प्राथमिक शाळांसाठीं सरकारी ग्रँट मदत .... | ८२५२६ | ० | ० | ९२७१४ | १० | ० | ... | ... | ... | १०,१८८ | ० | ० | |
| ३ | खाजगी शाळांसाठीं सरकारी मदत .. | ३९१५२ | ० | ० | ४७५०० | ० | ० | ... | ... | ... | ८३४८ | ० | ० | |
| ४ | रिफ्रेशर कोर्सेच खर्चासाठीं सरकारी मदत ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ५ | शिक्षकांच्या शारिरिक शिक्षणासाठीं सरकारी मदत ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ६ | उर्दू शाळांतील मुसलमान मुलांना स्कॉलरशिप देण्यासाठीं सरकारी मदत .... | १०० | ० | ० | १०० | ० | ० | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ७ | शिक्षणसामुग्री. ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ८ | म्यु. हद्दींतील जमिनीवरील लोकल फंड सेस ... | ९९५ | १५ | २ | २०१२ | ३ | ५ | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| ९ | खालील लोकांकडून मिळालेल्या प्रॉमिसरी नोटांवरील व्याज ... | | | | | | | ... | ... | ... | १०१६ | ४ | ३ | |
| | (१) के. सी. ढोले ... | १० | ८ | ० | १० | ८ | ० | ... | ... | ... | | | | |
| | (२) भिमा अंबा पुराणिक प्राइझ फंड. . | १७ | ८ | ० | १७ | ८ | ० | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| | (३) शेट सुलेमान लध्धा प्राइझ फंड. ... | १७ | ८ | ० | १७ | ८ | ० | ... | ... | ... | ... | ... | ... | |
| १० | किरकोळ .... ... | १०२ | ८ | ३ | ८१९ | ० | ९ | ... | ... | ... | ७१६ | ८ | ६ | |
| ११ | म्यु. फंड ... ... | १६८४०६ | ० | ० | १७५२०० | ० | ० | ... | ... | ... | ६७९४ | ० | ० | |
| | एकूण | २९५९४५ | ० | ५ | ३२३१०६ | ६ | ११ | ११५०८ | ६ | ९ | २७१९१ | ६ | ६ | |
| | शिल्लकेसह एकंदर एकूण | ३१०६५९ | १२ | २ | ३२६३१२ | ११ | ११ | | | | | | | |

जी. बी. वायकळ.

ॲडमिनीस्ट्रेटिव्ह ऑफिसर स्कूलबोर्ड

पुणे शहर म्युनिसिपालिटी

